# श्री स्वामी दत्तावधूत

## या सिद्धयोग्याच्या सहवासात

(भाग २)

♦ संपादन व संकलन ♦

ॐ वनिता ॐ

ॐ वनिता बुक्स
मुंबई ४०० ०१२.

☯ ॐ वनिता बुक्स

☯ **पुष्प : एकोणीसावे**
प्रथमावृत्ती : १ जानेवारी २०१५ (एकादशी)
द्वितीयावृत्ती : २०१७

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

☯ **प्रकाशक**
**ॐ वनिता बुक्स**
बी २१३,
सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),
डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.
दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

☯ **मूल्य : रु. २५०/-**

# अनुक्रमणिका


- **ॐ वनिता ॐ** ........ ७
- **ॐ वनिता ॐ** ........ ८
- **सप्तचिरंजीव** ........ २०
- **हनुमान व गणपती** ........ २२
    - अधोकुंडलिनी ........ २३
    - ऊर्ध्वकुंडलिनी ........ २८
    - हनुमान किंवा मारुती अवस्था ........ ३१
    - सूक्ष्मदेहाचे शुद्धीकरण ........ ३४
- **वसंत बापट / वसुधा वाघ** ........ ३६
- **पिंडे पिंडाचा ग्रासु** ........ ४३
- **ओवी ज्ञानेशाची** ........ ५१
    - एक ........ ५६
    - दोन ........ ५९
    - कौसानी ........ ६०
    - मोटकी देहाकृती उमटे ........ ६५
    - आणि निज ज्ञानाची पहाट फुटे ........ ६७
- **द्रोणागिरी** ........ ८६
- **राणीखेत** ........ ८८
    - सहजबोध ........ ९१
    - सलोकता ........ ९३
    - समीपता ........ ९३
    - स्वरूपता ........ ९३
    - सायुज्यता ........ ९४
    - देवाचिये द्वारी ........ ९४
    - कोटी पूजा समं स्तोत्रम् ........ ९९

कोटी स्तोत्रं समं जपः ........ १००

भूताकाश ........ १०१

स्वतःचे ज्ञान ........ १०३

चित्ताकाश ........ १०३

चिदाकाश ........ १०४

कोटी जपः समं ध्यानम् ........ १०५

कोटी ध्यानम् समं लयः ........ १०६

- **कांची कामाक्षीदेवी ........ १०७**
- **मयूर नृत्य ........ ११३**

सरिस्का अभयारण्य ........ ११४

- **नारद ........ ११६**
- **सारथी ........ ११८**

सहज बोलणे हाचि उपदेश ........ १२१

- **गुंडूनाना ........ १२८**

चेन्नम्मा ........ १३१

- **अन्नपूर्णाम्मा ........ १३४**
- **अरुण दाभोळकर ........ १३७**

वैष्णोदेवी दर्शन ........ १३८

देसाई ........ १३९

- **चामुण्डादेवीचे दर्शन ........ १४१**
- **मनोज-अस्मिता ........ १४३**
- **ए. डी.आय. साहेब ........ १५०**
- **तो कोण होता? ........ १५६**
- **रक्षाकवच ........ १५९**
- **असेही भक्त ........ १६५**
- **ऋषी ........ १६९**
- **ईश्वर व सैतान ........ १७५**
- **राधा ........ १८०**

- **श्रीदत्त प्रसंग** ........ **१८१**
- **निमित्त** ........ **१८५**
- **काही दिव्य अनुभव** ........ **१९१**
  - निद्रानाशातून मुक्ती ........ १९१
- **बाधा पळाली** ........ **१९३**
- **डोक्यातील जटा** ........ **१९५**
- **प्रभाव श्रीदत्तस्तोत्राचा** ........ **१९८**
- **श्रीदत्तस्तोत्र** ........ **२०१**
- **मृतात्म्याने केले मार्गदर्शन** ........ **२०२**
- **व्यसन सुटले** ........ **२०५**
- **इच्छापूर्ती** ........ **२०८**
- **माशाचा काटा** ........ **२१०**
- **बिपिन व अश्विनी** ........ **२१२**
  - २५ जुलै २०१० गुरुपौर्णिमा ........ २१५
- **सौ. प्रतिभा मुळ्ये** ........ **२२६**
  - श्री. प्रभाकर मुळ्ये ........ २३२
- **सौ. नलिनी उमेश राव** ........ **२३६**
  - मला पडलेले स्वप्न ........ २३७
  - श्री. निलेश उमेश राव ........ २४०
  - सौ. स्वाती निलेश राव ........ २४१
- **श्री. विश्वास निमकर** ........ **२४४**
- **निरुपमा शेवडे** ........ **२४७**
  - चोरांपासून रक्षण ........ २४७
  - लग्न ठरले ........ २४८
  - व्याधीपासून सुटका ........ २४८
  - पुस्तकांची सेवा ........ २४९
  - देवीभक्ती ........ २५०
- **सौ. वैशाली मुजुमदार** ........ **२५१**

- **नंदिनी-शेखर** ........ **२५८**
  - पक्ष्यांचा कलकलाट ........ २६९
- **सौ. लिना भंगाळे** ........ **२७१**
- **पाडळे कुटुंब** ........ **२७३**
  - मनाली पाडळे ........ २७३
  - नेहा पाडळे ........ २७५
  - राजीव पाडळे ........ २७७
  - शुभम पाडळे ........ २७७
  - रुचिका पाडळे ........ २७८
  - उत्तम पाडळे ........ २७९
  - संकेत पाडळे ........ २८०
- **अर्पणा मंडावडे** ........ **२८१**
  - अमर मंडावडे ........ २८३
- **दीपा शेंबेकर** ........ **२८४**
- **नंदन चौगुले** ........ **२८८**
- **सौ. सुजाता माळवे** ........ **२९२**
- **सौ. प्रतिभा मुकुंद लागू** ........ **२९४**
- **सौ. रश्मी ओक** ........ **३०१**

मिलिंद ओक ........ ३०५
- **सौ. वैशाली सांडीम** ........ **३०९**
- **सौ. मनिषा देसाई** ........ **३१५**
- **डॉक्टर मिलिंद पाटील** ........ **३२३**
- **प्रकाशकाचे निवेदन** ........ **३२७**

# ॐ वनिता ॐ

**श्रीस्वामी दत्तावधूत या** **सिद्धयोग्याच्या सहवासात भाग-१** या पुस्तकामध्ये माझ्याविषयी तसेच मला आलेल्या श्रीस्वामीजींच्या अनुभवांविषयी बरेच काही लिहिले आहे.

जेव्हा **भाग-२** प्रसिद्ध करण्याचे आम्ही ठरवले तेव्हा अनेक भक्तांनी मला सांगितले की, या पुस्तकाचे कितीही भाग प्रसिद्ध झाले तरी पहिला अध्याय ताई तुमचाच असला पाहिजे कारण आम्हाला माहीत आहे की, हजारो पाने लिहिता येतील इतके तुमचे अनुभव आहेत.

अमेरिकेहून मनोज, अस्मिता यांनी फोन करून सांगितले, 'ताई! तुमचे अनुभव तर लिहाच पण त्याचबरोबर श्रीस्वामीजींनी तुम्हाला जे आध्यात्मिक ज्ञान दिले त्या ज्ञानासंदर्भातही तुम्ही लिहा!' सुजाता माळवे हिने अमेरिकेहून फोन करून सांगितले, 'तुमच्या अनुभवांबरोबर तुमचे चरित्रही लिहा! आध्यात्मात प्रगती होण्यासाठी किती सद्‌गुणांची तसेच सहनशक्तीची आवश्यकता असते हेही लिहा!' कॅनडाच्या मेघलनेही अगदी हेच सर्व सांगितले. सर्व सद्‌भक्तांच्या इच्छेला मान देऊन माझे अनुभव पुढे लिहित आहे.

*या पुस्तकातील मजकूर सत्य घटनांवर आधारित आहे; फक्त काही ठिकाणी काल्पनिक नावे दिली आहेत.*

**ॐ वनिता ॐ**

# ॐ वनिता ॐ

**श्री**स्वामी दत्तावधूतांविषयी लिहिताना मला नेहमीच असे वाटते की, मी कितीही पुस्तके लिहिली तरी हे लिखाण कधीच संपणार नाही. काही गोष्टी अशा असतात की, त्यांची नोंद कोठेतरी होणे आवश्यक असते, म्हणून असंख्य अनुभवांपैकी फक्त काही अनुभवांची नोंद मी येथे करत आहे.

अरण्यामध्ये श्रीस्वामीजींची साधना, तपस्या चालू होती. साधनेमध्ये त्यांना अनेक मंत्र स्फुरत. हे मंत्र ते एका रजिस्टरमध्ये लिहून ठेवीत. सवडीनुसार मंत्रांचे प्रयोग करत. मंत्राचा प्रयोग केल्यानंतर त्या मंत्रदेवता त्यांच्यासमोर प्रकट होऊन व मंत्रामध्ये आपले अस्तित्व आहे असे सांगून मंत्रास आशीर्वाद देत व मंत्राचे विधी-विधान समजावून देत. असे पुष्कळ मंत्र त्यांनी एका रजिस्टरमध्ये लिहून ठेवलेले होते.

**प्र**मिला नांवाची एक १०-१२ वर्षांची मुलगी श्रीस्वामीजींकडे अगदी लहानपणापासून येत असे. ९-१० वर्षांची असल्यापासून तिला

ध्यान लागत असे व ध्यानामध्ये खूप दिव्य अनुभव येत असत. ध्यानामध्ये अनेक देव-देवता व ऋषींची दर्शने होत असत. पुष्कळवेळा ती तास-दीड तास श्रीस्वामीजींसमोर बसून ध्यान करत असे. अर्थात त्यामुळे श्रीस्वामीजींनाही तिच्यासमोर बसून रहावे लागत असे. प्रकाशमान अशा तिच्या सूक्ष्मदेहामध्ये कुंडलिनी कशाप्रकारे प्रवास करत आहे, एखाद्या चक्रामध्ये किंवा सूक्ष्म शरीरातील अदृश्य नाडी प्रवाहामध्ये कुंडलिनी कोठे अडकत तर नाही ना! इकडे लक्ष ठेवावे लागत असे. कारण सूक्ष्म शरीरात कुंडलिनी अडकली तर साधक वेड्यासारखे चाळे करू लागतो किंवा त्याला उन्मादित अशी अवस्था प्राप्त होते किंवा त्याचे ध्यान उतरतच नाही म्हणजे कोमासारखी अवस्था प्राप्त होते, इत्यादी काहीही प्रकार घडू शकतात. श्रीस्वामीजींना याचे ज्ञान असल्याकारणाने ध्यान करणाऱ्या व्यक्तीवर त्यांना सतत लक्ष ठेवावे लागत असे.

एकदा एक स्त्री श्रीस्वामीजींसमोर ध्यान करत बसली होती. विशुद्धचक्राच्या वर कुंडलिनी का जात नाही हे श्रीस्वामीजींच्या लक्षात येईना; सूक्ष्मदेहात तर काहीच प्रॉब्लेम नव्हता. शेवटी श्रीस्वामीजींनी स्वतः उठून काय अडचण आहे ते पाहिले तेव्हा केसामध्ये लोखंडी हेअरपीन्स लावलेल्या असल्याकारणाने त्या कुंडलिनीला अटकाव करत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. श्रीस्वामीजींनी मला बोलावले व त्या हेअरपीन्स काढण्यास सांगितले. मी त्या हेअरपीन्स काढल्या. त्यानंतर त्या स्त्रीची कुंडलिनी सहस्त्रारचक्रापर्यंत पोहोचली.

ध्यानातून उठल्यानंतर त्या स्त्रिने सांगितले, ‘माझ्या डोक्यातील हेअरपीन्स काढल्यानंतर अत्यंत प्रकाशमान असे सहस्त्रदल कमळ मला दिसले, ज्योति दिसली, गरुड दिसला व भगवान् विष्णूंचे

दर्शन झाले.' हा अनुभव जेव्हा तिने मला सांगितला, तेव्हा तिच्या चेहऱ्यातून अक्षरशः प्रकाश बाहेर पडत होता. आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. श्रीस्वामीजींच्या सान्निध्यामध्ये असंख्य साधक स्त्री-पुरुषांना असे अनुभव येत असत.

प्रमिला श्रीस्वामीजींसमोर बसून ध्यान करत असे व तिचे ध्यान उतरेपर्यंत श्रीस्वामीजीही तेथेच का बसून रहात, यावर व्यवस्थित प्रकाश टाकण्यासाठी मी वरील गोष्ट तुम्हाला सांगितली. त्याचप्रमाणे प्रगाढ ध्यान लागण्यास सुरुवात झाल्यानंतर किती काळजी घ्यावी लागते हा विषय वाचकांच्या लक्षात यावा म्हणून हे सर्व मी तुम्हाला सांगत आहे.

तिचे ध्यान कुठल्याही आवाजाने उतरत नसे. प्रमिला एकदा श्रीस्वामीजींसमोर बसून ध्यान करत होती. श्रीस्वामीजींजवळ एक छोटीशी बासरी होती. त्यांनी ती बासरी सहज हातात घेतली व वाजवायला सुरुवात केली. बासरीतून सूर बाहेर पडताच प्रमिलाचे ध्यान उतरले.

प्रमिलाचे ध्यान उतरल्यानंतर ध्यानात आलेला अनुभव, ती श्रीस्वामीजींना सांगत असे. बासरीच्या सुरांनी ध्यान उतरल्यानंतर तिने ध्यानात आलेला अनुभव श्रीस्वामीजींना सांगितला परंतु बासरी वाजवल्याकारणाने माझे ध्यान उतरले असे काही ती म्हणाली नाही. यावरून दोन गोष्टी श्रीस्वामीजींच्या लक्षात आल्या.

१) बासरी वाजवल्याने प्रमिलाचे ध्यान उतरते.

२) बासरी वाजवून तिचे ध्यान उतरते हे तिच्या लक्षात येत नाही.

प्रमिलाचे ध्यान उतरविण्याची किल्ली श्रीस्वामीजींच्या हातात आली होती. दुसऱ्या दिवसापासून प्रमिलाने पंधरा-वीस मिनिटे ध्यान केले, की श्रीस्वामीजी बासरीचे एक-दोन सूर वाजवत व प्रमिलाचे ध्यान उतरवित.

चार-पाच दिवस असे झाल्यानंतर श्रीस्वामीजींनी आश्रमात राहणाऱ्या ९-१० वर्षांच्या प्रमोद नांवाच्या प्रमिलाच्या भाच्याला अगदी हळू बासरी वाजवण्यास सांगितले.

बासरीचे सूर कानावर पडताच प्रमिलाचे ध्यान उतरले.

श्रीस्वामीजींना अतिशय आनंद झाला. ते प्रमोदला म्हणाले, ''तुझी मावशी ध्यानाला बसली की, तू येथे बसत जा व पंधरा-वीस मिनिटांनी हळूच बासरी वाजव व मावशीचे ध्यान उतरव!''

आता प्रमिला ध्यानाला बसल्यानंतर तिच्यासमोर बसून राहण्याची श्रीस्वामीजींना काहीच आवश्यकता उरली नव्हती. प्रमोद तिच्या समोर बसत असे व त्याला कंटाळा आला की बासरीचे सूर काढून आपल्या मावशीचे ध्यान उतरवित असे. श्रीस्वामीजी आपली इतर कामे करण्यास आता मोकळे झाले होते. प्रमिलाच्या ध्यानाच्या चिंतेतून त्यांची पूर्णपणे सुटका झाली होती.

अरण्यामध्ये श्रीस्वामीजी साधना करत असताना त्यांना अनेक मंत्र स्फुरत, ते मंत्र श्रीस्वामीजी एका रजिस्टरमध्ये लिहून ठेवत, हा विषय मी तुम्हाला सांगत होते. तो सांगता सांगता मध्येच मी तुम्हाला प्रमिलाची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. मी असे का केले असा प्रश्न वाचकांना पडला असेलच पण त्याला कारणही तसेच आहे.

एकदा श्रीस्वामीजी आपल्या झोपडीत ईश्वरचिंतन करत बसले

होते. अचानक त्यांना एक मंत्र स्फुरला. त्या मंत्रामध्ये फक्त चार-पाच अक्षरे होती. जवळच पडलेल्या एका कागदाच्या चिटोऱ्यावर त्यांनी तो मंत्र लिहिला. कागदाच्या चिटोऱ्यावर लिहिलेला मंत्र श्रीस्वामीजी वाचत होते. इतक्यात प्रमिलाने त्यांच्या झोपडीत प्रवेश केला आणि त्यांच्यासमोर बसून विचारले, ''काय वाचताय?''

श्रीस्वामीजींनी आपल्या हातातील कागदाचा चिटोरा, ज्याचा आकार जेमतेम एक इंच x दोन इंच होता, तो तिच्या हातात दिला.

त्या चिमुकल्या चिटोऱ्यावर प्रमिलाची नजर पडताच तिचे डोळे मिटले गेले व ती प्रगाढ ध्यानात गेली. तर्जनी व अंगठ्याच्या चिमटीत धरलेला तो चिटोरा तसाच हातात होता. डोळे मिटताच हात खाली येऊन गुडघ्यावर स्थिरावला.

प्रमिलाला प्रगाढ ध्यान लागले हे श्रीस्वामीजींच्या लक्षात आले परंतु ज्या तीव्र वेगाने तिला ध्यान लागले, तो वेग पाहून ''काहीतरी घोटाळा झालेला आहे,'' हे श्रीस्वामीजींच्या लक्षात आले.

एखादी व्यक्ती जेव्हा श्रीस्वामीजींसमोर ध्यानाला बसत असे तेव्हा श्रीस्वामीजी त्याच्या सूक्ष्मदेहाकडे (Astral body) लक्ष ठेवीत असत. पण येथे त्यांना अजब प्रकार दिसला. असा प्रकार त्यांनी कधीही पाहिला नव्हता.

प्रमिलाच्या स्थूलदेहातून सूक्ष्मदेह गायब झाला होता. तो कोठेतरी निघून गेला होता. त्याला शोधणे अतिशय कठीण होते. सामान्य भाषेत याला मृत्यू असे म्हणतात. प्रमिलाचा श्वासोच्छ्वास पूर्णपणे बंद झाला होता. नाडीचे ठोकेही बंद झाले होते. अशा परिस्थितीमध्ये काय करावे हे श्रीस्वामीजींना सुचत नव्हते. मन एकाग्र होत नव्हते. त्यामुळे एकाग्र मनाने प्रार्थना करून देवतांची मदत घेणेही शक्य होत

नव्हते. अर्धा-पाऊण तास असाच गेला.

अशा अत्यंत कठीण परिस्थितीत ध्यानस्थ व्यक्तीच्या डोक्यावर बर्फ ठेवतात. श्रीस्वामीजी जंगलातील झोपडीत रहात असल्याकारणाने त्यांच्याजवळ बर्फ नव्हता परंतु खूप गार पाणी होते. त्यांनी गार पाण्याची धार तिच्या ब्रह्मरंध्रावर धरली परंतु काहीही उपयोग झाला नाही. सुमारे पंचेचाळीस मिनिटे बासरी वाजवली तरी काही उपयोग झाला नाही. त्यांनी प्रमोदला बोलावले व बासरी वाजवण्यास सांगितले. त्याने सुद्धा मोठमोठ्याने बासरी वाजवली परंतु काही उपयोग झाला नाही. प्रमोद सुमारे एक तास बासरी वाजवत राहिला. तासाभराने प्रमोद श्रीस्वामीजींना म्हणाला, ''माझी छाती फुटायची वेळ आली. परंतु मावशीचे ध्यान काही उतरत नाही!'' असे म्हणून त्याने बासरी वाजवणे बंद केले.

श्रीस्वामीजींना आता काय करावे हे सुचेना, शेवटी त्यांनी डोळे मिटले व परमेश्वराची आर्ततेने प्रार्थना केली. तेव्हा त्यांना त्यांच्या मिटलेल्या डोळ्यासमोर मंत्राचा कागद दिसू लागला...

श्रीस्वामीजींनी डोळे उघडले. प्रमिलाच्या चिमटीमध्ये मंत्राचा कागद त्यांना दिसला. हा कागद काढल्यानंतर प्रमिलाचे ध्यान उतरेल म्हणजेच प्रमिलाचा सूक्ष्मदेह जो शरीर सोडून गेला आहे व कोठेतरी अडकला आहे, तो पुन्हा परत येईल असा आत्मविश्वास त्यांना वाटू लागला.

प्रमिलाचा देह लाकडाप्रमाणे कडक व जमिनीत रुतलेल्या दगडाप्रमाणे स्थिर झालेला होता. कागदाचा तुकडा न फाटता अलगदपणे चिमटीतून बाहेर काढणे आवश्यक होते. सुरुवातीला त्यांनी खूप प्रयत्न केला. परंतु ती चिमूट त्यांना सैल करता आली नाही. शेवटी त्यांनी ईश्वराची प्रार्थना केली. दोन्ही हातांनी प्रयत्न करूनही न उघडणारी चिमूट

प्रार्थना केल्यावर उघडली.

चिमूट उघडताच कागदाचा तुकडा खाली पडला व एखाद्या झाडावरून ज्याप्रमाणे फळ खाली पडावे त्याप्रमाणे प्रमिला आपल्या देहात परत आली.

श्रीस्वामीजींनी तात्काळ तिला पाणी पिण्यास दिले. ती दोन-तीन ग्लास पाणी प्यायली. श्रीस्वामीजींनी प्रमोदला चहा घेऊन येण्यास सांगितले. एक मोठा कप भरून चहा प्यायल्यावर ती या विश्वात परत आली व आपला अनुभव सांगू लागली.

''कागदाच्या त्या एवढ्याशा चिटोऱ्यावरील मंत्राची ती चार-पाच अक्षरे वाचताच बुलेटच्या वेगाने मी हिमालयातील एका विशाल गुहेत जाऊन पोहोचले. मी दुसऱ्या सेकंदाला हिमालयात होते. माझ्यासमोर साठ-सत्तर फूट उंचीचे एक विशालकाय ऋषी बसलेले होते. त्यांच्याकडे पाहताना मान खूप उंच करून पाहावे लागत होते.''

त्यांनी विचारले, 'तू तो मंत्र का वाचलास?' असे मंत्र सामान्य लोकांनी वाचायचे नसतात. तो मंत्र वाचल्याकारणाने तू येथे येऊन पोहोचली आहेस. एकदा येथे आल्यानंतर परत जाता येत नाही, तेव्हा तुला आता परत जाता येणार नाही! हा मंत्र इतका गहन व गुप्त आहे की, मी स्वतः या मंत्राचा अकरा हजार वर्षे जप केला आहे. तेव्हा मी साधक अवस्थेत होतो. या घटनेला लाखो वर्षे होऊन गेलेली आहेत. अशा या गूढ व रहस्यमय मंत्राचे तू उच्चारण केल्याने येथे येऊन पोहोचली आहेस. गेल्या लाखो वर्षात येथे कोणीही मनुष्य आलेला नाही.

मी खूप गयावया करू लागले. त्यांना विनवण्या व प्रार्थना करू लागले. असा किती वेळ गेला ते मला कळले नाही व अचानक

बुलेटच्या वेगाने मी माझ्या देहात परत आले. प्रमिलाने आपला अनुभव सांगितला.

या घटनेनंतर श्रीस्वामीजींनी मंत्रांचे रजिस्टर एका पेटीत ठेवण्यास सुरुवात केली. सर्व मंत्र लिहून पूर्ण झाल्यानंतर श्रीस्वामीजींनी प्रार्थना केली की, ''या मंत्राचा दुरुपयोग होऊ नये किंवा या मंत्रांमुळे कोणाचे जीवन संकटात येऊ नये याची काळजी घेतली जावी,'' असे म्हणताच... मंत्रांचे रजिस्टर बंद पेटीतून अदृश्य झाले.

**नि**र्मला नांवाची दोन वर्षांची मुलगी होती. मला श्रीस्वामीजींकडे जायचे आहे असा हट्ट ती आपल्या आईकडे करत असे. तिला कडेवर घेऊन तिची आई चार किलोमीटर चालत श्रीस्वामीजींकडे येत असे. श्रीस्वामीजींसमोर आल्यावर मात्र निर्मला मान खाली घालत असे व डोळे मिटून घेत असे. तिची आई खेडवळ कोंकणी भाषेत श्रीस्वामीजींना सांगत असे, ''घरी ही सारखी श्रीस्वामीजींकडे चल असे म्हणते व इथे आल्यावर खाली मान घालून बसते. तुमच्याकडे बघत पण नाही.''

श्रीस्वामीजी यावर काहीही बोलत नसत. ही मुलगी जेव्हा दहा-अकरा वर्षांची झाली तेव्हा मी तिला प्रथम पाहिले. ती कधीही श्रीस्वामीजींकडे पहात नसे. मी तिला याचे कारण विचारले, तेव्हा ती म्हणाली, ''त्यांच्या देहात असंख्य देव-देवता मला दिसतात. ते तेज मला सहन होत नाही म्हणून मी त्यांच्याकडे पहात नाही.''

श्रीस्वामीजी त्या अरण्यातील आपली तपस्या आटोपून, नंतर नागार्जुनसागरला राहू लागले. निर्मला लग्न करून आपल्या सासरी निघून गेली. निर्मला चाळीस वर्षांची होईपर्यंत उघड्या डोळ्यांनी

श्रीस्वामीजींकडे पाहू शकत नसे. नंतर मात्र ती उघड्या डोळ्यांनी श्रीस्वामीजींकडे पाहू लागली.

या विषयावर बोलताना श्रीस्वामीजी म्हणाले, ''एखाद्या स्तोत्राचे पंचेचाळीस हजार पाठ केले असता ती देवता आपल्या देहात येऊन रहाते. तुम्ही अनेक देवतांच्या स्तोत्रांचे पाठ करू शकता व देवतांची कृपा संपादन करू शकता. देवता शक्य तो सात्त्विक असावी. उग्र शक्तींच्या स्तोत्रांचे पाठ करू नयेत. त्याचे अनुभव खूप भयानक असतात. त्याने शरीरात तमोगुण वाढतो. प्रसंगी वेडही लागते. या जन्मी तसेच पुढच्या अनेक जन्मी तामसी शक्तींचे त्रास भोगावे लागतात!''

'मंत्रांचे जे रजिस्टर अदृश्य झाले, ते कोठे गेले?' असे मी श्रीस्वामीजींना विचारले, तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले,

''पृथ्वीतलावर अनेक गुप्त आश्रम आहेत. या गुप्त आश्रमामध्ये मोठमोठी ग्रंथालये आहेत. त्यातील एखाद्या आश्रमामध्ये हे रजिस्टर गेले असेल. योग्य साधकांना त्यातील मंत्र आपोआप प्राप्त होतील. या गुप्त आश्रमांमध्ये शेकडो वर्षांपासून साधना करणारे साधक राहतात. योगी-योगिनी राहतात. त्यांचे देह चिरंजीव असतात. ईश्वराच्या कृपेनेच अशा आश्रमात प्रवेश मिळतो व दुर्लभ अशा महान योग्यांचे दर्शन होते. विविध प्रकारच्या मंत्रांची येथे अनुष्ठाने केली जातात. येथील काही योगी **नित्यसिद्ध** आहेत, काही **साधनासिद्ध,** तर काही **कृपासिद्ध** आहेत.''

**श्री दुर्गा – नित्यसिद्ध म्हणजे काय?**

**श्री दत्त –** नित्यसिद्धांना व्यवहारी भाषेत परमेश्वर म्हटले जाते. सृष्टीच्या आरंभापासून हे ईश्वरच असतात. कुठल्याही कारणासाठी हे पृथ्वीलोकावर किंवा अन्य कुठल्याही लोकावर अवतार धारण करत नाहीत. यांचे देह **महाशून्यमय, चैतन्यमय** व **परमशक्तीमय** असतात. **सर्वव्यापी** आणि **परमज्ञानी** असतात. यांच्या चैतन्यमय देहामध्ये सूक्ष्मदेह व कारणदेह नसतो. तसेच महाकारणदेहही नसतो. हे सर्व चैतन्यमय असतात. एक असले तरी असंख्य असतात व असंख्य असले तरी एक असतात. यांनाच आपण **परमेश्वर** म्हणतो. हे देव-देवतांना निर्माण करतात. **महाकारणदेह, कारणदेह, सूक्ष्मदेह** व **स्थूलदेह** या सर्व गोष्टी हेच निर्माण करतात. **मन, बुद्धी, चित्त, अहंकार** हेच निर्माण करतात. किंबहुना विश्वाच्या खेळाची सुरुवात यांनीच केली आहे. ज्याला आपण चांगले म्हणतो ते यांनीच निर्माण केले आहे. ज्याला आपण प्रकाश म्हणतो तोही यांनीच निर्माण केला आहे. बिन्दुरूपेण महाकारणदेह रूपाने हेच सर्व मानवाच्या शरीरात वास्तव्य करून राहतात. ज्याला आत्म्याचा प्रकाश म्हणतो ते हेच असतात. ज्याला आत्मज्ञान म्हणतो ते हेच असतात. पृथ्वीवर येणारे सर्व ज्ञान व विज्ञान यांच्याकडूनच येत असते. कृपा, आभा, प्रेम, तेजस्विता, करुणा या सर्व गोष्टी यांच्याकडूनच पृथ्वीतलावर येत असतात. शांती, समाधान, आनंद इत्यादी सद्‌गुणही यांच्या कृपेनेच प्राप्त होत असतात. यांच्या अस्तित्वामुळेच विश्व श्वास घेत असते.

**श्री दुर्गा – साधनासिद्ध** व **कृपासिद्ध** म्हणजे काय?

**श्री दत्त –** जो साधना करून सिद्ध होतो त्याला **साधनासिद्ध** म्हणतात व गुरुच्या कृपेने जो सिद्ध होतो त्याला **कृपासिद्ध** म्हणतात.

सिद्ध होणे म्हणजे परम चैतन्याशी एकरूप होणे. चैतन्यमय होणे. मनाचे अस्तित्व नष्ट करणे, मन उन्मन करणे म्हणजेच सिद्ध होणे.

**श्री दुर्गा – एखाद्या सामान्य माणसाला जर ईश्वरस्वरूप अशी सिद्धावस्था प्राप्त करून घ्यायची असेल तर त्याने काय करावे?**

**श्री दत्त** – ही गोष्ट खूप कठीण आहे. या मार्गामध्ये अगदी पावलोपावली आपले प्रारब्धच आपल्या आड येत असते. खूप खूप सेवा करून आपले प्रारब्ध शुद्ध करावे लागते. आपल्या पूर्वजांचेही प्रारब्ध शुद्ध करावे लागते. यासाठी खूप कष्ट करावे लागतात. प्रारब्ध शुद्ध झाले की, पुढील मार्ग सोपा होत जातो. सत्पुरुष वेगवेगळ्या मार्गाने परीक्षा घेतात. भक्त नीट तयार झाला का पाहतात व मग पुढील साधना कशा करायच्या ते शिकवतात. या कलियुगामध्ये कांद्यासारखे गुरुंचे पीक आलेले आहे पण खरा सत्पुरुष सापडणे दुर्मिळ झाले आहे. समाजाला चुकीची दिशा दाखवली जात आहे, परंतु अशा प्रकारे समाजाला चुकीची दिशा दाखवणाऱ्या लोकांना मृत्यूनंतर प्रचंड शिक्षांना तोंड द्यावे लागते. तेथे पश्चात्ताप करण्याससुद्धा वाव नसतो.

**श्री दुर्गा – मी कशा पद्धतिने साधना करू?**

**श्री दत्त** – आध्यात्मातील बऱ्याचशा अवस्था (stages) तुम्ही पार केलेल्या आहेत. तुम्ही आता काही करायचे शिल्लक राहिले नाही, तरी पण तुमच्या माहितीकरिता काही गूढ गोष्टी सांगतो.

सदैव शून्य स्थितीमध्ये राहण्याचा प्रयत्न करा. शून्याचेच चिंतन करा म्हणजे महाशून्यात प्रवेश होईल व महाशून्यामध्ये कायमचे कसे रहायचे ते ही पुढे आपोआप कळून येईल. ईश्वर हा नामरूपातीत, शब्दातीत असा महाशून्य आहे. शब्दाचा आधार घेऊन पुढे जायचे असते व शून्य स्थिती प्राप्त करून घ्यायची असते. या सर्व गोष्टी

कुंडलिनी व षट्चक्रांच्या पलीकडील आहेत. गुरुकृपेनेच एक-एक रहस्य आपोआप प्रकट होऊ लागतात.

कुंडलिनी, चक्रे, सहस्त्रारचक्र हा सर्व प्रवास पूर्ण केल्यानंतर योगाचा रहस्यमय भाग सुरू होतो. या रहस्यमय भागातच

**हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणता भोगिजे ।**

**बोला आधी झोंबिजे । प्रमेयासी ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

या ज्ञानेश्वरीतील वचनांचा अनुभव येऊ लागतो. तुम्हाला आता हळूहळू शब्दापलीकडील ज्ञान होऊ लागेल.

ॐ

**विचार येत वा जात । त्याजकडे रहावे पहात ।**

**ऐसे करिता चित्त । आपैसे शांत होतसे ।।**

**।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।**

# सप्त चिरंजीव

**ए**कदा मी श्रीस्वामीजींना विचारले...

''तुम्ही म्हणता हिमालयामध्ये असंख्य चिरंजीव योगी आहेत. हिमालयातच नव्हे तर गिरनार, श्रीशैल, निलगिरी, माऊंटअबू, आल्पस्, सह्याद्री तसेच उत्तर धृवावरही असंख्य ऋषी लाखो वर्षांपासून तपस्या करत आहेत. असे असतांना

**अश्वत्थामा बलीर्व्यासो ।**

**हनुमानश्च बिभिषणः ।**

**कृपः परशुरामश्च ।**

**सप्तैतः चिरंजीवः ।।**

**अर्थ** - **अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमान, बिभिषण, कृप, परशुराम** हे सात चिरंजीव आहेत म्हणजे यांना मृत्यू नाही. असे पुराणात म्हटले आहे. सिद्धाश्रम, कौशिक आश्रम असे असंख्य गुप्त आश्रम असून या आश्रमात शेकडो योगी हजारो वर्षांपासून साधना, तपस्या करत आहेत असे तुम्ही नेहमी सांगता. पुराणात फक्त सात

माणसे चिरंजीव आहेत असे म्हटले आहे. या श्लोकामध्ये काही गूढ अर्थ आहे का?

यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

वरील श्लोकाचा गूढ अर्थ असा आहे की, पृथ्वीतलावर सात प्रकारच्या माणसांचे सदैव अस्तित्व राहिल.

१) **अश्वत्थामा** – अस्वस्थ आत्मे.

२) **बळी** – कष्ट करणारी माणसे, शेतकरी, मजूर इ.

३) **बिभिषण** – आसुरी प्रवृत्तीची, विचित्र स्वभावाची, भ्रष्ट प्रवृत्तीची माणसे. देवाला भिणारी माणसे.

४) **परशुराम** – शीघ्रकोपी, पराक्रमी, दानी, राज्यकर्ते.

५) **व्यास** – लेखक, कवी, ग्रंथकर्ते, संगीतकार, गायक, नर्तक इत्यादी.

६) **कृप** – कृपा करणारे सद्‌गुरु.

७) **हनुमान** – सूक्ष्मदेह (astral body), सूक्ष्मदेहाचे ज्ञानी, आध्यात्मिक माणसे, साधक, सिद्धयोगी.

माणसांचे हे सात प्रकार सदैव पृथ्वीतलावर असतील असा वरील श्लोकाचा गूढ अर्थ आहे.

ॐ

# हनुमान व गणपती

हनुमान व गणपती या दोन्ही आकारांना आपण देव मानतो. त्यांची उपासना करतो, त्यांची मंदिरे बांधतो. श्रीगणेशाचे स्मरण केल्याशिवाय आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करत नाही. या सर्व गोष्टींच्या पाठीमागे काही गूढ रहस्ये आहेत का?

माझा प्रश्न ऐकून श्रीस्वामीजी खूपच गंभीर झाले. ते म्हणाले, "हो! हा खूपच गंभीर प्रश्न आहे."

पृथ्वीतलावरील मानवांची गंतव्य स्थाने दोन! पहिले गणपती, दुसरे हनुमान! गंतव्य स्थान म्हणजे मुक्कामावर पोहोचण्याचे ठिकाण! आपल्या जीवन प्रवासाचे अंतिम लक्ष्य! सर्व मानवांना या दोन पैकी एका स्थानावर पोहोचल्याशिवाय मुक्त होता येत नाही. गणपती ही मुक्त अवस्थेची पहिली पायरी आहे. हनुमान ही जीवन्मुक्त अवस्था आहे. हनुमान या अवस्थेनंतर पुढे बरेच काही आहे, त्याविषयी आपण पुढे केव्हातरी चर्चा करू; सध्या फक्त गणपती व हनुमान या दोन अवस्थांविषयी आपण चर्चा करू; मानवी देहामध्ये कुंडलिनीचे वास्तव्य दोन प्रकारे असते. एक अधोकुंडलिनी व दुसरी ऊर्ध्वकुंडलिनी!

ॐ

# १. अधोकुंडलिनी

तळपायापासून नितंबापर्यंतच्या भागामध्ये अधोकुंडलिनी पसरलेली असते. यातील तळपायापासून गुडघ्यापर्यंतच्या भागामध्ये भयानक अंधःकारमय अशी शक्तींची केन्द्रे असतात. यातून सुटका होणे अतिशय कठीण! हजारो लाखो वर्षे माणसाचा आत्मा या शक्तीकेन्द्रांमध्येच अडकून पडतो. पुन्हा जन्म घेतो पुन्हा मरतो. सुटकेची वाट त्याला सापडत नाही. चमत्कार करणारे हजारो साधूसुद्धा तळपायापासून गुडघ्यापर्यंतच्या भागातील शक्तीकेन्द्रांमध्येच अडकलेले असतात. जादूचे प्रयोग करून दाखवणारेही या शक्तीकेन्द्रांमध्ये अडकलेले असतात. कोट्यावधी पिशाच्चशक्तींची केन्द्रे या परिसरातच आहेत.

हातातून विभूति काढून दाखवणे, पाणी अथवा अग्नी निर्माण करून दाखवणे, रुद्राक्षाच्या माळेतून पाण्याच्या धारा काढून दाखवणे, विविध खाद्य पदार्थ तसेच लॉकेट निर्माण करून दाखवणे, स्वतःचे किंवा आपल्या सहकाऱ्याचे डोके बाजूला काढून दाखविणे, शरीराचे दोन तुकडे करून दाखवणे असे सर्व चमत्कार अधोकुंडलिनी या क्षेत्रात येतात. असे चमत्कार करून दाखवण्यासाठी जप, तप, नामस्मरण काही करावे लागत नाही. या सर्व मायावी विद्या आहेत.

भूतकाळ अचूक सांगणे. नजिकच्या भविष्यात घडणाऱ्या एक-दोन घटना सांगणे, भविष्यकाळात होणारा रोग सांगणे, आपल्या भक्तांच्या अंगामध्ये भूते घुसवून देणे व तुला शक्ती दिली आहे असे सांगणे. हे सर्व प्रकार अधोकुंडलिनीमध्ये येतात.

स्वतःच्या घरात पिशाच्चशक्ती आणून ठेवणे, मुंजा, झोटींग, बाईंगी भूत घरात आणून ठेवणे, पूर्वजांचे आत्मे अथवा स्मशानातील

आत्मे आपल्या घरात आणणे अशा सर्व गोष्टी अधोकुंडलिनीच्या प्रान्तामध्ये येतात.

या प्रान्तात भरकटलेला मनुष्य हजारो वर्षे पिशाच्चलोकात अडकून पडतो म्हणून अधोकुंडलिनीच्या अंतर्गत येणारी शक्तीकेन्द्रे कधीही जागृत करू नये.

ईर्षा, द्वेष, मत्सर, कपट-कारस्थान करणारे लोक, स्वार्थी माणसे अधोकुंडलिनीच्या छायेखाली येतात.

तळव्यापासून मोठ्या आतड्यापर्यंतच्या प्रान्ताला अधो-कुंडलिनीचा प्रान्त असे म्हणतात. अंधःकारमय अशा या अधो-कुंडलिनीच्या प्रान्ताला पूर्ण तेजस्वी व प्रकाशमय बनवण्यासाठी ईश्वर आत्म्याला मानवी देहाचे वरदान देऊन पृथ्वीतलावर पाठवतो. परंतु दुर्दैवाने स्वार्थाधीन होऊन मनुष्य अंधःकारातच खितपत पडून रहातो. तो बाहेर येऊ शकत नाही. यासाठी पूर्वजांनी गणपतीची उपासना म्हणजेच ॐकाराची उपासना सांगितली आहे. अंधःकाराचा प्रान्त जिथे संपतो, तेथून उषःकालीन गुलाबी, सोनेरी, लालसर असा प्रकाशमय प्रान्त सुरू होतो. या प्रान्ताला गणपतीचा प्रान्त असे म्हणतात. येथून ऊर्ध्वकुंडलिनीचा प्रान्त सुरू होतो. योगाच्या भाषेत याला मूलाधारचक्र असे म्हणतात.

अधोकुंडलिनी ज्यांनी जागृत केलेली आहे, त्या सर्वांचे अनुभव मला माझ्या या पुस्तकात समाविष्ट करता येणे शक्य नाही. परंतु अधोकुंडलिनीचा विषय नीट समजावा म्हणून माझे काही अनुभव पुढे देत आहे.

प्रसिद्धीच्या झोतात असलेले व जाहिरातबाजी करणारे जितके काही विद्याधर अस्तित्वात आहेत, ते सर्व अधोकुंडलिनीच्या क्षेत्रात

येतात. हे श्रीस्वामीजींनी मला स्वतः सिद्ध करून दाखवले आहे.

एकदा आम्ही दक्षिण भारतात प्रवास करत होतो. बंगलोर, उटीहून कावेरी नदीच्या उगमाजवळ तलकावेरी येथे गेलो. तेथून मधुमलईच्या जंगलातून फिरलो व मुन्नार येथे आलो. मुन्नार येथे आम्ही एका हॉटेलमध्ये राहिलो होतो.

हॉटेलच्या मॅनेजरने सांगितले, ''हॉटेलच्या हॉलमध्ये रात्री जादूचे प्रयोग दाखविले जाणार आहेत, ते अवश्य पहायला या!''

आम्ही श्रीस्वामीजींना जादूचे प्रयोग पहायला येण्याचा आग्रह केला परंतु ते आले नाहीत. पण आम्हाला 'जरूर जा!' म्हणून सांगितले. आम्ही प्रयोग पहायला गेलो.

जादूगाराने विविध जादूचे प्रयोग दाखविले. ते सगळेच अद्‌भुत होते. जादूगाराने एक ओढणीसारखा कपडा घेतला, तो रॉकेलमध्ये भिजवला व त्याची गोलाकार रिंग बनवून ती स्वतःच्या डोक्यावर ठेवली. जादूगाराच्या सहाय्यक माणसाने ती रिंग पेटवली व त्यावर पाणी भरून पातेले ठेवले व त्यात चहा पावडर, साखर, दूध इत्यादी घालून चहा तयार केला. डोक्यावर बराच वेळ चहा उकळत होता. चहाचा सुगंध संपूर्ण हॉलभर दरवळत होता. चहा तयार झाल्यावर त्याने प्रेक्षकातील चार-पाच लोकांना बोलावून ती आग खरी आहे याची खात्री करून दिली. प्रेक्षकातील काही लोकांनी त्या आगीवर कागद पेटवला, सिगरेट पेटवली व आग किती खरी आहे याची खात्री केली. त्यानंतर जादूगाराच्या सहाय्यकाने डोक्यावरील कापडाची रिंग बाजूला काढली व त्यावर प्रेक्षकातील लोकांना पाणी ओतायला सांगितले. तयार झालेला चहा त्याने प्रेक्षकातील पाच-सहा लोकांना दिला.

जादूगाराने नंतर एक हवनकुंड घेतले. हवनकुंडामध्ये त्याने

समिधा व कापूर ठेवून पेटवले. भरपूर ज्वाळा झाल्यानंतर तो अग्नी खरा असल्याची खात्री करून घेण्यास प्रेक्षकातील चार-पाच लोकांना सांगितले. त्यानंतर त्या अग्नीत हात घालून त्याने अनेक रेशमी रुमाल बाहेर काढले व प्रेक्षकांमध्ये वाटले.

जादूगाराने या नंतर जो चमत्कार केला तो महाअद्भुत चमत्कार होता व प्रेक्षकांचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसणार नाही असा होता. प्रेक्षकातील एका सुंदर मुलीला त्याने बोलावले ती मुलगी आम्ही ज्या रूममध्ये रहात होतो त्या रूमपासून जवळच दुसऱ्या रूममध्ये रहात होती, त्यामुळे आम्ही तिला अनेकदा पाहिले होते. ती जादूगाराची मदतगार असण्याची मुळीच शक्यता नव्हती.

जादूगाराने त्या मुलीला स्टेजवर बोलावले एका व्हील चेअरवर बसवले. तिच्या अंगावर एक चादर टाकली. तिच्या कमरेपासून वरचा भाग कापला व तो उचलून दहा-पंधरा फूट दूर असलेल्या टेबलवर ठेवला. त्या मुलीला आम्ही आता दोन तुकड्यांमध्ये पहात होतो.

कमरेपासून वरचा भाग टेबलावर होता व ती मुलगी हातवारे करत सर्वांशी बोलत होती. तिचा कमरेखालील भाग खुर्चीत होता व ती पाय हलवत होती.

सर्व प्रेक्षकांना डोळ्याचे पारणे फिटल्यासारखे वाटले. अशाप्रकारे अनेक अद्भुत चमत्कार त्याने करून दाखवले.

भारावलेल्या अवस्थेत आम्ही रूमवर परत आलो. मी श्रीस्वामीजींना सर्वकाही सांगितले. तुम्ही आला असता तर मजा आली असती असेही मी त्यांना म्हणाले, तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ‘‘या सर्व क्षुद्र विद्या आहेत. याने आत्म्याचा उद्धार होत नाही; उलट अधोगती होते, अधोकुंडलिनीच्या अंतर्गत या सर्व विद्या येतात. ताई! तुम्ही त्या

जादूगाराकडे परत जा व त्याने हे चमत्कार कसे केले हे त्याला विचारा!''

मी म्हणाले, ''स्वामीजी कुठलाही जादूगार आपले सिक्रेट सांगत नाही. मी जाऊन काहीही उपयोग होणार नाही.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''जा, तर खरं!''

श्रीस्वामीजी असे म्हणाल्यावर मी त्या जादूगाराकडे गेले व त्याला विचारले, ''तुम्ही हे चमत्कार कसे करता! हे मला सांगाल का?''

यावर त्या जादूगाराने आपले सर्व सिक्रेट मला सांगितले व म्हणाला, ''तुम्ही देवतात्मा असल्याकारणाने तुमच्यासमोर जर मी खोटे बोललो तर माझी विद्या नष्ट होईल म्हणून तुम्हाला खरे सांगणे भाग पडले.''

अधोकुंडलिनीची एक झलक म्हणून मी हे सर्व लिहिले आहे. पृथ्वीतलावरील हजारपैकी ९९९ लोक अधोकुंडलिनीच्या अंतर्गत येतात. परंतु ईश्वराने आत्म्याला ऊर्ध्वकुंडलिनीच्या दिशेने प्रवास करण्यासाठी मानव जन्म दिलेला असतो.

प्रेमळ व परोपकारी स्वभावाची माणसे, ईश्वरभक्ती व नामस्मरण करणारी माणसे या केन्द्रांच्या पलीकडे जातात. हे जरी खरे असले तरी माया-मोहाचे अनेक प्रान्त अशा ईश्वरभक्त माणसांच्या आत्म्यांना अडकवण्याचा सतत प्रयत्न करत असतात. सिद्धी व प्रसिद्धीच्या मागे लागलेले लोक गुडघ्यापासून नितंबापर्यंतच्या प्रान्तामध्ये कोठेतरी अडकतात व येथेच त्यांचे अनेक जन्म व्यतीत होतात.

ज्यांची जाणीव तळव्यापासून गुडघ्यापर्यंतच्या भागातच

अडकलेली आहे अशा आत्म्यांना लाखो वर्षे मनुष्य जन्मही मिळणे कठीण होते. याकरिता प्राचीन विद्वानांनी ईश्वराचे स्मरण व्हावे म्हणून मोठमोठे धर्मग्रंथ लिहून ठेवले आहेत. कारण त्या निमित्ताने तरी मानवाला उद्धाराचा मार्ग मिळावा असा या मागील उद्देश आहे. यातूनही जे लोक दुष्टपणा करतात, क्रूरकर्मे करतात त्यांच्याविषयी काही न बोललेले बरे!

ज्यांची जाणीव गुडघ्यापासून नितंबापर्यंतच्या भागामध्ये जागृत झालेली आहे, अशी माणसे जरी प्रेमळ, परोपकारी व ईश्वरभक्त असली तरी माया-मोहाचे अनेक प्रान्त येथेही असतात. यासाठी सद्सद्विवेकबुद्धीची आवश्यकता असते.

ॐ

## २. ऊर्ध्वकुंडलिनी

**मू**लाधारचक्रामध्येच गणपतीचा प्रान्त सुरू होतो. खऱ्या अर्थाने ॐकाराची सुरुवात येथून होते. येथे वास्तव्य करून रहाणाऱ्या शक्तीला कुंडलिनी असे म्हटले जाते. अंगी परिपूर्ण सात्त्विकता आणल्याशिवाय येथपर्यंत पोहोचता येत नाही. लोकांनी कमीतकमी येथपर्यंत तरी पोहोचावे म्हणून अनेक ग्रंथ लिहिले गेले. प्रत्येक कार्याच्या आरंभी श्रीगणेश स्मरण केले पाहिजे असा सक्त कायदा केला गेला. हा गणपती म्हणजे **ॐ**! हा गणपती म्हणजेच सृष्टीचा आरंभ, निराकाराचा आरंभ, निर्गुणाचा आरंभ. ॐ म्हणजेच आपला **श्वासोच्छ्वास**!

प्रत्येक मानवाने ॐ पर्यंत पोहोचावे, आपल्या श्वासोच्छ्-

वासाच्या मूळापर्यंत पोहोचावे म्हणून ॐला गणपतीचा आकार देण्यात आला. हत्तीची सोंड ॐकारासारखी दिसते, म्हणून गणपतीची प्रतिमा निर्माण करण्यात आली. खोट्यानाट्या कथांनी भरलेले गणेशपुराण लिहिण्यासाठी लेखक, कवी सरसावले पण हे सर्व करण्याच्या पाठीमागे सर्वांचा एक चांगला उद्देश होता. तो चांगला उद्देश म्हणजे...

श्रीगणेश, गजानन, गणपती म्हणजे **ॐ! ॐ म्हणजेच श्वासोच्छ्वास; याला विसरू नका!**

नाकाचा आकार पहा. ॐ सारखा दिसतो. त्यातून वाहणारा श्वासोच्छ्वास म्हणजे ॐ नव्हे का? एखाद्या लहान बाळाला उपडे झोपवा त्याच्या नितंबापासून डोक्यापर्यंतच्या भागाकडे पाहा, तेथे तुम्हाला ॐ चा आकार दिसून येईल.

या ॐ ला सामान्य जनतेसाठी सुटसुटीत करण्यात आले. हत्तीचे तोंड बसवून गजमुख नांवाच्या गणपती बाप्पाला तयार करण्यात आले. गणपती स्तोत्र व गणपती अथर्वशीर्ष लिहून गणपतीचे स्मरण सर्वसामान्य जनतेला सुलभ करून देण्याचा प्रयास करण्यात आला. या सर्व गोष्टींच्या मुळाशी समस्त ज्ञानी जनांचा एकच उद्देश होता, स्वतःचा उद्धार करून घ्या! ॐ कडे लक्ष द्या! श्वासाकडे लक्ष द्या! या सर्वांचे फलित काय झाले ते आपण पाहातच आहोत!

गणपतीची निर्मिती ही अशा प्रकारे झाली. थोडक्यात आध्यात्मिक अर्थ असा की, ईश्वराचे नामस्मरण करा, दान-धर्म करा, परोपकार करा, कोणालाही दुखवू नका, अहंकार करू नका, कोणाचे वाईट व्हावे असे चिंतन करू नका, सत्कर्म करा, दुष्टपणा करू नका, आनंद, शांती, प्रेम, समाधान, परोपकार, दान, नम्रता अशा सद्गुणांचे आचरण करा म्हणजे तुमची जाणीव विकसित होऊ लागेल व तुम्ही

गणपती या स्टेजपर्यंत पोहोचाल.

गणपती स्टेजच्या जवळपास पोहोचल्यानंतर जप, नामस्मरण, स्तोत्रपठण, पूजा-अर्चा या बाह्य उपासनेची आवश्यकता रहात नाही. प्रारब्धशुद्धी झालेली असते. पूर्वजांचा उद्धार झालेला असतो. श्वास आपोआपच ऊर्ध्व होऊ लागतो. वरवर चढू लागतो. मनात उठणारे विचारांचे वादळ शांत होऊ लागते. येथे खऱ्या अर्थाने गणपती प्रान्तात, गणेश प्रान्तात, निर्गुणाच्या प्रान्तात साधकाचा प्रवेश झालेला असतो.

येथे आपोआपच **सोऽहम्** साधना सुरू होते. श्वास घेतांना **सो** व सोडतांना **हम्** असा जो नैसर्गिक ध्वनी होत असतो. त्या ध्वनीवर फक्त लक्ष ठेवायचे असते. प्रारंभी बराच काळ श्वास घेतांना **सो** व सोडतांना **हम्** असे मनांत म्हणायचे असते. नंतर हळूहळू फक्त लक्ष ठेवले तरी पुरते. या साधनेलाच ॐकार साधना असे म्हणतात. येथे निर्गुण साधनेचा प्रारंभ होतो व हळूहळू **मनोलय** होऊ लागतो. साधक भक्तिमान असेल तर **नाद**, **बिन्दू**, **कला** अशा विविध आध्यात्मिक प्रगतीचे दिव्य अनुभव त्याला येऊ लागतात. साधकाच्या देहातच देवता प्रकट होऊ लागतात. सूक्ष्मदेह शुद्ध होतो. कुंडलिनी व चक्रे जागृत होतात. हनुमान किंवा मारुती या अवस्थेकडे साधकाचा प्रवास सुरू होतो. गणपती या स्टेजमध्ये त्याला मुक्ती प्राप्त झालेली असते. आता त्याचा प्रवास जीवन्मुक्तीच्या दिशेने सुरू झालेला असतो.

ॐ

# हनुमान किंवा मारुती अवस्था

**या** पुढील ज्ञान हे अतिशय रहस्यमय असल्याने ते मी उघड करून सांगणे योग्य होणार नाही. जेवढे थोडक्यात सांगता येईल तेवढे सांगतो.

सूक्ष्मदेह (Astral body) शुद्ध होतो, पारदर्शक होतो. साधक देहातून बाहेर पडतो व ब्रह्मांडात सूक्ष्मदेहाने फिरू लागतो. ब्रह्मांडाच्या दुसऱ्या टोकाला तो गेला तरी स्थूलदेहाबरोबरचा त्याचा संपर्क कधीही तुटत नाही. कारण स्थूलदेह व सूक्ष्मदेह यांना जोडणारी एक रूपेरी दोरी (Silver cord ) असते. ब्रह्मांडातील विविध लोकांमध्ये फिरून तेथील ज्ञान मिळवून तो परत आपल्या देहात येऊ शकतो.

रामायणामध्ये मारुतीच्या शेपटीचे बहारदार वर्णन आहे. ती शेपटी म्हणजेच रुपेरी दोरी (Silver cord )! प्रत्येक माणसाच्या नाभीतून ही सूक्ष्म दोरी बाहेर पडते. मानवी नजरेला ही दिसत नाही. मृत्यूच्या वेळी ही दोरी तुटते व स्थूलदेहाचा मृत्यू होतो.

सूक्ष्मदेह जेव्हा बाहेर पडतो तेव्हा साधक आपल्या स्थूलदेहाला पाहतो. स्थूलदेहाच्या नाभीतून सूक्ष्मदेहाच्या नाभीपर्यंत रूपेरी दोरी दिसते. ही दोरी पाऱ्याप्रमाणे चमकते. एक इंचाहून थोडी जास्त रुंद असते. जिलेटीन पेपरहूनही पातळ असते. सूक्ष्मदेह स्थूलदेहापासून जसाजसा दूर जाऊ लागतो तशीतशी ही दोरी लांब होत जाते म्हणून म्हणतात मारुतीच्या शेपटीला अंत नाही. मारुती म्हणजे सूक्ष्मदेह (Astral body) व शेपटी म्हणजे रूपेरी दोरी (Silver cord).

स्थूलदेहामध्ये सात चक्रे असतात.

**१) मूलाधार २) स्वाधिष्ठान ३) मणीपूर ४) अनाहत ५) विशुद्ध ६) आज्ञा ७) सहस्त्रार**

याशिवाय तीन उपचक्रे असतात.

**१) मनःचक्र २) सोमचक्र ३) ललनाचक्र**

स्थूलदेहामध्ये कुंडलिनी शक्ती व चक्रे असतात. या मार्गाला कुंडलिनी मार्ग असे म्हणतात.

सूक्ष्मदेहामध्ये जी चैतन्य केन्द्रे आहेत. त्यांना घाट असे म्हटले जाते. या मार्गाला पश्चिम घाट असे म्हटले जाते व यातील चैतन्य केन्द्राना...

**१) श्रीहाट २) गोल्हाट ३) औटपीठ ४) भ्रमरगुंफा ५) पूर्णगिरीपीठ ६) ब्रह्मरंध्र** असे म्हणतात.

मानवाची जाणीव (consciousness) जसजशी विकसित होत जाते, तसतशी माणसाची आध्यात्मिक प्रगती होते व तो ईश्वरात **लय** पावू लागतो. ही गोष्ट क्रमशः होत असते, एकदम होत नाही. प्रथम देहाला स्थिर करावे लागते. नंतर मन स्थिर करावे लागते. मन स्थिर झाले की विचारचक्र पूर्णपणे थांबवावे लागते. तद्नंतर कल्पनाविलास बंद करावे लागतात. विचार करणे व कल्पना करणे संपूर्णपणे थांबवावे लागते. **'हे असे असावे'** ही वृत्ती पूर्णतः सोडून द्यावी लागते. इतक्या सर्व गोष्टी जमल्या की मग सूक्ष्मदेहात प्रवेश होतो व सूक्ष्मदेहातील साधना सुरू होतात. पश्चिमेचा घाट योग्यांना चांगलाच दमवतो म्हणून याला **दमघट की घाटी** असेही म्हटले जाते.

सूक्ष्मदेह व त्याच्या साधना हा सर्व रहस्यमय भाग असून यातील थोडक्यात जे सांगता येईल तेवढे मी तुम्हाला सांगितले आहे.

स्थूलदेहाच्या आकारा एवढाच सूक्ष्मदेह असतो. स्थूल-सूक्ष्म देहाच्या भ्रूमध्यामध्ये आणखी एक देह असतो त्याला **कारणदेह** असे म्हणतात. कारणदेहामध्ये हजारो जन्मांमध्ये केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांचे गाठोडे असते. या गाठोड्याला **संचित** म्हणतात. कारणदेहातील हे संचिताचे गाठोडे जळून भस्म व्हावे लागते, तरच योगमार्गात प्रगती होते. नाहीतर साधक प्रगती करू शकत नाही. कारणदेह ज्योतिप्रमाणे दिसतो. आपल्या अंगठ्या एवढा म्हणजे सुमारे दोन इंचाचा असतो. या दोन इंच आकाराच्या ज्योतिला बघून एका संताने म्हटले आहे.

**राम झरोका बैठ के । सबका मुजरा लेत ।**

**जिसकी जैसी चाकरी । वैसा उसको देत ।।**

**कारण**देह ज्योतिसारखा दिसतो. या ज्योतिकडे पाहूनच हिन्दी संत म्हणतात...''भ्रमरगुंफेमध्ये असणारी ही ज्योति म्हणजेच राम आहे. मनुष्य चांगली-वाईट अशी जी काही कर्मे करतो त्याकडे तो साक्षी भावाने पहात आहे व ज्याचे जसे कर्म असेल तसे फळ देत आहे.''

या **कारणदेहाच्या** आतमध्ये एक **नीलबिन्दू** असतो. हा **नीलबिन्दू** म्हणजेच **महाकारण देह!** येथपर्यंत प्रवास झाल्यानंतर योगी परमेश्वर स्वरूप होतो, **चैतन्यमय** होतो.

ॐ

# सूक्ष्मदेहाचे शुद्धीकरण

**सू**क्ष्मदेहाच्या शुद्धीकरणासाठी अनेक प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला जातो. सात्त्विक देव-देवतांच्या स्तोत्रांचे पाठ केले जातात. सात्त्विक देव-देवतांच्या स्तोत्रांचे पाठ केल्याने सूक्ष्म देह तर शुद्ध होतोच, पण त्याचबरोबर ज्या देवतेच्या स्तोत्राचे तुम्ही पाठ करता त्या देवतेची कृपाही होते. अशा अनेक स्तोत्रांचे पाठ केल्याने देवतांची कृपा होते व व्यावहारिक जीवन सुखी होते. सूक्ष्मदेह शुद्ध होण्यास मदत होते. तेजस्विता वाढते. साधारणपणे कुठल्याही स्तोत्राचे एक लाख पाठ केले असता त्या देवतेची कृपा होते असा अनुभव आहे म्हणून स्तोत्र नेहमी छोटे निवडावे.

दुसरा मार्ग **नामस्मरण**. सात्त्विक देवतेचे अखंड नामस्मरण करावे. सुमारे चौदा कोटी नामस्मरण केल्यानंतर सूक्ष्मदेह बऱ्याच प्रमाणात शुद्ध होतो. येथे साधकाने सावध रहाणे आवश्यक असते. तामस शक्तींच्या स्तोत्रांचे पाठ कधीही करू नयेत. तसेच तामस शक्तींचे नामस्मरणही करू नये. नामस्मरण नेहमी सात्त्विक देवतेचे करावे. सात्त्विक देवतेचे नामस्मरण केल्याने आत्म्याची प्रगती लवकर होते. तामस शक्तीची भक्ती करणे म्हणजे शाळेत न जाता मी इंजिनिअरची परीक्षा सहज पास होईन असे म्हणण्यासारखे आहे.

तिसरा मार्ग **मंत्रजप**. एकाच आसनावर बसून न हलता न डुलता सात्त्विक मंत्राचा जप करत रहावे. पाच मिनिटांपासून सुरुवात करून साडेतीन तासांपर्यंत वेळ वाढवीत जावे.

दररोज सकाळी साडेतीन तास व संध्याकाळी साडेतीन तास याप्रमाणे सुमारे साडेतीन वर्षे साधना केली असता अतिशय दिव्य

अनुभव येतात व सूक्ष्मदेह बऱ्याच प्रमाणात शुद्ध होतो.

चौथा मार्ग **ध्यान**. ध्यान या विषयावर मी माझ्या पुस्तकांमधून बरेच काही लिहिले आहे. वाचकांनी ते मुळातून पहावे. ध्यानाने सूक्ष्मदेह पूर्णपणे शुद्ध होतो व आध्यात्मात प्रगती होते. सुरुवातीला काही काळ श्वासाबरोबर मंत्राचा जप करावा. मन एकाग्र होऊ लागल्यानंतर श्वासावर लक्ष ठेवावे. या मार्गात भरपूर प्रगती झाल्यानंतर श्वासाला सहस्त्रारचक्राकडे नेण्याचा प्रयत्न करावा. या मार्गाने सूक्ष्मदेह शुद्ध होतो.

ॐ

**विश्व ईश्वराचा खेळ । तेथे न चले ढवळा ढवळ ।**
**न जळे अहंकाराचा पीळ । मी केले म्हणतसे ।।**
**मग शिक्षा भोगणे लागे । शक्ती झोडती मागे पुढे ।**
**जाळती अहंकार कर्म भोगे । मग शांती मिळत असे ।।**

**।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।**

# वसंत बापट / वसुधा वाघ

**श्री**स्वामीजींची व माझी ओळख झाल्यानंतर एक दिवस विलेपार्ले येथील मुळ्येकाका मला म्हणाले, ''आपण श्रीस्वामीजींची पत्रिका ज्योतिषी वसंत बापट यांना दाखवूया का?''

मी 'हो' म्हणाले व श्री. मुळ्येकाकांना श्रीस्वामीजींची पत्रिका दिली.

श्रीस्वामीजींची पत्रिका पाहताक्षणी ज्योतिषी बापट म्हणाले, ''ही सत्पुरुषाची पत्रिका आहे. यांनी परब्रह्मातीत अवस्था प्राप्त केली आहे.''

मुळ्येकाकांना अतिशय आश्चर्य वाटले. १९५३ साली बनवलेली पत्रिका १९८६ साली त्यांनी बापटांच्या हातात ठेवलेली होती. ज्योतिषी बापट यांनी पत्रिका पाहताक्षणीच ही सत्पुरुषाची पत्रिका आहे हे ओळखले. यावरून **''सत्पुरुष हे जन्मावेच लागतात''** हे सिद्ध होते.

बापट यांनी श्रीस्वामीजींविषयी जे उद्‌गार काढले, त्यामुळे मला त्यांच्याविषयी खूप आदर वाटू लागला. मी त्यांची ओळख

करून घेतली. माझीही पत्रिका दाखवली. त्यांनी माझ्याविषयी खूप गोष्टी सांगितल्या. माझ्या हातून खूप मोठे ईश्वरीकार्य होणार आहे हे त्यांनी मला १९८६ सालीच सांगितले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे माझ्या हातून ईश्वरीकार्याची सुरुवात १९९० साली झाली. श्री. बापट मला मुलीसारखे मानतात म्हणून मी त्यांना अधून-मधून भेटत असते. श्रीस्वामीजींविषयी अनेक गूढ व रहस्यमय गोष्टी ते सांगतात. अर्थात या पुस्तकाचा तो विषय नव्हे.

इ.स. २००२ च्या आसपास ज्योतिषी सौ. वसुधा वाघ यांना भेटण्याचा योग आला. त्यांनीही श्रीस्वामीजींची पत्रिका पाहून एका वाक्यात सांगितले, ‘‘कुठल्याही बाजूने या पत्रिकेचा अभ्यास केला असता हे जन्मसिद्ध **‘दत्त’** आहेत हे सिद्ध होते.’’

‘‘अहो! आजकाल कुंडलिनी व षट्चक्रे या विषयावर बरेच काही ऐकू येते. परंतु यांची पत्रिकाच सांगते की, हे स्वामी या सर्व गोष्टींच्या पलीकडे गेलेले आहेत. या सर्व गोष्टी यांच्यासाठी पोरखेळ आहेत, इतके हे मोठे आहेत.’’

सौ. वसुधा वाघ यांनी जे सांगितले ते ऐकून मला श्रीस्वामीजी खूप खूप मोठे आहेत हे कळले व आनंद वाटला. परंतु कुंडलिनी शक्ती व षट्चक्रे या सर्व गोष्टी श्रीस्वामीजींसाठी पोरखेळ आहेत, हे ऐकून मला वसुधा वाघ यांनी बरीच अतिशयोक्ती (exaggeration) केली असे वाटले. कारण मी षट्चक्र दर्शन व भेदन, Serpent Power अशा प्रकारची कुंडलिनी या विषयावरची अनेक पुस्तके वाचलेली होती. कुंडलिनी अचानक जागृत झाली असता ती माणसाचा सर्वनाश करते म्हणून शरीरातील ७२ हजार नाड्या शुद्ध झाल्याशिवाय कुंडलिनी जागृतीसाठी प्रयत्न करू नये, हे मी वाचलेले

होते. त्याचबरोबर शक्तिपात योग रहस्य नांवाचे मोठे मोठे ग्रंथ वाचले होते परंतु त्यातील मला काहीच कळले नव्हते.

कुंडलिनी शक्ती जागृत करून देणारे कितीतरी महात्मे भारतात त्याकाळात (१९७० ते १९८०) वास्तव्य करून होते. त्यानंतर अनेक इंग्लिश कोर्सेस आले. प्राणिक हिलींग, रेकी, ब्रह्मविद्या, मेस्मेरिझम, मंत्राने कुंडलिनी जागृती, क्रियायोग, हिप्नॉटीझम यांचा सर्वत्र प्रसार सुरू झाला. अधून-मधून या सर्वांचे वाचन होत होते. परंतु मी श्रीगोंदवलेकर महाराजांचे चरित्र व प्रवचने या दोन ग्रंथांमधून काही गोष्टी शिकले होते. त्यातील मुख्य म्हणजे सतत परमेश्वराचे नामस्मरण करत रहावे, आपली योग्यता झाल्यानंतर व योग्य वेळ आल्यानंतर पुढील मार्ग दाखवणारा सद्‍गुरु भेटतो व तो आपल्याला ईश्वरापर्यंत पोहोचवतो. अर्थात् योग्य वेळ आल्यानंतर ईश्वराच्या कृपेने श्रीस्वामीजी भेटले, त्यांनी भरभरून ज्ञान दिले व ईश्वरीकार्य करून घेतले. तरी पण वसुधा वाघ यांनी जे उद्‍गार काढले होते त्या विषयी मला खुलासा हवा होता म्हणून मी एक दिवस श्रीस्वामीजींना विचारायचे ठरवले.

सिद्धयोग्यांचे माहेरघर अशा हिमालयामध्ये श्रीस्वामीजीं-बरोबर मी प्रवास करत होते. मी प्रश्न विचारत होते व श्रीस्वामीजी उत्तर देत होते. श्रीमहाअवतार बाबा एकेकाळी ज्या परिसरात फिरत होते त्या परिसरामध्ये म्हणजे द्वाराहाट, द्रोणागिरी पर्वत, ग्वालदम, राणीखेत या परिसरात आम्ही रहात होतो. या काळात आमच्यामध्ये जी प्रश्नोत्तरे झाली त्या प्रश्नोत्तरांच्या संवादाचे एक पुस्तक **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या नांवाने मी प्रकाशित केले आहे. **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकामध्ये श्रीस्वामीजींनी दिलेल्या अनेक प्रश्नांच्या उत्तरांपैकी

१२५ प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. काही प्रश्न असे होते की, त्यावर चिंतन-मनन होणे अतिशय आवश्यक होते म्हणून ते प्रश्न मी **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकात समाविष्ट केले नाहीत. त्यातील काही प्रश्न पुढे देत आहे.

द्रोणागिरी पर्वतावरील एका कुटीमध्ये मोकळ्या वातावरणामध्ये आम्ही दोघे बसलो होतो. त्या कुटीला फक्त छप्पर होते. ती गोल आकाराची कुटी चारही बाजूने मोकळी असल्याकारणाने चारही दिशांना भव्य दिव्य हिमालयाचे दर्शन होत होते. कौसानी, पर्वत रांगेतील बर्फाच्छादित शिखरांवर सूर्याची किरणे पडून ती शिखरे गुलाबी (light pink) रंगाची दिसत होती. त्या दिव्य वातावरणात मी श्रीस्वामीजींना अनेक प्रश्न विचारले व त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सविस्तररित्या दिले.

नादयोग म्हणजे काय? खेचरी मुद्रा म्हणजे काय? शांभवी मुद्रा म्हणजे काय? हे सर्व प्रश्न **श्रीदत्त-दुर्गा संवाद** मध्ये आहेत. परंतु काही प्रश्न असे आहेत की जे **श्रीदत्त-दुर्गा संवाद** मध्ये नाहीत, ते असे!

श्रीस्वामीजींनी या संवादाला **श्रीदत्त-दुर्गा संवाद** असे नांव दिल्याकारणाने **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकाप्रमाणेच मी प्रश्नोत्तरे लिहित आहे.

**श्रीदुर्गा** - कुंडलिनी व षट्चक्रे यांच्या पलीकडे काही आहे का? याविषयी अधिकार वाणीने कुठल्या ग्रंथात लिहिले आहे का?

**श्रीदत्त** - कुंडलिनी व षट्चक्रे यांच्या पलीकडे बरेच काही आहे. थर्मामीटरमधील लाल रंगाच्या पाऱ्याप्रमाणे कुंडलिनी मूलाधार चक्राजवळ असते. ती षट्चक्रांचे भेदन करते व त्यानंतर तिचे कार्य संपते. ती मावळते किंवा अदृश्य होऊन जाते. त्या चैतन्यमय शक्तीला

नंतर मारुती असे म्हटले जाते. या अवस्थेला पोहोचल्यानंतर साधकाला मारुती अशी स्टेज प्राप्त होते. साधकाचा प्रवेश सूक्ष्मदेहामध्ये झालेला असतो. साधक सूक्ष्मदेहाद्वारे साधना करू लागतो.

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायामध्ये याचे अतिशय बहारदार वर्णन आहे. याशिवाय ज्ञानेश्वरीतील इतर अध्यायांमध्ये सुद्धा कुंडलिनी व षट्चक्रांच्या पलीकडील वर्णने आहेत असे म्हणून श्रीस्वामीजींनी ज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणण्यास सुरुवात केली.

पुण्यातील श्री. विष्णूपंत नारायण भंडारे हे ज्या ज्या वेळी आश्रमात येत असत त्या त्या वेळी श्रीस्वामीजी औदुंबर वृक्षाखाली बसून ज्ञानेश्वरीतील असंख्य ओव्या त्यांना तोंडपाठ म्हणून दाखवित व त्याचे अर्थ व गूढ अर्थ समजावून सांगत.

मी गेली तीस वर्षे श्रीस्वामीजींना अतिशय जवळून पहात आहे. परंतु श्री. विष्णूपंत नारायण भंडारे यांच्या व्यतिरिक्त कुठल्याही व्यक्तीसमोर श्रीस्वामीजींनी कधीही श्रीज्ञानेश्वरीतील एकही ओवी म्हटलेली मी ऐकलेली नाही आणि आज पवित्र हिमालय पर्वतामध्ये बसून श्रीस्वामीजी मला श्रीज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणून दाखवत होते व गूढ अर्थही सांगत होते. माझ्या मनाची त्रिधाअवस्था झाली होती. मनाच्या एका कप्प्यामध्ये मी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराच्या संदर्भात श्रीस्वामीजी ज्या ओव्या सांगतील त्या ओव्या व त्याचे गूढ अर्थही मला लिहून घ्यायचे होते. तसेच माझ्या प्रश्नांच्या संदर्भाच्या व्यतिरिक्त इतरही काही ओव्या व त्याचे गूढ अर्थही या दिव्य हिमालयाच्या कृपेने जर ऐकायला मिळाले तर त्याबद्दल मला उत्सुकता होती.

मनाच्या दुसऱ्या कप्प्यामध्ये पितृतुल्य श्री. भंडारे यांच्यामुळे आपल्याला हा लाभ अनेकवेळा मिळाला, म्हणून त्यांच्याविषयी कृतज्ञतेने

मन भरून येत होते. त्याचवेळी एक आठवण मनात सारखी जागृत होत होती व ती मी कोणालाच सांगितली नव्हती.

त्याकाळामध्ये मी श्रीस्वामीजींना विचारले होते, ''स्वामीजी, फक्त श्री. भंडारे समोर आले की, आपण धाराप्रवाह ज्ञानेश्वरीच्या ओव्या म्हणून दाखविता व त्याचे गूढ अर्थही समजावून सांगता परंतु इतर कोणाही समोर तुम्ही कधीही ज्ञानेश्वरीतील ओवी म्हणून दाखवत नाही याचे कारण काय?''

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले होते, ''श्री. भंडारे यांनी श्रीज्ञानेश्वरांचे आशीर्वाद मिळवले आहेत, सोनोपंत दांडेकरांच्या सहवासात ते राहिलेले आहेत. सोनोपंत दांडेकर खूप मोठे संत होते. आत्मज्ञानी होते. याशिवाय इतरही अनेक संतांच्या दर्शनाचा लाभ व कृपा त्यांनी प्राप्त केलेली आहे म्हणून ते माझ्यासमोर येताच माझ्या मुखाने आपोआपच ज्ञानेश्वरी बाहेर पडू लागते.''

मनाच्या दुसऱ्या कप्प्यात हे विचार चालू असतानाच मी ठरविले **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकात गूढ रहस्यमय व ज्ञानमय हे प्रश्न घ्यायचे नाहीत, यावर थोडे चिंतन-मनन करायचे व नंतर ते एखाद्या वेगळ्या पुस्तकात घ्यायचे. आज तो योग येत आहे.

माझ्या मनाचा तिसरा कप्पा श्रीस्वामीजींच्या मुखकमलातून केव्हा एकदा ओव्या बाहेर पडतात व त्या केव्हा लिहून घेते, यासाठी अतिशय जागृत होता.

**पिंडे पिंडाचा ग्रासु । तो हा नाथ संकेतींचा दंशु ।**
**दाऊनी गेला उद्देशु । महाविष्णू ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

वरील ओवी म्हणून श्रीस्वामीजी म्हणाले, ''या ओवीचा अर्थ व तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी थोड्या वेळाने देतो. परंतु प्रथम आपण ज्ञानेश्वरी म्हणजे काय? हे थोडक्यात समजून घेऊ.''

**नामा म्हणे ग्रंथ । श्रेष्ठ ज्ञानदेवी ।।**

**एक तरी ओवी । अनुभवावी ।।**

संत नामदेव महाराज म्हणतात, ''ज्ञानेश्वरी हा अतिशय श्रेष्ठ ग्रंथ आहे. यातील एका तरी ओवीचा **अनुभव** घ्या!'' महाराष्ट्रात ज्ञानेश्वरीवर प्रवचन करणारे असंख्य आहेत व ज्ञानेश्वरीची पारायणे करणारे पण असंख्य आहेत; परंतु **अनुभव** घेणारा कोणीच नाही. नामदेवाने एकातरी ओवीचा **अनुभव** घ्या असे कळवळून ७५० वर्षांपूर्वी सांगितले. त्याच्या कितीतरी पुढे जाऊन माझे असे सांगणे आहे की, एक चतुर्थांश ओवीचा **अनुभव** घ्या! **नर जन्माचे सार्थक होऊन जाईल.** ज्ञानेश्वरीची एक चतुर्थांश ओवी समजली तर नराचा नारायण होईल. तो प्रवचने करणे सोडेल व समाजातही राहणार नाही.

ॐ

**कर्म फळी आस न करावी।आणि कुकर्मी संगती न धरावी ।**
**हे सत्क्रीयाची आचरावी । हेतुविण ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# पिंडे पिंडाचा ग्रासु

**पिंडे पिंडाचा ग्रासु । तो हा नाथ संकेतींचा दंशु ।**
**दाऊनी गेला उद्देशु । महाविष्णू ।।**
**।। ज्ञानेश्वरी अध्याय ६ ।।**

**या** ओवी पैकी फक्त **पिंडे पिंडाचा ग्रासु** या एक चतुर्थांश ओवीचा किंवा तीन शब्दांचा अर्थ जर मी तुम्हाला समजावून सांगायचे ठरवले तर त्यावर किमान १०-२० पाने अगदी आरामात लिहिता येतील. इतका गूढ व रहस्यमय अर्थ श्रीज्ञानेश्वरांनी फक्त एक चतुर्थांश ओवीत सांगितला आहे.

**पिंडे पिंडाचा ग्रासु ।** पिंड म्हणजे शरीर. शरीराने शरीर खाऊन टाकणे.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, नरदेह हे इतके सुंदर साधन आहे की, या साधनाचा योग्यरितीने वापर केल्यास नराचा देहासहित नारायण होतो. या देहामध्ये कोट्यावधी गुप्तविद्या, लाखो रहस्ये व हजारो शक्ती दडलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर योग्यप्रकारे साधना केल्यास मनुष्य देहासहित अमर होऊ शकतो. त्याचा देह

वायुमय होऊ शकतो.

माणसाला **स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह व महाकारणदेह** असे चार देह प्रामुख्याने असतात. पूर्वजन्मांमध्ये जर दुष्टकर्मे केली असतील तर सूक्ष्मदेहावर, मन-बुद्धीवर अनेक आवरणे पडतात. कंदिलातील काचेवर कार्बन धरल्यामुळे ज्याप्रमाणे आतील ज्योतिचा प्रकाश बाहेर येत नाही, त्याप्रमाणे दुष्कर्मांच्या काळ्या आवरणांमुळे महाकारणदेहातील परमात्म्याचा प्रकाश बाहेर पडत नाही.

**पिंडे पिंडाचा ग्रासु ।** श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मनुष्यदेहरूपी हत्याराचा वापर करा, योग्यप्रकारे साधना करा. सूक्ष्मदेहावरील तुमच्या देहाच्या आकाराच्या असंख्य काळ्या आकृत्या सोऽहम् साधनेने नष्ट करा. अशारितीने शरीरानेच तुमच्या शरीराच्या आत दडलेली असंख्य काळी शरीरे नष्ट करा. हे करत असताना हळूहळू जसजशा या काळ्या आकृत्या नष्ट होतील तसतसे महाकारणदेहातील परमात्म्याचे किरण बाहेर पडू लागतील. कुंडलिनी व षट्चक्रे जागृत होतील. यावेळी अत्यंत सावध राहावे लागेल. कारण अंतिम ध्येय प्राप्त होईपर्यंत शक्तींना व सिद्धींना न भुलता पुढे प्रवास चालू ठेवावा लागतो.

**नाद, बिन्दू , कला** यांचे प्रान्त ओलांडून पुढे जावे लागते. मन **निर्विकल्प** होते व शेवटी अशी अवस्था येते की साधक देहासहित अदृश्य होतो.

**आईके शक्तीचे तेज जव लोपे । तव देहाचे रूप हारपे ।**
**मग तो डोळ्यामाजी लपे । जगाचिया ।।**
**एऱ्हवी आदिलाचि असे । सावयव तरी दिसे ।**
**परी वायुचे का जैसे । वळीले होय ।।**

**तैसे होय शरीर । तै ते म्हणती खेचर ।**
**हे पद होता चमत्कार । पिंड जनी ।।**
**देखे साधक निघोनी जाये । मागा पाऊलांची ओळ राहे ।**
**तै ठायी ठायी होये । आणिमादिक ।।**

**।। ज्ञानेश्वरी अध्याय ६ ।।**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''साधनेने साधक देहासहित अदृश्य होतो. त्याचे शरीर वायुमय होते. तुमच्या डोळ्यांना त्याचे शरीर दिसते पण त्याच वेळी तो चराचरात भरून रहातो. या अवस्थेला खेचरी अवस्था म्हणतात. साधकाची इच्छा असो अथवा नसो, एकाच वेळी लाखो लोकांना चमत्कार दिसू लागतात. असा साधक वाटेने नुसता चालत जरी गेला किंवा एखाद्या ठिकाणी वाटेत जरी उभा राहिला तरी तेथील लोकांना काही तरी दिव्य अनुभव आल्याशिवाय रहात नाही.''

अशी अवस्था प्राप्त झाली तरी ही अंतिम अवस्था नव्हे. प्राप्त होणाऱ्या सिद्धी व प्रसिद्धीला न भुलता साधकाने सतत पुढे जात रहायला हवे. येथे कोठेही अडकल्यास पुढील मार्ग अवरूद्ध होण्याची दाट शक्यता असते. सिद्धी, प्रसिद्धी, सत्ता व पैसा या सर्व गोष्टींपासून दूर राहणेच चांगले असते.

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील **पिंडे पिंडाचा ग्रासु ।** या **तीन** शब्दांचा किंवा एक चतुर्थांश ओवीचा अर्थ मी तुम्हाला अतिशय थोडक्यात सांगितला. तुमचा मूळ प्रश्न....

कुंडलिनी व षट्‌चक्रांच्या पलीकडे काही आहे का? असा आहे. त्याचे उत्तर थोडक्यात सांगतो, तेही श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दात.

नामस्मरण, अखंड ईश्वरचिंतन, दान, परोपकार, नम्रता इत्यादी

सद्‌गुणांचे आचरण केल्यानंतर प्रारब्ध शुद्ध होते. मनाची एकाग्रता साध्य होऊ लागते. मनाची एकाग्रता साध्य झाल्यानंतर सोऽहम् साधना आपोआप सुरू होते व त्यानंतर कुंडलिनी शक्ती जागृत होते. कुंडलिनी शक्तीचे बहारदार वर्णन श्रीज्ञानेश्वरांनी सहाव्या अध्यायात केलेले आहे. कुंडलिनी शक्ती जागृत झाली, सर्व चक्रे जागृत झाली, **पिंडे पिंडाचा ग्रासु ।** म्हणजे काय तेही कळले परंतु तुमचा प्रश्न कुंडलिनी व षट्‌चक्रांच्या पलीकडे काय? असा असल्याने त्याविषयी सांगतो.

मूलाधारचक्र ते सहस्रारचक्र येथपर्यंतचा प्रवास संपल्यानंतर योगाचा अतिशय कठीण असा भाग सुरू होतो. रामायण व महाभारत हे दोन्ही ग्रंथ योगाच्या या अत्यंत कठीण प्रवासाचे वर्णन करणारे ग्रंथ आहेत. योगी लोक या मार्गाला पश्चिमेचा घाट असे म्हणतात. देहामध्ये ज्याप्रमाणे कुंडलिनी व चक्रे असतात त्याप्रमाणे सूक्ष्मदेहामध्ये अत्यंत अवघड घाट असतात. यामध्ये **श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा, पूर्णगिरीपीठ व ब्रह्मरंध्र** असे घाट असतात. या मार्गाने जी शक्ती प्रवास करते त्या शक्तीला **मारुती** असे म्हणतात.

सहस्रारचक्रापर्यंतचा प्रवास संपल्यानंतर योग्याचा सूक्ष्मदेहात प्रवेश होतो. सूक्ष्मदेहात योग्याच्या साधना सुरू होतात. श्रीज्ञानेश्वरांनी याचे बहारदार वर्णन केले आहे.

**तव कुंडलिनी हे भाष जाये । मारुती ऐसे नाम होये ।**
**परी शक्तीपण आहे । जो वरी न मिळे शिवी ।।**
**ॐकाराचे पाठी । पाय देत उठाउठी ।**
**परा-पश्यंतीचिये पाऊठी । मागा घाली ।।**
**मग ब्रह्मरंध्री स्थिरावोनी । सोऽहम् भावाच्या बाह्या पसरोनी ।**

**परमात्मा लिंगा धावोनी । आंगा घडे ।।**

**महाशून्याचिया डोही । जेथ गगनासीही ठाव नाही ।**

**तेथ तागा लागेल कायी । बोलाचा इया ।।**

साधकाला मारुती ही स्टेज प्राप्त होते. साधकाचा सूक्ष्मदेहात प्रवेश झालेला असतो. तो आत्म्याचा महात्मा झालेला असतो. तरीपण अजून परमात्मास्वरुप झालेला नसतो. पश्यंतीवाणीमधून त्याची सुटका झालेली असते किंवा पश्यंतीवाणीला त्याने मागे टाकलेले असते. परावाणीच्या शेवटच्या टोकावर तो पाय देऊन उभा असतो. ॐकाराच्या पलीकडे जाण्याची त्याने तयारी केलेली असते. येथे तो भ्रमरगुंफेपर्यंत पोहोचलेला असतो. ब्रह्मरंध्राच्या दिशेने त्याचा प्रवास सुरू झालेला असतो. अखेरीस तो ब्रह्मरंध्रात पोहोचतो. त्याला परमात्मास्वरूप अशी अवस्था प्राप्त होते. महात्म्याचा परमात्मा होतो. ॐकाराला जेव्हा मागे टाकले तेव्हाच गगन संपलेले असते व महाशून्याचा प्रान्त सुरू झालेला असतो. या महाशून्याच्या प्रान्ताचे वर्णन करण्यास शब्दाचा आधार घेता येत नाही. योगी जेव्हा महाशून्यात विलीन होतो तेव्हा त्याचे अस्तित्व संपलेले असते. त्याचा प्रवास संपलेला असतो. फक्त परब्रह्म उरलेले असते. येथे योग्याची अवस्था...

**हे विश्वची माझे घर । ऐशी मति जयाची स्थिर ।**

**किंबहुना चराचर । आपणची जाहला ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

अशी होते. येथे योगी साक्षात् परब्रह्म होतो. त्याचा सर्व प्रवास संपलेला असतो.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''या नरदेहामध्ये एवढे अद्भुत सामर्थ्य आहे की, या देहाच्या आश्रयाने आत्मा परमात्मा होतो.'' हे नक्कीच एका जन्मात घडत नाही. प्रत्येक जन्मात आनंदात राहून, सत्कर्मे करून, पुण्य करून, सात्त्विकतेने वागून तो हळूहळू पुढे जात असावा व हजार जन्मांनंतर आत्म्याचा परमात्मा होत असावा. तशा अर्थाची ओवीच त्यांनी ज्ञानेश्वरीत लिहिली आहे.

**वर्ष शतांचिया कोडी । जन्म सहस्त्रांचिया आडी ।**
**लंघिता पातला थडी । आत्मसिद्धीची ।।**

शेकडो वर्षे घालविल्यानंतर प्रत्येक जन्मामध्ये सत्कर्मे करून उदारतेने वागून पुन्हापुन्हा मनुष्यजन्म मिळेल, अशी पुण्याई केल्यानंतर व सद्गुरुची कृपा झाल्यानंतर रहस्यमय अशा या योगाचा मार्ग मिळतो व त्यात प्रगती होते. प्रगती करून घेणारे योगी भेटतात. ही गोष्ट अतिशय कष्टसाध्य आहे. त्यासाठी जन्मोजन्मींची पुण्याई आवश्यक आहे असे स्वतः श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

श्रीज्ञानेश्वर महाराज इतकेच म्हणून थांबत नाहीत तर योगी म्हणून जन्म मिळावा किंवा पृथ्वीतलावर सात्त्विक मानव म्हणून जन्म मिळावा, योग मार्गात प्रगती करून घेणारा व रहस्यमय योग मार्गाचे ज्ञान देणारा सद्गुरु भेटावा व या रहस्यमय योग मार्गात प्रगती व्हावी अशी इच्छा स्वर्गातील देव करत असतात व त्यासाठी जप, होम, प्रार्थना करत असतात असे त्यांनी ज्ञानेश्वरीतच म्हटले आहे. तशा अर्थाची ओवी त्यांनी ज्ञानेश्वरीत लिहिली आहे.

**ऐसे जे जन्म । जया लागी देव सकाम ।**
**स्वर्गी ठेले जप होम । करिती सदा ।।**

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी योग्याच्या वैभवाचे वर्णन करताना

म्हटले आहे.

**अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देवो जाणिजे ।**

**सुख सर्वस्व माझे । चैतन्य तो ।।**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''योगी हा सर्व देवांचाही महादेव असतो. चैतन्याचे केन्द्र असतो, चैतन्याच्या लहरी त्याच्याद्वारा विश्वभर पसरत असतात व विश्व कल्याण होत असते.''

रहस्यमय योगमार्गावरील आपले भाष्य श्रीस्वामीजींनी संपविले. सोप्या व साध्या भाषेमध्ये रहस्य समजावून सांगताना ते म्हणाले, ''या मार्गात आणखी अनेक रहस्ये आहेत जी समाजासमोर उघड करता येत नाहीत.''

श्रीस्वामीजींची जन्मकुंडली पाहून वसुधा वाघ यांनी कुंडलिनी व षट्‌चक्राच्या पलीकडे पोहोचलेले हे महायोगी आहेत असे उद्‌गार काढले होते. त्याविषयी थोडीफार माहिती मिळवण्याच्या उद्देशाने मी श्रीस्वामीजींना प्रश्न विचारला होता. अर्जुनाच्या निमित्ताने जसा श्रीकृष्ण कृपेचा मेघ वर्षाव श्रीज्ञानेश्वरांनी केला. तसाच माझ्या प्रश्नाच्या निमित्ताने गुरुकृपेचा वर्षाव माझ्यावर झाला. रहस्यमय योगमार्गाचे ज्ञान मिळाले. हा वर्षाव थांबूच नये असे मला वाटत होते. माझ्या प्रश्नाचे उत्तर येथे मिळाले. मी पुढे श्रीस्वामीजींना काय विचारले ते नंतर सांगते.

**वर्ष शतांचिया कोडी । जन्म सहस्त्रांचिया आडी ।**

**लंघिता पातला थडी । आत्मसिद्धीची ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

**अर्थ** - सद्भक्त, सज्जन, परोपकारी, मनुष्य म्हणून पृथ्वीतलावर हजार जन्म घेऊन या हजार जन्मांमध्ये शेकडो वर्षे साधना, तपस्या केल्यानंतर आत्मसिद्धी प्राप्त होते.

हिमालयातील दुर्गम भागामध्ये घाट रस्त्याने प्रवास करताना मी श्रीस्वामीजींना विचारले...

**श्री दुर्गा** - एका पंडिताने रामायण व महाभारत एका श्लोकात सांगितले आहे. तसे शुद्ध मराठीमध्ये एक-दोन वाक्यात लक्षात राहिल असे ज्ञानेश्वरीचे सार सांगा. यावर श्रीस्वामीजी म्हणाले...

**श्री दत्त** - ज्याप्रमाणे आपण अंगातील बनियान काढून खुंटीवर अडकवतो, त्याप्रमाणे **मन, बुद्धी, चित्त, अहंकार** या चारही गोष्टींना शरीरातून काढून खुंटीवर टांगता आले पाहिजे **'ते कसे करावे'** हे ज्ञानेश्वरी शिकविते. तसेच गरजेनुसार यांचा वापर कसा करायचा हेही ज्ञानेश्वरी शिकविते.

ॐ

**सदा स्वरुपानुसंधान । ते साधूचे लक्षण ।**
**जनी असोनी आपण । जनावेगळा ।।**
**।। एकनाथ ।।**

# ओवी ज्ञानेशाची

**श्रीदुर्गा** - मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणून कुंडलिनी व षट्‌चक्रे यांच्या पलीकडील भाग तुम्ही ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या आधाराने समजावून दिला. परंतु मला माहीत आहे की, तुम्हाला ज्ञानेश्वरीतील अनेक ओव्या मुखोद्‌गत आहेत. त्यातील जितक्या ओव्या तुम्हाला सांगता येतील तेवढ्या सांगाल का? त्यावर भाष्य कराल का? मला चिंतन, मननासाठी त्याचा खूप उपयोग होईल.

**श्रीदत्त** - तुमच्या या प्रश्नाने तुमचा तर लाभ होईलच पण त्याचबरोबर इतर अनेकांचाही लाभ होईल म्हणून मी तुम्हाला जरूर ज्ञानेश्वरीतील काही ओव्या सांगतो.

''ज्याप्रमाणे गाय आपल्या वासरासाठी दूध देते परंतु जगाला त्याचा लाभ होतो, तुमचा प्रश्नही तसाच आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीही अशाच अर्थाची एक ओवी ज्ञानेश्वरीत लिहिली आहे.''

**जैसे वत्साचेनी मिषे । गाय पान्हा सोडीतसे ।**
**परी लाभ सकळा होतसे । तिया परी गा ।।**

असे म्हणून श्रीस्वामीजींनी ज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणायला सुरुवात केली.

**शारदेचिये चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।**
**ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे ।।१।।**

**तिया परी श्रोता । अनुभवावी हे कथा ।**
**अति हळुवारपण चित्ता । आणोनिया ।।२।।**

**देखे भ्रमर परागु नेती । परी कमळदळे नेणती ।**
**तैसे परी आहे सेविती । इये ग्रंथी ।।३।।**

**ऐसे हळुवारपण येईल । तरीच हे उपेगा जाईल ।**
**ना तरी गोठी होईल । मुक्या बहिऱ्याची ।।४।।**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मी जे काही सांगत आहे किंवा जी गोष्ट तुम्हाला सांगत आहे, त्याचा तुम्हाला अनुभव घ्यायला हवा. अन्न म्हटल्याने कोणाचे पोट भरत नाही पण भरपूर जेवल्यानंतर तृप्तीचा आनंद मिळतो. मी जी काही गोष्ट तुम्हाला सांगत आहे, त्या गोष्टीचा तुम्हीसुद्धा अनुभव घ्यायला हवा. जर अनुभव यावा अशी तुमची इच्छा असेल तर तुमचे चित्त अतिशय **कोमल** व्हायला हवे. मनामध्ये सरलता, दयाळूपणा असायला हवा. तरच या दिव्य ज्ञानाचा अनुभव तुम्हाला येईल.'' मनाची कोमलता कशी असावी व किती असावी याची परिसीमा समजावी म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी अतिशय सुंदर उपमा अलंकार वापरला आहे.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

''शरद ऋतुतील चंद्राच्या किरणांमध्ये अतिशय कोमल, कोवळे, सूक्ष्म, अदृश्य अमृतकण असतात. चकोर पक्षाची पिल्ले हे अमृतकण शोषून घेतात व पुष्ट होतात.''

''श्रोत्यांनो! तुम्हाला आध्यात्मात प्रगती करायची असेल

तर तुमच्यामध्ये प्रेमळपणा, दयाळूपणा, कोमल अंतःकरण व मनाचा सरळपणा या गोष्टी आणाव्याच लागतील तरच आध्यात्माचा अनुभव येईल. आत्मतृप्त अशी अवस्था प्राप्त होऊन तुम्ही आत्मानंदात निमग्न व्हाल.''

आपला मुद्दा आणखी व्यवस्थितरित्या पटवण्यासाठी श्रीज्ञानेश्वर माऊली आणखी एक उपमा देतात. श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात... ''भ्रमर (भुंगा) कमळातील पराग घेऊन जातात. हे काम ते इतक्या हळुवारपणे करतात की, आपल्यातील पराग नेला, हे कमळाला कळतच नाही इतक्या हळुवारपणे तुम्हाला या कथेचा आस्वाद घ्यावा लागेल. जर तुमचे मन इतके कोमल झाले, हळुवार झाले तरच मी जे काही सांगतो त्याचा उपयोग होईल. नाहीतर मुक्याने सांगितले व बहिऱ्याने ऐकले अशी स्थिती होईल.''

**श्रीदुर्गा** – श्रीज्ञानेश्वरांनी ज्या हळुवारपणाचे वर्णन केले आहे, तो हळुवारपणा कसा येईल? जो अर्जुन अनेक युद्धे लढला तो इतका हळुवार होता का? इतका कोमल होता का?

**श्रीदत्त** – दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, नम्रता, प्रेम, मानवता, परोपकार, इतरांना मदत करण्याची वृत्ती, लोक कल्याण करण्याची वृत्ती, विवेकबुद्धी हे सर्व सद्गुण ज्या व्यक्तिमध्ये सामावलेले असतात त्या व्यक्तिला किंवा त्या अवस्थेला **अर्जुन** म्हटले जाते. **अर्जुन म्हणजे कोमल मन। अर्जुन म्हणजे ज्याचे मन लोण्याप्रमाणे मऊ आहे, कोमल आहे, हळुवार आहे असा मनुष्य!** अशा माणसाला जेव्हा भगवान् श्रीकृष्णासारखा सद्गुरु भेटतो, तेव्हा तो सद्गुरु वीर पुरुष होण्याचा सल्ला देतो. सद्गुण व दुर्गुण या दोन्ही गोष्टींवर विजय प्राप्त करुन तुला पुढे जायचे आहे असा उपदेश करतो. नुसत्या सद्गुणांनी आत्मज्ञान

प्राप्त होणार नाही, परब्रह्म तादात्म्यता प्राप्त होणार नाही. यासाठी त्रिगुणातीत व्हावयास हवे.

**त्रैगुण्यो विषया वेदः । निःत्रैगुण्यो भवार्जुनः ।।**

''अर्जुना! वेदांमध्ये फक्त सात्त्विक, राजस व तामस या तीन विषयांचे ज्ञान दिलेले आहे. तू त्रिगुणातीत हो, त्रिगुणांच्या पलीकडे जा व परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त करून घे!'' असे भगवान् श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे.

रामायण, महाभारत हा फक्त इतिहास नसून हे दोन्ही ग्रंथ आध्यात्मिक आहेत. हे माझ्या अनेक पुस्तकांमध्ये लिहिले आहे.

शंभर कौरव म्हणजे माणसातील शंभर मुख्य दुःष्प्रवृत्ती. या दुष्ट प्रवृत्तींवर विजय कसा मिळवायचा किंवा या दुष्ट प्रवृत्तींना ठार कसे मारायचे हे सद्गुरु भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला भगवद्गीतेद्वारा सांगत आहेत. तर श्रीज्ञानेश्वर माऊली भगवद्गीतेवर भाष्य करताना श्रोत्यांना सांगत आहेत, प्रथम 'अर्जुन व्हा! हळुवार व्हा!'

**ऐसे हळुवारपण येईल । तरीच हे उपेगा जाईल ।**
**ना तरी गोठी होईल । मुक्या बहिऱ्याची ।।**

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात, ''आधी मनाला कोमल करा, आधी अर्जुन व्हा, म्हणजे तुम्हाला आत्मज्ञान देणारा सद्गुरु भेटेल व मग तो तुम्हाला व्यवहार आणि आध्यात्म दोन्ही शिकवेल. परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त करून देईल. पण जर अर्जुन ही अवस्था तुमच्याकडे नसेल तर समर्थ सद्गुरु भेटूनही काही उपयोग होणार नाही. मुक्याने सांगितले व बहिऱ्याने ऐकले अशी तुमची अवस्था होईल.''

श्री तुकाराम महाराजांनी पण आपल्या एका अभंगात हेच सांगितले आहे.

**तुका म्हणे वेळू चंदना संगती ।**

**काय ते नुसते जवळीके ॥**

चंदनाच्या संगतीने त्याच्या आसपासच्या झाडांना चंदनाचा सुगंध येऊ लागतो परंतु वेळू म्हणजे बांबू जर चंदनाच्या जवळ असेल तर त्याला काहीच वास येत नाही.

**भाव धरील तया । तारील पाषाण ।**

**दुर्जना सज्जन । काय करी ॥**

ज्याच्या अंतःकरणात श्रद्धा, भक्तीभाव आहे, ज्याचे मन कोमल आहे, अशा व्यक्तीने जर एखाद्या पाषाणाच्या मूर्तीवर श्रद्धा ठेवली तर त्यातून ईश्वर प्रकट होतो. परंतु परमेश्वर स्वरूप सत्पुरुषाच्या सहवासात स्वार्थी व दुष्ट विचारांची माणसे कितीही काळ राहिली तरी त्यांच्या अंतःकरणात काही बदल होत नाही ''याला सत्पुरुष काय करणार?'' म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ज्ञानेश्वरी समजण्यासाठी किंवा मी जे काही सांगत आहे ते समजण्यासाठी, मनाला हळुवारपणा येणे किंवा मन कोमल होणे अतिशय आवश्यक आहे.

द्रोणागिरी पर्वतावर एका गेस्ट हाऊसमध्ये आम्ही रहात होतो. **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकाचे लेखन करत होतो. श्रीस्वामीजी ज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणून दाखवत होते व त्याचे अर्थ समजावून सांगत होते. ज्ञानेश्वरी ग्रंथ आमच्याबरोबर नव्हता. श्रीस्वामीजींना जेवढ्या ओव्या तोंडपाठ येत होत्या त्या ते म्हणून दाखवत व त्याचा

अर्थ समजावून सांगत. सूर्यास्त झाल्याकारणाने आम्ही आमचे लिखाण थांबवले. तेव्हा मला दोन गोष्टी आठवल्या.

## एक

**म**हाराष्ट्रामध्ये नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर हे तीर्थक्षेत्र आहे. या तीर्थक्षेत्राजवळ आंजनेरी गावामध्ये अंजन पर्वत नांवाचा एक खूप उंच पर्वत आहे. पर्वतावर गुहा आहेत. या पर्वताच्या माथ्यावरती एक तलाव व औदुंबर वृक्ष आहे. त्या वृक्षाखाली बसून श्रीस्वामीजी साधना करत होते. या पर्वतावर एका प्राचीन कालीन ऋषींचेही त्यांना दर्शन झाले.

अंजन पर्वतावरील आपली तपस्या आटोपून श्रीस्वामीजी त्र्यंबकेश्वर येथे आले. त्यावेळी त्यांचे वय तेरा होते. अगदी बारीक किडकिडीत, हातापायाच्या काड्या झालेल्या, पोट खपाटीला गेलेले पण चेहऱ्यावर व डोळ्यात तेज ! चेहऱ्यावरून ओसंडून वाहणारा आनंद ! असे त्यांचे रूप होते.

त्या काळामध्ये श्रीस्वामीजी संपूर्ण भारतभर पायी फिरत होते व ठिकठिकाणी तपस्या करत होते. ते कोणाकडे काहीही मागत नसत. कोणी आग्रह करून प्रेमाने दिले तरच खात असत. एक पंचा, दोन लंगोट, एक टॉवेल, एक कमंडलू, एक ग्लास व देवाच्या पूजेचे साहित्य एवढे त्यांच्या झोळीत असायचे. जन्माला आल्यापासून वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत त्यांनी पायात चप्पल घातली नव्हती. त्यानंतर ते स्लीपर वापरू लागले.

संपूर्ण आयुष्यात कुठल्याही दुकानात जाऊन त्यांनी कधी काहीही विकत घेतले नाही. अमुक एक गोष्ट मला हवी असे त्यांना

कधी वाटले नाही. पायी प्रवास करत असताना जवळ पैसे असल्यास रस्त्यावरच्या टपरीवर ते कधी कधी चहा पीत किंवा काहीतरी खात. अशा मुक्त जीवनाची त्यांना खूप आवड होती. १९८७ साली त्यांच्या बरोबर हिमालयात प्रवास करत असताना त्यांना काहीही न सांगता त्यांचा हात धरून मी त्यांना खेचून एका दुकानात घेऊन गेले व त्यांना कॅनव्हासचे बूट घेऊन दिले परंतु माझ्या आग्रहामुळे त्यांनी फक्त १५ मिनिटे बूट पायात ठेवले व नंतर काढून टाकले व हिमालयातील सर्व पर्वत अनवाणीच चढले आणि उतरले.

अंजन पर्वतावरून श्रीस्वामीजी त्र्यंबकेश्वरला आले. एका साधूकडे त्यांनी आपली झोळी दिली व कुशावर्त तीर्थावर ते अंघोळीला गेले. मनसोक्त अंघोळ करून कुशावर्त तीर्थावरून पुन्हा त्र्यंबकेश्वरला यायला निघाले. वाटेत एक छोटीशी बाग होती. दोन वारकरी त्या छोट्याशा बागेमध्ये तीन दगडांच्या चुलीवर काहीतरी जेवण बनवत होते.

डोक्याला कपडा गुंडाळलेला, खांद्यावर टॉवेल टाकलेला व कमरेला एक पंचा गुंडाळलेला अशा अवस्थेत श्रीस्वामीजी कुशावर्त तीर्थावरून स्नान करून येत होते. त्या दोन वारकऱ्यांपैकी एक वारकरी पुढे आला व म्हणाला, ''माऊली या!'' (श्री संत ज्ञानेश्वर यांना महाराष्ट्रातील सर्व वारकरी श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात. यांनीच सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. त्यांनी एकविसाव्या वर्षी समाधी घेतली. बागेतील वारकऱ्याला श्रीस्वामीजींना पाहून आपल्याकडे श्रीज्ञानेश्वर माऊलीच येत आहे असे वाटले म्हणून तो म्हणाला, ''माऊली या!'')

श्रीस्वामीजी बागेत गेले व पद्मासन घालून बसले.

वारकऱ्यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ समोर आणून ठेवला. श्रीस्वामीजींनी ज्ञानेश्वरीतील एक एक ओवी वाचून तिचा अर्थ सांगण्यास सुरुवात केली. यात बराच वेळ गेला. नंतर वारकऱ्यांनी श्रीस्वामीजींना जेवण दिले व निरोप दिला. श्रीस्वामीजी, जेथे झोळी ठेवली होती त्या साधूकडे आले. श्रीस्वामीजींची झोळी घेऊन साधू पळून गेला होता. श्रीस्वामीजींनी तसेच पुढे चालण्यास सुरुवात केली व हिमालयापर्यंत प्रवास केला. सामान गेले, झोळी गेली, अंगावर कपडे नाहीत, प्रचंड थंडी या कशाचेच त्यांना काही वाटले नाही. या अवस्थेचे वर्णनही एकदा त्यांनी मला ज्ञानेश्वरीतील ओवी म्हणून करून दाखवले होते.

**सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे ।**
**आणि लाभालाभ न धरावे । मना माजी ।।**

सुख प्राप्त झाले असता मनाला आनंद होऊ नये व दुःख झाले असता मनावर त्याचा काही परिणाम होऊ नये. लाभ अथवा हानी झाली असता त्याचाही मनावर काही परिणाम होऊ नये. मनाची अशी स्थिती प्राप्त झाल्यानंतर मनुष्य सदैव आनंदात रहातो असे श्रीस्वामीजी म्हणाले! ही स्थिती कशी प्राप्त होते असे मी विचारताच, श्रीस्वामीजी म्हणाले...

**अर्जुना समत्त्व चित्ताचे । तेचि सार जाण योगाचे ।**
**जेथे मन आणि बुद्धीचे । ऐक्य आथी ।।**

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

''अर्जुना! मन आणि बुद्धी एक करणे, चित्तावर कुठल्याही गोष्टीचा परिणाम न होता त्याला सर्व गोष्टी सारख्याच वाटणे म्हणजे योग! थोडक्यात सदैव समाधानात राहणे.''

श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात, **''देव प्रसन्न झाला तर त्याच्याकडे अखंड समाधान मागावे बाकीच्या गोष्टी आपोआपच येतात.''**

मी विचारले, ''अखंड समाधान, मन, बुद्धी, चित्त यांची एकात्मता या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी एखादी सोपीशी साधना सांगा.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''रोज सकाळ-संध्याकाळ अर्धा -अर्धा तास सूर्योदयापूर्वी व सूर्यास्ताच्या वेळी आकाशाकडे पहात राहा. असे आकाशध्यान करताना लक्ष श्वासावर केन्द्रित करा. हळूहळू मनाची एकाग्रता होऊ लागते व पुढील मार्ग मिळतो.''

## दोन

**श्री**स्वामीजींबरोबर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व कच्छ गुजरातपासून कलकत्त्यापर्यंत अनेकवेळा गाडीने प्रवास केला. या प्रवासामध्ये अनेकदा हास्य, विनोद, ज्ञान, मनोरंजन अशा कितीतरी गोष्टी होत असत. श्रीस्वामीजी खूप गोष्टी सांगायचे. पुष्कळवेळा एखादे गाणे ऐकले की, त्यावर ते लगेच parody करायचे. मराठी गद्य पुस्तक काव्यमय पद्धतिने वाचून दाखवायचे असे काही ना काही हास्य विनोद चाललेले असायचे. असेच एकदा प्रवास करत होतो. गर्दीमुळे गाडी दोन सेकंद थांबली. जवळच कोठेतरी प्रवचन चालू होते व स्पीकरवर ओवी ऐकू आली. श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''ताई! ऐकलं का? श्रीज्ञानेश्वरांची ओवी,'' असे म्हणून ओवी म्हणून दाखवली.

**ये हृदयींचे ते हृदयी घातले । ऐसे ज्ञान अर्जुना दिले ।**

**नवल भगवंते केले । भगवद्‌गीती ।।**

माझ्या मनात शंका आली ही ओवी पण यांची पाठ? माझ्या मनातील विचार ओळखून श्रीस्वामीजी म्हणाले,

''आपल्या कानावर फक्त एक चतुर्थांश ओवी पडली. ती ऐकून मी स्वतःच ओवी तयार करून तुम्हाला ऐकवली. परंतु आपण आत्ता ऐकलेली ओवी ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात आहे. मला ती पाठ नाही. घरी गेल्यावर ज्ञानेश्वरीतील ती ओवी तुम्हाला काढून दाखवतो.''

परत माझ्या मनात विचार आला ज्ञानेश्वरीत एकूण ९०३३ ओव्या आहेत. त्यातून श्रीस्वामीजी ही ओवी कशी शोधून दाखवणार?

मुंबईला परत आल्यावर श्रीस्वामीजींनी ज्ञानेश्वरी हातात घेतली व मला म्हणाले, ''ताई! तुम्हाला श्रीज्ञानेश्वरांची ओवी दाखवतो. '' असे म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय काढला व ओवी नं. १४२१ मला काढून दाखवली.

**हृदया हृदय एक झाले । ये हृदयींचे ते हृदयी घातले ।**

**द्वैत न मोडीता केले । आपणा ऐसे अर्जुना ।।**

या ओवीचा थोडक्यात अर्थ असा...

श्रीकृष्णाने अर्जुनाला आपल्यासारखे केले. देहाने अर्जुन, अर्जुन राहिला. कृष्ण, कृष्ण राहिला. परंतु दोघांचा आत्मा एक झाला. दोघांचे ज्ञान एक झाले. श्रीकृष्णाप्रमाणे अर्जुनही आत्मज्ञानी झाला.

ॐ

# कौसानी

**दु**सऱ्या दिवशी सकाळी आम्ही कौसानीला जायला निघालो. वाटेतील अप्रतिम सृष्टीसौंदर्य पहात आम्ही कौसानीला पोहोचलो. कौसानी येथील सृष्टीसौंदर्य व प्रेक्षणीय स्थळे पाहून झाल्यानंतर

संध्याकाळी सहाच्या सुमारास आम्ही गेस्ट हाऊसला पोहोचलो.

मी श्रीस्वामीजींना म्हणाले, ''स्वामीजी! तुम्ही मला ज्ञानेश्वरीतील ओव्या समजावून सांगा. मी माझे रजिस्टर व पेन घेऊन येते. श्रीस्वामीजी त्रिशूल, नंदादेवी, पंचचुली इत्यादी पर्वत शिखरांच्या रांगांकडे पहात बसले होते. पर्वतांवरील बर्फावर मावळत्या सूर्याची किरणे पडून सर्व शिखरे सोन्याप्रमाणे चमकत होती. मी रजिस्टर व पेन घेऊन त्यांच्यासमोर बसले. श्रीस्वामीजी ओव्या म्हणू लागले...

**अनादि सिद्ध हे आघवे । होत जातसे स्वभावे ।**
**तरी तुवा का शोचावे । सांग मज ।।१।।**

**परी मूर्खपणे नेणसी । न चिंतावे ते चिंतसी ।**
**आणि तूचि निती सांगसी । आम्हाप्रती ।।२।।**

**देखे विवेकी जे होती । ते दोही ते न शोचती ।**
**जे होय जाय हे अंती । म्हणोनिया ।।३।।**

ज्याप्रमाणे प्रोड्यूसर, डायरेक्टर व टीम मेंबर्स एक फिल्म तयार करतात, त्या फिल्ममध्ये कोणी जन्माला यायचं, कोणी मरायचं, कोणी मार खायचा, कोणी जिंकायचं, कोणी मार खाताना मरायचं, कोणी प्रेम करायचं, कोणी प्रेमात विघ्ने आणायची, कोणी हिरो व्हायचं, कोणी हिरॉईन व्हायचं, या सर्व गोष्टी प्रोड्यूसर, डायरेक्टर व त्याची टीम ठरवत असते व त्याप्रमाणे पूर्ण फिल्म तयार होते.

थिएटर मधील प्रेक्षकांनी ती फिल्म फक्त पहायची असते. त्यात ते काहीच ढवळाढवळ करू शकत नाहीत. त्याप्रमाणे...

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

"अर्जुना ! हे जग अनादि सिद्ध आहे. प्रत्येक सेकंदाला काय घडणार हे आगाऊ ठरलेले आहे. अर्जुन रूपाने तू विषाद करणार, श्रीकृष्ण रूपाने ईश्वर अर्जुनाला उपदेश करणार, महर्षी व्यास सर्व लिहून ठेवणार व भगवान् श्रीकृष्ण ज्ञानेश्वरांच्या रूपाने परत जन्माला येऊन मूढ जनांना ज्ञानेश्वरीच्या रूपाने गीता समजावून सांगणार. या सर्व गोष्टी पूर्व नियोजित आहेत, अनादि सिद्ध आहेत. निसर्ग नियमाप्रमाणे त्या आपोआपच होत असतात. ज्याप्रमाणे प्रथम उन्हाळा येतो नंतर पावसाळा येतो तद्नंतर हिवाळा येतो व पुन्हा उन्हाळा येतो, याला निसर्गक्रम म्हणतात. त्याचप्रमाणे विश्वामध्ये घडणारी प्रत्येक गोष्ट निसर्गाच्या नियमानुसार घडत असते."

भगवान् श्रीकृष्ण म्हणतात...

"पण मूर्खा तुला हे कळत नाही. ज्याचा विचारसुद्धा कधी करू नये त्याचा तू विचार करतोस आणि मलाच नीतिमत्तेच्या गोष्टी सांगतोस." श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

"जी माणसे विवेकी असतात, ते सुख आणि दुःख या दोन्ही गोष्टींचा विचार करत नाहीत. ईश्वराची जशी इच्छा असेल तसे घडेल असे म्हणतात व आनंदात राहतात म्हणून तू विवेक प्राप्त करून घे! म्हणजे तुझे मन सदैव आनंदात राहील आणि एक गुप्त गोष्ट तुला सांगतो. जो सदैव आनंदात राहतो तो हे विश्व निर्माण करणाऱ्या ईश्वराच्या खूप जवळ जातो म्हणून लक्षात घे!"

**सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे ।**
**आणि लाभालाभ न धरावे । मनामाजी ।।**

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

"सुखाच्या गादीवर लोळत असताना मी पूर्ण सुखी आहे हा

भ्रम मनात बाळगू नये. कारण शनीची साडेसाती सुरू झाली की, रावणासारख्या सोन्याची लंका बांधणाऱ्या राजाच्या पाठीमागेसुद्धा संकटांचा ससेमिरा लागतो.

तुझ्या कर्म प्रारब्धाप्रमाणे जेव्हा तुला दुःख प्राप्त होईल तेव्हा त्या दुःखाचा स्पर्श मनाला होणार नाही, किंवा त्या दुःखाचा परिणाम मनावर होणार नाही याची दक्षता घे! जर काही लाभ झाला तरी आनंद मानू नकोस व हानी झाली तरी त्याचा खेद मानू नकोस कारण या सर्व गोष्टी तुझ्या प्रारब्धाप्रमाणे होतच रहाणार आहेत. या चक्रातून जर बाहेर पडायचे असेल तर सोऽहम् ध्यान कर! ते जमले नाही तर ईश्वराच्या स्तोत्रांचे पाठ कर! ते करायला वेळ मिळत नसेल तर येता-जाता, उठता-बसता, अखंड नामस्मरण कर व तेही करणे जमत नसेल तर हातात टाळ घेऊन थोडे भजन कर! अतएव दररोज थोडा वेळ तरी ईश्वरचिंतन कर! म्हणजे केव्हातरी ईश्वराची कृपा होईल. या जन्मी, पुढच्या जन्मी किंवा दहा जन्मानंतर केव्हातरी ईश्वराची कृपा होईल व जन्म-मरणाच्या चक्रातून सुटण्याचा मार्ग मिळेल.''

आता थोड्यावेळापूर्वी मी तुम्हाला काही ओव्या सांगितल्या त्यातील एका ओवीमध्ये '**देखे विवेकी जे होती ।**' असे शब्द आहेत. यातील विवेक या शब्दावर मला काही सांगायचे आहे.

**मद् हृदयी सद्गुरु । तेणे तरलो हा संसार पुरु ।**
**म्हणौनी विशेषे अत्यादरु । विवेका वरी ।।**

**म्हणौनी जाणितेनी गुरु भजिजे । तेणे कृतकार्य होईजे ।**
**जैसे मूळ सिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ।।**

ज्याप्रमाणे वटवृक्षाच्या किंवा पिंपळवृक्षाच्या अथवा

आम्रवृक्षाच्या मुळाशी पाणी घातले असता, शाखा, पल्लवसहित संपूर्ण वृक्ष संतुष्ट होतो त्याप्रमाणे सद्गुरुची भक्ती केल्यानंतर सर्व देव-देवता संतुष्ट होतात.

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

''मी माझ्या ह्रदयामध्ये सदैव सद्गुरुला स्थापन केलेले आहे. त्यामुळे जन्म-मृत्युरूपी संसारातून माझी सुटका झाली आणि ह्रदयात सद्गुरु राहिल्याकारणाने माझी सद्सद्विवेकबुद्धी सदैव जागृत असते. किंबहुना मी असे म्हणेन की, पूर्वजन्मी जर सद्गुरुची सेवा केली असेल तर सद्सद्विवेकबुद्धीच्या रूपाने सद्गुरु सद्भक्ताच्या ह्रदयात रहातात. सद्सद्विवेकबुद्धी म्हणजेच सद्गुरु! सद्गुरु म्हणजेच सद्सद्विवेकबुद्धी!'' सद्सद्विवेकबुद्धी कशी असते किंवा सद्सद्विवेकबुद्धी म्हणजे काय? याची परिभाषा करतांना श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

**तैसी दुर्लभ जे सद्बुद्धी । जिये परमात्म्याची अवधी ।**
**जैसा गंगेसी उदधी । निरंतर ।।**

**तैसे ईश्वरावाचूनी काही । आणीक लाणी नाही ।**
**तेचि एक बुद्धी पाही । सद्बुद्धी ते ।।**

सद्बुद्धी प्राप्त होणे ही अतिशय दुर्लभ गोष्ट आहे. सद्बुद्धी प्राप्त झाली की, मानवाला ''मला परमात्म्याशी एकरूप व्हायचे आहे,'' ''ईश्वराशी एकरूप व्हायचे आहे,'' ''देवाशी एकरूप व्हायचे आहे'' अशी ओढ लागते; अशी ओढ लागणे म्हणजे ''**सद्बुद्धी!**''

हा मुद्दा आणखी पटवून सांगण्यासाठी श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

‘‘उंच उंच हिमालयामध्ये जेथे कोणी जाऊ शकत नाही, अशा गोमुख या ठिकाणी गंगा नदीचा उगम होतो. त्या गंगा नदीला समुद्राची अशी काही ओढ जन्मतःच लागलेली असते की, पाच हजार कि. मी. चा प्रवास करून ती शेवटी समुद्राला जाऊन मिळते. प्रत्येक नदीला समुद्राकडे जाण्याची नैसर्गिक ओढ असते. त्याप्रमाणे ज्याला सद्‌बुद्धी प्राप्त झाली आहे अशा आत्म्याला म्हणजेच मनुष्याला परमात्म्याची ओढ आपोआपच लागते. अशा माणसाला ईश्वरावाचून काहीही आवडत नाही. ईश्वर हे एकच साध्य त्याला प्राप्त करायचे असते. तो ईश्वराच्या दिशेने पुढे पुढे जात रहातो. अनेक प्रकारचे कष्ट सहन करतो व ईश्वराशी एकरूप होतो.’’

ॐ

## मोटकी देहाकृती उमटे ...!

**आ**मचे त्या दिवशीचे लिखाण संपले. तेथून आम्ही अल्मोडामार्गे बाबा निमकरौली यांच्या तपस्थानात आलो. श्रीस्वामीजी ध्यान करत बसले.

सद्‌बुद्धी या विषयावर त्यांनी काल बरेच सांगितले होते. ज्ञानेश्वरीतील ओव्याही सांगितल्या होत्या. ‘‘अशी सद्‌बुद्धी एका जन्मात प्राप्त होत नाही, अनेक जन्म तीव्र ईश्वरभक्ती केल्यानंतर प्राप्त होते.’’ असेही ते म्हणाले. यावरून मला ज्ञानेश्वरीतील काही ओव्या आठवल्या व काही गोष्टीही आठवल्या. ज्ञानेश्वरीतील या दिव्य ओव्या श्रीस्वामीजींनी मला मागेच लिहून दिल्या होत्या व त्याचा अर्थही समजावून दिला होता. ते सर्व मी सविस्तरपणे पुढे लिहित आहे.

**मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पहाट फुटे ।**
**सूर्यापुढे प्रगटे । प्रकाशु जैसा ।।१।।**

**तैसी दशेची वाट न पाहता । आणि वयसेचिया गावा न येता ।**
**बालपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।।२।।**

**तिये सिद्धप्रज्ञचेनी लाभे । मनचि सारस्वत दुभे ।**
**मग सकळ शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ।।३।।**

**ऐसे जे जन्म । जयालागी देव सकाम ।**
**स्वर्गी ठेले जप होम । करिती सदा ।।४।।**

सुमारे एक-दोन वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींनी या ओव्या मला लिहून घेण्यास सांगितले होते व त्याचा अर्थही समजावून सांगितला होता. आज जेव्हा श्रीस्वामीजींनी विवेकबुद्धी कोणाला होते या विषयावर भाष्य केले तेव्हा मला या ओव्या आठवल्या. मी माझ्या दुसऱ्या रजिस्टर मधून या ओव्या शोधून काढल्या व या ओव्यांच्या आधारे मी तुम्हाला काही अद्‌भुत गोष्टी सांगणार आहे. प्रथम या ओव्यांचा अर्थ समजून घेऊ या!

एक बाळ जन्माला येते, ते बाळ आत्मज्ञानी असते. खूप ज्ञानी असते. त्याच्या ज्ञानाचा प्रकाश जगभर पडणार असतो. सूर्योदय होण्यापूर्वी क्षितिजावर जसा प्रकाश दिसतो त्याप्रमाणे जणूकाही आत्मज्ञानाची पहाट झाली आहे असे वाटते. आता हळूहळू ज्ञानाचा प्रकाश सर्व जगभर पसरेल याचा शुभ-शकुन म्हणून ते मूल जन्माला आलेले असते. जन्मतः या छोट्याशा मुलाकडे सद्‌सद्‌विवेकबुद्धी असते. त्यामुळे वय लहानच असले तरी पण अशा बाळाला सर्वज्ञता प्राप्त असते. सिद्धप्रज्ञा जन्मतः प्राप्त असल्यामुळे त्याच्या मुखाने

जणूकाही सरस्वतीच बोलू लागते. चौथ्या-पाचव्या वर्षीच अशा मुलाकडे खूप खूप ज्ञान असते. ऐकणाऱ्याला असे वाटते की या इतक्या लहान मुलाकडे एवढे ज्ञान आले कोठून! अशाप्रकारचा जन्म प्राप्त व्हावा म्हणून स्वर्गलोकातील देवसुद्धा जप, होम करत असतात. जेव्हा एखादे असे बालक जन्माला येते, तेव्हा स्वर्गलोकातील देवसुद्धा स्तुती स्तोत्रे गाऊ लागतात आणि म्हणतात... ''पृथ्वीलोक धन्य आहे. या पृथ्वीवरच जगाच्या उद्धाराकरिता महात्मे प्रकट होत असतात. अशाप्रकारचा जन्म, ज्यांनी पूर्वजन्मी प्रचंड निस्वार्थ बुद्धीने, सद्सद्विवेकबुद्धीने, लोकांच्या कल्याणार्थ देह झिजवला आहे व त्यासाठी प्रचंड तपश्चर्या केली आहे अशाच महात्म्याला प्राप्त होतो.''

ॐ

## आणि निज ज्ञानाची पहाट फुटे ...!

**वा**चक हो ! मी तुम्हाला अशाच एका बालकाची कथा अगदी थोडक्यात सांगणार आहे. ते बालक म्हणजेच श्रीस्वामीजी, म्हणजेच ''**स्वामी दत्तावधूत !**'' यांना '**श्रीदत्तगिरी**' असेही म्हणतात.

श्रीस्वामीजींचा जन्म १९५३ साली भाद्रपद पौर्णिमेला २४ सप्टेंबर रोजी झाला.

सामान्य माणसे ही पिढ्यान्पिढ्या कृपा किंवा क्लेश यांचा अनुभव घेत जगत असतात. थोडेफार चांगले दिवस आले की ते त्याला ईश्वराची **कृपा** समजतात व थोडेफार **क्लेश** होताच मी असे काय पाप केले म्हणून रडू लागतात व ईश्वराची करुणा भाकू लागतात.

जन्म-सिद्ध पुरुषांचे तसे नसते. ते अगदी बालपणापासून संघर्षाला तोंड देत असतात. संकटाशी सामना करत असतात. हे सर्व

करत असताना ते आतून शांत व समाधानी असतात.

श्रीस्वामीजींनाही जन्माला आल्यापासून संकटे व समस्यांना तोंड द्यावे लागले.

श्रीस्वामीजी जेव्हा दीड-दोन महिन्यांचे होते. तेव्हा त्यांच्यावर पहिले संकट आले. एक-दोन दिवसाचे आजारपण येऊन श्रीस्वामीजींचा मृत्यू झाला. घरात रडारड सुरू झाली. दीड-दोनशे माणसे गोळा झाली व अंत्यसंस्काराची तयारी पूर्ण झाली.

इतक्यात भगवान् दत्तात्रेय तेथे साधूच्या रूपात प्रकट झाले. त्यांच्या अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. जणूकाही नरसोबावाडीहून धावत आले असे वाटत होते. कमरेला पांढरे धोतर होते व अंगावरती भगव्या रंगाचा लांब हाताचा गुडघ्याखाली येणारा सिल्कचा शर्ट होता.

''छोकरा किधर है! छोकरा किधर है!'' अशी गर्जना करत त्यांनी धावतच घरात प्रवेश केला.

वडिलांच्या मांडीवर श्रीस्वामीजींचे मृत शरीर होते. ते त्यांनी उचलले व ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी एक चापटी मारली. या चापटीने श्रीस्वामीजी जिवंत झाले. ब्रह्मरंध्रावर थोडे भस्म टाकून ते साधू (म्हणजेच भगवान् दत्तात्रेय) अंगणात आले व अचानक अदृश्य झाले ते कोठे गेले हे कोणालाही कळले नाही.

हळूहळू श्रीस्वामीजी मोठे होऊ लागले. घरात अठरा विश्वे दारिद्र्य असल्याने अंगावर कपडे फक्त घराच्या बाहेर पडताना असायचे.

श्रीस्वामीजी एक वर्षाचे असताना एक साधू दररोज दुपारी त्यांच्या घरी यायचा. श्रीस्वामीजींची आई त्याला जेवण द्यायची तेवढेच तो खायचा. बाकी कोणाकडून काहीही घेत नसे. संपूर्ण रत्नागिरीत तो

कोणाच्याही घरी जायचा नाही व कोणाकडेही काही खायचा नाही. संध्याकाळी चार-पाचच्या सुमारास तो श्रीस्वामीजींच्या आईच्या हातचा चहा प्यायचा. तो तामिळ भाषिक होता. तो श्रीस्वामीजींच्या वडिलांना श्रीस्वामीजींविषयी काहीतरी सांगायचा. पण कोणालाच काही कळायचे नाही. श्रीस्वामीजींकडे बोट दाखवून तो सिद्ध! सिद्ध! एवढेच बोलायचा. हा साधू सूर्य त्राटक करायचा.

श्रीस्वामीजी दोन वर्षांचे असताना हिमालयातून एक सिद्धपुरुष आले; त्यांनी या दोन वर्षांच्या बालकाकडे पाहून उद्‌गार काढले, ''हा हिमालयातील योगी आहे. घरात राहणार नाही, फक्त जगदोद्धारासाठी याने अवतार धारण केला आहे.''

श्रीस्वामीजी तीन वर्षांचे असताना त्यांचे वडील रत्नागिरीहून राजापूर येथील शीळ गावात स्थानांतरित झाले. वडील दररोज सुमारे सहा किलोमीटर चालत राजापूर येथे जात व दुपारी परत येत तसेच परत संध्याकाळी राजापूरला जात व अंधार पडण्यापूर्वी परत येत.

तीन वर्षांच्या बाल स्वामीजींची ड्यूटी अशी असे की, ते दररोज दुपारी व रात्री वडिलांचे पाय चेपत. श्रीस्वामीजी भिंतीचा आधार घेऊन आपल्या पायांनी वडिलांच्या पाठीपासून पायापर्यंतचा सर्व भाग चेपून देत.

वडील दररोज सकाळी देवाची पूजा करत. पूजा करताना अनेक देव-देवतांची स्तोत्रे म्हणत. ही सर्व स्तोत्रे श्रीस्वामीजींना वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत पाठ झाली होती. दररोज संध्याकाळी वडील मुलांना गोष्टी सांगत, गाणी म्हणून दाखवत. वडील जी काही गाणी म्हणत व स्तोत्रे म्हणत, ती सर्व श्रीस्वामीजींना तोंडपाठ होत असत. दर सोमवारी संध्याकाळी आरती होत असे. श्रीस्वामीजींना सर्व आरत्या

तोंडपाठ झाल्या होत्या. इतकेच नव्हे तर दर सोमवारी श्रीस्वामीजींचे वडील शिवलीलामृतातील अकरावा अध्याय वाचत. आठवड्यातून एकदा ऐकूनही श्रीस्वामीजींना हा अकरावा अध्याय तोंडपाठ झाला होता.

**बालपणीच सर्वज्ञता.. । वरी तयाते...।**

श्रीज्ञानेश्वरांच्या या ओवीचा अनुभव जणूकाही श्रीस्वामीजी घेत होते.

दररोज दुपारी व रात्री वडिलांचे पाय चेपतांना श्रीस्वामीजी वडिलांना विविध प्रश्न विचारून भंडावून सोडत. सर्वसाधारणपणे ते प्रश्न असे असत.

**प्रश्न** - तपश्चर्या का करतात?

**उत्तर** - देव प्रसन्न होण्यासाठी तपश्चर्या करतात.

**प्रश्न** - तपश्चर्या कशी करतात?

तीन वर्षांच्या श्रीस्वामीजींनी दुपारच्या वेळी भिंतीचा आधार घेत आपल्या चिमुकल्या पायांनी वडिलांचे अंग दाबून देता देता प्रश्न विचारला.

**उत्तर** - एखाद्या झाडाखाली बसायचे व ''**ॐ नमः शिवाय**'' असे म्हणत राहायचे याला तपश्चर्या म्हणतात.

वडिलांनी सांगताच श्रीस्वामीजी दररोज एका झाडाखाली बसून जप करू लागले.

वयाच्या दुसऱ्या वर्षापासूनच '**दत्तगुरु**' '**दत्तगुरु**' असा जप करत असत. आता वडिलांच्या सांगण्याने त्यांचा '**ॐ नमः शिवाय**' असा जप सुरू झाला. श्रीस्वामीजींची तल्लख बुद्धी पाहून श्रीस्वामीजींची मोठी बहीण पुष्पाताई हिने श्रीस्वामीजींना वयाच्या तिसऱ्या वर्षीच अ,

आ, ई व बाराखडी शिकवल्या. चौथ्या वर्षापर्यंत श्रीस्वामीजींना तीसपर्यंत पाढे पाठ होते व जमिनीवर पडलेला कुठलाही मराठी पेपरचा तुकडा ते वाचत असत. त्यांचे घर अरण्यात होते. त्यामुळे एखादा पेपरचा तुकडाही वाचायला मिळणे कठीण होते. परंतु दुकानातून कुठल्याही सामानाची पुडी घरात आली तर त्या पेपरचा तुकडा वाचायला मिळत असे. दुकानही सहा किलोमीटर दूर असे, तेथून केव्हातरी वडील सामान आणत असत. सामान बांधलेले सर्व कागद श्रीस्वामीजी वाचून काढत असत.

एकदा श्रीस्वामीजींच्या वडिलांनी रविवारचा लोकसत्ता पेपर विकत आणला. श्रीस्वामीजींना तो खूप आवडला. त्यातील किशोरकुंज हे सदर सर्वात जास्त आवडले व दर रविवारी लोकसत्ता आणावा म्हणून वडिलांजवळ हट्ट करू लागले. घरापासून सुमारे दीड कि. मी. अंतरावर एका खोलीमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शाळा भरत असे. चौथे वर्ष सुरू होताच वडिलांनी 'आता शाळेत जायला हवे' असे श्रीस्वामीजींना सांगितले.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''शिकण्याकरिता शाळेत जायचे असते. मला चांगले वाचता येते. तीसपर्यंत पाढे येतात. मग मी शाळेत कशाला जाऊ?''

यावर वडील म्हणाले, ''शाळेमध्ये एक पेटारा असून या पेटाऱ्यात गोष्टीची खूप पुस्तके आहेत. ती तुला वाचायला मिळतील.'' गोष्टीची पुस्तके वाचायला मिळणार हे ऐकून श्रीस्वामीजी खूष झाले.

दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यानंतर त्यांनी आपले शिक्षक सामंत गुरुजी यांना आपला अभ्यास कोठपर्यंत झाला आहे ते सिद्ध करून दाखवले. पाढे म्हणून दाखवले, पुस्तके वाचून दाखवली तेव्हा

सामंत गुरुजी म्हणाले...''आमची शाळा चौथीपर्यंत आहे. या मुलाचा चौथीपर्यंतचा अभ्यास पूर्ण झालेला आहे. सध्या आपण याला तिसरीत बसवूया व नंतर याला तुम्ही रत्नागिरीला शिकायला पाठवा. या मुलाचे येथे नुकसान होईल.''

याच काळामध्ये श्रीस्वामीजींची मारुती उपासना सुरू झाली होती. मारुती हा देव अतिशय लवकर प्रसन्न होतो असे वडिलांनी सांगितल्याकारणाने मारुती स्तोत्राचे रोज शंभरहून अधिक पाठ करायचे अशी साधना श्रीस्वामीजींची सुरू होती. अखेरीस श्रीस्वामीजींना मारुतीने दर्शन दिले.

वयाच्या सहाव्या वर्षी, एक साधू श्रीस्वामीजींचा शोध घेत आले व त्यांनी स्वतः जवळील एक चांदीची दत्त मूर्ती व जप माळ श्रीस्वामीजींना देऊन दत्तमंत्राचा उपदेश केला. तेव्हापासून आपल्या आधी-व्याधी निवारणार्थ लोक श्रीस्वामीजींकडे येऊ लागले व श्रीस्वामीजींची साधनाही जोमाने सुरू झाली.

श्रीज्ञानेश्वरांच्या, **मोटकी देहाकृती उमटे ।** या ओवीचा मी स्वतः साक्षात् अनुभव श्रीस्वामीजींच्या रूपाने घेतलेला आहे. त्याची आठवण झाल्याने थोडक्यात वर्णन केले आहे.

ईश्वरभक्त किंवा अवतारी आत्मे यांचे जीवन बालपणा-पासूनच किती दिव्य असते हे दाखवण्याचा येथे प्रयत्न केला आहे. याशिवाय श्रीस्वामीजींनी केलेली घनघोर तपस्या मी स्वतः पाहिलेली आहे व फक्त लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी केलेले कष्टही स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेले आहेत.

श्रीस्वामीजींना दत्ताच्या उपासनेने विविध प्रकारचे ज्ञान होऊ लागले. **''ॐ दत्तगुरु ॐ''** असा अखंड जप ते करू लागले. या

जपाने त्यांच्यामध्ये अद्‌भुत तेज येऊ लागले व त्यांना विविध प्रकारचे ज्ञान होऊ लागले. याशिवाय ते बोलतील तो शब्द खरा ठरत असे.

श्रीस्वामीजींना सहाव्या वर्षी जे काही अनुभव येत, त्यातील एक-दोन अनुभव पुढे देत आहे.

एकदा श्रीस्वामीजी व त्यांचे वडील राजापूरातून जंगलातील पायवाटेने शीळ गावातील आपल्या घरी परत येत होते. अचानक सहा-सात फूट लांबीचा सोनेरी रंगाचा नाग श्रीस्वामीजींसमोर फडा काढून उभा राहिला. आपला मुलगा घाबरेल असे वाटून वडिलांनी श्रीस्वामीजींच्या हाताला घट्ट धरून ठेवले होते. श्रीस्वामीजींनी आपला हात अलगद सोडवून घेतला व त्या नागासमोर पद्मासन घालून बसले. नागाने श्रीस्वामीजींच्या डोक्यावर फडा धरला. थोड्यावेळाने नाग तेथून निघून गेला. श्रीस्वामीजी व त्यांचे वडील दोघेही पायवाटेने पुढे जाऊ लागले. वडील श्रीस्वामीजींना म्हणाले...

''मी तुला **ॐ नमः शिवाय** जप कर म्हणून सांगितले होते. तू जप करत आहेस म्हणून भगवान् शंकराने तुला नागाच्या रूपात दर्शन दिले!''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

''नागाच्या रूपात भगवान् शंकर आलेले नव्हते. पळसुले देसाई यांचा पूर्वज नागरूपात गेली अनेक वर्षे रहात आहे. मला सर्पयोनीतून मुक्तता द्या ! अशी प्रार्थना करण्यास तो आला होता. मनुष्य रूपाने तो जेव्हा पृथ्वीतलावर वावरत होता, तेव्हा त्याने काहीच दान-धर्म केला नाही, पुण्यकर्म केले नाही. ब्राह्मणजातीत जन्माला येऊनही काहीच आध्यात्मिक प्रगती न केल्याकारणाने गेली दीडशे वर्षे तो सर्पयोनीत वावरत आहे. तो माझ्याकडे मुक्ती मागण्यासाठी आला

होता!''

आपला सहा वर्षांचा मुलगा आध्यात्मामध्ये आपल्यापेक्षा खूपच पुढे गेला आहे हे वडिलांच्या लक्षात आले.

शाळेत जाण्यासाठी श्रीस्वामीजी पाऊलवाटेने एक किलोमीटर चालत जात. तद्नंतर एक नदी क्रॉस करत. नदी क्रॉस करून झाल्यानंतर एक उंच पर्वत चढावा लागे. पर्वत माथ्यावरून सुमारे अर्धा किलोमीटर चालून गेल्यानंतर परत पाऊलवाटेने थोडे उतरावे लागे. तेथील देसाई यांच्या घराच्या माडीवर शाळा भरत असे.

एकदा श्रीस्वामीजी सकाळी साडेदहाच्या सुमारास शाळेतून घरी परत आले. श्रीस्वामीजींपेक्षा तीन वर्षांनी मोठी बहीण आशा उर्फ बेबी खूप रडत होती. सहा वर्षांच्या श्रीस्वामीजींना त्यांची आई म्हणाली, ''बेबीच्या पोटात खूप दुखत आहे. तू पळत पळत राजापूरला जा; वडिलांचा शोध घे व डॉक्टरला घेऊन ये!''

आईने असे सांगताच श्रीस्वामीजी पळत पळत निघाले. परंतु तोपर्यंत नदीला खूप पूर आलेला होता. सहा वर्षांचे बाल श्रीस्वामीजी त्या पुरात नक्कीच वाहून गेले असते. श्रीस्वामीजींच्या गावात पाऊस न पडल्याने या अचानक आलेल्या पुराची कोणालाच कल्पना नव्हती. श्रीस्वामीजींची उंची अंदाजे तीन फूट होती व नदीचे पाणी तीन फूटाहून जास्त होते. श्रीस्वामीजी नदीजवळ गेले व पाण्यात पाऊल टाकले इतक्यात मागून हाक ऐकू आली.

''अरे बाळ, जरा थांब!'' श्रीस्वामीजींनी मागे वळून पाहिले. त्यांना एक सहा फूट उंचीचा पेशवेकालीन कपडे घातलेला धिप्पाड मनुष्य दिसला. तो श्रीस्वामीजींना म्हणाला,

"मलाही नदीच्या पलीकडे जायचे आहे. तू मला नदीच्या पलीकडे घेऊन जाशील का?"

तीन फूट उंचीचे, सहा वर्षांचे, जोरात वारा आल्यास उडून जातील अशा तब्येतीचे श्रीस्वामीजी त्या सहा फूट उंचीच्या धिप्पाड गृहस्थाला म्हणाले, "हो ! मी जरूर तुम्हाला नदी पार करून देईन."

त्या धिप्पाड गृहस्थाने श्रीस्वामीजींचा दंड पकडला व नदीत प्रवेश केला. त्या धिप्पाड गृहस्थाच्या पोटापर्यंत नदीचे पाणी आले पण श्रीस्वामीजींची चड्डीसुद्धा भिजली नव्हती. एका बाजूने गुडघ्यापर्यंत पाणी व दुसऱ्या बाजूला सुमारे चार-साडेचार फूट पाणी हे पहाताच ही व्यक्ती दैवी पुरुष आहे हे श्रीस्वामीजींच्या लक्षात आले. नदी पार केल्यावर श्रीस्वामीजींनी त्यांना नमस्कार केला. ती व्यक्ती अरण्यात निघून गेली.

मला १९८६ मध्ये ही गोष्ट श्रीस्वामीजींनी सांगितली. तेव्हा मी त्यांना विचारले, 'ते कोण होते?'

तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, "त्या अरण्यात गुप्तपणे तपस्या करणारे ते एक ऋषी होते. असे ऋषी चराचरात भरून राहिलेले असतात. यांना '**परमेश्वर**' म्हटले जाते. मी नदीत वाहून जाऊ नये म्हणून ते प्रकट झाले होते."

श्रीस्वामीजींना अदृश्य सृष्टीतून अशा प्रकारे सदैव मदत मिळत असे.

नदी पार केल्यावर बाल श्रीस्वामीजी पायवाटेने एक पर्वत चढून गेले. पर्वत माथ्यावर सुमारे एक कि. मी. धावत गेल्यानंतर उतरण लागली, पुढे राजापूरचा रस्ता लागला. एक कि. मी. धुळीच्या रस्त्याने धावत गेल्यानंतर म्हसोबा नावाचे एक ठिकाण होते. तेथे

त्यांना आपले वडील दिसले. तेथील वटवृक्षाखाली रहाणाऱ्या एका साधूची थोडीफार सेवा करून म्हणजे तेथे साफसफाई वगैरे करून वडील पुढे जाण्यास निघाले होते. वटवृक्षापासून सुमारे २५-३० फूट पुढे गेले असतील, इतक्यात श्रीस्वामीजींची हाक त्यांना ऐकू आली. ते पुन्हा वटवृक्षाखाली आले. श्रीस्वामीजींनी बेबीच्या पोटात दुखत असल्याचे सांगितले व आईचा निरोप दिला.

वटवृक्षाखालील तो साधू श्रीस्वामीजींच्या वडिलांना म्हणाला, ''डॉक्टरला नेण्याची काही गरज नाही, मधू! तू तुझ्या कामाला निघून जा!''

श्रीस्वामीजींचे वडील राजापूरच्या दिशेने निश्चिंतपणे निघून गेले व श्रीस्वामीजी त्या साधूजवळ विश्रांती घेण्यासाठी बसले.

त्या साधूने श्रीस्वामीजींना गुळाचा चहा दिला व आपल्या जवळील चिवडा खायला दिला व म्हणाला, ''निवांत बस!'' ''जेव्हा तुला दत्त महाराज भेटले व तुझा हात धरून त्यांनी नदी पार करून दिली, तेव्हाच तुझ्या बहिणीला बरे वाटलेले आहे. पण तुझ्या डोक्यामध्ये वडिलांना गाठायचेच व आईचा निरोप सांगायचा, या विचारांचा तीव्र आवेग असल्याकारणाने त्या आवेगाला त्यांनी अडवले नाही. तुला फार कष्ट होऊ नयेत म्हणून तुझ्या वडिलांना येथे थांबवून ठेवण्याचा संदेश त्यांनी मला दिला. त्याप्रमाणे मी त्यांना थांबवून ठेवले. सिद्धयोग्यांच्या गोष्टी सामान्य माणसांसमोर उघड करायच्या नसतात म्हणून मी तुझ्या वडिलांना यातील काहीच सांगितले नाही!''

त्या साधूचा निरोप घेऊन श्रीस्वामीजी घरी परत आले. त्यांची बहीण ठणठणीत बरी झालेली होती. श्रीस्वामीजींना अशा प्रकारचे कितीतरी अनुभव येत असत. मारुतीला ते आपला मित्र मानत. कारण

तो रोज रात्री येऊन श्रीस्वामीजींच्या सूक्ष्मदेहाला त्यांच्या शरीरातून बाहेर काढत असे व ब्रह्मांडभर श्रीस्वामीजींना फिरवून परत आणत असे. सूक्ष्मदेहाचे ज्ञानही त्यानेच श्रीस्वामीजींना दिले. या सर्व गोष्टी वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षी घडल्या. श्रीस्वामीजी बोलतील तो शब्द खरा होत असे. त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी लोक दूरदूरून येत असत पण या शक्तीमुळे एकदा त्यांच्यावर दुःखदायक प्रसंग ओढवला. त्या प्रसंगानंतर त्यांनी मारुतीरायाला प्रार्थना करून वाचासिद्धी स्वतःकडे राहणार नाही अशी व्यवस्था केली. तो दुःखदायक प्रसंग असा...

शीळ गावातील अरण्यातील श्रीस्वामीजींच्या घरासमोर छोटेसे अंगण होते. अंगणासमोरून पाटाचे पाणी वाहत असे. त्या पाटाच्या पाण्याजवळ छोटीशी टाकी होती. पाटाचे पाणी त्या टाकीत पडत असे. दीड फूट बाय दीड फूट अशा त्या टाकीतील पाण्यात डुंबत रहाणे हा श्रीस्वामीजींचा आवडता छंद होता. त्याच्या पलीकडे एक मोठी बाग होती. अधून-मधून अनेक विविध रंगी पक्षी त्या बागेमध्ये दिसत असत.

पावसाळ्याचे दिवस होते. पाटाला भरपूर पाणी आलेले होते. श्रीस्वामीजींच्या वयाचा त्यांचा एक मित्र शंकर श्रीस्वामीजीं बरोबर खेळण्यासाठी आला होता. दोघांनी मिळून त्या पाण्यात खूप मस्ती केली. इवल्याशा दोणीत (छोटी टाकी) दोघेही बसले होते. इतक्यात शंकर श्रीस्वामीजींना म्हणाला, ''माझा नेम बघ!''

काही कळायच्या आत शंकरने जवळच पडलेला एक छोटासा दगड उचलला व समोरच्या झाडावर मारला. श्रीस्वामीजींना हा काय प्रकार आहे काहीच कळले नव्हते. शंकर धावत धावत त्या झाडाखाली गेला व पिवळ्या रंगाचा एक छोटासा पक्षी घेऊन टाकीजवळ आला. त्याने तो पक्षी टाकीत सोडला. त्या छोट्याशा टाकीमध्ये पक्ष्याने

थोडावेळ पंख फडफडवले व पक्षी मृत झाला.

पाच वर्षांचे श्रीस्वामीजी शंकरला म्हणाले, ‘‘शंकर तू खूप मोठे पाप केलेस, अरे! आपण **जसं करावं तसं भरावं लागतं!** बघ तुला काहीतरी नक्की शिक्षा होणार!’’

तो विषय तेथेच संपला. शंकर त्याच्या घरी गेला. श्रीस्वामीजींनी त्या मृत पक्ष्याचे बागेत दफन केले व त्यांनाही या गोष्टीचा विसर पडला.

बरोबर सातव्या दिवशी शंकर साप चावून मेल्याची बातमी आली. तेव्हा श्रीस्वामीजींना खूप मोठा धक्का बसला व वाईट वाटले. त्यांनी मारुतीरायाला प्रार्थना करून आपल्याकडील वाचासिद्धी मारुतीरायाला अर्पण केली. नंतर कधीही अशी बोलाफूलाची गाठ पडली नाही.

वयाच्या आठव्या वर्षी श्रीस्वामीजींचे शीळ, राजापूर येथील वास्तव्य संपले व पाचव्या इयत्तेपासून पुढे शिकण्यासाठी ते रत्नागिरीला आले.

श्रीस्वामीजींच्या वडिलांनी रत्नागिरीच्या मूळ घरी आता कायमचे वास्तव्य करायचे ठरवले, त्यामुळे त्यांनी राजापूर कायमचे सोडले व सहकुटुंब रत्नागिरीला आले.

मारुती मंदिर येथील दामले विद्यालय या शाळेत नांव घालायचे ठरवले होते. पण त्यासाठी थोडा अवधी होता. शाळेला उन्हाळी सुट्टी होती. या उन्हाळी सुट्टीच्या दिवसात श्रीस्वामीजींनी आंब्याच्या पेट्या तयार करण्याचे काम केले व थोडेफार पैसे मिळवून वडिलांना दिले. पाचवी-सहावी व सातवी या तीन इयत्ता दामले विद्यालयात शिकत असताना सुट्ट्यांच्या दिवसामध्ये श्रीस्वामीजी

काहीतरी काम-धंदा करून पैसे मिळवत व वडिलांना देत.

सातव्या इयत्तेची वार्षिक परीक्षा व बोर्डाचीही परीक्षा संपली. ज्या दिवशी परीक्षा संपली त्याच दिवशी तुला पुढे शिकवण्याची माझी ऐपत नाही तू आता नोकरी कर, असे श्रीस्वामीजींना त्यांच्या वडिलांनी सांगितले. दुसऱ्याच दिवशी श्रीस्वामीजींना नोकरी मिळाली.

श्रीस्वामीजींना पहिल्या दोन नोकऱ्यांमध्ये दररोज सहा किलोमीटर चालावे लागायचे. उठल्याबरोबर ते मनातल्या मनात नामस्मरण सुरू करत. अंघोळ करून घरातून नोकरीवर जाण्यासाठी बाहेर पडेपर्यंत त्यांचे हे नामस्मरण चालू असे. कामावर जाण्यासाठी घरातून बाहेर पडले की, ते स्तोत्रे म्हणायला सुरुवात करत. गणपती स्तोत्र, दुर्गा स्तोत्र, मारुती स्तोत्र, नवग्रह स्तोत्र, रामरक्षा व व्यंकटेश स्तोत्र. कामावर पोहोचेपर्यंत ही सर्व स्तोत्रे म्हणून पूर्ण होत असत. कामावर हजर झाल्यानंतर लगेच ते नामस्मरण सुरू करत व हे नामस्मरण आठ-नऊ तास चालू राही.

छोट्या छोट्या दोन नोकऱ्या केल्यानंतर श्रीस्वामीजींना प्रेसमध्ये नोकरी मिळाली. ही नोकरी दूर असल्याकारणाने दररोज एकूण १६ किलोमीटर चालावे लागत असे. या चालण्यामध्ये त्यांची भरपूर साधना होत असे. याशिवाय प्रेसमध्ये कंपोझिंग, बाइंडिंग, प्रिंटिंग करताना ते विविध प्रकारची अनुष्ठाने करत. अशा प्रकारे हातात काम व मुखात नाम अशी त्यांची साधना चालू होती.

श्रीस्वामीजी नोकरी करून पैसे मिळवत होते व घरात पैसे देत होते. त्याचबरोबर साधना करून दैवी शक्ती प्राप्त करत होते व दुःखितांचे दुःखही दूर करत होते.

आपली संसारी कर्तव्ये पार पाडत असतानाही श्रीस्वामीजी दुःखितांचे दुःख कसे दूर करत असत, त्याचे एक उदाहरण पुढे देत आहे.

**आ**शा साखरकर नांवाच्या मुलीला सात रोग होते. रत्नागिरीतील सर्व मोठमोठ्या डॉक्टरांचे उपचार करून झाले होते व सर्वांनी फार दिवस जगणार नाही असे सांगितले होते. आशा साखरकरच्या भावाने श्रीस्वामीजींच्या कानावर ही गोष्ट घातली. या मुलीने सात वर्षांमध्ये काहीही खाल्ले नव्हते. ग्लुकोजचे पाणी, आमटीचे पाणी व भाताची पेज असा तिचा आहार होता. भाताचा एक कण किंवा डाळीचा एखादा दाणा जरी तिच्या पोटात गेला तरी तिला भयानक वेदना होत असत. अन्नाचा एकही कण पोटात जाणार नाही याची काळजी घेऊन तिला पाणी दिले जात असे. आशा साखरकरच्या भावाने सर्व हकिकत श्रीस्वामीजींना सांगितली.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''चल! मी आत्ताच तुझ्या बहिणीला पाहायला येतो.''

आशाचा भाऊ म्हणाला, ''मी रिक्षा घेऊन येतो.''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''नको, मी तुझ्या बहिणीला बरे वाटावे म्हणून प्रार्थना करत आहे, माझी प्रार्थना ईश्वराने मान्य करावी म्हणून मी तुझ्या घरी चालत येणार आहे.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी एका छोट्याशा बाटलीत पाणी मंत्रून घेतले. सात किलोमीटर दूर चालत जाऊन श्रीस्वामीजींनी आशा साखरकरला पाणी दिले.

आशाच्या आईने श्रीस्वामीजींना चहा घेण्याचा खूप आग्रह केला. परंतु श्रीस्वामीजींनी चहा वगैरे काहीही न घेता घरी चालत परत

आले.

किमान परतीचा प्रवास तरी श्रीस्वामीजींनी बसने किंवा रिक्षाने करावा म्हणून आशा, तिचा भाऊ व आई यांनी खूप आग्रह केला. परंतु श्रीस्वामीजींनी ऐकले नाही.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''आशा ठणठणीत बरी झाली तर मला जास्त आनंद होईल. आठ-दहा किलोमीटर चालण्यात मला काहीही कष्ट होत नाहीत. ती चांगली बरी व्हावी अशी माझी खूप खूप इच्छा आहे.''

यावर आशाची आई म्हणाली, ''रत्नागिरीतील मोठमोठ्या एम्.डी. व एम्. एस्. झालेल्या डॉक्टर्सनी उपचार करण्यास नकार दिला आहे. कोणी ऑपरेशनही करण्यास तयार नाही. डॉक्टर म्हणतात हिच्यासाठी तुम्ही पैसे खर्च करू नका. जगेल तितके दिवस हिला पाणी, ग्लूकोज वॉटर देत रहा. कुठल्याही फळांचा रससुद्धा आम्ही तिला देत नाही कारण आतडी सडलेली आहेत, जितके दिवस जगेल तितके दिवस जगेल. आमच्या मुलाने तुम्हाला उगाचच त्रास दिला. रिक्षा व बसची सोय असताना सत्पुरुषाला चालायला लावल्याचे पाप तुम्ही आमच्या डोक्यावर ठेवू नका!''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''काळजी करू नका! आशा नक्की बरी होईल. मी चौदा किलोमीटर चालल्याचे पाप तुम्हाला लागणार नाही उलट माझ्या या तपस्येने देव प्रसन्न होईल व आशीर्वाद आशाला देईल!'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी आशा व तिच्या आईचा निरोप घेतला व चालत आपल्या घरी परत आले.

सात वर्षे आशा अंथरुणावर पडून होती. आंघोळसुद्धा ती आठवड्यातून एकदा करत असे एवढी अशक्त होती, लवकर मृत्यू यावा

म्हणून दररोज देवाला प्रार्थना करत होती पण तिला मृत्यू येत नव्हता. तिची आई व भाऊ तिला भरपूर ग्लूकोज वॉटर प्यायला देत होते. चहा, कॉफी, लिंबू सरबत, फळांचा रस, भात, दूध, दही या सर्व गोष्टी खाण्यास तिला मनाई होती. आशाच्या अंगात त्राण नव्हते.

श्रीस्वामीजींना बघितल्यानंतर आशाच्या अंगामध्ये प्रचंड उत्साह संचारला. ती खणखणीत आवाजात बोलू लागली.

श्रीस्वामीजी आशाच्या घरातून बाहेर पडल्याबरोबर आशाने आईला शेवटचे सांगून टाकले.... ती म्हणाली, 'आई मी तुला शेवटचे सांगते. उद्या सकाळी उठल्याबरोबर मी आंघोळ करणार. चांगल्यापैकी साडी नेसणार अगदी नटून-थटून श्रीस्वामीजींच्या घरी जाणार व श्रीस्वामीजींच्या आईने जे काही जेवण केले असेल ते पोटभर जेवणार! जर मला मृत्यू आला तर कोणालाही दोष देऊ नका. माझी सुटका झाली असे समजा व आनंद माना!'

आशाच्या आईने यावर काहीच उत्तर दिले नाही. अंथरुणावरून उठून दोन पावले चालायची ताकद आशामध्ये नाही हे आशाच्या आईला चांगले माहीत होते. श्रीस्वामीजींना पाहून झालेला आनंदाचा अतिरेक व गेल्या ७-८ वर्षांत मनसोक्त आंघोळ केली नाही, नीट केस विंचरले नाहीत, चांगली साडी नेसली नाही, पावडर-टिकली लावली नाही या सर्व गोष्टींमुळे आलेला उद्रेक या दोन्ही भावनांच्या झालेल्या मिश्रणाने आशा असे बोलत असावी असे  आईला वाटले.

त्या रात्री आशाला अतिशय गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा तिला जाग आली तेव्हा आपण अगदी ठणठणीत बरे झालो आहोत असा आत्मविश्वास तिच्यामध्ये निर्माण झाला होता.

आदल्या दिवशी बोलल्याप्रमाणे तिने मनसोक्त आंघोळ केली

व छानपैकी साडी नेसून अगदी मनासारखे नटून-थटून, बसमध्ये बसून श्रीस्वामीजींकडे आली व श्रीस्वामीजींच्या आईला म्हणाली... ''मला तुमच्या हातचे भरपूर खायचे आहे. भरपूर जेवायला वाढा!'' असे म्हणून पोटभर जेवली व श्रीस्वामीजींना नमस्कार करून घरी परत गेली. आशा ठणठणीत बरी झाली होती. कालांतराने तिचे लग्न झाले, मुले झाली सर्वकाही व्यवस्थित झाले. ही घटना सुमारे पन्नास वर्षांपूर्वीची आहे.

अशा हजारो गोष्टी मला माहीत आहेत. त्या सर्व लिहायच्या ठरवल्या तर मला हजारो पाने लिहावी लागतील. त्यात रोग निवारण, बाधा निवारण, गृहबाधा निवारण, दारिद्र्य निवारण अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. दुसऱ्याच्या कल्याणाकरिता त्यांनी स्वतःचा देह असा काही झिजवला की पुढे पुढे केवळ संकल्पाने दुसऱ्याचे भले करणे हे त्यांना शक्य होऊ लागले. त्यानंतर भूमी, पाषाण, शीळा, जल, फुले, फळे, नारळ, वृक्ष अशा वस्तूंमध्ये शक्ती ठेवून त्याद्वारे लोककल्याण करण्याचे अद्‌भुत सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. भारतात हजारो ठिकाणी त्यांनी शक्ती ठेवली. लिंबू व नारळांसारख्या फळांमध्ये शक्ती ठेवून लोकांचे रोग निवारण व वास्तुदोष निवारण अशा गोष्टी केल्या व सर्वात शेवटी सुमारे तीस वर्षांपूर्वी ते मला म्हणाले...

''ताई! मी ठिकठिकाणी शक्ती ठेवली आहे, याचा तुम्ही स्वतः अनुभव घेतला आहे. आपल्या हातून लाखो लोकांचे कल्याण झालेले आहे. तरी लोककल्याणाची माझी इच्छा अजून पूर्ण झालेली नाही. यापुढे मी पोथ्या व पुस्तके लिहिन, तुम्ही ती प्रकाशित करा. त्यामध्ये अद्‌भुत असे दैवी सामर्थ्य असेल, लोकांच्या मनोकामना पूर्ण होतील,

अदृश्य सृष्टीमध्ये अडकलेल्या आत्म्यांचा उद्धार होईल, पूर्वजांचा उद्धार होईल, लोकांची आध्यात्मात प्रगती होईल. याच कार्यासाठी तुमचा जन्म झालेला आहे.''

श्रीस्वामीजींच्या आज्ञेप्रमाणे गेली तेहतीस वर्षे माझ्या हातून सद्‌गुरु कार्य करून घेत आहेत. लाखो लोक श्रद्धेने श्रीस्वामीजींचे साहित्य वाचत आहेत. लोकांना दिव्य अनुभव येत आहेत. ईश्वराचे कार्य ईश्वरच करत आहे.

आजकाल जिकडे-तिकडे साधूसंतांचे पीक आलेले आहे. वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथांवर प्रवचन करणारे साधू व त्यांच्यासमोर बसलेला लाखो लोकांचा समुदाय बघून मनाला विषण्णता प्राप्त होते. खरा साधू कसा असतो हे अगदी थोडक्यात सांगण्याच्या उद्देशाने मी श्रीस्वामीजींविषयी थोडेसे लिहिले पण प्रत्यक्षामध्ये त्यांनी प्रचंड कष्ट, दुःख, यातना व त्रास सहन केलेला आहे. अगदी लहानपणापासून हे सर्व सहन करत असतानाही त्यांनी मनाचा अभ्यास अतिशय लहानपणापासून केला हेच खरे त्यांच्या अवतारीपणाचे लक्षण आहे असे मला वाटते. झोपेतून उठल्यापासून पुन्हा रात्री झोपेपर्यंत मनात येणाऱ्या प्रत्येक विचारावर लक्ष ठेवणे हा अभ्यास त्यांनी वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून सतत केला. मनाला नामस्मरणाची, स्तोत्रांचे पाठ करण्याची सवय लावली.

वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी सोळा-सोळा तास काम करत असतानाही त्यांची साधना कधीही भंग पावली नाही. खायला अन्न नाही, अंगावर फाटके कपडे, अशा अवस्थेत सोळा तास भयानक कष्ट करणे, खूपवेळा मोलमजुरी करणे, वर्षानुवर्षे दररोज सोळा ते वीस किलोमीटर चालणे, समाधानात व आनंदात राहून हे सर्व सहन करणे

व दुःखितांचे दुःख दूर करणे, ईश्वराकडून व कोणाहीकडून कसलीही अपेक्षा न करणे व सतत लोक कल्याण करत रहाणे. श्रीस्वामीजींचे बालपण हे असे होते.

श्रीस्वामीजींविषयी मला ज्या हजारो गोष्टी माहीत आहेत त्याचा हा सारांश आहे. लोकांना याचा उपयोग होईल असे मला वाटते म्हणून हे सर्व लिहिले आहे.

ॐ

**सहजशब्दु तरी विषो श्रवणाचा ।**
**परि रसना म्हणे रसू आमुचा ।**
**घ्राणासी जाय परिमळाचा ।**
**हा तोचि होईल ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# द्रोणागिरी

**हि**मालयातील **द्वाराहाट** हे गाव द्रोणागिरी पर्वतात वसलेले आहे. या द्रोणागिरी पर्वतावरील एका गेस्ट हाऊसच्या व्हरांड्यामध्ये बसून **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकाचे लिखाण चालू होते. मी श्रीस्वामीजींना विचारले...

**श्री दुर्गा** : रामायणामध्ये एक कथा अशी आहे की, इंद्रजित बरोबर युद्ध करताना इंद्रजितने सोडलेली शक्ती लागून लक्ष्मण मूर्च्छित होतो. तेव्हा मारुती हिमालयातील या द्रोणागिरी पर्वतावर येतो व तो पर्वत उचलून युद्ध भूमीवर घेऊन जातो व त्यावरील संजीवन वनस्पतीचा रस प्यायल्यामुळे लक्ष्मण शुद्धीवर येतो असे वर्णन आहे.

या कथेमध्येसुद्धा काही आध्यात्मिक रहस्य दडलेले आहे का?

**श्री दत्त** : रामायणातील प्रत्येक कथा म्हणजे एक आध्यात्मिक रहस्य आहे. ध्यान करताना कधी कधी अशा रहस्यांचा उलगडा होतो. या कथेमध्येसुद्धा एक रहस्य दडलेले आहे.

इंद्रजित ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर मनातील **''हे हवे ते हवे''** ही वृत्ती नष्ट होते. इंद्रियांना विषयांचा पूर्णपणे विसर पडतो. **सविकल्प समाधी** प्राप्त होते.

सविकल्प समाधी प्राप्त झाल्यानंतर पुढे दोन मार्ग दिसतात. एक मार्ग निर्विकल्प समाधीकडे जातो. दुसरा मार्ग अनेक प्रकारचे ज्ञान प्राप्त करत ईश्वर या अवस्थेकडे जातो. तो विषय अतिशय गहन व गूढ असल्याकारणाने त्या विषयावर मी काहीच बोलू इच्छित नाही. आता फक्त लक्ष्मणाची मूर्च्छा या कथेचा अर्थ सांगतो.

इंद्रिये विषय विसरल्यानंतर **मारुती** ही अवस्था प्राप्त होते. मारुती ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर सूक्ष्मदेहाने (Astral body) विश्वसंचार करता येतो. विविध प्रकारचे ज्ञान व सामर्थ्य प्राप्त होतात. वनस्पतींचेही ज्ञान प्राप्त होते. असा या कथेचा अर्थ आहे.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथातील एका ओवीमध्ये याचा खुलासा केला आहे.

**तै शरीर भाव नासती । इंद्रिये विषय विसरती ।**
**जै सोऽहम् भाव प्रतिती । प्रकट होय ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

ॐ

# राणीखेत

**श्री**स्वामीजींबरोबर मी हिमालयात प्रवास करत होते. **श्रीदत्त दुर्गा संवाद** या पुस्तकाचे लेखन चालू होते. मी प्रश्न विचारत होते व श्रीस्वामीजी उत्तर देत होते. हे पुस्तक २०१० साली प्रकाशित झाले. **श्रीदत्त-दुर्गा संवाद** या पुस्तकातील काही अप्रकाशित भाग मी या पुस्तकामध्ये घेण्याचे ठरवले. ओवी ज्ञानेशाची हा अध्याय लिहित असतांना अवतारी पुरुष कसे असतात हे दाखवण्याच्या उद्देशाने अगदी थोडक्यात श्रीस्वामीजींविषयी लिहिले आहे. आता आपण परत मूळ विषयाकडे वळू!

राणीखेत येथील श्रीहेडाखान बाबांच्या भव्य मंदिराशेजारील एका गेस्ट हाऊसच्या व्हरांड्यात बसून आमचे लिखाण सुरू झाले.

ज्ञानेश्वरीतील शेकडो ओव्या श्रीस्वामीजींना पाठ होत्या. कुंडलिनी व षट्चक्रांच्या पलीकडे काय आहे असा प्रश्न मी त्यांना केला व त्याचे उत्तर त्यांनी मला ज्ञानेश्वरीच्या आधाराने दिले. या लेखनाचा समारोपही त्यांनी श्रीज्ञानेश्वरांच्या ओव्यांनीच केला.

श्रीस्वामीजी म्हणाले,

‘‘मनुष्यदेह ही आत्म्याला मिळालेली बहुमूल्य सुवर्णसंधी असते. एकदा का ही संधी गेली की, ती संधी पुन्हा प्राप्त होत नाही. आत्म्याने थोडीतरी आध्यात्मिक प्रगती करावी अशी सर्व साधू-संतांची इच्छा असते व म्हणून ते मोठमोठे ग्रंथ लिहितात म्हणजे ग्रंथ ऐकण्याच्या उद्देशाने तरी आपल्या आयुष्यातील काही काळ मनुष्य ईश्वरचिंतन करील.’’

आत्मोन्नतीच्या दिशेने, आध्यात्मिक प्रगतीच्या दिशेने जे लोक काहीच प्रगती करत नाहीत त्यांच्याविषयी श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात...

**दैवे अमृतघट जोडीला । तो पाये हाणोनी उलंडीला ।**
**तैसा नासती धर्म उपजला । हेतुक पणे ।।**

कल्पना करा, एक मनुष्य पायवाटेने पळत पळत जात आहे. त्याच्या सुदैवाने त्या पायवाटेवर अमृताने भरलेला तांब्या किंवा कलश त्याला आढळला. पळण्याच्या नादामध्ये त्या कलशावरून उडी मारून जाण्याच्या प्रयत्नात कलशाला थोडा पाय लागला, तरीपण तेथे न थांबता तो पळत पळत पुढे निघून गेला, या दुर्दैवाला काय म्हणावे? तो कलश अमृताने भरलेला आहे हे नुसते जरी कळले असते तरी त्याच्या आत्म्याचे कल्याण झाले असते.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

‘‘चौऱ्याऐंशी लक्ष जीव योनीतून आत्मा फिरत असतो. या त्याच्या अखंड प्रवासामध्ये सुदैवाने किंवा परमेश्वराच्या कृपेने त्याला मनुष्यजन्म प्राप्त झालेला असतो. परंतु, स्वार्थाने व अहंकाराने वागून, चित्रविचित्र कल्पना उरापोटाशी बाळगून, चुकीच्या आचार-विचारांनी

हाताशी आलेली सुवर्णसंधी तो घालवतो व पुन्हा विविध योनींमध्ये भटकत रहातो. नरजन्मरूपी सुवर्णसंधी ही लाखो वर्षातून एकदा आत्म्याला प्राप्त होत असते. यासाठी अनेक साधू-संतांनी असंख्य ग्रंथ लिहिले आहेत. येन केन प्रकारेण माणसांकडून ईश्वरचिंतन व्हावे व उद्धाराच्या दिशेने त्यांची चार पावले पडावीत अशी त्या साधू-संतांची इच्छा असते. गेली शेकडो वर्षे मानवाच्या उद्धाराचे प्रयत्न साधू-संत करत आहेत.''

मानवदेहाचे महत्त्व, मानव जन्माचे महत्त्व, श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीतील अनेक ओव्यांमध्ये समजावून सांगितले आहे. त्यातील दोन ओव्या अशा...

**प्रतिबिंबोनी बिंबवरी । प्रभेची जैसी उजरी ।**
**सोऽहम् वृत्ती अवधारी । तैसी होय ।।**
**ऐसे नि मग परस्परे । ते सोऽहम् वृत्ती जै अवतरे ।**
**तै तियेही सकट सरे । आपसया ।।**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

''मनुष्य हे परमेश्वराचे प्रतिबिंब आहे. ज्याप्रमाणे आपण आरशामध्ये आपले प्रतिबिंब पहातो त्याप्रमाणे परमेश्वराने मनुष्यदेह म्हणजे स्वतःचे प्रतिबिंबच असल्याप्रमाणे तयार केला आहे. मनुष्य म्हणजेच ईश्वर! नर म्हणजेच नारायण!

या मनुष्यदेहामध्ये श्वासाच्या रूपाने साक्षात् परब्रह्म वास्तव्य करून रहाते. या श्वासाची कास धरून त्या श्वासाशी संपूर्णतः एकरूप झाल्यावर आपण व आपला श्वास एकजीव होऊन जातो म्हणजे आपण व्यक्ती न रहाता समष्टी होतो, विश्वचैतन्य होतो, कॉस्मिक

एनर्जी होतो!''

श्रीस्वामीजींनी ज्ञानेश्वरीवरील आपले भाष्य संपवले. परंतु मला माहीत आहे की, अजून कितीतरी ओव्या त्यांना पाठ आहेत. जर श्रीज्ञानेश्वरांची इच्छा असेल तर एखादे छोटेसे पुस्तकही मी त्यावर प्रकाशित करेन.

ॐ

## सहजबोध

**सहज बोलणे हाचि उपदेश ।**

**करूनी सायास शिकविती ।।**

**ए**कदा आम्ही प्रवास करत होतो. अचानक एके ठिकाणी श्रीस्वामीजींनी गाडी थांबवली. श्रीस्वामीजी मला म्हणाले,

''ताई! समोर रस्त्यावर तीन फोटो पडले आहेत ते उचला!''

मी खाली उतरले व पाहिले तर संत ज्ञानेश्वरांचा फोटो असलेली छोट्या आकाराची हरिपाठाची तीन पुस्तके होती. विशेष म्हणजे गाडीत आम्ही तिघेजण होतो. मी, श्रीस्वामीजी व दिगंबर ऊर्फ नन्या.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''ताई! बघा! सध्या आपण ज्ञानेश्वरीवर लिहित आहोत तर संत ज्ञानेश्वरांनी तिघांनाही कृपाशिर्वाद दिला.''

घरी पोहोचल्यावर मी पुस्तकांचा आकार मोजून पाहिला, अडीच इंच x पावणेचार इंच आकाराची छोटीशी तीन हरिपाठाची ती

पुस्तके होती. पुस्तकाच्या कव्हरवर संत ज्ञानेश्वर महाराजांचा अतिशय सुंदर फोटो होता व पुस्तकाच्या पाठीमागे आळंदीच्या घाटाचा सुंदर फोटो होता. विशेष म्हणजे तीनही पुस्तके कोरी करकरीत होती. त्यावर धुळीचा एक कणही नव्हता. मला हे सर्वच अजब व अद्‌भुत वाटत होते. कारण आजकाल श्रीस्वामीजी मला ज्ञानेश्वरीवर मजकूर सांगत होते व तो मी लिहून घेत होते. या घटनेच्या मागे काहीतरी अर्थ असावा. ''श्रीज्ञानेश्वर महाराज हरिपाठावर काहीतरी लिही,'' असे सांगत असावेत असे मला वाटल्याने मी श्रीस्वामीजींना विचारले...

''स्वामीजी! सुमारे पंचवीस लाख लोक दररोज हरिपाठ वाचतात. दरवर्षी लाखो ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रती विकल्या जातात. असे असूनही आत्मज्ञानाने तृप्त, दैवी संपत्तीने युक्त अशी माणसे शोधूनही सापडत नाहीत. अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच लोक आध्यात्मिक प्रगती करू शकतात असे का?''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

''श्रीखंड पुरी, आमरस पुरी, आम्रखंड, रसमलई हे पदार्थ पोटभर खाल्ल्यानंतर जी तृप्ती प्राप्त होते, ती तृप्ती केवळ शेकडोवेळा त्या पदार्थांची नांवे उच्चारून प्राप्त होत नाही. प्रथम कष्ट करावे लागतात, पैसे मिळवावे लागतात, मग तो पदार्थ विकत घेता येतो किंवा आपल्या गावात मिळत नसेल तर तो पदार्थ कसा तयार करायचा हे शिकावे लागते. बाजारातून सामान आणावे लागते व इतके सर्व करूनही तुम्ही बनवलेला पदार्थ टेस्टी म्हणजे चवदार बनेलच याची काही खात्री देता येत नाही. व्यवहारात जर इतके कष्ट करावे लागतात तर ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी किती कष्ट करणे आवश्यक आहे याचा विचार कोणी करत नाही म्हणून आध्यात्मिक

प्रगती होत नाही.''

श्रीनामदेवांनी सातशे वर्षापूर्वीच सांगितले आहे, ज्ञानेश्वरीच्या एका तरी ओवीचा अनुभव घ्या!

आता हरिपाठाचेच घ्या...!

श्रीस्वामीजींच्या संभाषणातील दिव्यत्व हरिपाठाच्या दिव्य गरुड पंखावर आरुढ झालेले पाहून मीही सर्वांगाचे कान करून हरिपाठातील अमृतानुभव घेण्यास सिद्ध झाले.

**देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी ।**
**तेणे मुक्ती चारी । साधियेल्या ।।**

मुक्ती चार प्रकारे प्राप्त होते, असे ग्रंथात लिहिले आहे.

## सलोकता

**आ**पण ज्या देवतेची आराधना करतो त्या लोकामध्ये स्थान प्राप्त होणे म्हणजे सलोकता मुक्ती! उदाहरणार्थ शिवभक्त शिवलोकात रहातात, विष्णूभक्त विष्णूलोकात रहातात.

## समीपता

**दे**वाच्या दरबारात स्थान प्राप्त होणे. याला समीपता मुक्ती असे म्हणतात.

## स्वरुपता

**दे**वासारखे रूप प्राप्त होणे याला स्वरुपता मुक्ती असे म्हणतात. ही मुक्ती प्राप्त झाली असता कृष्णभक्ताला कृष्णाचे रूप प्राप्त होते, रामभक्ताला रामाचे रूप प्राप्त होते. हे जरी खरे असले तरी या देवतेचे ज्ञान, सामर्थ्य व अधिकार प्राप्त होत नाहीत.

# सायुज्यता

**ज्या** देवतेची आपण उपासना करतो ती देवता आपणच होणे, त्या देवतेचे ज्ञान, सामर्थ्य व अधिकार सर्व काही आपल्याला प्राप्त होणे म्हणजे सायुज्यता मुक्ती! अनेक जन्मांच्या तपस्येनंतर सायुज्यमुक्ती प्राप्त होत असते. येथे...

**भक्त म्हणजे विभक्त नव्हे। आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे।**
**हे अवघेचि जाणणे । विलक्षण ।।**

**।। समर्थ रामदास ।।**

श्री समर्थ रामदास स्वामींच्या या वचनांचा अनुभव येतो.

ॐ

## देवाचिये द्वारी

**देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी ।**
**तेणे मुक्ती चारी । साधियेल्या ।।**

**अर्थ –** देवाच्या द्वारात एक क्षणभर जरी उभे राहिले तरी चारही मुक्ती प्राप्त होतात. वरील अभंगाचा शब्दशः अर्थ असा.....!

देवाचे असंख्य भक्त देवासमोर उभे राहून श्रीज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील अभंगाचा हा एक चरण देवाला म्हणून दाखवतात. जणूकाही ते देवाला आठवण करून देतात. हे देवा! बघ! श्रीज्ञानेश्वरांनी देवाच्या द्वारात एक क्षण उभे राहिले असता चारही मुक्ती प्राप्त होतात असे म्हटले आहे. मला जेव्हा सवड मिळते तेव्हा मी तुझ्या दर्शनाला

येतो व चांगली पाच मिनिटे उभा रहातो. तू मला एखादी तरी मुक्ती नक्कीच देशील. माझा तसा विश्वास आहे. मनात असे म्हणून तो आपल्या उद्योग धंद्याला निघून जातो.

चार मुक्ती म्हणजे काय हे आपण वर पाहिले आहे. आता आपण देवाच्या घराच्या द्वाराचा शोध घेऊ!

देवाचे घर कोठे आहे? हे जेव्हा तुम्हाला कळेल तेव्हा श्रीज्ञानेश्वरांच्या अभंगातील गूढ अर्थ तुमच्या लक्षात येईल व खरंच त्या देवाच्या द्वारात एक क्षण उभे राहिल्यानंतर चारही मुक्ती प्राप्त होतात. हे अगदी सत्य आहे याचाही अनुभव येईल म्हणून मी तुम्हाला सुरुवातीलाच सांगितले, नुसते श्रीखंड म्हटल्याने श्रीखंड खाल्ल्याची तृप्ती तुम्हाला प्राप्त होणार नाही, त्यासाठी श्रीखंड खाल्लेच पाहिजे तरच तृप्तीचा अनुभव येईल. तसेच मंदिरात जाऊन **देवाचिये द्वारी** हा अभंग म्हणून मुक्ती प्राप्त होणार नाही. त्यासाठी देवाच्या घराचे द्वार कोठे आहे ते प्रथम शोधावे लागेल.

''ताई! ज्याप्रमाणे तुम्ही मुंबईत रहाता हे मला प्रथम माहीत असले पाहिजे. नंतर तुम्ही कोठे रहाता तेथील पत्ता माझ्याकडे असायला हवा, तरच मी तुमच्याकडे पोहोचू शकेन. तुमचे घर शोधेपर्यंत मला अनेकांना मार्ग विचारावा लागेल. इतके सर्व करून अगदी घराजवळ पोहोचलो तरीसुद्धा जर मी आंधळा असेन तर मला तुमच्या घराचे द्वार दिसणार नाही. कोणी मार्गदर्शक असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. येथे फक्त आपल्याला देवाचे द्वार कोठे आहे एवढाच विचार करायचा आहे.

**दोन भुवयांच्या मधल्या जागेला कूटस्थ म्हणतात. हेच देवाचे द्वार आहे.**

येथे मनाची एकाग्रता झाल्यानंतर किंवा मन पूर्ण निर्विचार झाल्यानंतर या देवाच्या द्वाराजवळ आपण पोहोचतो.''

''**ठोठवा म्हणजे उघडेल ।**'' असे येशू ख्रिस्ताने म्हटले आहे.

''**उलट पवन ठोकर मारे । खोले दरवाजा ।।**'' असे महान योगी लाहिरी महाशयांनी म्हटले आहे.

''**अजपा जपणे उलट प्राणाचा ।**'' असे हरिपाठामध्येच श्रीज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे.

या सर्वांचा अर्थ एकच ''तुमच्या मिटलेल्या डोळ्यासमोर जो अंधःकार दिसतो. त्या अंधःकाराच्या पलीकडे ईश्वराचे साम्राज्य आहे.'' त्या साम्राज्यात प्रवेश करण्यासाठी भ्रूमध्याच्या जागी मन एकाग्र करा, एक दिवस दरवाजा उघडेल व आत प्रवेश होईल. यासाठी मार्ग म्हणून श्रीज्ञानेश्वर माऊलीने...

**हरी मुखे म्हणा । हरी मुखे म्हणा ।**
**पुण्याची गणना । कोण करी ।।**

असा मार्ग सांगितला आहे. अखंड ईश्वराचे नामस्मरण करा, म्हणजे देवाच्या द्वारापर्यंत जाण्याचा मार्ग तुम्हाला सापडेल. श्रीज्ञानेश्वरांनी पुण्याची गणना कोण करी असे सांगून देवाच्या द्वारापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया उघड केली आहे. ही प्रक्रिया कशी होते ते आता पाहू!

परमेश्वराचे दर्शन म्हणजे स्वतःला ओळखणे यालाच **आत्मज्ञान** असे म्हणतात. भक्ती, योगसाधना, तपश्चर्या इत्यादी सर्व साधनांची आटाटी (कष्ट) हे स्वतःच्याच दर्शनासाठी करायचे असतात, आत्मज्ञान होण्यासाठी करायचे असतात. यालाच ईश्वराचे दर्शन असे

म्हणतात. ही प्रक्रिया कशी घडत जाते ते पाहू!

डोळ्यासमोर कंदील आणा.

कंदिलाचा सांगाडा हा आपला **स्थूलदेह** आहे.

कंदिलाची काच हा आपला **सूक्ष्मदेह** आहे. कंदिलामध्ये असणारी ज्योत हा आपला **कारणदेह** आहे व कंदिलामध्ये जळणारा गॅस किंवा प्राणवायू हा आपला **महाकारणदेह** आहे.

कंदिलाच्या काचेवर जर प्रचंड काजळी साठली असेल तर कंदिलातून प्रकाश बाहेर पडणार नाही.

आपणा सर्वांची अवस्था या कंदिलाप्रमाणेच झालेली आहे.

आपल्या सूक्ष्मदेहावर वाईट कर्मांची इतकी काही काजळी साठलेली आहे की, त्यामुळे आपल्या अंतरंगातील ईश्वराचा प्रकाश, परब्रह्माचा प्रकाश बाहेरच पडत नाही. ही काजळी कमी व्हावी म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी "**हरी मुखे म्हणा**" म्हणजे परमेश्वराचे अखंड नामस्मरण करा असे म्हटले आहे. तुम्हाला आवडेल त्या नामाने परमेश्वराचे अखंड नामस्मरण करा असे सांगितले आहे.

जेव्हा साधू-संतांच्या हे लक्षात आले की, पंचवीस-पंचवीस वर्षे अखंड नामस्मरण करूनही सूक्ष्मदेहावर पकडलेले काजळीचे थर काही केल्या कमी होत नाहीत तेव्हा साधू-संतांनी यावर आणखी एक उपाय शोधला. तो म्हणजे पायी तीर्थयात्रा करणे. पायी तीर्थयात्रा व अखंड नामस्मरण करणे असे दोन उपाय प्राचीन संतांनी सामान्य जनांना सांगितले म्हणून भारतामध्ये लाखो लोक पायी तीर्थयात्रा करतात व हजारो लोक अखंड नामस्मरण करतात. पण पुष्कळांची अवस्था अशी होते की, ते जी काही साधना करतात त्याचाच त्यांना

अहंकार होतो व पुढचा मार्ग अवरुद्ध होतो, त्यांना पुढचा मार्ग सापडत नाही. ईश्वर आपल्या हृदयात आहे. त्याला प्रकट करण्यासाठी **जाणीवपूर्वक** प्रयत्न करायला हवेत. यासाठी पुढील दोन श्लोक सद्भक्तांनी नेहमी चिंतनात ठेवावे.

**उत्तमा सहजावस्था । मध्यमा ध्यान धारणा ।**

**मूर्खस्य प्रतिमा पूजा । तीर्थयात्रा अधमाधमा ।।**

सहजावस्थेमध्ये राहणे म्हणजे ईश्वराशी एकरूप होऊन सामान्य माणसाप्रमाणे जगणे. ही अतिशय उत्तम अवस्था होय!

ध्यान धारणा करणे ही मध्यम किंवा दुय्यम अवस्था होय.

मूर्तिपूजा किंवा प्रतिमापूजा ही अज्ञानी लोकांनी करावी. कारण अज्ञानी लोकांचे सूक्ष्मदेह दुष्कर्मांच्या काळ्याकुट्ट काजळीने भरलेले असतात. त्यामुळे भजन, नामस्मरण, मूर्तिपूजा या लोकांनी करणे अत्यंत आवश्यक असते व अधमातील अधम लोकांनी पायी तीर्थयात्रा करून पूर्वजन्मामध्ये केलेल्या दुष्कर्मांचा नाश करावा असा मार्ग सांगितला आहे. परंतु ताई! हे वाचताना पायी तीर्थयात्रा करणाऱ्यांना दुःख होईल, सर्व यात्रिकांनी हे लक्षात ठेवावे की पायी तीर्थयात्रा करण्याची सद्बुद्धी होणे, यालासुद्धा ईश्वरीकृपा मानली जाते. मी स्वतः हजारो कि. मी. (सुमारे दहा हजार कि. मी. हून जास्त) पायी प्रवास केलेला आहे.

**कोटी पूजा समं स्तोत्रम् । कोटी स्तोत्रम् समं जपः।**

**कोटी जपः समं ध्यानम् । कोटी ध्यानम् समं लयः।।**

# ।। कोटी पूजा समं स्तोत्रम् ।।

**को**ट्यावधीवेळा म्हणजे अनेक जन्म ईश्वराची पूजा-पाठ करणे व काही वर्षे ईश्वराच्या स्तोत्रांचे हजारो लाखो पाठ करणे, या दोन्ही क्रियांनी निर्माण होणारी पुण्याई किंवा तेजस्विता सारखीच असते. यावरून प्रतिमापूजा, मूर्तिपूजा किंवा तीर्थयात्रा यापेक्षा स्तोत्रांचे पाठ करणे हे श्रेष्ठ असते, हे सिद्ध होते. पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवावे की तीर्थयात्रा व प्रतिमापूजा करून आपले पूर्वजन्मातील प्रारब्ध शुद्ध केले नसेल तर स्तोत्रांचे पाठ करण्याची बुद्धीच होणार नाही, म्हणून तीर्थयात्रा किंवा प्रतिमापूजा यांना कमी लेखू नये. ती पहिली पायरी आहे, हे लक्षात ठेवावे, साधनेचे श्रेष्ठत्त्व साधकांना कळावे, म्हणून वरील दोन्ही श्लोक रचलेले आहेत. थोडक्यात अर्थ असा घ्यायचा की, बारावी पास झाल्यानंतर पहिल्या इयत्तेचा अभ्यास करण्याची गरज नाही. आध्यात्मात आपली प्रगती कशी होत आहे हे समजण्यासाठी असे श्लोक मार्गदर्शक ठरतात, म्हणून अशा श्लोकांकडेही दुर्लक्ष करू नये. अशा श्लोकांच्या चिंतनाने नम्रता वाढते. नाहीतर पायी तीर्थयात्रा केल्याचा अहंकार होऊन अनेकांची अधोगती झालेली मी पाहिलेली आहे, म्हणून अंगी नम्रता येणे अतिशय आवश्यक असते. कारण नम्रता येण्यापूर्वीच सद्भक्ताला स्वतःची लायकी समजत असते व त्यामुळेच तो नम्र रहात असतो. उलट अहंकारी मनुष्य, ''मी इतके केले'' असा अहंकार धरत असतो, म्हणून तुकोबारायांच्या अभंगातील दोन चरण नेहमी लक्षात ठेवावे.

**नम्र झाला सर्वां भूतां । तेणे कोंडीले अनंता ।**

**अहंकार गेला । तुका म्हणे देव झाला ।।**

''ताई! मी अशी माणसे पाहिली आहेत की त्यांना त्यांच्या साधनेचा अहंकार असतो. ते अहंकाराने सांगतात आमच्या गुरुने फक्त रामाचेच नांव घेतले, दुसऱ्या कुठल्याही देवाचे नांव कधी घेतले नाही. त्यामुळे आम्हीसुद्धा फक्त राम नाम घेतो, दुसरे कुठलेही नाम घेत नाही.''

''तुम्ही म्हणता ध्यान-धारणा श्रेष्ठ आहे पण आमच्या गुरुने तर कधीच ध्यान-धारणा केली नाही मग आम्ही तरी का करावी?''

''ताई! या लोकांच्या हे लक्षात येत नाही की परमेश्वर हा नामरूपातीत आहे, महाशून्य आहे, निर्गुण, निराकार आहे, अशा परमेश्वराशी साधू-संत-गुरु-सिद्धपुरुष प्रथम एकरूप होतात व ईश्वराच्या आज्ञेने अज्ञानी, मूढ व पापी जीवांचा उद्धार करण्यासाठी ते समाजात येतात व समाजाला रामनामासारखे सोपे साधन देतात व समाजाच्या परमार्थाची वाटचाल सुरू करतात. ईश्वराच्या नामाचा आधार घेऊन सर्वांनी पुढे जावे अशी त्यांची अपेक्षा असते. पण पुढे जाण्याऐवजी भक्त आपल्या गुरुचा व नामाचा अहंकार धरून अडकून पडतात ही खेदाची गोष्ट आहे.''

## ।। कोटी स्तोत्रं समं जपः ।।

**ए**खाद्या स्तोत्राचे लाखो पाठ करण्यापेक्षा एकाग्र मनाने जप करणे हे श्रेष्ठ आहे. याचे विवरण करून सांगताना श्रीस्वामीजी म्हणाले,

''मन एकाग्र होत नाही अशी अनेक लोकांची तक्रार असते. मन एकाग्र न होण्याची अनेक कारणे असतात.

पूर्वजांचा उद्धार झालेला नसणे. पूर्वजन्मी एक किंवा अनेक माणसांबरोबर शत्रुत्व असणे. वातावरणातील नकारात्मक शक्तीबरोबर (negative forces) कॉन्टॅक्ट असणे. प्रारब्ध शुद्ध नसणे, द्वेष, मत्सर

करणे, चिंता करणे अशा अनेक कारणाने मन एकाग्र होत नाही. अशा लोकांनी श्रीदत्तस्तोत्र, रामरक्षा, देवी कवच, देवी सूक्त अशा स्तोत्रांचे हजारो-हजारो पाठ करावे. अशा प्रकारे साधना केल्याने सूक्ष्मदेह शुद्ध होतो व देव-देवतांची दर्शने होऊ लागतात. पुष्कळवेळा आपल्या सूक्ष्मदेहामध्ये एक किंवा अनेक देवता प्रकट होतात. याला चित्ताकाश दर्शन असे योगाच्या भाषेत म्हणतात म्हणून जोपर्यंत चित्ताकाशात प्रवेश होत नाही तोपर्यंत स्तोत्रांचे पाठ करत रहावे.''

स्वामीजी! चित्ताकाशाविषयी थोडीशी माहिती सांगा असे मी म्हणाले.

त्यावर श्रीस्वामीजी म्हणाले,

साधना करताना साधकाला तीन प्रान्त लागतात.

**१) भूताकाश २) चित्ताकाश ३) चिदाकाश**

## भूताकाश

**मि**टलेल्या डोळ्यासमोर जो अंधःकार दिसतो, त्या अंधःकाराला **भूताकाश** असे म्हणतात. या भूताकाशामध्ये विचारांची भूते थैमान घालत असतात. मनाला स्वस्थ बसू देत नाहीत. मनाच्या एका कप्प्यात नामस्मरण किंवा स्तोत्रपाठ सुरू असतो. या नामस्मरणाने किंवा स्तोत्रपाठाने विचारांची भूते अधिकच खवळतात व अधिक सतावण्याचा प्रयत्न करतात. असे का घडते म्हणून लोक मला प्रश्न विचारतात. याचे उत्तर असे आहे की...

''समजा तुम्ही मुंबईत नोकरी करत आहात व तुमच्या गावामध्ये तुमचे स्वतःचे घर आहे. वीस वर्षांनंतर तुम्ही तुमच्या घरी गेलात तर घरात सर्वत्र कचरा पडलेला तुम्हाला दिसेल. कोळीष्टके

साठलेली दिसतील. तुम्ही तुमची रहाण्याची व्यवस्था शेजाऱ्याकडे केलेली असते. रोज स्वतःच्या घरी जाता व झाडूने घर साफ करण्याचा प्रयत्न करता. घर साफ करायला सुरुवात करताच प्रचंड धुरळा उठतो. दोन मिनिटांतच तुम्ही हैराण होता व जेथे तुम्ही स्वतःची रहाण्याची व्यवस्था केली असेल तेथे येता, तुम्हाला हायसे वाटते. स्वतःचे घर साफ करण्यापेक्षा भाड्याच्या घरात राहणे परवडले असे तुम्ही म्हणता. हजारातील नऊशे नव्याण्णव साधक साधना सोडून देतात व मनोरंजनाच्या साधनात मग्न होतात. तोच प्रान्त त्यांना बरा वाटतो.''

मी असे हजारो लोक पाहिलेले आहेत की, त्यांना साधना करणे मूर्खपणाचे वाटते. त्याऐवजी खाणे, पिणे, मजा करणे याला ते जीवनाचा आनंद समजतात. तर काही लोक असेही असतात की, वयाच्या चाळीसाव्या वर्षी ते साधना करायला सुरुवात करतात व आमचे मन एकाग्र का होत नाही असे विचारतात. अशा सर्व भक्तांना समजावे म्हणून मी वरच्या पॅरेग्राफमध्ये गावातील घराचे उदाहरण दिले आहे. हे उदाहरण सतत डोळ्यासमोर ठेवावे व साधना करत रहावी.

गावाकडील घर साफ करायला सुरुवात केली की, धुरळा हा उडणारच, तुम्हाला घुसमटायला होणारच पण तुम्हाला जर स्वतःच्या घरात रहायचे असेल तर हे सर्व सहन केलेच पाहिजे.

समजा; तुम्ही वयाच्या विसाव्या वर्षी साधना सुरू केली याचा सरळ अर्थ असा आहे की वीस वर्षे तुम्ही तुमच्या सूक्ष्म-देहावरती काजळी साठवली आहे. याशिवाय तुमच्या अनेक पूर्वजन्मांमध्ये तुम्ही किती काजळी तुमच्या सूक्ष्मदेहामध्ये साठवली आहे ते समजायला मार्ग नाही. पण विसाव्या वर्षी साधना सुरू केली

तर वीस वर्षांचा कचरा साफ करणे भाग आहे हे सिद्ध होते. येथे हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की तुमचा वीस वर्षांचा कचरा वीस दिवसात साफ होणार नाही. अगदी दोन वर्षे साधना केल्यावरही साफ होणार नाही. कारण पूर्वजन्मीचा कचरा किती आहे याची आपल्याला काहीच कल्पना नाही. तरीपण मी थोडेफार प्रमाण सांगून ठेवतो. दररोज सलग तीन तास ईश्वराचे नामस्मरण किंवा स्तोत्रांचे पाठ याप्रमाणे दोन वर्षे साधना केल्यानंतरसुद्धा जर मनाची एकाग्रता होत नसेल, हृदयातून आनंद निर्माण होत नसेल, समाधान शांती वाढत नसेल तर प्रारब्ध अतिशय खराब आहे असे समजावे व साधनेचा वेळ वाढवावा. तसेच दान-धर्म करण्यास सुरुवात करावी.

## स्वतःचे ज्ञान (Self Realization)

**आ**त्मज्ञान, ईश्वराचे ज्ञान, ईश्वरकृपा, परमानंद, देवतांची दर्शने, गाढ झोप, स्वप्नात दिव्य दर्शने, स्वतःचा सूक्ष्मदेह दिसणे. अशा सर्व गोष्टींपैकी एखाद दुसरी गोष्ट जरी दिसू लागली तरी तुम्ही देवाच्या द्वाराच्या जवळपास पोहोचला आहात असे समजण्यास हरकत नाही. तेच तुमचे स्वतःचे घर आहे. जोपर्यंत ईश्वराशी एकरूपता झाली नाही, ईश्वरात विलीन झालो नाही तोपर्यंत त्याला देवाचे घर किंवा ईश्वराचा दरबार असे म्हणावे.

## चित्ताकाश

**ध्या**नामध्ये अथवा गाढ झोपेत स्वप्नामध्ये देवता दिसू लागल्या, सत्पुरुषांची दर्शने होऊ लागली की आपला प्रवेश चित्ताकाशात झाला असे समजावे.

याच्या पुढची अवस्था म्हणजे स्वतःच्या देहामध्येच देव-देवतांची दर्शने होतात. येथे देवता पद प्राप्त होते.

## चिदाकाश

**चि**दाकाशात प्रवेश झाल्यानंतर अतिशय दिव्य असे आकाश दिसते. या चिदाकाशाला सतत पहात रहायचे असते. अनेक वर्षे अशी साधना केल्यानंतर चित्त, चिंतन व चिदाकाश ही त्रिपुटी नष्ट होते व निर्गुण निराकार परमेश्वराशी साधक एकरूप होतो, तादात्म्य पावतो. या चिदाकाशाच्या दर्शनालाच श्रीज्ञानेश्वरांनी देवाचे द्वार असे म्हटले आहे. दररोज दहा मिनिटे चिदाकाशाचे दर्शन झाले तरी चारही मुक्ती क्रमाक्रमाने प्राप्त होतील असे श्रीज्ञानेश्वरांना म्हणायचे आहे. कारण सायुज्य मुक्ती म्हणजे स्वतः चिदाकाश होणे.

**श्रीरामदासस्वामींनी....**

**नभासारिखे रूप या राघवाचे ।**
**मनी चिंतिता मूळ तुटे भवाचे ।**
**तया पाहता देहबुद्धी उरेना ।**
**सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना ।।**

**अर्थ** - चिदाकाश हेच परमेश्वराचे रूप आहे. याचे अखंड चिंतन केले असता जन्म-मृत्यूरुपी संसार चक्रातून सुटका होते.

एकदा का चिदाकाशाचे दर्शन झाले की मन परमानंदाने तृप्त होते. देहबुद्धी मुळीच रहात नाही म्हणजे या जगातील कुठलीही वस्तू आवडत नाही. ते चिदाकाशच सतत पहात रहावे असे वाटत रहाते व जोपर्यंत त्या चिदाकाशाशी तादात्म्यता होत नाही, तोपर्यंत

ही आर्तता वाढतच जाते व ही आर्तता तेव्हाच थांबते जेव्हा साधक स्वतः चिदाकाश होतो.

## ।। कोटी जपः समं ध्यानम् ।।

**को**ट्यावधी पूजा करण्यापेक्षा स्तोत्रांचे पाठ करणे उत्तम. कोट्यावधी स्तोत्रांचे पाठ करण्यापेक्षा जप करणे उत्तम. कोटी जप करण्यापेक्षा ध्यान करणे उत्तम. श्लोकातील तीनही चरणांचा अर्थ वरील प्रमाणे हे जरी खरे असले तरी याचा क्रियात्मक अर्थ थोडक्यात असा की, अनेक जन्म पूजा-पाठ केले. पूजा-पाठाच्या पुण्याईने पुन्हा पुन्हा मनुष्य जन्म मिळाला. पूजा-पाठ करण्याची बुद्धी होत राहिली. नंतर वरची अवस्था प्राप्त झाली व स्तोत्रांचे पाठ सुरू केले. पूजा-पाठाने शरीर शुद्ध झाले. स्तोत्रांचे लक्षावधी पाठ केल्याकारणाने मन शुद्ध झाले असे काही जन्म गेले. आणखी वरची अवस्था प्राप्त झाल्यानंतर जपामध्ये मन रमू लागले, मन अखंड जप करू लागले. एकाग्रता वाढू लागली व ध्यानावस्था प्राप्त झाली म्हणून कोट्यावधी जप केल्यानंतरच ध्यानावस्था प्राप्त होते. हे आपण समजून घेणे आवश्यक आहे. पूजा-पाठाने शरीर शुद्ध होते. स्तोत्र, पाठ व जपाने सूक्ष्मदेह शुद्ध होतो. मनात सात्त्विक विचार येऊ लागतात. राजस, तामस विचार नष्ट होतात. मनाला शांती प्राप्त होते व ध्यानावस्था प्राप्त होते. ध्यानावस्था प्राप्त झाल्यानंतर विचारचक्र पूर्णपणे थांबते. सूक्ष्मदेहांतर्गत ओंकार ध्वनी ऐकू येऊ लागतो. देवता दिसणे बंद होते. चिदाकाश दिसू लागते. त्या चिदाकाशाचे अखंड चिंतन करत रहायचे. चिदाकाशाशी तादात्म्यता पावल्यानंतर ओंकार ध्वनी बंद होतो. चिदाकाश व साधक एक होतात. येथे साधक सिद्ध होतो व **''कोटी ध्यानं समं लयः''** अशी अवस्था प्राप्त होते.

# ।। कोटी ध्यानम् समं लयः।।

**को**टीवेळा ध्यान करण्यापेक्षा दहा मिनिटे मनोलय साध्य झाला तर ते अनंतपटीने श्रेष्ठ होईल. या मनोलय अवस्थेला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी..

**देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी ।**
**तेणे मुक्ती चारी । साधियेल्या ।।**

असे म्हटले आहे.

''ताई! तुमच्या लक्षात आले असेलच देवाच्या द्वारात पोहोचणे म्हणजे आज्ञाचक्र जागृत होणे. भ्रूमध्याच्या ठिकाणी मनाची एकाग्रता साध्य होणे व हळूहळू मनोलय होणे.''

ॐ

**अर्जुना समत्त्व चित्ताचे । तेचि सार जाण योगाचे ।**
**जेथे मन आणि बुद्धीचे । ऐक्य आथी ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# कांची कामाक्षीदेवी

**श्री**स्वामीजी दक्षिण भारतामध्ये प्रवास करत होते. या प्रवासामध्ये त्यांनी कुरवपूर, श्रीशैल, अल्लमपूर, जोगुळांबा, मंत्रालय, हम्पी, विरुपाक्ष, महानंदी, अहोबिळम, तिरुपती बालाजी, काळहस्ती, महाबलीपुरम, पक्षीतीर्थ, चिदंबरम, कुंम्भकोणम, मायावरम, मदुराई-मीनाक्षी, तंजावूर, धनुष्कोटी, रामेश्वरम, कन्याकुमारी, शुचिन्द्रम, नागरकोईल, अंबासमुद्रम, कुटरालम, पाबनाशम अशा अनेक स्थानांची दर्शने घेतली. प्रत्येक स्थानामध्ये काहीतरी दिव्य अनुभव आलाच, परंतु त्याची आम्हाला काहीही माहिती मिळाली नाही. कांचीपुरम येथील कामाक्षीदेवीचा अनुभव आम्हाला देवीकडूनच कळला. यात्रा पूर्ण झाल्यानंतर मी तो अनुभव श्रीस्वामीजींकडून सविस्तररित्या जाणून घेतला तो पुढे देत आहे.

त्याकाळामध्ये म्हणजे १९८७-८८ साली एअरकंडीशन गाड्यांची सोय नव्हती. श्रीस्वामीजी आमच्या ॲम्बॅसॅडर गाडीने प्रवास करत असत. त्याकाळी एस. टी. डी. फोनसुद्धा मुख्य शहरांमध्ये उपलब्ध असत. नागार्जुनसागरला एस. टी. डी. ची सुविधा नव्हती. इतकेच नव्हेतर मुंबईहून पाठविलेले पत्र आठ दिवसांनी नागार्जुन-

सागरला मिळत असे. त्यामुळे श्रीस्वामीजींच्या प्रवासात काय घडले ते जाणून घेण्यासाठी मी स्वतःच नागार्जुनसागरला गेले व कांचीपुरम येथील कामाक्षी देवीने केलेली लीला जाणून घेतली.

**कां**चीपुरम येथे रात्री नऊच्या सुमारास श्रीस्वामीजी पोहोचले. श्रीस्वामीजींबरोबर एक तेलगु व एक तामिळ अशी दोन माणसे होती. कामाक्षी देवीचे मंदिर बंद झालेले होते. त्यामुळे सर्वांनी तेथे रहाण्याचे ठरवले. सर्वजण थकलेले होते. सर्वांना चहा प्यायचा होता व काहीतरी खाण्याची इच्छा होती. तामिळनाडूतील भयंकर उकाड्याने सर्वजण हैराण झालेले होते. सर्वत्र अंधार होता. रस्त्याच्या बाजूला एके ठिकाणी चूल पेटलेली दिसत होती. कोणीतरी एक बाई तव्यावर काहीतरी शिजवत होती. श्रीस्वामीजींबरोबर असणाऱ्या दोन सेवकांनी त्या स्त्रीजवळ जाऊन पाहिले. ती डोसे बनवून विकत होती. एका भक्ताने श्रीस्वामीजींसाठी एक डोसा आणला व तो श्रीस्वामीजींना दिला. एवढ्यात त्या अंधारात एक आठ-नऊ वर्षांची मुलगी श्रीस्वामीजींच्या गाडीजवळ आली व श्रीस्वामीजींकडे डोसा मागू लागली. ती तामिळ भाषेत बोलत होती. तरीपण तिच्या हावभावावरून तिला डोसा हवा आहे हे श्रीस्वामीजींनी ओळखले.

श्रीस्वामीजींनी आपल्या तामिळ भक्ताला बोलावले व ''त्या मुलीला पोटभर डोसे खायला दे, अगदी ती मागेल तितके डोसे दे, नाही म्हणू नकोस!'' असे सांगितले.

श्रीस्वामीजी आपल्या तामिळ भक्ताबरोबर तेलगुमध्ये बोलत होते. नऊ वर्षांच्या त्या तामिळ मुलीने श्रीस्वामीजी तेलगुमध्ये काय बोलत आहेत हे ओळखले. ती तामिळ भक्ताजवळ येऊन तामिळ भाषेत म्हणाली, ''मला पोटभर डोसे खायला देऊ नकोस, श्रीस्वामीजी

जो डोसा खात आहेत त्यातील एक घास पुरे. त्याने माझा उद्धार होईल.''

तामिळ भक्ताने श्रीस्वामीजींना सर्व सांगताच श्रीस्वामीजींनी आपण खात असलेला डोसा दिला.

ती मुलगी डोसा खाऊ लागली.

श्रीस्वामीजींच्या भक्ताला वाटले त्या मुलीला खूप भूक लागली असावी म्हणून तो एका प्लेटमध्ये दोन डोसे घेऊन आला परंतु त्याच्यापासून दोन फूट अंतरावर डोसा खाणारी मुलगी अदृश्य झाली होती. हातात डोसे घेऊन त्या सेवकाने आजूबाजूला सर्वत्र शोध घेतला परंतु मुलगी कोठेच दिसली नाही.

सर्व भक्तांनी डोसा खाऊन, चहा पिऊन एका हॉटेलमध्ये मुक्काम केला व दुसऱ्या दिवशी सकाळी कांची कामाक्षी देवीचे दर्शन घेतले.

ज्या दिवशी त्या नऊ वर्षांच्या मुलीने रात्री साडेनऊच्या सुमारास श्रीस्वामीजींकडून डोसा मागून घेतला, त्यावेळी मी (ॐ वनिता ॐ) मुंबईत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सात-साडेसातच्या सुमारास डॉ. अल्पा व डॉ. मेघल या दोन बहिणींची आई मंजुबेन ठक्कर यांचा मला फोन आला.

डॉ. अल्पा व डॉ. मेघल या माझ्याच घरी (घाटकोपर) रहात होत्या. त्यामुळे त्यांची आई मंजुबेन ठक्कर यांचा फोन बहुदा त्यांच्यासाठी आला असावा असे मला वाटले. पण मंजुबेन ठक्कर मला म्हणाल्या,

‘‘ताई, मला तुमच्याशीच बोलायचे आहे.’’

मी म्हणाले, ‘‘काय विशेष?’’

तेव्हा मंजुबेन ठक्कर मला म्हणाल्या, ‘‘रात्री माझ्या स्वप्नामध्ये कांचीपुरम येथील कामाक्षीदेवी आली होती.’’ ती म्हणाली,

‘‘मला श्रीस्वामीजींकडून ते खात असलेल्या मसाला डोशाचा प्रसाद मिळाला.’’ आपले स्वप्न सांगून मंजुबेन ठक्कर मला म्हणाल्या, ‘‘ताई, तुम्ही जरा श्रीस्वामीजींना पत्र पाठवा व यातील खरे काय ते जाणून घ्या!’’

मी पत्र पाठवण्याऐवजी स्वतःच नागार्जुनसागरला गेले व श्रीस्वामीजींकडून सर्व माहिती घेतली. तीच वर लिहिली आहे. याच प्रवासामध्ये श्रीस्वामीजींना अगस्तीऋषी व काकभृशुंडीऋषी या दोघांचे ही दर्शन झाले.

या घटनेनंतर बऱ्याच वर्षांनी श्रीस्वामीजींबरोबर तीर्थयात्रा करण्याचा योग मला आला. हा प्रवास आम्ही दक्षिण भारतातच करत होतो. वडलूर (तामिळनाडू) येथील रामलिंगम स्वामींचे दर्शन घेऊन तामिळनाडू व केरळ यांच्या सीमेवर असलेल्या पाबनाशम येथे गेलो. येथे सुमारे साडेचार-पावणेपाच फूट उंचीचे एक स्थूल साधू आमच्या जवळून निघून गेले. ते अतिशय मंद गतीने चालत होते. कोणी भिकारी दिसला की, त्याला श्रीस्वामीजी खूप पैसे देत. कोणी साधू दिसला की, श्रीस्वामीजी त्याला कपडे, लुंगी, पैसे असे नेहमी भरपूर देत असत. पण या साधूला श्रीस्वामीजींनी काहीसुद्धा दिले नाही. मला थोडेसे आश्चर्य वाटले.

मी श्रीस्वामीजींना असे कां केले म्हणून विचारताच ते

म्हणाले, ''ते अगस्तीऋषी होते. खास तुम्हाला दर्शन देण्यासाठी आले होते. ही जागा अगस्ती ऋषींची तपोभूमी असून हजारो वर्षांपूर्वी अगस्तीऋषींनी येथे षोडषीत्रिपुरसुंदरी देवीचा मंत्र सिद्ध केला होता!''

परतीच्या प्रवासामध्ये आम्ही कन्याकुमारी, शुचिन्द्रम, धनुष्कोटी, रामेश्वरमवरून कोडाईकॅनाल येथे आलो. तेथे काही दिवस मुक्काम केला. ''कोडाईकॅनाल येथे काही ऋषी तपस्या करत आहेत.'' असे श्रीस्वामीजी म्हणाले,

कोडाईकॅनालवरून आम्ही खम्मम येथे आलो. येथून ब्रह्मेंद्रस्वामींचे स्थान पहाण्यासाठी आम्ही कंदेमल्लयापल्ली येथे गेलो. या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे खम्मम येथे कंदेमल्लयापल्ली हे गाव कोठे आहे असे विचारल्यास कोणीही सांगत नव्हते कारण हे नाव चारशे वर्षांपूर्वीचे आहे. या गावाला आता ब्रह्मंगार मठम असे म्हटले जाते.

ब्रह्मेंद्रस्वामींच्या समाधी स्थानी सुमारे दीड-दोन हजार माणसांची गर्दी होती. श्रीस्वामीजींनी एका माणसाला जवळ बोलावले व त्याला म्हणाले, ''गाडीत बस व आम्हाला ब्रह्मेंद्रस्वामींची सर्व स्थाने दाखव.'' तो मनुष्य गाडीत बसला व सुमारे दीड-दोन तासात त्याने आम्हाला सगळी स्थाने दाखवली. प्रत्येक स्थानात गेल्यानंतर त्या स्थानाचा महिमा तो वर्णन करून सांगत होता. श्रीस्वामीजी तो तेलगुमध्ये जे काही सांगत असे त्याचे मराठीत भाषांतर करून आम्हाला सांगत. सर्व काही पाहून झाल्यानंतर श्रीस्वामीजींनी त्याला एक पांढरी लुंगी, पॅन्ट-शर्टचे कापड, पंचा व एक हजार रुपये दिले. तेव्हा तो म्हणाला,

''आज माझी यात्रा सफल झाली. ब्रह्मेंद्रस्वामींचा प्रसाद मला मिळाला. गेली सोळा वर्षे मी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी

ब्रह्मेंद्रस्वामींच्या दर्शनाला येत आहे. मी केलेल्या सेवेची पोच-पावती मला श्रीब्रह्मेंद्रस्वामींकडून मिळावी अशी माझी इच्छा होती ती आज पूर्ण झाली'', असे म्हणून त्याने श्रीस्वामीजींना पुन्हा नमस्कार केला व श्रीस्वामीजींचा निरोप घेतला.

माझ्या अनेक पूर्वजन्मांपैकी एका जन्मात कंदेमल्लयापल्ली येथे मी ब्रह्मेंद्रस्वामी होतो असे श्रीस्वामीजी अनेकदा म्हणाले होते. अप्रत्यक्षरित्या श्रीस्वामीजींनी मला त्याची खूण पटविली होती. नाहीतर दीड-दोन हजार माणसांमध्ये नेमके ज्याच्या मनात कृपेची अभिलाषा होती त्याच व्यक्तीला श्रीस्वामीजींनी कसे बोलावले.

ॐ

**अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देवो जाणिजे ।**
**सुख सर्वस्व माझे । चैतन्य तो ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# मयूर नृत्य

**१९९७** च्या मार्च महिन्यामध्ये श्रीस्वामीजींना भेटण्यासाठी मी नागार्जुनसागरला गेले होते. वातावरणात प्रचंड उष्णता होती. अंगाची लाही लाही होत होती. मी हिल कॉलनी येथे गेले होते. तेथून सुमारे एक दीड वाजता मी आश्रमात परत आले व औदुंबराजवळील मोकळ्या हॉलमध्ये खुर्चीवर बसले. इतक्यात खूप दूरुन एक मोर धावत आला.

सरळ माझ्यासमोर येऊन त्याने माझ्या पायाजवळ दोनवेळा चोच घासल्यासारखे केले. पिसारा फुलवला व मयूरनृत्य करण्यास आरंभ केला. सुमारे दोन तास तो मोर नाचत होता. कधी कधी तो खूप जवळ येई. गुडघ्याला व मांडीला स्पर्श करून पुन्हा नृत्य करी. हा प्रकार सुमारे दीड तासाहून अधिक काळ चालला होता. नंतर मोराने शांतपणे आपला पिसारा मिटला. हॉलच्या बाहेर गेला व आकाशात झेप घेऊन झाडावर जाऊन बसला.

ॐ

# सरिस्का अभयारण्य

**हि**मालयातील तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन आम्ही दिल्लीला राजूभाईंच्या गाडीने परत आलो. दुसऱ्या दिवशी सरिस्का अभयारण्य पहायला गेलो. अरण्यामध्ये कच्च्या रस्त्याने आमची टेम्पो ट्रॅव्हलर मंदगतीने पुढे जात होती. अचानक रस्त्याच्या दोन्ही बाजूला दहा-बारा मोर दिसले. टेम्पो ट्रॅव्हलरच्या गडगडाटाने मोर पळून जातील की काय? असा विचार मनात आला नाही तोच, सर्व मोर रस्त्यावर आले व सर्व मोरांनी पिसारा फुलवून नाचायला सुरुवात केली. वातावरणामध्ये प्रचंड गरमी होती. दुपारचे सुमारे दोन-अडीच वाजले होते. सरिस्का अभयारण्य हे राजस्थानमध्ये आहे. राजस्थानातील गरमीची जाणीव सर्व वाचकांना असेलच. इतक्या भयानक गरमीमध्ये असंख्य मोर दीड-दोन तास नाचत होते. वेगवेगळ्या स्टेप्स घेऊन दाखवत होते. हावभाव दाखवत होते. हे सारेच दृश्य विलोभनीय होते. त्याकाळात मोबाईल आजच्या इतके ॲडव्हान्स झालेले नव्हते व आमच्याजवळ कॅमेराही नव्हता, त्यामुळे शूटींग करणे शक्य नव्हते. सुमारे दीड-दोन तास दुपारच्या उन्हामध्ये विलोभनीय नृत्य करून मोर जंगलात निघून गेले. आम्ही सगळे अनिमिष नेत्रांनी अचंबित होऊन स्वर्ग सुखाचा अनुभव घेत होतो. मोर निघून गेल्यानंतर एक-दोन मिनिटांनी आम्ही भानावर आलो व राजस्थानच्या गरमीची जाणीव होऊ लागली.

मी श्रीस्वामीजींना विचारले,

‘‘पक्षीतज्ज्ञ असे म्हणतात की, आकाशामध्ये पावसाच्या ढगांची जेव्हा दाटी होते, तेव्हाच पावसाच्या स्वागतासाठी मोर नृत्य

करतात. राजस्थानच्या प्रचंड गरमीत हे अशक्य आहे. आपण सर्व भयानक गरमीचा अनुभव घेत आहोत. असे असताना दहा-बारा मोर गाडीच्या समोर येऊन दोन तास नृत्य करतात याच्या पाठीमागे काही गूढ अर्थ आहे का? याशिवाय वीस सीटर टेम्पो ट्रॅव्हलर गाडीचा आवाज एखाद्या ट्रक एवढा असतो. असे असताना ट्रकच्या आवाजाने मोर पळून जायला हवे होते. या सर्वच गोष्टी मला रहस्यमय वाटतात.''

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''गाडीमध्ये साक्षात् देवी सरस्वती बसलेली आहे हे त्या मोरांनी ओळखले, त्यांना आनंद झाला व त्यांनी नृत्यास सुरुवात केली.''

ॐ

मग निष्कलंक गहन । उपजेल आत्मज्ञान ।
तेणे निचाडे होईल मन । आपैसे तुझे ॥
॥ ज्ञानेश्वरी ॥

# नारद

लहानपणी कोठेही कथा-कीर्तनाला गेलो की, त्या कथा-कीर्तनातील सर्वात मजेशीर पात्र म्हणजे नारद हे असायचे! यावर घरात नेहमी चर्चा व्हायची. श्रीस्वामीजींनी जेव्हा रामायण व महाभारत या दोन्ही ग्रंथातील गूढ अर्थ समजावून सांगितला. मी त्यांना पुराणातील नारद या पात्राविषयी विचारले. तेव्हा ते म्हणाले,

''संस्कृत शब्दांचे अर्थ अतिशय गूढ असतात. प्रत्येक वेळी आध्यात्मिक अर्थ असेल असे नाही. उदाहरणार्थ आपण पोस्टमन असे म्हणतो. या एका शब्दामध्ये पोस्ट खात्याचा संपूर्ण व्यवहार दडलेला असतो व तो आपल्याला माहीत असतो. यात टेलिग्राफ, टेलिकम्युनिकेशन, आधुनिक विज्ञानाप्रमाणे इंटरनेट या सर्व गोष्टी या एकाच खात्यामध्ये येतात. पोस्टमन अनेक असतात. आधुनिक विज्ञानाप्रमाणे मोबाईलधारक व इंटरनेटधारक अनेक असू शकतात. अगदी त्याचप्रमाणे अदृश्य सृष्टीमध्ये नारद या शब्दाचा अर्थ संदेशवाहक आत्मे असा आहे. इंग्रजीमध्ये याला Messenger Angels म्हणजे संदेशवाहक देवदूत असे म्हणतात. इंटरनेटपेक्षाही अतिशय वेगाने हे संदेशवाहक देवदूत काम करत असतात. नारद या

शब्दाची ही झाली अदृश्य सृष्टीतील बाजू! याची व्यावहारिक बाजू अशी आहे की नार म्हणजे पाणी. द म्हणजे देणारे! पाण्याचा वापर करून दिला जाणारा संदेश! किंवा पाण्याचा वापर करून मानवाला अथवा सृष्टीला दिल्या जाणाऱ्या असंख्य सुविधा म्हणजे **नारद**!

यामध्ये सर्वात पहिली जर कुठली गोष्ट येत असेल तर ती म्हणजे इलेक्ट्रिसिटी! व इलेक्ट्रिसिटीवर आधारित असणाऱ्या सर्व सुख-सुविधा म्हणजेच **नारद**!

ॐ

**जो जो जयाचा घेतला गुण ।**
**तो तो गुरु केला म्यां जाण ।**
**गुरुसी आले अपारपण ।**
**जग संपूर्ण गुरु दिसे ।।**
**।। एकनाथी भागवत ।।**

# सारथी

**श्री**स्वामीजींकडे येणाऱ्या माणसांविषयी श्रीस्वामीजींना बऱ्याच गोष्टी अगोदरच माहीत असत. वातावरणातील देव-देवता त्यांना बरेच काही सांगत असत. येणाऱ्या माणसाची कुलदेवताही श्रीस्वामीजींकडे अगोदर येत असे. पुष्कळवेळा घराण्यातील पूर्वज श्रीस्वामीजींना भेटत व या माणसाला आम्ही तुमच्याकडे टिकू देणार नाही असे सांगत. अशा सर्व प्रकारच्या माणसांना श्रीस्वामीजी अत्यंत आदराने व प्रेमाने वागवित व त्यांच्या उद्धाराचा प्रयत्न करत हे सर्व जरी खरे असले तरी माझ्या पहाण्यात असे आले आहे की ज्याच्याकडे मनाचा सरळपणा असे, अशी माणसेच श्रीस्वामीजींची कृपा संपादन करू शकत. इतरांची अवस्था ...

**तुका म्हणे वेळू । चंदना संगति ।**
**काय ते नसते । जवळीके ॥**

**॥ संत तुकाराम ॥**

अशी होत असे.

या विषयावर बोलताना एकदा श्रीस्वामीजी मला म्हणाले, ‘‘ताई! तुमच्या देहामध्ये मला साक्षात् जगदंबा दिसते म्हणून तुमच्याशी माझे वागणे जरी एखाद्या बालकासारखे असले तरी प्रत्यक्षात मी कसा आहे ते तुम्हाला सांगतो.

एकेकाळी मी दत्तगिरी म्हणून समाजात वावरत होतो. अत्यंत भोळा, अतिशय प्रेमळ व कोणीही सहज बनवावे असा मी होतो. लाखो लोकांनी माझ्या सरळसाध्या स्वभावाचा गैरफायदा घेतला. काही लोक तर वीस-पंचवीस वर्षे मला फसवत राहिले. पण मला कधीच कळले नाही. माझ्यातील प्रचंड दैवीशक्तीचा सामान्य माणसांनी तसेच साधू-संतांनीही उपयोग केला व दुरुपयोगही केला. वयाच्या चाळीसाव्या वर्षानंतर जेव्हा मला याची थोडीफार जाणीव होऊ लागली. तेव्हा मी माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला प्रश्न केला. अशा या सर्व लोकांपासून स्वतःचा बचाव करायचा असेल, तर दुसऱ्यातील वाईट दोष बघावे लागतील व दुसऱ्यातील वाईट दोष बघण्याची प्रवृत्ती जर माझ्यात निर्माण झाली तर इतर दुर्गुण माझ्यात यायला वेळ लागणार नाही व माझी अधोगती होईल. मला तर जगातील कुठल्याही माणसामध्ये दुर्गुण व दोष दिसतच नसत व याचा फायदा असंख्य गुंड प्रवृत्तीचे लोकही घेऊ लागले होते. अशा परिस्थितीत मी काय करावे असा प्रश्न मला पडला होता. शेवटी मी ईश्वराची प्रार्थना केली व ईश्वराने मला योग्य मार्ग दाखविला.

मी सर्वप्रथम सगळ्यांचा त्याग करून एकान्तवासात गेलो. एकान्तवासात जाऊन मी माझ्या मनाला शून्य बनविले.’’

**श्री दुर्गा :-** तुम्ही तुमच्या मनाला शून्य कसे बनवले हे कृपया सांगाल का?

**श्री दत्त :-** मन पूर्णपणे विचारशून्य व कल्पनाशून्य केल्यानंतर सूक्ष्म शरीर नष्ट होते. कुंडलिनी, चक्रे, उपचक्रे या सर्व गोष्टी मावळतात. लोकांना दिसण्यापुरते शरीराचे अस्तित्व रहाते व दत्तगिरी म्हणून जो कोणी या शरीरात रहातो, तो फुगा फुटल्याप्रमाणे वातावरणात विलीन होतो. त्यानंतर ज्याप्रमाणे कॉम्प्युटरमध्ये एखादी मॅटर सेव्ह करून ठेवतो, त्याप्रमाणे दत्तगिरींचे अस्तित्व कोठेतरी ब्रह्माण्डात सेव्ह होते व जेव्हा गरज असेल तेव्हाच ते प्रकट होते. इतर वेळी दत्तगिरींच्या देहाद्वारे असंख्य देव-देवता बोलतात. सेकंदा-सेकंदाला देवतांचे अस्तित्व बदलत असते. समोर ज्या पद्धतिचे भक्त बसलेले असतील त्या पद्धतिच्या देव-देवता अशा सिद्धयोग्याच्या मुखाने बोलू लागतात.

दत्तगिरींना कुठलाच गुणदोष लागत नाही. अशा या अवस्थेमुळे आता दत्तगिरींना कोणी फसवू शकत नाही अथवा खोट्या भक्तिभावाने प्रभावितही करू शकत नाहीत. अंतःकरण शुद्ध असेल तर दिव्य अनुभव येतील पण अंतःकरणात अशुद्धता असेल, चलाखी असेल, अहंकार असेल तर दत्तगिरींकडूनही तशाच प्रकारची उत्तरे मिळत जातील. या अवस्थेविषयी श्रीरामदास स्वामींनी सुंदर ओवी लिहिली आहे.

**जरी भाव असेल मायिक । तरी देव होई महाठक ।**
**नवल तयाचे कौतुक । जैशासी तैसा ।।**
**।। श्री रामदास स्वामी ।।**

ॐ

# सहज बोलणे हाचि उपदेश

**सि**द्धयोग्यांचे देह बासरीप्रमाणे असतात. शून्य असतात. जो कोणी त्यांच्या सहवासात रहात असेल, त्याची कुलदेवता अथवा रक्षण करणारी देवता सिद्धयोग्याच्या मुखाने बोलते. आपण काय बोललो व का बोललो याचा विचार सिद्धयोगी करत नाहीत. त्यांचे मन निर्विकल्प असते. त्यांचे सहज बोलणे हा उपदेश असतो व त्यांचे कठोर बोलणे हा शक्तिपात असतो.

माझा ड्रायव्हर प्रशान्त, हा अगदी मला घरच्यासारखाच होता. श्रीस्वामीजी मात्र दोन-तीन वेळा म्हणाले, ''प्रशान्त तुझे लग्न झालेले आहे, तुझ्यावर पत्नी व मुलाची जबाबदारी आहे. तेव्हा ड्रायव्हिंग सांभाळून करत जा.''

श्रीस्वामीजींनी अनेकवेळा सांगूनही प्रशान्तचे फास्ट ड्रायव्हिंग चालूच असायचे. त्यामुळे आमच्या एस्टीम गाडीला अपघात झाला. श्रीस्वामीजींच्या कृपेने प्रशान्तला तसेच गाडीत बसलेल्या आणखी दोघांना कसलीही दुखापत झाली नाही. यावर श्रीस्वामीजी प्रशान्तला म्हणाले, ''प्रशान्त, ईश्वराच्या कृपेने तू वाचलास. आपण सर्वांनी ईश्वराचे आभार मानू या! परंतु यापुढे दोन वर्षे तू फोर व्हीलर चालवू नकोस. लवकरात लवकर तू ताईंना दुसरा ड्रायव्हर शोधून दे. तोपर्यंत मी तुला सांभाळतो!''

सुमारे एक महिन्यात प्रशान्तने मला शेषमणी नांवाचा दुसरा ड्रायव्हर दिला. श्रीस्वामीजींना व मला नमस्कार करून आमचा निरोप घेतला व थ्री व्हीलर रिक्षा चालवायला सुरुवात केली.

श्रीस्वामीजींच्या आज्ञेप्रमाणे प्रशान्तने दोन वर्षे थ्री व्हीलर रिक्षा चालवली. या दोन वर्षांमध्ये श्रीस्वामीजींच्या कृपेमुळे किंवा

श्रीस्वामीजींच्या शब्दाचा मान राखल्याकारणाने प्रशान्तची खूप भरभराट झाली व दोन वर्षांनंतर त्याने फोर व्हीलर खरेदी करण्या इतका पैसा त्याला मिळाला म्हणून म्हणतात...

**गुरु न राहे देहात । सदैव राहे वचनात ।।**

किंवा

**साधनातील साधन जाण । गुरु वचन मानावे प्रमाण ।।**

**।। श्री गोंदवलेकर महाराज ।।**

प्रशान्तने आम्हाला जो शेषमणी नांवाचा ड्रायव्हर दिला तो उत्तर प्रदेशचा होता. लवकरच तो आमच्या घराशी एकरूप झाला. श्रीस्वामीजींचा तर तो अत्यंत लाडका होता. सुमारे सात वर्षे तो आमच्याकडे होता.

एकदा शेषमणी दोन महिन्यांची सुट्टी घेऊन आपल्या गावाला गेला. त्याच्या गावात एक लक्ष्मी-नारायणाचे मंदिर होते. त्यासाठी आम्ही खूप मदत केली होती. तो जेव्हा परत आला तेव्हा श्रीस्वामीजी त्याला म्हणाले, ''शेषमणी, तू गावाला परत जा! लक्ष्मी-नारायण मंदिराची सेवा करणे आवश्यक आहे. तू खूप सेवा कर व दररोज पूजा कर. फावल्या वेळामध्ये रिक्षा किंवा प्रायव्हेट टॅक्सीसारखा उद्योग कर. त्यात तुला पुरेसे पैसे मिळतील परंतु तू मुंबईत राहू नकोस! तू लवकरात लवकर गावाला जा!''

अत्यंत प्रेमाने वागणाऱ्या व लाड करणाऱ्या श्रीस्वामीजींच्या मुखाने अचानक आलेले हे उद्‌गार पाहून शेषमणी काहीच बोलला नाही. श्रीस्वामीजींनी त्याला परोपरीने समजावून सांगण्याचा प्रयत्न

केला परंतु तो दुसऱ्या दिवसापासून यायचा बंद झाला.

श्रीस्वामीजींनी त्याच्या चुलत भावाला आमच्या घरी बोलावले व त्यालाही सांगितले लवकरात लवकर शेषमणीला गावाला पाठवा. तुमच्या पूर्वजांची तशी इच्छा आहे असेही त्याच्या चुलत भावाला सांगितले. परंतु दुर्दैवाने त्याच्या चुलत भावालाही श्रीस्वामीजींचे म्हणणे पटले नाही. शेषमणीने आमच्या घरी येणे बंद केले म्हणून आमच्या घरातील सर्वांच्याच मनाला एक प्रकारचा चटका लागून गेला. त्याच्यात कुठलाही दोष नव्हता. त्याचे काहीही चुकले नव्हते. श्रीस्वामीजींनी त्याला गावाला जाऊन लक्ष्मी-नारायणाची सेवा व पूजा कर असे सांगितले होते. यात काही गैर नव्हते पण जरूर काहीतरी गूढ होते. कमीत कमी उत्तरप्रदेशात जाण्यासाठी निघेपर्यंत त्याने आमच्या घरी रहावे, अशी आमची व श्रीस्वामीजींची इच्छा होती कारण श्रीस्वामीजींनी जेव्हा त्याला, 'तू तुझ्या घरी उत्तर प्रदेशात जा व लक्ष्मी-नारायणाची सेवा कर' असे सांगितले तेव्हाच श्रीस्वामीजींना ही काय भानगड आहे असे मी विचारले. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले होते की, ''मी माझ्या पदरचे काहीच सांगत नाही. त्याच्याबरोबर त्याचे असंख्य पूर्वज आले असून ते मला सांगत आहेत की, ताबडतोब याला गावाला पाठवा.''

सुमारे एक महिन्याभरात आम्हाला असे कळले की, शेषमणीने मुंबईत एक रिक्षा घेतली असून तो ती चालवत आहे. असेच काही महिने गेले आणि एक दिवस ती धक्कादायक बातमी आमच्या कानावर आली.

कोणीतरी शेषमणीला बेदम मारून बेशुद्ध अवस्थेमध्ये रस्त्याच्याकडेला टाकले होते. अनेक ठिकाणी त्याची हाडे मोडली होती. त्याचा मोबाईल त्याच्या खिशात नव्हता. कोणीतरी ओळखीच्या

व्यक्तीने त्याला अशा अवस्थेत बघितले व हॉस्पिटलला ॲडमिट करून त्याच्या चुलत भावाला कळवले. त्याच्या चुलत भावाने हॉस्पिटलला जाऊन त्याची अवस्था बघितली. डॉक्टरने सांगितले, ''जीवाला धोका नाही पण सहा महिने हॉस्पिटलला ठेवावे लागेल.'' हे ऐकल्यावर त्याच्या चुलत भावाने ताबडतोब डिस्चार्ज द्यायला सांगितला व पॅसेंजर ट्रेनने एक माणूस बरोबर देऊन त्याला गावाकडे पाठवून दिले. ही सर्व हकिकत त्याच्या एका नातेवाईकाने नंतर मला भेटून सांगितली, तेव्हा सर्वांनाच वाटले त्याच्या जीवाला धोका होता म्हणून त्याला गावाला जाण्याचा आग्रह श्रीस्वामीजी करत होते.

शेषमणी जेव्हा माझ्याकडे होता तेव्हा मी त्याला अगदी माझ्या मुलासारखे वागवत होते. जेव्हा जेव्हा तो आपल्या गावी वाराणसीला जात असे त्या त्या वेळी मी त्याला जाण्या-येण्याचे विमानाचे तिकीट देत असे. त्याच्या घरच्या सर्व लोकांसाठी कपडे, खाऊ व खेळणीही पाठवत असे. शेवटी तो भावाच्या मुलीच्या लग्नाला म्हणून गेला. तेव्हा त्याच्या घरच्या लोकांसाठी व येणाऱ्या नातेवाईकांसाठी, सर्वांसाठी कपडे, भेटवस्तू इत्यादी देऊन सर्व लग्नाची तयारी करून दिली. तो परत आल्यावर श्रीस्वामीजींनी त्याला तू तुझ्या गावी परत जा व काही दिवस लक्ष्मी-नारायणाची सेवा कर असे सांगितले. यामुळे त्याच्यातील सुप्त अहंकार दुखावला गेला व मला कुठलाही सल्ला न विचारता त्याने माझ्याकडे येण्याचे बंद केले. माझ्या इतकेच श्रीस्वामीजीही त्याचे लाड करत असत. हेही तो विसरला व शेवटी त्याला पॅसेंजर ट्रेनने जखमी अवस्थेत गावाला जावे लागले. तो गेल्यानंतर आठ-दहा दिवसांनी मला ही सर्व हकिकत कळली. यावरून प्रारब्ध माणसाला खेचून नेते व कर्माची फळे

भोगायला लावते असे म्हणतात ते अगदी खरे आहे, याची खात्री पटते. प्रारब्ध कसे खडतर असते व माणसातील सूक्ष्म अहंकार माणसाचे किती नुकसान करतो हे सद्भक्तांना कळेल.

उजव्या हाताने केलेले सत्कर्म डाव्या हाताला कळता कामा नये. हा माझा मूळ स्वभाव आहे. या स्वभावानुसार मी गेली बासष्ट वर्षे जगत आले आहे. स्वतः श्रीस्वामीजींनी **सिद्ध योग्याच्या सहवासात भाग १** मध्ये माझ्या परिचयाचा मजकूर कसा लिहायचा हे मनोज-अस्मिता या न्यूजर्सीच्या सद्भक्तांना सांगितला व तो तसाच्या तसा छापण्याची मला आज्ञा दिली.

सद्गुरुंसमोर कधी आपली अक्कल-हुशारी दाखवू नये, अहंकार दाखवू नये. प्रेमाने, विनयाने व नम्रतेने वागावे यात कोठेही खोटेपणा असू नये कारण त्यांच्या नजरेत काहीच लपत नाही. **त्यांच्या सहज बोलण्यातसुद्धा अपरंपार उपदेश भरलेला असतो.** मी असे लोक खूप पाहिले की, त्यांचा स्वार्थ साधेपर्यंत ते प्रेमाचे खूप मोठे नाटक करतात व स्वार्थ साधल्यानंतर दूर पळून जातात परंतु त्यांना ही कल्पना नसते की ते कितीही धूर्ततेने वागले तरी वातावरणातील देवता त्यांच्यावर लक्ष ठेवून असतात व योग्य वेळ आल्यावर त्यांच्यावर कारवाई केली जाते. अशा कृतघ्नतेने वागणाऱ्या लोकांविषयी माझा अनुभव असा आहे की, अशा लोकांची बुद्धी भ्रष्ट होते. त्यामुळे पुण्याई नष्ट होते. पुण्याई नष्ट झाल्यानंतर फटके बसू लागतात व त्यावेळी तारावयास कोणीही गुरु नसतो.

**सहज बोलणे हाचि उपदेश ।**
**करूनी सायास शिकविती ।।**

श्रीगुरुंच्या सहज बोलण्यात किती अर्थ असतो हे सांगण्याचा

प्रयत्न येथे केला आहे. अशा आणखी दोन छोट्या गोष्टी सांगून हा विषय आटोपता घेते.

श्रीस्वामीजी अरण्यात रहात होते तेव्हाची गोष्ट...

**अ**रण्यात खूप पाऊस पडत असे. त्यामुळे धुनीसाठी लागणारा लाकडांचा साठा एप्रिल-मे महिन्यात भरून ठेवावा लागे. काही सेवक अरण्यात जाऊन लाकडाचा साठा करण्याची सेवा करत असत.

एकदा मुंबईहून एक सेवक सेवा करण्यासाठी आला. त्याच्या बरोबर त्याचा दहा-बारा वर्षांचा मुलगा होता. श्रीस्वामीजी त्या मुलाला म्हणाले, ''बाळ! झोपड्यांसमोर सुमारे पंचवीस एकरांचे मोकळे मैदान आहे. या मैदानात कोठेही खेळ परंतु नदीवर जाऊ नकोस!''

मुलगा म्हणाला, 'ठीक आहे!' त्यानंतर दोन दिवसांनी त्या मुलाचे वडील नदीतून वाहत आलेल्या सुक्या लाकडाचे ओंडके गोळा करत होते व नदी किनारी ठेवत होते. तेथे हा मुलगा गेला. ओंडक्याजवळ ठेवलेली कुऱ्हाड त्याने उचलली व इतक्यात त्याचा तोल गेला व तो पडला. कुऱ्हाड त्याच्या मांडीवर पडली. पूर्ण मांडी फाटली. त्याचे वडील व इतर सेवक यांनी त्याला उचलून आणले. हॉस्पिटल तेथून पन्नास किलोमीटर दूर होते. घोंगडीची डोली करून त्या डोलीत त्या मुलाला ठेवण्यात आले. डोली खांद्यावर घेऊन सेवक जंगलातून तेरा किलोमीटर चालत मेनरोडपर्यंत आले. तेथून ट्रकने सर्वांनी पुढील प्रवास केला व मुलाला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. मुलाच्या मांडीला तेरा टाके घालावे लागले. मुलाला घेऊन सर्व सेवक मंडळी अरण्यातील झोपडीत परतली.

अशा प्रकारे एक वर्ष गेले. दुसऱ्या वर्षी मे महिन्यात त्या

मुलाचे वडील मुलाला घेऊन पुन्हा अरण्यातील श्रीस्वामीजींच्या तपस्थानी आले.

श्रीस्वामीजी मुलाला म्हणाले, ''अरे बाळ गेल्यावर्षीची आठवण आहे ना! परत अशी काही गडबड करू नकोस. तू लक्षात ठेव. उंच जागी चढायचे नाही तसेच झाडावर वगैरे चढायचे नाही.''

मुलाने मी कुठल्याच उंच जागी चढणार नाही असे श्रीस्वामीजींना व आपल्या वडिलांना कबूल केले. त्यानंतर काही दिवसांनी तो मुलगा पाण्याच्या टाकीवर चढला व तोल जाऊन खाली पडला. ईश्वराच्या कृपेने मुलगा पाण्यात न पडता जमिनीवर पडला. पाण्याची टाकी फक्त सात फूट उंच होती. तरीही मनगटाला फ्रॅक्चर झाले व हाताला प्लास्टर घालावे लागले.

वरील सर्व घटनातून एकच अर्थ निघतो. खऱ्या सत्पुरुषाजवळ अक्कल हुशारी दाखवू नये. **''मनाचा सरळपणा जेवढा जास्त तेवढा आध्यात्माचा मार्ग प्रशस्त होतो!''**

वरील गोष्टी आध्यात्मात प्रगती करू इच्छिणाऱ्या लोकांसाठी आहेत. सामान्य माणसांसाठी याचा काही उपयोग नाही.

ॐ

**तया एकवटलिया प्रेमा । जरी पाडे पाहिजे उपमा ।**
**मी देह तो आत्मा । हेचि होय ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# गुंडूनाना

**गुं**डूनाना याचे खरे नांव नरसिंहा! श्रीस्वामीजींनी त्याला प्रेमाने गुंडूनाना असे नांव दिले. त्यामुळे सर्व भक्तही त्याला गुंडूनाना म्हणत.

गुंडूनानाची पत्नी चेन्नम्मा. या दोघांनी श्रीस्वामीजींची व श्रीस्वामीजींच्या भक्तांची प्रेमाने, निस्वार्थ बुद्धीने व कुठल्याही प्रकारच्या मोठेपणाची किंवा सन्मानाची अपेक्षा न करता सुमारे चाळीस वर्षे सेवा केली. त्यांना असंख्य दिव्य व अद्‌भुत अनुभव आले. त्यातील काही पुढे देत आहे.

श्रीस्वामीजी यतिपोतला येथील गुहेमध्ये साधना करत होते. तेव्हा त्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था चेन्नम्मा पहात असे. उंच टेकडीवरील गुहेमध्ये श्रीस्वामीजी साधना करत असत व नदीकिनारी असणाऱ्या गुहेमध्ये चेन्नम्मा रहात असे. दररोज संध्याकाळी गुंडूनाना आपली ड्यूटी करून नागार्जुनसागरहून सामान घेऊन येत असे. अशा प्रकारे श्रीस्वामीजींनी सुमारे एक वर्ष तेथे साधना केली. गुंडूनाना व चेन्नम्मा या उभयतांनी त्यांची सेवा केली.

गुंडूनाना श्रीस्वामीजींबरोबर अनेकदा अरण्यात जात असे.

सत्रसाला येथे श्रीस्वामीजी साधना करत असताना गुंडूनाना त्यांच्या बरोबर होता. सलेश्वरम्, गुत्तीकोंडा बिळम्, बाणालोद्दी गुहा, श्रीशैल पर्वतातील भीमनकोळ्ळा इत्यादी ठिकाणी श्रीस्वामीजी जेव्हा साधना करत होते, तेव्हाही गुंडूनाना त्यांच्याबरोबर होता.

प्रखर साधनेच्या काळात गुंडूनानाने सेवा केल्याकारणाने त्याचे अनुभवही तसेच प्रखर आहेत, पण आपले अनुभव तो कोणालाही सांगत नाही. चुकून एखादा अनुभव त्याच्याकडून ऐकायला मिळतो.

यतिपोतला येथील नदीच्या प्रवाहात श्रीस्वामीजी साधना करत असताना असंख्य देव-देवता वातावरणातून खाली उतरत आहेत व श्रीस्वामीजींच्या आसपास दाटीवाटीने बसलेल्या आहेत, असे त्याने पाहिले.

आत्ता नागार्जुनसागरला जेथे आश्रम व मंदिरे आहेत तेथे एकेकाळी काटेरी जंगल होते. ती सर्व जागा साफ करण्याचे काम गुंडूनाना व चेन्नम्मा या उभयतांनी केले. जागा साफ झाल्यानंतर वड, औदुंबर व पिंपळ यांचा त्रिफला वृक्ष, व इतर ठिकाणी वड, औदुंबर व पिंपळ ही झाडे लावण्यासाठी खड्डे खोदले. मंदिराच्या पायाभरणीचा एक छोटासा खड्डाही त्यानेच खोदला.

सर्व खड्डे खोदून झाल्यानंतर त्या खड्ड्यांमध्ये सर्व भक्तांच्या सात्त्विक मनोकामना पूर्ण करतील व आध्यात्मात प्रगती करून देतील अशा काही सिद्धवस्तू अभिमंत्रित करून तेथे ठेवायच्या होत्या. श्रीस्वामीजींनी आपल्या झोपडीमध्ये असंख्य सिद्धवस्तू मांडून ठेवल्या होत्या. त्या वस्तूंची श्रीस्वामीजी रोज पूजा करत असत व देवतांचे आवाहन करत असत. गुंडूनाना हा सर्व प्रकार पहात असे. हळूहळू वातावरणातील एक-एक देवता प्रकट होऊन त्या सिद्धवस्तूंवर बसलेली

गुंडूनानाने पाहिली. अशा सर्व देवता प्रकट होऊन तेथील सिद्धवस्तूंवर बसलेल्या, गुंडूनानाने दिवसा उजेडी उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. त्यानंतर सर्व खड्ड्यांमध्ये वस्तू ठेवण्यात आल्या व त्यावर श्रीस्वामीजींनी वृक्षारोपण केले. या वृक्षांची जोपासनाही गुंडूनानाने केली.

सुमारे दहा वर्षांनंतर वृक्ष खूप मोठे झाले. मंदिरही बांधले गेले. या काळामध्ये अनेकदा गुंडूनानाला वृक्षातून काही आत्म्यांनी प्रकट होऊन दर्शन दिले. एकदा तर मंदिराला मारुती प्रदक्षिणा घालत आहे असे त्याला दिसले. तेव्हापासून श्रीस्वामीजींनी दररोज संध्याकाळची आरती झाल्यानंतर सर्व भक्तांनी हनुमान चालीसा म्हणत मंदिराला तीन प्रदक्षिणा घालण्याचा नियम केला. गुंडूनानाला एकदा श्रीराम पंचायतन व तिरुपती बालाजी या देवतांची दर्शने झाली.

कृष्णानदीतून असंख्य देव-देवता रात्रीच्या वेळी बाहेर येत आहेत व मंदिराला प्रदक्षिणा करत आहेत असे दृश्य त्याने अनेकदा पाहिले.

एकदा श्रीस्वामीजी ध्यानस्थ बसले असताना श्रीस्वामीजीं-च्या जागी अत्यंत विशाल आकाराचे ऋषी त्याने पाहिले, ज्यांची उंची बसून पंधरा-सोळा फूट होती.

गुंडूनाना आपला संपूर्ण पगार श्रीस्वामीजींसाठी खर्च करत असे. आश्रमाचा सर्व खर्च तो चालवत असे. अशा प्रकारे छत्तीस वर्षे सेवा केल्यानंतर श्रीस्वामीजींनी त्याच्या गावात त्याला एक हनुमान मंदिर बांधून दिले व हनुमान मंदिरात बसून गरीबांचे दुःख निवारण करण्याची विद्या दिली. ''तू येणाऱ्या दुःखितांना फक्त विभूति देत रहा, त्यांचे दुःख-कष्ट निवारण करण्याचे काम मी करेन.'' श्रीस्वामीजींच्या

आज्ञेप्रमाणे गुंडूनाना आपल्या गावी, गणापुरम येथे राहू लागला व चेन्नम्मा श्रीस्वामीजींच्या सेवेसाठी आश्रमात राहू लागली.

ॐ

## चेन्नम्मा

**श्री**स्वामीजी कृष्णानदीला परिक्रमा करत असताना नागार्जुन सागर येथे थांबले होते. तेथे अनेक लोक त्यांच्या दर्शनास येत. येथेच गुंडूनाना व चेन्नम्मा यांची श्रीस्वामीजींशी ओळख झाली. श्रीस्वामीजींनी उभयतांना श्रीदत्त नाम दिले. याचा अखंड जप उभयता करू लागले. यातील गुंडूनानाचे अनुभव आपण वर पाहिले आहेतच, आता चेन्नम्माच्या असंख्य अनुभवांपैकी दोन अनुभव पुढे देत आहे.

त्याकाळात कोठेही गॅसची सोय नव्हती. तीन दगड मांडून चूल बनविली जात असे व अशा चुलीवर स्वयंपाक केला जात असे. यासाठी दररोज दुपारी अनेक स्त्रीया जंगलात जात व लाकडे गोळा करून आणत.

घरचे काम व रोजचा जप या सर्व गोष्टी उरकून जंगलात जायला चेन्नम्माला उशीर होत असे व त्यामुळे तिला खूप कमी लाकडे मिळत असत. आपण जर लवकर जंगलात जाऊ शकलो तर आपल्याला भरपूर लाकडे मिळतील व मग २-३ दिवस आराम करता येईल, भरपूर देवाचे करता येईल असे चेन्नम्माला वाटत असे.

एकदा चेन्नम्मा नेहमीच्या वेळेला जंगलात लाकडे आणायला गेली. आश्चर्य म्हणजे जंगलामध्ये कोणीही नव्हते, चेन्नम्मा एकटीच होती. तिला खूप आनंद झाला. ''आज भरपूर लाकडे गोळा करायची''

असे तिने ठरविले, ती लाकडे गोळा करू लागली. तिने खूप लाकडे गोळा केली, एक मोठा भारा बांधला व तो भारा उचलून ती डोक्यावर ठेवू लागली. पण तो भारा जागचा हलेचना! चेन्नम्माला काय करावे सुचेना! तिने चौफेर दूर नजर टाकली. भारा उचलून डोक्यावर ठेवण्यासाठी मदत मिळते का हे बघितले. जवळपास कोणीच दिसत नव्हते. शेवटी तिने आकाशाकडे बघून नमस्कार केला व श्रीस्वामीजींना प्रार्थना केली. तेव्हा तिच्या मनात विचार आला. आपल्याला पुन्हा एकदा भारा उचलता येतो का? ते पहावे असे म्हणून तिने भारा उचलण्याचा प्रयत्न केला व तो सहज उचलला गेला. तिला काही कष्ट करावे लागले नाहीत. डोक्यावर भारा घेऊन ती घरी आली. एवढा मोठा भारा हलका कसा झाला याचा विचार ती करू लागली.

त्यानंतर ज्या स्त्री-पुरुषांनी तो भारा पाहिला त्या प्रत्येकाने एवढा मोठा भारा तू कसा उचललास, असे म्हणून आश्चर्य व्यक्त केले.

गुंडूनाना व चेन्नम्मा कालांतराने आश्रमात राहू लागले. पहाटे चार वाजल्यापासून रात्री एक वाजेपर्यंत चेन्नम्मा आश्रमात सेवा करत असे. एकदा एका भक्ताने तिला पन्नास रुपये दिले. तिने बऱ्याचवेळा नको म्हटले पण भक्ताचा आग्रह पाहून शेवटी तिने नाईलाजाने पैसे घेतले.

त्या दिवशी रात्री तिच्या स्वप्नामध्ये श्रीदत्तमहाराज आले. त्यांच्या हातात एक वेताची छडी होती. श्रीदत्तमहाराजांनी चेन्नम्माला दरडावून विचारले, ''पैशाला हात का लावलास? पैसे कमवायला आलीस का?' असे म्हणून श्रीदत्तमहाराजांनी तिला चोपायला सुरुवात केली. रात्रभर श्रीदत्तमहाराज तिला चोपत होते. पहाटे साडेतीन वाजता तिने गुंडूनानाला उठवले व स्वप्न सांगितले. तेव्हा गुंडूनानाने

चेन्नम्माला सांगितले, ''स्नान करून मंदिरात जा, श्रीदत्तमहाराजांची क्षमा माग व पैसे हुंडीमध्ये टाक.'' चेन्नम्माने त्याप्रमाणे केल्यानंतर तिला कधीच कसलाच त्रास झाला नाही.

ॐ

**देह संगे तरी असे । परी चैतन्यासारिखा दिसे ।**
**पाहता परब्रह्माचेनि कसे । चोखाळु भला ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# अन्नपूर्णाम्मा

**अ**न्नपूर्णाम्मा हिल कॉलनी नागार्जुनसागरला रहात असे. श्रीस्वामीजी जेव्हा कृष्णा नदीला परिक्रमा करत होते तेव्हा अन्नपूर्णाम्माची व श्रीस्वामीजींची भेट झाली.

कृष्णा प्रदक्षिणा करत असल्याकारणाने श्रीस्वामीजी चालत प्रवास करत होते. नागार्जुनसागर येथील नदीकिनारी असणाऱ्या हिल कॉलनीत डाऊन हिल पार्क या बागेमध्ये श्रीस्वामीजी राहिले होते. अनेक लोक त्यांना भेटायला येत असत. येणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये काही ना काही चमत्कार घडत असत व त्यांच्या इच्छा पूर्ण होत असत.

अन्नपूर्णाम्माला कसलीच इच्छा नव्हती. ती कृष्ण भक्त होती. आध्यात्मिक चर्चा करण्यासाठी एके दिवशी रात्री दहा वाजता एका ट्रान्सलेटरला घेऊन ती श्रीस्वामीजींकडे आली. अन्नपूर्णाम्माला फक्त तेलगु भाषा येत होती. तिने श्रीस्वामीजींना प्रश्न विचारला,

''गेली चाळीस वर्षे मी भगवान् श्रीकृष्णाची भक्ती करत आहे. मला अजून कृष्ण दर्शन का झाले नाही?

तुम्ही कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांना चालत प्रदक्षिणा करत आहात हे ऐकून मला असे वाटले की, तुम्हाला नक्कीच कृष्ण दर्शन झाले असेल. मला तुमचा कृष्ण दर्शनाचा अनुभव सांगाल का?''

श्रीस्वामीजींनी यावर अगदी थोडक्यात उत्तर दिले. श्रीस्वामीजी म्हणाले,

''मी तुला एक मंत्र देतो! घरी जा. देवासमोर तुपाचा दिवा लाव व त्या ज्योतिकडे पहात मंत्राचा जप कर. तुला जो काही अनुभव येईल तो मला येऊन सांग.'' असे म्हणून श्रीस्वामीजींनी तिला एक मंत्र दिला!

अन्नपूर्णाम्मा घरी गेली, देवासमोर तुपाची ज्योत लावली. त्या ज्योतिकडे पहात तिने मंत्राचा जप करायला सुरुवात केली. अचानक ती ज्योत अतिशय प्रखर होऊ लागली. काही क्षणापूर्वी अन्नपूर्णाम्मा ज्योतिकडे पहात होती. परंतु आता मात्र ती ज्योत अन्नपूर्णाम्माची दृष्टी खेचून घेत होती. तिला डोळे मिटता येईना. तिने जबरदस्तीने डोळे मिटले. तेव्हा अतिशय प्रखर ज्योति तिला भ्रूमध्यामध्ये दिसू लागली. ज्योतिला भिऊन तिने डोळे उघडले. अंगाला दरदरून घाम फुटला होता. ती उठून उभी राहिली. ज्योतिमध्ये आता कृष्ण दिसू लागला होता व त्याचे तेज तिला सहन होत नव्हते.

अतिशय प्रखर रूपामध्ये अत्यंत तेजस्वी असा कृष्ण दिसत होता व त्याचे तेज तिला सहन होत नव्हते. डोळे उघडे ठेवले तरी ज्योत व ज्योतिमध्ये भगवान् श्रीकृष्ण दिसत होता व डोळे मिटले तरी ज्योतिमध्ये भगवान् श्रीकृष्ण दिसत होता.

घराबाहेर गेल्यावर जास्त बरे वाटेल, असे वाटल्याने ती अंगणात आली. अंगणात आल्याबरोबर त्या ज्योतिने विशाल रूप

धारण केले. जमिनीपासून आकाशापर्यंत तिला महाज्योति व त्या महाज्योतित भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन घडले. जमिनीपासून आकाशापर्यंत सर्वव्यापी भगवान् श्रीकृष्णाच्या दर्शनाने ती अतिशय भयभीत झाली व रात्रभर झोपू शकली नाही. भगवान् श्रीकृष्णाने तिला अंतर्बाह्य व्यापून टाकले होते.

सकाळी सहा वाजता एक थर्मास भरून कॉफी घेऊन ती श्रीस्वामीजींकडे आली. हे सर्व दृश्य बंद करा म्हणून श्रीस्वामीजींना प्रार्थना करू लागली.

श्रीस्वामीजींनी ''ठीक आहे!'' असे म्हणताच सर्व दृश्य नाहीसे झाले.

बरीच वर्षे अन्नपूर्णाम्मा आश्रमात येऊन सेवा करीत असे. श्रीगुरुपौर्णिमा व श्रीदत्तजयंतीला बुंदी बनविण्याचे काम ती करत असे. वयाच्या सत्तराव्या वर्षी २००५ साली तिला देवाज्ञा झाली.

ॐ

**प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ।।**

**।। रामदास ।।**

# अरुण दाभोळकर

**अ**रुण दाभोळकरला श्रीस्वामीजी 'हेड ऑफ द डिव्होटीज्' असे म्हणत. मनाचा सरळपणा कसा असावा तर तो अरुण दाभोळकरसारखा असावा असे श्रीस्वामीजी इतर भक्तांना सांगत. आयुष्यभर नोकरी करून, संसार करून, व्यवहारी जगात राहून अरुणने जेवढी तेजस्विता प्राप्त केली, आध्यात्मिक प्रगती प्राप्त केली कमीत कमी तेवढी तरी प्रगती प्राप्त करणे आवश्यक आहे. तरच बेडा पार होईल असे उद्गार श्रीस्वामीजी अरुणविषयी काढीत. अत्यंत शुद्ध भाव व मनाचा सरळपणा या दोन गोष्टींमुळे अरुण तरून गेला. असेही उद्गार श्रीस्वामीजींनी माझ्याजवळ काढले. अशा या अरुणचे काही अनुभव पुढे देत आहे.

एकदा अरुण नागार्जुनसागरला जाण्यासाठी हैद्राबाद बस स्टॅण्डवर उतरला व नागार्जुनसागरला जाणाऱ्या दुसऱ्या बसमध्ये चढला. बस संपूर्ण भरलेली होती. अनेक लोक उभे होते. इतक्यात एका सीटवर बसलेल्या माणसाने हातवारे करून अरुणचे लक्ष वेधून घेतले. अरुणने त्याच्याकडे पहाताच 'इधर आव!' असे म्हणून तो

त्याला बोलावू लागला. हा अनोळखी तेलगु माणूस आपल्याला का बोलावतो हे अरुणला समजेना. काखेतील व हातातील बॅगा सांभाळत गर्दीतून वाट काढत अरुण त्याच्यापर्यंत पोहोचला.

'इधर बैठो!' असे म्हणून त्या प्रवाशाने अरुणला जागा दिली. त्याच्या बोलण्याच्या पद्धतिवरून त्याला मोडके-तोडकेसुद्धा हिन्दी येत नसावे असे अरुणला वाटले. त्याच्या सीटवर अरुण बसला. अरुणला वाटले तो थोड्यावेळाने परत येईल व आपल्याला उठायला सांगेल. परंतु तो आलाच नाही. बस नागार्जुनसागरला पोहोचेपर्यंत अरुणने अनेकदा सर्व प्रवाशांकडे पाहिले परंतु तो कोठेच दिसला नाही.

## वैष्णवीदेवी दर्शन

**अ**रुणला घेऊन श्रीस्वामीजी वैष्णवदेवीच्या दर्शनार्थ हिमालयात गेले होते. कटरा ते वैष्णवीदेवी हा अठरा किलोमीटरचा पहाड चढताना एके ठिकाणी एका छोट्या मुलीला श्रीस्वामीजींनी खूप वस्तू दिल्या. त्या मुलीबरोबर एक म्हातारा व म्हातारी होते. श्रीस्वामीजींनी अरुणला त्या तिघांना नमस्कार करण्यास सांगितले. नमस्कार करून दोन पावले पुढे गेल्यानंतर अरुणने मागे वळून बघितले तर त्या तिघांपैकी तेथे कोणीही नव्हते.

अरुणला आश्चर्य वाटले. अरुणने हा प्रकार श्रीस्वामीजींना सांगितला. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''ते शंकर-पार्वती व वैष्णवी देवी होते.''

अत्यंत निःस्पृहतेने अरुणने सुमारे वीस वर्षे सेवा केली. वीस वर्षांच्या सेवा साधनेचे फळ म्हणून श्रीस्वामीजींनी त्याला लोकांना सेवा, साधना व उपासना सांगण्याचा अधिकार दिला. वनिता बुक्समध्ये

दर शनिवार-रविवारी बसून त्याने लोकांना मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. त्याने ज्यांना साधना दिली त्यांनाही खूप चांगले अनुभव आले.

ॐ

## देसाई

**श्री**स्वामीजी अरण्यात साधना करत होते. त्या अरण्यामध्ये झोपड्या बांधण्याचे काम सुरू होते. देसाई नांवाचे गृहस्थ गवंडी काम करत होते. एक दिवस ते श्रीस्वामीजींना म्हणाले,

''एकेकाळी मी खूप श्रीमंत होतो. जमिनीच्या भांडणावरून माझ्या हातून चार खून झाले. मला अटक झाली. कोर्ट कचेऱ्या झाल्या. या सगळ्यांमध्ये माझी सर्व प्रॉपर्टी मला विकून टाकावी लागली. काही वर्षे शिक्षा भोगून दहा वर्षांपूर्वी माझी सुटका झाली. तेव्हापासून मी गवंड्याच्या हाताखाली काम करत आहे. माझ्यासारख्या माणसाचा उद्धार होऊ शकेल का? मला काही मार्ग मिळेल का?''

त्याच्या बोलण्यातील आर्तता पाहून श्रीस्वामीजींचे हृदय कळवळले. ते देसाई यांना म्हणाले, ''ईश्वर दयाळू आहे, तो तुमचा उद्धार करेल. तुम्ही आता गवंडी काम करणे सोडून द्या व आश्रमात गायींची सेवा करा.'' देसाई यांची गोमाता सेवा सुरू झाली. मनोभावाने ते गायींचा गोठा साफ करत, तसेच गायींना पाणी पाजत, गवत घालीत अशा प्रकारे ते गोसेवा करू लागले. जेमतेम पंधरा-वीस दिवस त्यांनी सेवा केली असेल, एवढ्यात त्यांना एक विलक्षण अनुभव आला.

रात्रीचा एक वाजला होता. देसाईंना झोप येत नव्हती म्हणून ते विडी ओढत बसले होते, इतक्यात त्यांनी पाहिले, श्रीस्वामीजी गोठ्यात आले आहेत. आत येऊन ते प्रत्येक गायीजवळ गेले व त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. सर्व गायींवरून हात फिरवून झाल्यानंतर श्रीस्वामीजी जसे आले तसे निघून गेले.

देसाई विचार करू लागले, श्रीस्वामीजी आले परंतु एक शब्दसुद्धा माझ्याशी बोलले नाहीत. नक्कीच माझे काहीतरी चुकले असले पाहिजे. या विचाराने त्यांना रात्रभर झोप आली नाही. श्रीस्वामीजींची बहीण संध्या त्यावेळी अरण्यातच रहात होती. श्रीस्वामीजी जे लिखाण करीत त्याची कॉपी काढण्याचे काम ती करत असे. सकाळी साडेपाच-पावणेसहाला देसाई संध्याला भेटले व तिला म्हणाले, ''संध्या, रात्री श्रीस्वामीजी गोठ्यात आले. त्यांनी सर्व गायींवरून हात फिरवला व गोठ्यात एक फेरी मारून निघून गेले. परंतु माझ्याशी एक अक्षरही बोलले नाहीत. नक्कीच माझे काहीतरी चुकले आहे, म्हणून ते माझ्यावर रागावले आहेत. तरी माझ्या हातून काय चूक झाली हे तू त्यांना विचार!''

संध्या श्रीस्वामीजींच्या झोपडीत आली. श्रीस्वामीजी नुकतेच उठले होते. तिने श्रीस्वामीजींना विचारले, ''रात्री तुम्ही गायींच्या गोठ्यात गेला होता का?''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''नाही! रात्री दोन वाजेपर्यंत मी साधना करत होतो. तद्नंतर झोपलो व आत्ता उठत आहे.''

एवढे ऐकल्यावर तिने देसाईंनी सांगितलेली सर्व हकिकत श्रीस्वामीजींना सांगितली.

संध्याने सांगितलेली सर्व हकिकत ऐकून श्रीस्वामीजी तिला म्हणाले, ‘‘चल! आपण त्यांना भेटायला जाऊ!’’ असे म्हणून श्रीस्वामीजी गायींच्या गोठ्याजवळ गेले.

देसाईंना ते म्हणाले, ‘‘देसाई, तुम्ही फार भाग्यवान आहात. साक्षात् भगवान् श्रीदत्तात्रेय रात्री गोठ्यात गायींना दर्शन देण्यासाठी आले होते व गायींमुळे तुम्हालाही त्यांचे दर्शन घडले. तुम्ही आता येथेच कायमचे रहा व गायींची सेवा करत रहा. श्रीदत्ताच्या दरबारातील या गायी फार पुण्यवान आहेत. ही सर्व गायी-वासरे पुढील जन्मी मनुष्य होणार आहेत.’’

## चामुण्डादेवीचे दर्शन

**द**रवर्षी पावसाळ्यात श्रीस्वामीजी नागार्जुनसागरला जात असत. त्याप्रमाणे पावसाळ्यामध्ये त्यांनी नागार्जुनसागरला जाण्याचे ठरवले.

श्रीस्वामीजी नागार्जुनसागरला निघून गेल्यानंतर देसाई व दोन सेवक आश्रमात रहात होते. त्या अरण्यात सुमारे चारशे इंच पाऊस पडत असे. वर्षातील जवळजवळ सहा महिने पाऊस पडत असे. त्यामुळे आश्रमामध्ये जरुरी सामान, गायी-गुरांसाठी चारा वगैरेंचा मे महिन्यात साठा करून ठेवावा लागत असे.

पावसाळ्यात सहा महिने गायींवर लक्ष ठेवणे व शेकोटी-समोर बसून ईश्वरचिंतन करणे या व्यतिरिक्त आश्रमातील सेवकांना अन्य काही काम करता येत नसे.

रात्रीची वेळ होती. मुसळधार पाऊस पडत होता. देसाई

गोठ्यामध्ये पेटविलेल्या शेकोटीजवळ बसून थंडीने गारठलेल्या शरीरात ऊब आणण्याचा प्रयत्न करत होते. अचानक गोठ्याच्या छतातून प्रचंड तेजाचा गोल खाली आला. त्या तेजाच्या गोलातून एक देवी साकार झाली. ही देवी अत्यंत तेजोमय होती. तिच्या हातात पंचारती होती. तिने सर्व गायींना ओवाळले व प्रचंड तेजोवलयाचे रूप धारण करून ती अदृश्य झाली.

हा प्रकार पाहिल्यानंतर मात्र देसाईंची पाचावर धारण बसली. ते खूप घाबरले. त्यांनी सेवकांना हाका मारण्यास सुरुवात केली. सेवक आल्यावर त्यांनी सर्व प्रकार त्यांना सांगितला व आपण गोठ्यात झोपणार नाही, ''ही जागा माझ्यासारख्या सामान्य माणसाने रहाण्याची नाही,'' असे ते म्हणू लागले.

सेवकांबरोबर ते दुसऱ्या झोपडीत झोपले. सकाळी देसाई आपल्या गावाला निघून गेले.

ॐ

**तो एकचि ठायी बैसला । परि सर्वत्र तोचि गेला ।**
**हे असो विश्व जाहला । अंगेचि तो ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# मनोज - अस्मिता

**श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्धयोग्याच्या सहवासात भाग १** या पुस्तकामध्ये **मनोज-अस्मिता** या पती-पत्नीचे अनुभव आले आहेत. १४ नोव्हेंबर २०१४ या दिवशी त्यांनी मला एक त्यांचा दिव्य अनुभव वर्णन करून सांगितला तो पुढे देत आहे.

मनोज-अस्मिता हे अमेरिकेतील न्यूजर्सी येथे रहातात. सुमारे आठ वर्षांपूर्वी ते नागार्जुनसागरला श्रीस्वामीजींच्या दर्शनाला आले होते. तेव्हा श्रीस्वामीजी मनोजला म्हणाले, ''अस्मितामध्ये दैवी तेज आहे. तू अमेरिकेहून जेव्हा भारतात येशील तेव्हा प्रथम तू सौ. ताईंच्या **(ॐ वनिता ॐ)** घरी जा. तेथे अस्मिताला थोडे ध्यान करू दे. एखादी रात्र तेथे राहू दे. ताईंकडून दैवी संरक्षण घेऊन मग पुढे जाऊ दे. असे केले असता, तुझ्या घराण्यामध्ये असणाऱ्या काही अतृप्त आत्म्यांचा तिला जो त्रास होतो त्यापासून तिचे संरक्षण होईल.''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे मनोजने सुमारे सात वर्षे केले. यावर्षी म्हणजेच २०१४ सप्टेंबरमध्ये मनोजने भारतात येण्याची

तिकीटे काढताना न्यूजर्सी ते दिल्ली, दिल्ली ते पुणे अशी तिकीटे काढली. ही तिकीटे १३ नोव्हेंबर २०१४ ची होती.

तिकीटे काढून झाल्यानंतर त्याने मला फोन केला व मला म्हणाला, ''ताई, मी यावर्षी डायरेक्ट पुण्यापर्यंत फ्लाईट घेतली आहे. त्यामुळे माझा मुंबई ते पुणे हा कारने प्रवास करण्याचा त्रास वाचेल. याशिवाय तिकीटे मला खूप स्वस्त मिळाली. विमानाने पुण्यापर्यंत प्रवास करून प्रथम आम्ही आमच्या घरी जाऊन माझ्या वडिलांचा पंच्याहत्तरावा वाढदिवस साजरा करून दोन-तीन दिवसानंतर तुमच्याकडे येऊ!''

मी म्हणाले, ''ठीक आहे.''

यानंतर सुमारे दोन महिने गेले, नोव्हेंबर महिना (२०१४) सुरू झाला. मनोज-अस्मिता येणार इकडे आता लक्ष लागले होते. मी अस्मिताला माझी मुलगी मानते व श्रीस्वामीजीही तिला मुलीसारखेच मानतात. ९ नोव्हेंबर २०१४ रविवार रोजी मनोज व अस्मिता दोघांनी एकत्रितपणे मला फोन केला.

**अस्मिता** :-''ताई, आत्ताच मी मनोजचा पासपोर्ट पाहिला. मनोजचा व्हिसा संपून गेला आहे. मनोज आता भारतात प्रवेश करू शकत नाही. आज रविवार आहे काहीच करता येणे शक्य नाही. उद्या १० तारीख आहे. १३ तारखेची दुपारची तिकीटे आहेत. व्हिसा मिळायला दहा दिवस लागतात. मनोजचे भारतात येणे कॅन्सल होईल असे वाटते. सहा बॅगा घेऊन एकटीने प्रवास करणे मला शक्य नाही. मनोजचे डोके अगदी सुन्न झाले आहे, त्याला तुमच्याशी बोलायचे धाडसच होत नाही. तो फोनवरच आहे. श्रीस्वामीजींच्या आज्ञेचे उल्लंघन केले त्याची शिक्षा झाली असे म्हणतो.''

''मनोज, काही मार्ग काढता येईल का?'' मी विचारले.

**मनोज :-** ''ताई, फक्त ईश्वरी चमत्कारच मला भारतात आणू शकतो. व्हिसा मिळायला दहा दिवस लागतात. एम्बसीमध्ये व्हिसाची कामे सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत केली जातात व दहा दिवसांनी व्हिसा आपल्याला मिळतो. इमर्जन्सी केसमध्ये व्हिसा पाच दिवसात मिळतो. (ईमरजन्सी केस याचा अर्थ कोणीतरी मृत्यूशय्येवर असणे.) ईमरजन्सी केसमध्येसुद्धा केसची सगळी कागदपत्रे पूर्ण असावी लागतात.

मी म्हणाले, ''मनोज तू पैसे वाचवण्यासाठी व अन्य कुठल्याही कारणाने देवाच्या आज्ञेचे उल्लंघन केलेले आहेस. ही गोष्ट वातावरणातील देव-देवतांना आवडलेली नाही म्हणूनच तुझ्यावर हे संकट आलेले आहे. तरी तू आता देवाच्या फोटोसमोर बस. अगरबत्ती लाव व देवाची माफी माग. पुढे काय होते ते पाहू. मीपण तुझ्यासाठी प्रार्थना करते.''

मी सांगितल्याप्रमाणे मनोजने देवाची माफी मागितली व एम्बसीला ई-मेल केला. दोन मिनिटांच्या आंत एम्बसीमधून उत्तर आले. (याच एम्बसीच्या लोकांनी मनोजला पंधरा मिनिटापूर्वीच्या ई-मेलमध्ये नॉर्मल व ईमरजन्सी केसचे नियम सांगितले होते, त्या नियमांप्रमाणे मनोज भारतात येऊ शकत नव्हता.) पासपोर्टचा नंबर कळवा. मनोजने पासपोर्टचा नंबर कळवला व मला फोन करून कळवले.

मी म्हणाले, ''मनोज, सतत देवाची प्रार्थना करत रहा. तुला व्हिसा मिळेल.'' या सर्व गोष्टी ११ नोव्हेंबरच्या आहेत. १२ नोव्हेंबरला मनोजला एम्बसीमध्ये बोलावले व भारतात जाण्याचा व्हिसा दिला.

न्यूजर्सीहून दिल्लीला जाणाऱ्या विमानामध्ये मनोज व अस्मिता बसले. अबु-धाबी येथे विमानाचा हॉल्ट होता. तेथे सर्व प्रवासी विमानातून उतरतात व दुसऱ्या विमानात बसून आपला पुढील प्रवास सुरू करतात. त्याला कनेक्टिंग फ्लाईट असे म्हणतात.

विमानात बसल्यावर मनोज पायलटला भेटला व म्हणाला, ''अबु-धाबीहून दिल्लीसाठी माझी कनेक्टिंग फ्लाईट आहे. विमान दीड तास उशिरा सुटत आहे. माझे विमान चुकेल, आपण काही करू शकता का? शक्य असेल तर अबु-धाबीला फोन करा व कळवा की, या विमानामधून दिल्लीला जाण्यासाठी काही पॅसेंजर येत आहेत. तरी अबु-धाबीहून दिल्लीला जाणारे विमान, प्रवासी पोहोचेपर्यंत तेथेच थांबवावे.''

त्यावर पायलट म्हणाला, ''एअरपोर्ट ऑथॉरिटीला मी ऑर्डर देऊ शकत नाही,'' परंतु विमान फास्ट चालवून मी एक तास भरून काढू शकतो. ''बाकी सर्व गोष्टी तुम्ही ईश्वरावर सोडून द्या.''

मनोज-अस्मिता यांचे विमान अबु-धाबीला उतरले. विमानातून उतरल्याबरोबर त्याने दिल्लीला जाणाऱ्या विमानाकडे धाव घेतली, तेव्हा काऊंटरवर त्यांना सांगण्यात आले की, दिल्लीला जाणारे विमान निघून गेले आहे.

काऊंटरवरची बाई म्हणाली, ''दिल्लीला जाणारे दुसरे विमान चार-पाच तासानंतर आहे. तोपर्यंत सर्वांनी एअरपोर्टवर बसावे. परंतु ज्यांना मुंबईला जायचे आहे त्यांनी ताबडतोब माझ्यासमोर यावे.''

इतके सगळे घडल्यानंतर मनोज काय समजायचे ते समजला होता. मुंबईला जाणाऱ्या पॅसेंजरने माझ्याकडे यावे असे काऊंटरवरच्या स्त्रिने म्हणताच, मनोज-अस्मिता तिच्यासमोर येऊन उभे राहिले व

आम्हाला मुंबईला जायचे आहे असे सांगितले. मुंबईला जाणारे एकूण सहा पॅसेंजर होते. मनोज-अस्मिताच्या अगोदर जे पॅसेंजर त्या स्त्रीकडे गेले, त्यांनी तिच्याशी भांडण करायला सुरुवात केली. त्यामुळे त्या स्त्रिने त्या तीन-चार पॅसेंजर्सना आपल्या वरीष्ठांकडे पाठवून दिले. मनोजला ती म्हणाली, ''मी विमानात किती सीटस् आहेत ते पहाते व मग काय ते तुम्हाला सांगते.'' तिने विमानात फोन केला. विमानामध्ये फक्त दोनच सीट मोकळ्या होत्या.

काऊंटरवरच्या स्त्रिने मनोज-अस्मिता यांचे बोर्डींग पासेस बनवले व त्यांचे सारे सामान मुंबईला जायच्या विमानात चढवले. अशारितीने मनोज व अस्मिता दोघेही मुंबईला पोहोचले व माझ्या घरी येऊन सर्व हकिकत सांगितली.

मनोज व अस्मिता यांना आलेला दिव्य अनुभव लिहून संपवताना मला ज्ञानेश्वरीची एक ओवी आठवली व तदनुषंगाने दोन छोट्या छोट्या गोष्टीही आठवल्या. वाचकांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी त्या मी पुढे देत आहे.

**मग तो समुद्रापैलाड देखे । स्वर्गींचा आलोचु आयिके ।**
**मनोगत ओळखे । मुंगिचिये ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

एकदा मी श्रीस्वामीजींबरोबर बागेमध्ये फिरत होते. बागेत अनेक ठिकाणी स्प्रिंकलर्स् लावलेले होते. स्प्रिंकलर्स् पाहून श्रीस्वामीजी म्हणाले, ''ताई, वनस्पतींनासुद्धा मन असते. एखादा मोठा पाईप लावून जर बागेमध्ये पाणी सोडले तर दुर्वांसारख्या छोट्या वनस्पतींना असे वाटते की महापूर आला. त्या तात्काळ मरून जातात. परंतु स्प्रिंकलर्सने पाणी शिंपडले की, वनस्पतींना वाटते की पाऊस आला. त्या लगेच

प्रफुल्लित होतात म्हणून बागेतील हरियाली या वनस्पतीला स्प्रिंकलर्सने पाणी दिले जाते.''

**ज**गातील अनेक भाषांमध्ये भगवद्‌गीतेचे भाषांतर झालेले आहे. श्रीस्वामीजी म्हणत, ''**अर्जुन**'' ही एक मनाची अवस्था आहे. ज्याचे मन लोण्यासारखे मऊ आहे अशा भक्तिमान व्यक्तीला अर्जुन म्हणतात. अशा व्यक्तीमध्ये एक बारीकसा दोष असतो. हा बारीकसा दोष म्हणजे विजयाची ''**आकांक्षा.**''

विजयाची आकांक्षा म्हणजे ''**हे असे असावे.**'' ही वृत्ती!

ही वृत्ती नष्ट होताच ''**धर्ममेध समाधी**'' प्राप्त होते. या समाधीलाच **सहजावस्था** असे म्हणतात. त्यामुळेच अर्जुन व श्रीकृष्ण यांच्या संवादाला म्हणजे भगवद्‌गीतेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.

**कौरव** म्हणजे हृदयातील **दुष्ट प्रवृत्ती! पांडव** म्हणजे शरीरातील **पंचप्राण**.

**१. प्राण**

**२ अपान**

**३. व्यान**

**४. उदान**

**५. समान**

हे पंचप्राण!

**द्रौपदी** म्हणजे **कुंडलिनी शक्ती व कर्ण** म्हणजे **श्रवणेंद्रियाचा** गैरवापर. ताई! माझी भगवद्‌गीता संपली.

मनोज व अस्मिता यांच्या प्रसंगामुळे ज्या गोष्टी आठवल्या त्या येथे नमूद केल्या आहेत.

ॐ

**घरचिया उजियेडू करावा ।**
**का पारखिया अंधारु पाडावा ।**
**हे नेणेचिगा पांडवा ।**
**दिपु जैसा ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# ए. डी. आय. साहेब

**श्री**स्वामीजी वर्षातील सुमारे आठ महिने अरण्यात राहून साधना करत व पावसाळ्याचे चार महिने जून ते सप्टेंबर ते नागार्जुनसागरला येऊन रहात.

श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ अरण्यामध्ये ए. डी. आय. साहेब येत. कधी कधी ते चार-चार दिवस श्रीस्वामीजींच्या सहवासात रहात. ते आसने व प्राणायाम करत. श्रीस्वामीजींना ते नेहमी म्हणत...

''मी गेली चाळीस वर्षे योग साधना करत आहे. मला तुमच्याबरोबर साधना करायची आहे. साधनेची जुगलबंदी तुमच्या बरोबर करायची आहे. तेव्हा सांगा तुम्ही माझ्याबरोबर साधनेची जुगलबंदी केव्हा करणार?''

प्रत्येक भेटीत ते श्रीस्वामीजींना हा प्रश्न विचारत. श्रीस्वामीजी कधीही त्यांना या प्रश्नाचे उत्तर देत नसत. पुष्कळवेळा चार-चार दिवस श्रीस्वामीजी त्यांच्याबरोबर राहूनही त्यांच्यासमोर साधना करत नसत. आपण आपल्या साधनेची जुगलबंदी केव्हा करायची असा प्रश्न ए. डी. आय. साहेब त्यांना विचारत व श्रीस्वामीजी नंतर केव्हातरी बघू असे

उत्तर देत. असे अनेकदा घडले. ए. डी. आय. साहेबांना श्रीस्वामीजींबरोबर साधनेची जुगलबंदी करण्याची संधी काही केल्या मिळाली नाही.

पावसाळा सुरू झाला होता. श्रीस्वामीजींनी अरण्यातील आपली साधना आटोपून नागार्जुनसागरला जाण्याची तयारी केली. नागार्जुनसागरला ते चार महिने राहून तेथे साधना करणार होते. चार महिन्यानंतर दसऱ्याच्या सुमारास अरण्यात परत येण्याचे त्यांनी ठरवले होते. सर्व तयारी झाली होती.

निघण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी अंधार पडता पडता ए. डी. आय. साहेबांची स्वारी श्रीस्वामीजींकडे आली.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''साहेब! तुम्ही आलात खूप चांगले झाले. तुम्ही आता येथे चार-आठ दिवस राहून साधना करा. मी उद्या सकाळी सहा वाजता नागार्जुनसागरला जाण्यासाठी निघणार आहे. चार महिन्यांनी परत येईन.''

यावर ए. डी. आय. साहेब म्हणाले, ''अरेरे! मी या खेपेला तुमच्याबरोबर साधनेची जुगलबंदी करायचीच असे ठरवून आठ दिवसांची रजा घेऊन आलो होतो. चला! आपण असे करू या; आपण रात्रभर साधनेची जुगलबंदी करू या! मला बघू दे तरी, तुम्ही माझ्यासमोर साधना करतांना किती वेळ टिकता?''

''मला माहीत आहे, तुम्ही माझ्यासमोर जास्त वेळ तग धरू शकणार नाही! तुम्ही नक्कीच हराल!'' अशी ए. डी. आय. साहेबांनी स्वामीजींची चेष्टा केली.

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''ए. डी. आय. साहेब, खरंच! आज मला वेळ नाही. खूप आवरा-सावर करायची आहे. नंतर

केव्हातरी बघू. चार महिन्यानंतर मी येणार आहे तेव्हा आपण नक्की साधनेला बसू!''

हा विषय येथेच संपला. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीस्वामीजी नागार्जुनसागरला निघून गेले. ए. डी. आय. साहेब एक-दोन दिवस राहून आपल्या घरी गेले. नागार्जुनसागर येथे श्रीस्वामीजी चार महिने राहिले. त्या काळामध्ये म्हणजे १९८० पूर्वी, टेलिफोनचा फारसा प्रसार झालेला नव्हता. नागार्जुनसागरला कोणाच्याही घरी टेलिफोन नव्हते. मुंबईमध्येसुद्धा आजच्यासारखे घरोघरी टेलिफोन नव्हते. एस. टी. डी. ची सोय फक्त मुंबई, कलकत्ता, चेन्नई अशा मोठ्या शहरांमध्येच होती. खुशालीचे आदान-प्रदान पत्र व्यवहाराद्वारेच होत असे. नागार्जुनसागरला पत्र पोहोचण्यास सात-आठ दिवस लागत. त्यामुळे चार महिन्यामध्ये ए. डी. आय. साहेबांची काहीच खुशाली श्रीस्वामीजींना कळली नाही व ज्या अरण्यात श्रीस्वामीजी रहात होते. तेथून पोस्ट ऑफिस सोळा-सतरा किलोमीटर दूर होते. त्यामुळे तेथील कोणालाही श्रीस्वामीजींना पत्र पाठविणेही शक्य नव्हते.

ऑक्टोबर महिन्यात श्रीस्वामीजी अरण्यात परत आले. तेव्हा त्यांच्या दर्शनास येणाऱ्या प्रत्येक माणसाने श्रीस्वामीजींना एकच गोष्ट सांगितली.

''ए. डी. आय. साहेब गेले चार महिने तुमची वाट पहात आहेत. जो भेटेल त्या प्रत्येकाला श्रीस्वामीजी आले का? म्हणून विचारत आहेत व श्रीस्वामीजी आले की, तात्काळ मला कळवा असे सांगत आहेत.'' अनेक लोकांनी श्रीस्वामीजींना ही गोष्ट सांगितली. तिसऱ्या दिवशी ए. डी. आय. साहेब स्वतः आले. झोपडीच्या बाहेर अंगणात श्रीस्वामीजी उभे होते. श्रीस्वामीजींना पाहून ते अक्षरशः

धावत आले. त्यांनी श्रीस्वामीजींना साष्टांग नमस्कार घातला. त्यांच्या पायावर डोके ठेवून ढसाढसा रडू लागले व मला माफ करा तुम्ही माफ करेपर्यंत मी पाय सोडणार नाही असे म्हणू लागले.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''ठीक आहे, तुम्हाला माफ केले!'' असे म्हणताच ए. डी. आय. साहेबांनी पाय सोडले. श्रीस्वामीजींनी त्यांना प्यायला पाणी दिले व ए. डी. आय. साहेबांना म्हणाले,

''काय प्रकार झाला तो मला सांगा.''

यावर ए. डी. आय. साहेबांनी जे काही सांगितले त्या घटनेचा अर्थ पुढीलप्रमाणे....

अरण्यात दोन दिवस राहून ए. डी. आय. साहेब घरी गेले. रात्री जेवून झोपले. त्यांना शांत झोप लागली. इतक्यात कोणीतरी त्यांच्या कमरेत लाथ घातली. ए. डी. आय. साहेब उठले, पहातात तो काय...

श्रीदत्त महाराज श्रीस्वामीजींच्या रूपात उभे होते. श्रीदत्त महाराज श्रीस्वामीजींचे रूप घेऊन आले आहेत हे ए. डी. आय. साहेबांनी ओळखले. कारण श्रीस्वामीजी अतिशय प्रेमाने वागत असत तर ए. डी. आय. साहेबांसमोर जे श्रीदत्त महाराज प्रकट झाले होते त्यांचे बोलणे कमी व ''ठोकणे'' जास्त होते. ते अतिशय उग्र दिसत होते. त्यांना पाहूनच ए. डी. आय. साहेबांच्या अंगाला कंप सुटला व हात-पाय कापू लागले. हात जोडून नमस्कार करणेसुद्धा त्यांना शक्य होत नव्हते. श्रीस्वामीजींच्या रूपात प्रकटलेले श्रीदत्त महाराज लाथा मारत होते, हातातील वेताच्या काठीने झोडपून काढत होते व विचारत होते....

''माझ्याबरोबर जुगलबंदी करतोस काय?''

''माझ्याबरोबर तुला साधना करायची आहे काय?''

''माझ्यासमोर बसायची तरी तुझी लायकी आहे काय?''

असे काहीतरी ते मारता-मारता बोलत होते. 'चल बस! साधना करायला. घाल पद्मासन' असे म्हणून श्रीदत्त महाराजांनी आणखी दोन लाथा त्यांच्या कमरेत घातल्या. हा मारहाणीचा प्रकार जवळजवळ चार-पाच तास चालला. नंतर त्यांना थोडी झोप लागली. सकाळी उठले तेव्हा सर्व अंग ठणकत होते.

त्या दिवसापासून रोज रात्री हा प्रकार घडू लागला म्हणून त्यांनी रात्री पद्मासनात बसून साधना करण्यास सुरुवात केली. जोपर्यंत ते पद्मासनात बसले होते व साधना करत होते तोपर्यंत काहीच त्रास झाला नाही. पण अचानक त्यांना एक सेकंद डुलकी लागली. डुलकी लागताच श्रीदत्त महाराजांनी त्यांच्या मुस्कटात जोराने थप्पड मारली. थप्पड इतक्या जोराने मारली गेली होती की, त्यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले, त्यांचे पद्मासन सुटले व ते जमिनीवर आडवे झाले. आदल्या रात्रीप्रमाणे पुनश्च मारहाणीचा प्रकार सुरू झाला व तो सुमारे तीन-चार तास चालला.

अशा प्रकारच्या यातनांना ए. डी. आय. साहेब गेले चार महिने तोंड देत होते, त्यांना वेड लागायची पाळी आली होती व म्हणून त्यांना श्रीस्वामीजींचे दर्शन हवे होते. वेड्यासारखे ते लोकांना श्रीस्वामीजी केव्हा येणार असे विचारत होते. श्रीस्वामीजीच या सर्व यातनातून आपल्याला सोडवू शकतात असेही त्यांना वाटत होते म्हणून श्रीस्वामीजींची भेट झाल्यानंतर ढसाढसा रडून त्यांनी आपला पश्चात्ताप ईश्वरासमोर व्यक्त केला.

ए. डी. आय. साहेबांची सर्व हकिकत कळल्यानंतर

श्रीस्वामीजी म्हणाले, ‘‘साहेब तुम्ही काही काळजी करू नका, मी श्रीदत्त महाराजांना प्रार्थना करतो व तुम्हाला त्रास देऊ नये अशी विनंती करतो.’’

श्रीस्वामीजींना बघून ए. डी. आय. साहेबांना जीवात जीव आल्यासारखे वाटले. त्या दिवसापासून त्यांचे सर्व त्रास बंद झाले.

वरील गोष्टीवरून असा बोध होतो की सत्पुरुषांबरोबर कधीही बरोबरी करू नये, स्पर्धा करू नये. सिद्धपुरुष आपल्याशी अतिशय आपुलकीने व प्रेमाने वागत असले तरी त्यांचे संरक्षण करणाऱ्या देवता त्यांच्यासारख्याच प्रेमळ असतील असे सांगता येत नाही. तसेच नम्रता व शिकण्याची वृत्ती असेल तरच तुम्हाला श्रीगुरुंकडून काहीतरी शिकता येईल. सत्पुरुष या जगातले नसतात, ईश्वराच्या आज्ञेने जगाला ज्ञान देण्यासाठी ते या जगात आलेले असतात. त्यांच्याकडून ज्ञान मिळवण्यासाठी अंगी नम्रता असावी लागते. ‘‘**आपली पात्रता आपण सिद्ध करून दाखवावी लागते.**’’ खूप खूप सेवा करून ज्ञान ग्रहण करण्यास आपण योग्य आहोत हे सिद्ध करून दाखवावे लागते. जसजशी आपली योग्यता वाढत जाईल तसतसे आपले ज्ञान आपोआपच प्रकट होऊ लागते. हा सर्व विषय अतिशय गूढ व रहस्यमय आहे. तो शब्दात सांगता येणे कठीण आहे.

ॐ

**गायीची तृषा हरु । का व्याघ्राते विष होऊनी मारू ।**
**हे नेणेचि काही करू । तोय जैसे ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# तो कोण होता?

**श्री**स्वामीजी अरण्यामध्ये एका छोट्याशा झोपडीत रहात होते. आसपासच्या खेडेगावातील लोक आपल्या अडचणी व समस्या सोडवण्यासाठी त्यांच्याकडे येत. तेथील लोकांचा असा विश्वास होता की, ''समस्या, अडचण किंवा संकट एकदा श्रीस्वामीजींच्या कानावर घातले की, त्यातून आपोआपच मार्ग मिळत असे.''

त्याच अरण्यात रहाणारे जाधवही आपली समस्या श्रीस्वामीजींच्या कानावर घालण्यासाठी श्रीस्वामीजींकडे आले होते. ते श्रीस्वामीजींना म्हणाले, ''मला ताबडतोब मुंबईला जाणे भाग आहे. अडचण अशी आहे की, मी कधीच मुंबईला गेलेलो नाही. आमच्या गावातील कोणीही मुंबईला गेलेले नाही. त्यामुळे मुंबईची कोणालाच माहिती नाही. माझा भाऊ परळ येथे रहातो. त्याचा पत्ता माझ्याकडे आहे पण मला लिहिता-वाचता येत नाही.'' जाधवांनी आपली अडचण श्रीस्वामीजींना सांगितली.

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''काही काळजी करू नका. खिशात पत्ता नीट जपून ठेवा. मुंबईच्या गाडीत बसा. कंडक्टरला

परळला उतरविण्यास सांगा. देव तुम्हाला तुमच्या भावाच्या घरी सुखरूप पोहोचवेल!''

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे जाधव मुंबईच्या गाडीत बसले. साडेचारशे किलोमीटर प्रवास करून परळ-मुंबई येथे उतरले. मुंबईतील उत्तुंग इमारती, माणसांची गर्दी, रस्त्यावरून सुसाट वेगाने पळणाऱ्या असंख्य गाड्या हे सर्व पाहून ते भांबावून गेले. त्यांना काही सुचेना! त्यांनी खिशातून तंबाखूची चंची (पान, तंबाखू व सुपारी ठेवण्याची छोटीशी पिशवी, जिचे तोंड दोन्ही बाजूने दोरा ओढून बंद करता येते. अशा पिशवीला चंची म्हणतात) काढली. चिमूटभर तंबाखू काढून ते मळू लागले. इतक्यात...

एक माणूस त्यांच्याजवळ आला व म्हणाला,

''थोडीशी तंबाखू देता का?''

जाधवांनी त्या माणसाला तंबाखू दिली. तंबाखू हातात घेऊन मळता मळता त्या माणसाने जाधवांना विचारले, ''कोठे जायचे आहे?''

जाधवांनी खिशातून पत्ता काढला व त्याला दाखवला व म्हणाले..''या पत्त्यावर माझा भाऊ रहातो. तेथे जायचे आहे!''

''अरेच्चा! मला पण तेथेच जायचे आहे. चला! मी तुम्हाला सोडतो.'' असे म्हणून त्या माणसाने टॅक्सी थांबवली.

दोघेही टॅक्सीत बसले. त्या माणसाने जाधवांना त्यांच्या भावाच्या घरी पोहोचवले. जाधवांना पाहून त्यांच्या भावाच्या घरातील लोकांना अतिशय आनंद झाला.

या माणसाने मला तुमच्या घरापर्यंत आणून पोहोचवले असे म्हणून जाधवांनी मागे वळून पाहिले. त्यांच्याबरोबर आलेला, त्यांच्या भावाच्या घरापर्यंत ज्या माणसाने जाधवांना पोहोचवले तो माणूस केव्हाच अदृश्य झाला होता.

ॐ

**आधी मन मुंडा । नंतर ब्रह्म धुंडा ।।**

**।। संत तुकाराम ।।**

# रक्षा कवच

**आं**ध्र प्रदेशातील यतितपोस्थला (यति तप स्थलः) येथील गुहेत श्रीस्वामीजी साधना करत होते. त्या काळामध्ये म्हणजे १९७०-७१ साली यतितपोस्थला या स्थानात जाण्यास फक्त पायवाट होती. तीन किलोमीटर चालत गेल्यावर पायवाटेनेच एका दरीत उतरायचे व नंतर दरीच्या बाजूला असणारा डोंगर अर्धा चढून गेल्यावर मोठी गुहा होती. या गुहेत श्रीस्वामीजींनी तपस्या करण्याचे ठरविले होते. त्यांनी सुमारे एक वर्षभर या गुहेत साधना केली. गुहेच्या आसपासचा पाच किलोमीटर प्रदेश अगदी निर्मनुष्य होता. काटेरी जंगल होते. पंधरा किलोमीटरवर नागार्जुनसागर हे एकच गाव पश्चिम दिशेला होते. पूर्व दिशेला माचरला वीस किलोमीटरवर होते. मधला सर्व प्रदेश निर्मनुष्य होता. आता हेच स्थान पर्यटन स्थळ झाले असून दरवर्षी शेकडो लोक या स्थानाला भेट देतात.

दरीमध्ये एक नदी वाहत असून त्या नदीला बाराही महिने भरपूर पाणी असते. या दरीमध्ये तीन मुख्य गुहा आहेत. पहिल्या गुहेमध्ये शेषशायी भगवान् महाविष्णूची मूर्ती असून या मूर्तीला श्रीरंग

नायक असे म्हणतात. दुसऱ्या गुहेमध्ये देवीची मूर्ती असून या देवीला मधुमती देवी असे म्हणतात. पुढे अर्धा डोंगर पायवाटेने चढून गेल्यानंतर एक मोठी गुहा आहे. या गुहेत एकमुखी दत्ताची मूर्ती आहे. दत्तमूर्तीच्या हृदयस्थानी मधुमती देवीची मूर्ती आहे. दरीची जेथे सुरुवात होते तेथे एक मोठा धबधबा आहे. सुमारे दीडशे फूट उंचीवरून खाली दरीत पाणी कोसळत असते. जेथे पाणी कोसळते, तेथे एक मोठा डोह असून या डोहात अनेक मगरी आहेत. दरीमध्येही अधून-मधून मगरी फिरत असतात. डोहाच्या एका बाजूला घनदाट काटेरी वेलींचे जंगल असून या जंगलात एक गुहा आहे. या गुहेमध्ये चौंडेश्वरी देवीचे स्थान आहे.

श्रीस्वामीजी श्रीदत्ताच्या गुहेमध्ये साधना, तपस्या करत असत. देवी चौंडेश्वरी त्यांची काळजी घेत असे.

कोणीतरी शर्ट-पॅन्ट घालणारा साधू गुहेत साधना करत आहे. हे दूरदूरच्या लोकांना कळल्यानंतर श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी लोक येऊ लागले. जो दर्शनासाठी येत असे त्याला चांगले अनुभव येत असत, त्याच्या मनोकामना पूर्ण होत असत.

नागार्जुनसागर येथील एका इंजिनिअरने श्रीदत्त गुहेकडे जाणारा रस्ता पायऱ्यांनी बांधून काढला. या इंजिनिअरचे नांव कुप्पा असे होते.

अनेक लोक विविध प्रकारच्या समस्या घेऊन श्रीस्वामीजीं-कडे येत. त्या सर्वांच्या इच्छा पूर्ण होत. याशिवाय श्रीस्वामीजी कोणाकडून काहीही घेत नसत. पैसे, फळे, कपडे, वस्तू, खाद्य-पदार्थ यातील काहीही घेत नाहीत अशी श्रीस्वामीजींची ख्याती असल्याकारणाने त्या अरण्यामध्ये लोकांची वर्दळ वाढू लागली.

साहजिकच ज्या देवांच्या मुर्तींकडे शेकडो वर्षांत कोणी पाहिले नव्हते त्या मुर्तींकडेही लोक पाहू लागले. त्यांना नमस्कार करू लागले. तेथे फळ-फळावळ ठेवू लागले. साहजिकच पाच किलोमीटर दूर अंतरावरील पुजारी मंडळी तेथे येऊन पूजा करू लागली. अशा प्रकारे त्या स्थानाला तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले.

यतितपोस्थला स्थानापासून शंभर किलोमीटर दूर अंतरावर मिऱ्यालगुडा नांवाचे एक गाव होते. त्या गावातील सूर्यनारायण नांवाचा एक शिक्षक दर शनिवारी संध्याकाळी श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी येत असे व रविवारी संध्याकाळी परत जात असे.

त्याची समस्या अशी होती की, मिऱ्यालगुडा गावामध्ये त्याची दहा एकर जमीन होती. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या काही लोकांनी या जमिनीवर कब्जा केला होता. त्याने त्या लोकांवर कोर्टात केस केली. ते गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक त्याला नेहमी धमक्या देत असत. ही समस्या सोडवण्यासाठी तो दर शनिवारी श्रीस्वामीजींकडे येत असे व चोवीस तास सहवासात राहून परत जात असे. हा प्रकार जवळजवळ सहा-सात महिने चालू होता. कोर्टाने त्याच्या बाजूने निकाल दिला तरीही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी जागेवरील ताबा सोडला नाही. उलट ते जास्त धमक्या देऊ लागले. सूर्यनारायण दर शनिवारी श्रीस्वामीजींकडे येऊन आपले गाऱ्हाणे सांगू लागला.

नेहमीप्रमाणे सूर्यनारायण शनिवारी संध्याकाळी श्रीस्वामीजीं कडे आला. रविवारी संध्याकाळी चारच्या सुमारास जेव्हा तो जायला निघाला तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''आजचा दिवस राहा! आज जाऊ नकोस.'' सूर्यनारायणने खूप विरोध केला. म्हणाला, ''मी जर शाळेत गेलो नाही तर हेडमास्तर रागावेल. मी रजा घेतलेली नाही.

असे रजा न घेता दांडी मारणे बरोबर नाही,'' इत्यादी गोष्टी सांगू लागला. तरीही श्रीस्वामीजींनी त्याला खूप आग्रह करून ठेवून घेतले.

सोमवार उजाडताच सूर्यनारायणची कुरकुर सुरू झाली. ''मला जाऊ द्या! माझा आजचा दिवस फुकट गेला! माझे सहशिक्षक व शाळेतील स्टाफ मला नांवे ठेवतील. हेडमास्तर माझी हजामत करेल!'' अनेक प्रकारे तक्रारी करूनही श्रीस्वामीजींनी काहीही लक्ष दिले नाही. दुपारी बारा वाजल्यानंतरही श्रीस्वामीजी जायची परवानगी देत नाहीत हे बघून सूर्यनारायणला राग येऊ लागला. तो म्हणाला, ''माझा आजचा दिवस फुकट गेला. तुम्ही माझा उद्याचा दिवसही फुकट घालवणार आहात काय? तुम्ही मला परवानगी द्या!''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''मुळीच परवानगी देणार नाही. जोपर्यंत मी परवानगी देत नाही, तोपर्यंत येथून हलायचे नाही व हलल्यास पुन्हा माझ्याकडे यायचे नाही!''

श्रीस्वामीजींचे हे निर्वाणीचे उद्‌गार ऐकून सूर्यनारायणचा नाईलाज झाला. दहा एकर जमीन गुंडप्रवृत्तीच्या लोकांच्या हातून सोडवण्यासाठी त्याला श्रीस्वामीजींची अत्यंत आवश्यकता होती. अशा प्रकारे मंगळवार व बुधवार हे दोन्ही दिवस श्रीस्वामीजींनी त्याला ठेवून घेतले.

गुरुवारी सकाळी उठल्याबरोबर सूर्यनारायण श्रीस्वामीजींना म्हणाला, ''स्वामीजी मला एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये मी मिऱ्यालगुडा येथील एका रस्त्याने चालत होतो. माझ्या मागून एक जीप आली व माझ्याजवळ येऊन थांबली. तिच्यामधून लाठ्या-काठ्या घेतलेले ७-८ लोक खाली उतरले. त्यांनी मला काठ्यांनी खूप खूप मारले. मी जमिनीवर पडलो. लाठ्या-काठ्यांनी मारणे, शिव्या देणे,

लाथा घालणे हे चालूच होते. एक माणूस माझ्या पोटावर बसला. आपल्याजवळील सुऱ्याने त्याने माझ्यावर खूप वार केले. मी जखमी झालो, बेशुद्ध झालो. मला तसाच रस्त्यात टाकून ते लोक जीपमध्ये बसून निघून गेले. इतक्यात तुम्ही प्रकट झालात व म्हणालात, 'सूर्यनारायण काळजी करू नकोस, मी तुझ्याबरोबर आहे!' तुम्ही असे म्हणालात व मला जाग आली.''

सूर्यनारायणचे हे स्वप्न ऐकल्यानंतर श्रीस्वामीजी म्हणाले, ''तुझ्यावरील गंडांतर टळले आता तू घरी जायला हरकत नाही.''

आत्तापर्यंत घरी जाण्यास उत्सुक असणारा, श्रीस्वामीजी घरी जाऊ देत नाही, म्हणून श्रीस्वामीजींशी भांडणारा सूर्यनारायण आता घरी जाण्यास कचरू लागला, त्याला भीती वाटू लागली. श्रीस्वामीजी म्हणाले,

''सूर्यनारायण आता तू घरी जा! तुला काही अपाय होणार नाही!''

श्रीस्वामीजींनी असे आश्वासन दिल्यानंतर सूर्यनारायण श्रीस्वामीजींचा निरोप घेऊन निघाला. मिऱ्यालगुडा बसस्टॅण्डवर गाडीतून उतरताच त्याला एक ओळखीचा मनुष्य भेटला. तो त्याला म्हणाला, ''अरे सूर्यनारायण! तू आहेस तरी कोठे? रविवारपासून मी तुला सारखा शोधत आहे!'' सूर्यनारायण म्हणाला, ''झाले तरी काय?''

तेव्हा त्याचा मित्र म्हणाला, ''तुझ्या जागेवर ज्या लोकांनी कब्जा केला आहे ते लोक रविवारपासून दररोज संध्याकाळी तुझ्या येण्याजाण्याच्या मार्गावर जीप घेऊन फिरत होते. तुला ठार करण्याचा त्यांचा बेत होता. तुला मारून टाकल्यावर जमीन आपोआपच त्यांची झाली असती.''

श्रीस्वामीजींनी आपल्याला वाचवले हे सूर्यनारायणच्या लक्षात आले. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी तो शाळेत गेला. शाळेतील कोणीही त्याला काहीही बोलले नाही याचे त्याला खूप खूप आश्चर्य वाटले. हजेरीबुकमध्ये सही करण्यासाठी त्याने हजेरीबुक उघडले. सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार या चारही दिवसांच्या त्याच्या सह्या तेथे केलेल्या होत्या. शुक्रवारची सही त्याने केली. संध्याकाळपर्यंत शाळेमध्ये ड्यूटी करून तो संध्याकाळी यतितपोस्थला येथे परत आला. श्रीस्वामीजींना त्याने सर्व हकिकत सांगितली.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''काळजी करू नकोस! तुझे काम झाले आहे!''

त्यानंतर काही दिवसांनी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी जागेचा ताबा सूर्यनारायणला दिला. इतकेच नव्हे तर ते लोक गाव सोडून निघून गेले. सूर्यनारायणची जागा त्याला परत मिळाली. हजेरी बुकात चार दिवसांच्या सह्या कोणी केल्या हे गूढ मात्र सूर्यनारायणला कधीही उकलले नाही.

ॐ

**खांडावया घावो घाली । का लावणी जयाने केली ।**
**दोघा एकचि साऊली । वृक्ष दे जैसा ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# असेही भक्त

**ना**गार्जुनसागर येथे एका छोट्याशा झोपडीमध्ये श्रीस्वामीजी रहात होते. दूरदूरून लोक त्यांच्या दर्शनाला येत असत. श्रीस्वामीजी तेव्हा सिव्हील ड्रेसमध्ये रहात. बाह्यात्कारी साधूचे कुठलेही लक्षण त्यांच्याकडे नव्हते. तरीही त्यांचे ज्ञान व सामर्थ्य यांच्या चर्चा दूरदूरपर्यंत केल्या जात असत; त्यामुळे खूप दूरदूरून लोक त्यांच्या दर्शनाला येत असत.

गुंटूरहून एक मनुष्य श्रीस्वामीजींच्या दर्शनाला आला. श्रीस्वामीजींचे दर्शन घेऊन समाधानाने तो आपल्या गावाला परत गेला.

एक दिवस तो सायकलने कोठेतरी जात होता. वाटेत त्याला एक मित्र भेटला म्हणून सायकल थांबवून तो त्याच्याशी गप्पा मारत उभा राहिला. इतक्यात एक मुलगा त्याच्याजवळ आला व त्याला म्हणाला, ''तुम्हाला श्रीस्वामीजींनी बोलावले आहे!''

या भक्ताला थोडे आश्चर्य वाटले तरीपण तो त्या मुलाबरोबर एका घरात गेला. त्या घरामध्ये एक साधू बसलेले होते. या भक्ताला

पाहून ते म्हणाले, ''तुझे गुरु कसे आहेत?'' यावर या भक्ताने उत्तर दिले, ''मी अद्याप कोणाला गुरु केलेले नाही!''

''मग नागार्जुनसागरला जाऊन तू मंत्र घेतलास ते तुझे गुरु नव्हेत काय?'' या भक्ताच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तरीपण आपलेच घोडे पुढे दामटीत हा भक्त म्हणाला, ''ते साधू नाहीत! ते शर्ट-पॅन्ट घालतात. सिव्हिल ड्रेसमध्ये रहातात.'' यावर ते साधू म्हणाले, ''खऱ्या सिद्धपुरुषाला ड्रेस कोडची आवश्यकता नसते. तू मनोभावे त्यांची सेवा करत रहा. तुझे अनेक जन्मांचे कल्याण होईल!''

श्रीस्वामीजींकडे अनेक प्रकारची माणसे येत. या सर्वांना ते प्रेम देत, सर्वांची काळजी घेत. प्रत्येकाला चहा, नाश्ता, जेवण मिळाले की नाही तिकडे लक्ष देत व सर्वांचे कल्याण करत. तसेच त्यांची सर्व कामे करत. असे असून सुद्धा त्यांच्या भक्तांमध्ये अनेक तऱ्हेवाईक नमुने दिसून येत. यातील काही नमुने पुढे देत आहे.

मला असे काही भक्त माहीत आहेत की, ज्यांना श्रीस्वामीजींनी ३०-३५ वर्षे सर्व बाजूंनी सुखी केले आहे. त्यांच्या कल्याणासाठी अपार कष्ट केले आहेत. त्यांची सर्व कामे केली आहेत. तरीही ते अतिशय कृतघ्न आहेत.

गोड बोलून श्रीस्वामीजींना उल्लू बनवणे या व्यतिरिक्त त्यांना काहीही जमत नाही. अर्थात श्रीस्वामीजींची कोणाकडून कसलीही अपेक्षा नसते. परंतु श्रीस्वामीजींकडे येणाऱ्या माणसांच्या अंतःकरणात ईश्वराविषयी प्रेमभाव, भक्तिभाव जर जागृत झाला तर त्या माणसाचे परलोकीही कल्याण होईल असे मला वाटत राही. पण या जन्मी श्रीस्वामीजींसारखी व्यक्ती मिळणे ही ईश्वराची अगाध कृपा होय!

पण याचा जर दुरुपयोग झाला म्हणजे श्रीस्वामीजींशी कृतघ्नतेने वागले, ईश्वरभक्तिभाव कणभरपण अंतःकरणात जागृत झाला नाही तर त्याचे दुष्परिणामही तितकेच होतील याची मला कल्पना असल्याकारणाने लोकांनी असे वागू नये, असे मला उगाचच वाटत राही!

आता वरच्या भक्ताचेच उदाहरण पहा! एवढा मोठा अनुभव मिळूनही कुठलेही कारण नसतांना तो श्रीस्वामीजींपासून दूर निघून गेला. अशा लोकांची संख्या पन्नास हजाराहून जास्त आहे.

काही भक्त तर अगदी अशक्यप्राय वाटणारे एखादे काम व्हावे म्हणून श्रीस्वामीजींकडे येत. श्रीस्वामीजींची प्रार्थना करून निघून जात. पुन्हा कधीही ते श्रीस्वामीजींकडे येत नसत अथवा ईश्वराची भक्तीही करत नसत. त्यांचे काम मात्र झालेले असे. त्यांच्या इच्छा पूर्ण झालेल्या असत.

काही लोक तर असे असत की ते श्रीस्वामीजींना मुठीत ठेवण्यासाठी किंवा खिशात टाकण्यासाठी प्रयत्न करत असत.

श्रीस्वामीजी दिव्य ज्ञानी असल्याकारणाने त्यांना प्रत्येक माणसाचे मन कसे आहे हे अचूक कळत असे. पण ते नेहमी करुणेने वागत. एकदा ते मला म्हणाले,

''लोक माझ्याकडे येतात, मी त्यांची सर्व कामे करतो. त्यांना सुखी करतो. पण खरा भक्त बनण्यासाठी प्रयत्न करणे ही जबाबदारी त्यांची असते. ईश्वराने त्यांना संधी दिलेली असते. भक्तांनी सद्भावनेने वागून स्वतःतील दुर्गुण व दोष घालवायचे असतात व ईश्वराच्या जवळ जायचे असते. पण मी पाहतो आहे, लबाड मनुष्य अधिक

लबाड होत आहे, धूर्त अधिक धूर्त होत आहे, लोभी अधिक लोभी होत आहे. ज्यांना धनवान केले ते कंजूष होत आहेत. या सर्वांचे दुष्परिणाम त्यांनाच भोगावे लागतील. मी माझे कर्तव्य करत आहे.''

ॐ

**हे कर्म मी करेन । अथवा आदरिले सिद्धी नेईन ।**
**येणे संकल्पे जयाचे मन । विटाळेना ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# ऋषी

**भा**रतातील प्रत्येक कुटुंबाचे एक गोत्र असते. या गोत्रांचे मूळ ऋषी असतात. यांना गोत्र प्रवर्तक ऋषी असे म्हणतात. या ऋषींचे स्मरण प्रत्येक पूजेच्या वेळी केले जाते. याविषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी मी श्रीस्वामीजींना पुढीलप्रमाणे प्रश्न विचारले.

१) ऋषी म्हणजे काय?

२) गोत्र प्रवर्तक ऋषी म्हणजे काय?

श्रीस्वामीजी म्हणाले,

''मनाच्या अगाध शक्तींचा शोध घेणाऱ्या तसेच वातावरणातील असंख्य शक्तींचा शोध घेणाऱ्या तपस्वींना ऋषी असे म्हणतात.''

यावर मी म्हणाले, ''हा मुद्दा थोडा खुलासेवार सांगाल तर खूप बरे होईल.''

श्रीस्वामीजी म्हणाले,

''प्रथम मनोलय साध्य करावा लागतो. मनोलय साध्य

झाल्यानंतर मनाच्या एक एक शक्ती प्रकट होऊ लागतात. या शक्तींचा विकास करावा लागतो. प्रथम अंतर्ज्ञान प्रकट होते. अंतर्ज्ञानाने बऱ्याच गोष्टी आपोआप कळू लागतात. मी तुम्हाला एक उदाहरण सांगतो म्हणजे हा विषय तुमच्या लक्षात येईल.

एक साधू ध्यान करत बसले होते. मनाच्या एकाग्रतेने त्यांचे ध्यान चालू होते. मनाच्या एकाग्र अवस्थेमध्ये खूपवेळा स्मृति जागृत होतात. म्हणजे विसरलेले विषय आठवतात.

या साधूची चप्पल तुटली होती. चांभाराच्या दुकानात जाऊन ती चप्पल दुरुस्त करण्याचा या साधूला विसर पडला होता. मनाच्या एकाग्र अवस्थेत त्याला या गोष्टींची आठवण झाली. तो विषय त्याने झटकून टाकला व ध्यान पुढे चालू ठेवले.

ध्यान आटोपून जेव्हा त्या साधूने डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की त्यांच्या ओळखीचे दुसरे एक सत्पुरुष त्यांना भेटायला आलेले आहेत. साहजिकच या साधूने त्या सत्पुरुषांना विचारले,

''केव्हा आलात?''

''तुम्ही जेव्हा चांभाराच्या दुकानात गेला होता तेव्हा मी आलो.'' सत्पुरुषांनी उत्तर दिले.

सत्पुरुषांच्या या उत्तराने ध्यान करणारा साधू खजील झाला.

ध्यान करणाऱ्या साधूच्या मनात चांभाराच्या दुकानाचे उभे राहिलेले गुप्त चित्र या सिद्धपुरुषाने कसे ओळखले? याचे उत्तर असे की, ध्यान करणारा साधू मन एकाग्र करून ध्यान करत होता. तर त्याला दर्शन देण्यासाठी आलेले सिद्धपुरुष विश्वचैतन्याशी पूर्णतः एकरूप झालेले होते. त्यांचे मन वैश्विक मन झाले होते.

असाच एक अनुभव माझाही आहे. मी ज्या अरण्यात तपस्या, साधना करत होतो तेथे एक स्त्री केव्हातरी मला भेटायला येत असे.

मी त्या स्त्रीला तिच्या गावाजवळ राहणाऱ्या सत्पुरुषाच्या दर्शनाला जा! असे अनेकवेळा सांगितले पण ती कधीच गेली नाही. अनेकदा आग्रह केल्यानंतर ती म्हणाली, ''तुम्ही चिठ्ठी लिहून द्या, मग मी त्यांच्याकडे जाते. चिठ्ठीत लिहा, मी काकींना तुमच्याकडे पाठवत आहे. त्यांच्याशी भरपूर बोला!''

मी तिला एक नारळ दिला व सांगितले, ''हा त्यांना दे ! यात मी माझी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. ती ते वाचतील! व तुलाही कळेल एका सत्पुरुषाचे दुसऱ्या सत्पुरुषाबरोबर कसे कनेक्शन असते.''

चमत्कार पाहण्यासाठी म्हणून ती स्त्री त्या सत्पुरुषांकडे गेली. त्यांच्यासमोर खूप माणसे बसलेली होती. मी पाठवलेल्या स्त्रीला पाहताच त्यांनी सर्वांना निघून जायला सांगितले व या स्त्रीबरोबर अनेक तास बोलत राहिले.

वैश्विक मनाशी तादात्म्यता पावल्यानंतर असे खूप अनुभव येत असतात.

मनाच्या शक्ती, वायुतील शक्ती, सूर्यकिरणातील शक्ती अशा विविध शक्तींवरती संशोधन करणाऱ्या महायोग्यांना ऋषी म्हटले जाते. संशोधनाची प्रवृत्ती म्हणजे पूर्वजन्मातील ऋषी असल्याचा पुरावा असतो. ऋषी हजारो वर्षे तपस्या करतात व विविध प्रकारचे संशोधन करतात. अन्नपाण्याशिवाय हजारो वर्षे कसे जिवंत रहायचे याची कला त्यांना साध्य झालेली असते. हाडामांसाच्या देहाला वायुमय कसे बनवायचे याचेही त्यांना ज्ञान असते. सूर्यकिरणांपासून विविध जड पदार्थ कसे बनवायचे याचेही त्यांना ज्ञान असते.

मी विचारले, ''या विविध प्रकारच्या शक्ती प्राप्त करण्यासाठी ऋषींना मंत्रांचे जप करावे लागतात का?''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''जोपर्यंत साधक अवस्था आहे तोपर्यंतच फक्त मंत्रांचे जप करावे लागतात. सिद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर कुठल्याही मंत्रांचे जप करावे लागत नाहीत.''

याशिवाय मराठी भाषेचा मनुष्य मराठी भाषेतील मंत्रांचा जप करेल. तामिळ मनुष्य तामिळ भाषेतील मंत्रांचा जप करेल. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की मंत्रशक्ती या तुमच्या मनातील इच्छाशक्तीवर आधारित असतात.

वैश्विकशक्ती प्राप्त करण्यासाठी कुठल्याही मंत्राचा जप करावा लागत नाही. या शक्ती विश्वव्यापी असतात. आपल्या मनाचा वैश्विक मनाशी लय केला असता या शक्ती प्राप्त होतात. एकदा का विश्व चैतन्याशी तादात्म्यता प्राप्त झाली की बसल्याजागी ''विश्व समाचार'' प्राप्त होऊ लागतात. परंतु हीसुद्धा एक प्रकारची माया असून येथे न फसता खरे साधक पुढे पुढे जात रहातात व विश्वरूप होऊन रहातात. असे साधक चैतन्यमय होतात. त्यांचा देहही चैतन्यमय होतो. देह चैतन्यमय झाल्यानंतर ते तपस्या करू लागतात. अगदी सृष्टीच्या अंतापर्यंत हे लोक तपस्या करतात. यांना ऋषी म्हटले जाते. यांच्या कृपेने जगामध्ये संशोधक प्रवृत्तीची वाढ होते व विविध प्रकारचे संशोधन होते. पृथ्वीतलावर येणारे विज्ञान हे ऋषीलोकातूनच खाली येते. कारण ऋषी म्हणजेच संशोधक किंवा शास्त्रज्ञ.

गोत्र प्रवर्तक ऋषी म्हणजे काय? हा तुमचा दुसरा प्रश्न.

याचे उत्तर अगदी सोपे आहे. एक उदाहरण देऊन सांगतो.

''आमच्या घराण्याचे गोत्र अत्रि आहे. अत्रि ऋषींच्या पत्नीचे

नांव अनसूया! या उभयतांमुळे जो वंश निर्माण झाला त्या वंशाची लाखो कुटुंबे विश्वभर पसरलेली आहेत. त्या सर्वांचे मूळ पुरुष अत्रि! म्हणजे अत्रि हा आमच्या वंशाचा गोत्र प्रवर्तक ऋषी!

गोत्र या शब्दाचा अर्थ सूत्र (लिंक्) असा आहे.

आपले गोत्र अत्रि आहे असे आमच्या वडिलांनी आम्हाला सांगितले, आमच्या वडिलांना त्यांच्या वडिलांनी सांगितले, व आम्ही आमच्या मुलांना सांगतो.

अशा प्रकारे पिढ्या दर पिढ्या आपले मूळ ऋषी कोण याची माहिती सांगितली जाते. हजारो वर्षांपासून ही परंपरा सुरू असून पुढे हजारो वर्षे ही परंपरा कायम राहील.''

ॐ

**तो देहसंगे तरी असे । परी चैतन्यासारिखा दिसे ।**
**पाहतां परब्रह्माचेनि कसें । चोखाळु भला ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

**महाशून्याचिया डोही । जेथ गगनासीही ठाव नाही ।**
**तेथ तागा लागेल कायी । बोलाचा इया ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

ध्यानमार्गाने परमशून्यात प्रवेश केल्यानंतर लक्षात येते की, ज्या परब्रह्माशी मी तदाकार झालो आहे त्याला आकाश म्हणणे, शून्य म्हणणे, परब्रह्म म्हणणे हेही चूक आहे. याचे वर्णन मी शब्दात कसे करू! असे श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

# ईश्वर व सैतान

**श्री**स्वामीजी एकदा आमच्या घरी आले होते. सहज बोलता बोलता ते म्हणाले,

‘‘काही धर्मग्रंथांमध्ये ईश्वर व सैतान यांची बरीच वर्णने केलेली आहेत. हिन्दू धर्म ग्रंथांमध्ये देव व दानव यांची वर्णने आहेत. गीतेमध्येसुद्धा दैवासुरसंपत्ती विभाग योग नांवाचा एक अध्याय आहे. या सर्व धर्मग्रंथांची भाषांतरे जगातील अनेक भाषांमध्ये झालेली आहेत व हे धर्मग्रंथ दुर्बोध आहेत. आम्ही तुम्हाला समजावून सांगतो अशी जाहिरात करून व्याख्याने, प्रवचने व कीर्तने करणाऱ्या लोकांची संख्याही दहा लाखाहून जास्त असेल. यापैकी कोणालाही ‘ईश्वर व सैतान’ ‘देव व दानव’ म्हणजे काय? याची काही कल्पना नसते. कारण या गोष्टी कल्पनेपलीकडील आहेत. त्या सिद्धपुरुषांच्या कृपेनेच कळतात. या विषयी आज मी तुम्हाला सांगतो.’’

श्रीस्वामीजींसमोर जेव्हा बसण्याचा योग येत असे, तेव्हा मी माझी लिखाणाची वही व पेन घेऊनच बसत असे. त्यामुळे त्यांनी सांगायला सुरुवात करताच मी तितक्याच वेगाने लिहायला सुरुवात

करत असे. याविषयी एकदा श्रीस्वामीजी मला म्हणाले होते की, ‘‘ज्ञानाचा प्रकाश आकाशातून येतो. मेंदूमध्ये एक स्पार्क दिसतो. या स्पार्क मधून एक हजार पाने लिहून पूर्ण होतील इतके ज्ञान प्राप्त होते. हे ज्ञान शब्दामध्ये बसवून सोप्या भाषेमध्ये मी तुम्हाला सांगत असतो; हे जरी खरे असले तरी आध्यात्मिक उंची प्राप्त झाल्याशिवाय हे ज्ञान तथाकथित पंडितालाही पचणार नाही. त्याच्यातील अहंकार यावर विश्वास ठेवणार नाही. या सर्व गोष्टींची मला कल्पना आहे. तरीसुद्धा ईश्वरी आज्ञा म्हणून मी हे कार्य करीत आहे.’’

हे सर्व जग शून्यातून निर्माण झालेले आहे. या शून्यातून दोन महाशक्ती निर्माण झाल्या. प्रकाश व अंधार. पॉझिटीव्ह एनर्जी व निगेटीव्ह फोर्सेस! दैवी प्रकाशातील किरणांना किंवा दैवी लहरींना आपण ईश्वर, देव-देवता असे म्हणतो व काळ्याकुट्ट अंधारातील आत्म्यांना शक्ती, सैतान, राक्षस, भूत, पिशाच्च असे म्हणतो.

ईश्वराचे, देव-देवतांचे अस्तित्व आपल्या शरीरामध्ये सद्‌गुणांच्या रूपाने असते. जितके सद्‌गुण जास्त तितक्या पटीने देव-देवता आपल्या देहात प्रकट होत असतात. किंबहुना सद्‌गुण म्हणजेच देव-देवता! सद्‌गुणांच्या आचरणाने आपण आध्यात्मात प्रगती करतो.

ईर्षा, द्वेष, मत्सर, स्वार्थ, क्रोध, अहंकार, तिरस्कार करण्याची वृत्ती, कपट, कारस्थान या सर्व गोष्टी अंधाराचे प्रतिनिधित्व करतात. राक्षसी शक्तींचे प्रतिनिधित्व करतात. किंबहुना दुर्गुण म्हणजे पिशाच्च शक्ती. अहंकार म्हणजे राक्षस. दुर्गुणांच्या रूपाने पिशाच्च शक्ती आपल्या शरीरात निवास करू लागतात. या शक्तींना निगेटीव्ह फोर्सेस किंवा सैतानी शक्ती असे म्हणतात. अशा दुर्गुणांच्या किंवा

दुःष्प्रवृत्तींच्या आचरणाने मनुष्याचा आत्मा सैतानी शक्तीच्या आधीन होतो व मृत्यूनंतर कृमी किटकादी असंख्य योनीतून फिरत रहातो म्हणूनच असे म्हटले जाते की मनुष्य जन्म म्हणजे परमेश्वराच्या, प्रकाशाच्या, महाशून्याच्या प्रान्ताचे प्रवेशद्वार! येथे घोटाळत राहू नका. जास्तीत जास्त ईश्वरभक्ती करून आध्यात्मात प्रगती करा. सद्‌गुण प्राप्त करून ईश्वराच्या जवळ जा! प्रकाशाच्या जवळ जा! महाशून्याच्या जवळ जा! कारण मनुष्य जन्म ही अतिशय दुर्मिळ गोष्ट आहे. ज्याप्रमाणे कपिलाषष्ठी साठ वर्षांनी एकदाच येते, त्याप्रमाणे मनुष्य जन्म लाखो वर्षातून एकदा मिळतो. ''पुन्हा पुन्हा मनुष्य जन्म मिळावा, आध्यात्मात प्रगती करण्याची संधी आत्म्याला पुन्हा पुन्हा मिळावी यासाठी साधूसंतांनी नामस्मरण, जप, सात्त्विकतेचे आचरण, सद्‌गुणांचा अभ्यास, दान-धर्म, परोपकार इत्यादी गोष्टी सांगितल्या आहेत. याचे थोडेफार आचरण केल्यानंतर ईश्वराची कृपा प्राप्त होते. पुन्हा मनुष्य जन्म मिळतो व आध्यात्मात प्रगती करण्याची संधी मिळते. हाही जन्म संपल्यानंतर पुढे अनेकवेळा मनुष्य जन्म मिळतो. आध्यात्मात प्रगती होतच रहाते. अनेक जन्म ईश्वरभक्ती, दान-धर्म, परोपकार इत्यादी सद्‌गुणांचे आचरण केल्यानंतर मनुष्याच्या अंगी योग साधना करण्याची पात्रता येते व तो ध्यानमार्गात प्रगती करू लागतो. निर्गुण, निराकार अशा परमेश्वराचे तो ध्यान करू लागतो. हळूहळू त्याच्या लक्षात येते की, ईश्वर म्हणजे महाशून्य! या महाशून्याशी तो एकरूप होतो. येथे योगी शून्य होतो. त्याला आकार रहात नाही. हाडामासांचा देह रहात नाही. परंतु तो कुठल्याही क्षणी एक शतांश सेकंदात मनुष्य रूप धारण करू शकतो. असा योगी लायटरच्या स्पार्कप्रमाणे दिसतो.''

ईश्वरभक्ती व सद्‌गुणांचे आचरण करून अशाप्रकारची शून्यावस्था प्राप्त करणे कोणासही शक्य आहे. यासाठी कठोर प्रयत्न करणे आवश्यक असते. अर्थात एका जन्मात हे साध्य होत नाही. अशा प्रकारे ईश्वरभक्तीने व सद्‌गुणांच्या आचरणाने मनुष्यही शून्य होतो, ईश्वरस्वरूप होतो. निर्गुण, निराकार होतो.

जेव्हा मनुष्य ईश्वरभक्ती करू लागतो, तेव्हा वातावरणातील देव-देवता तसेच महान आत्मे त्याला मदत करू लागतात. त्याच्या इच्छा पूर्ण होऊ लागतात. त्याच्या मार्गातील अडचणी दूर होऊ लागतात. परंतु येथे ईश्वराशी प्रामाणिकपणे वागून सतत सेवा करत राहून सद्‌गुण वाढवावे लागतात. असे केले तरच प्रगती होत रहाते.

काही तथाकथित भक्त थोडासा स्वार्थ साधला की लगेच ईश्वराला विसरतात. दान-धर्म, परोपकार विसरतात. अशा लोकांना खूप मोठ्या शिक्षा होतात म्हणून ईश्वराशी प्रामाणिक रहाणे अतिशय आवश्यक असते.

या अध्यायाचे नांव ईश्वर व सैतान असे आहे. ईश्वराची भक्ती करून आपण ईश्वरापर्यंत पोहोचतो, निर्गुण-निराकार होतो. हे आपण येथे पाहिले.

सैतानाची कास धरणाऱ्या लोकांचे काय होते, ईर्षा, द्वेष व मत्सर करणाऱ्यांचे काय होते याविषयी आपण चर्चा न करणे चांगले. अशा लोकांचे आत्मे त्यांच्या कर्माप्रमाणे विविध योनींमध्ये अनंतकाल भटकत रहातात. त्यांना परत मनुष्य जन्म मिळत नाही. हे समजून, हे लक्षात घेऊन, माणसाने गुन्हेगारी कृत्ये करणे सोडली तरी खूप चांगले होईल.

**श्री दुर्गा :-** योगी देहासहित निराकार होतात, त्यांचे देह

वायूचे असतात, त्यात पृथ्वीतत्त्व, आपतत्त्व नसते. असे आपण म्हटले आहे. ही अवस्था प्राप्त होण्यासाठी कुठल्या मंत्राचा जप करतात, कुठली साधना करतात?

**श्री दत्त** :- या साधना अतिशय गुप्त असतात. त्या उघड करता येत नाहीत. मी तुम्हाला फक्त इतकेच सांगतो की, ईश्वर हा शब्दांच्या पलीकडील आहे. त्यामुळे तेथे कुठलाही शब्द चालत नाही, कुठलाही मंत्र चालत नाही, जप चालत नाही, ॐ ही चालत नाही, या सर्व साधनांच्या पलीकडे जावे लागते. निर्विकल्प समाधी प्राप्त झाल्यानंतरच पुढील मार्ग सांगितला जातो. अशा साधनांमध्ये कुठल्याही प्रकारचा शब्दांचा उच्चार नसतो. तेज, वायू व आकाश या तत्त्वांवर आधारीत साधना असतात. अशारितीने योगी सूक्ष्म होऊ लागतो. सूक्ष्म झाल्यानंतर अतिसूक्ष्म व्हावे लागते. मग शून्यातील साधना सुरू होतात. येथे योगी शून्य होतो. मग महाशून्यातील साधना सुरू होतात. अशा प्रकारे हा अतिशय गूढ मार्ग आहे. अशा योग्यांना संसारी जगामध्ये जर रहावे लागत असेल तर एक मायावी देह निर्माण करून तो या व्यवहारी जगात ठेवून देतात व मूळ निर्गुण निराकार अशा देहाने निराकाराच्या साधना करत राहतात. मायावी देह ईश्वरीकार्य करतो किंवा त्याचे जे असेल ते प्रारब्ध तो भोगत रहातो. आजही असे योगी भारतात गुप्तरितीने तपस्या करत आहेत.

ॐ

# || राधा ||

**वारीयाने कुंडल हाले ।**
**डोळे मोडीत राधा चाले ।।**

**।। संत एकनाथ ।।**

एकनाथांच्या प्रसिद्ध भारुडातील ही ओळ घराघरातून अतिशय चवीने म्हटली जाते. पण अर्थाचा कोणीच विचार करत नाही.

'**वारीयाने**' म्हणजे सोऽहम् साधनेने ! अर्थात वारा म्हणजे श्वास! श्वासाच्या वरून खाली वाहणाऱ्या अखंड धारांना कवीने राधा म्हटले आहे. **राधा म्हणजे धारा**. राधा म्हणजे कुंडलिनी शक्ती!

कुंडल हाले म्हणजे निद्रिस्त कुंडलिनी जागृत होते. श्वासावर लक्ष केन्द्रित केल्याने म्हणजेच सोऽहम् साधनेने कुंडलिनी शक्ती जागृत होते व आळोखे पिळोखे देत नागमोडी वळणे घेत सहस्त्रारचक्राकडे जाते. असा वरील भारुडातील ओवीचा अर्थ आहे.

ॐ

# श्रीदत्त प्रसंग

**अ**रण्यामध्ये श्रीस्वामीजींकडे जाण्याचा आनंदच काही वेगळा होता. या आनंदाच्या भरात आठ मैल म्हणजे तेरा किलोमीटर आम्ही चालत जात असू! तेही डोक्यावर ओझे घेऊन. आमच्या सामानाच्या बॅगा उचलून नेण्यास कोणी माणूसही मिळत नसे. बऱ्याचवेळा अल्पा, मेघलही माझ्याबरोबर असायच्या. कधी कधी आम्ही चार-पाच माणसांचा ग्रुप करून जात असू. तो आनंद अवर्णनीय असा होता.

श्रीस्वामीजी खूप दयाळू व प्रेमळ असल्यामुळे आपल्याकडे येणाऱ्या गोरगरिबांना ते नेहमी जवळील सर्व वस्तू वाटून टाकत असत. पैसे, कपडे, अशा सर्व वस्तू ते वाटून टाकत.

एकदा श्रीस्वामीजी मला म्हणाले,

''मी दत्त आहे. तुम्ही महालक्ष्मी आहात. माझी झोळी भरत राहा. मला गोरगरिबांना वस्तू व पैसे वाटण्यात खूप आनंद होतो.'' मी 'हो' म्हणाले! आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी जितके देत राहिले त्याच्या हजारो पटीने मला मिळत राहिले. कोणालाही सांगून खरे वाटणार नाही, इतके अद्‌भुत कार्य त्यांनी माझ्या हातून करवून घेतले.

देणारे तेच असतात, कार्य करणारे तेच असतात, आपल्याला **निमित्त** करीत असतात. परंतु **निमित्त** होण्यासाठी किंवा सिद्धपुरुषांचे माध्यम होण्यासाठी आपल्या अंगीसुद्धा काही सद्‌गुण असावे लागतात. काही सत्प्रवृत्ती असाव्या लागतात. खूप लोक मला विचारतात की आम्ही काय केले असता ईश्वराची प्रसन्नता आम्हाला प्राप्त होईल किंवा एखाद्या सिद्धपुरुषाची कृपा आम्हाला प्राप्त होईल. अशा सर्व सद्‌भक्तांना माझे असे सांगणे आहे की, पुढील सूचनांप्रमाणे जर तुम्हाला वागणे जमले तर परमेश्वराची, देव-देवतांची, सिद्धपुरुषांची कृपा नक्कीच प्राप्त होईल. ते तुम्हाला आपले माध्यम बनवतील व तुमचे सर्व जीवन प्रकाशमय होईल. तुम्ही सदैव प्रकाशातच रहाल. कुठल्याही गोष्टीची कमतरता तुम्हाला पडणार नाही. ईश्वर तुम्हाला भरभरून देईल. यासाठी पुढील सद्‌गुण आचरणात आणण्याचा प्रयत्न करा!

१) आतून बाहेरून मन अगदी सरळ असावे लागते.

२) आत एक व बाहेर एक असे किंचितही असता कामा नये. कारण त्यांना सर्वकाही कळत असते. त्यांच्यापासून काहीही लपून रहात नाही.

३) सद्‌गुरुला खूष करण्यासाठी नाटके करणे; प्रलोभने दाखविणे असे प्रकार करू नयेत कारण सत्पुरुषाच्या आसपास अनेक देवता असतात व वेळोवेळी ते त्यांना सर्व गोष्टींची माहिती पुरवत असतात.

४) पराकोटीची **नम्रता** असावी लागते. परंतु ती **नम्रता** जन्मसिद्ध असावी लागते. नम्रतेचा आणलेला खोटा आव हा सत्पुरुषांच्या तात्काळ लक्षात येतो.

५) तुमच्या सूक्ष्मदेहामध्ये जे बदल घडतात, ते त्यांना दिसत

असतात. तुमचा ऑरा त्यांना दिसत असतो. तुमच्च्या पाठीमागे असणाऱ्या चांगल्या-वाईट शक्ती त्यांना दिसत असतात.

६) सत्पुरुषाविषयी मनात शंका असू नये. मनात शंका असेल तर त्या सत्पुरुषाकडे जाणे सरळ बंद करावे व या सत्पुरुषाचा मार्ग मी सोडला आहे असे खुशाल जाहीर करावे. याने काहीही नुकसान होत नाही. याउलट मनात विश्वास नाही, श्रद्धा नाही, खूप शंका आहेत, पण काय करणार आम्ही फक्त हजेरी लावण्यापुरते सत्पुरुषांकडे जातो. असे वागणाऱ्या लोकांचे खूप नुकसान होण्याची शक्यता असते. कारण वातावरणातील देव-देवतांना अशी माणसे आवडत नाहीत.

७) आपण जी काही सेवा अथवा भक्ती करतो त्यातून जे पुण्य तयार होते. त्या पुण्याईचे चार वाटे होतात.

१) पूर्वजन्मातील प्रारब्ध शुद्ध होण्यास पुण्याई खर्च होते.

२) पूर्वजांचा उद्धार होण्यात पुण्याई खर्च होते.

३) या जन्मामध्ये आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण होण्यामध्ये पुण्याई खर्च होते.

४) आपल्या पुढील जन्मात उपयोगी यावी म्हणून थोडीफार पुण्याई सुरक्षित ठेवली जाते.

सर्वसाधारणपणे पुण्याईचे असे चार वाटे होतात म्हणून प्रतिक्षण आपली पुण्याई कशी वाढत राहील याचा विचार करून वागावे लागते.

अशा प्रकारे....

**जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी ।**

**तेणे पथ्ये सांभाळावी ।।**

याचे भान ठेवून वागल्यास निश्चित प्रगती होते. चांगले अनुभव येतात व ईश्वराचे माध्यम होण्याची पात्रता अंगी येते.

हा अध्याय लिहिताना श्रीस्वामीजींच्या काही गोष्टी वाचकांना सांगण्याचे ठरविले होते. परंतु थोडे विषयांतर झाले, तरी मला माहीत असलेल्या असंख्य गोष्टींपैकी काही गोष्टी मी तुम्हाला सांगते.

ॐ

**हे असो विश्व पाही ।**
**जयासि आपणा वाचूनि नाही ।**
**आता कवण ते कर्म कायी ।**
**बाधी तयाते ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# निमित्त

अर्जुनाला निमित्त करून परमेश्वराने जगाला गीता सांगितली, ब्रह्मज्ञानाचा मार्ग सांगितला. श्रीज्ञानेश्वरांना निमित्त करून ब्रह्मज्ञान आणखी सविस्तररित्या सांगितले. तेच ब्रह्मज्ञान किंवा आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग परमेश्वराने श्रीस्वामी दत्तावधूतांना निमित्त करून तुम्हा आम्हाला उपलब्ध करून दिला. मला निमित्त करून ते सर्व साहित्य प्रकाशित करून घेतले. असे हे परमेश्वराचे कार्य परमेश्वरच करत असतो व कोणालातरी निमित्त करत असतो. प्रकाशनाव्यतिरिक्त माझ्या हातून इतरही अनेक कार्ये करून घेतली. अशी काही अद्‌भुत कार्ये माझ्या हातून घडतील असे मला स्वप्नातही कधी वाटले नव्हते. ईश्वराच्या हातचे बाहुले होण्यामध्ये अवर्णनीय आनंद असतो. यालाच निमित्त होणे असे म्हणतात. निमित्त होण्यासाठी कसे वागावे लागते, किती सद्‌गुण असावे लागतात, या विषयी मी तुम्हाला यापूर्वीच सांगितले आहे. प्रकाशन या ईश्वरी कार्याची सुरुवात कशी झाली त्या प्रसंगाचे वर्णन मी आता थोडक्यात तुम्हाला सांगणार आहे.

श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ अरण्यात गेले असता श्रीस्वामीजी

मला म्हणाले, ''ताई! तुम्हाला माहीत आहेच की माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचे ईश्वराच्या कृपेने खूप चांगले होते, त्याला चांगला मार्ग मिळतो. हे जरी खरे असले तरी त्या परम दयाघन ईश्वराची अशी इच्छा आहे की कोणालाही माझ्याकडे येण्याचे कष्ट करण्याची आवश्यकता पडू नये. तपश्चर्येने मला प्राप्त झालेले दैवी ज्ञान व दैवी शक्ती लोकांच्या घरापर्यंत पोहोचावी, त्याने लोकांच्या आधी-व्याधी दूर होतील, समस्या दूर होतील, कष्ट दूर होतील, लोक सुखी होतील, ज्ञानी होतील व लोकांना आध्यात्माचा मार्ग मिळेल म्हणून ईश्वराने मला पोथ्या व पुस्तके लिहिण्याची आज्ञा केलेली आहे. हे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचे ईश्वरीकार्य तुम्हाला करायचे आहे.''

श्रीस्वामीजींनी असे सांगितल्यानंतर मी आनंदाने **'हो'** म्हणाले! आमचे प्रकाशन कार्य सुरू झाले. परमेश्वराच्या कृपेने याला इतका काही प्रतिसाद मिळाला की **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** या पोथीच्या वीस हजार कॉपीज तीन-चार महिन्यात संपून गेल्या. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** वाचनाने आम्हाला अतिशय दिव्य अनुभव आले असे सांगणारी हजारो पत्रे आम्हाला आली.

**श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत** या पोथीच्या वाचनाने पूर्वजांचा उद्धार होतो. हे आम्हाला प्रथम अमेरिकेहून सुजाता माळवे हिने कळविले, त्यानंतर तशाप्रकारची शेकडो पत्रे आम्हाला ठिकठिकाणाहून आली.

**श्रीस्वामी समर्थ सप्तशती, श्रीदुर्गा सप्तशती** व **श्रीदुर्गा त्रिशती** या पोथ्यांनीही दिव्य चमत्कार घडविले. ग्रह दोष, वास्तू दोष निघून जातात, पिशाच्च बाधा दूर होतात, करण्या दूर होतात, घरातील वातावरण शुद्ध होते असे सांगणारी हजारो पत्रे आमच्याकडे

आजही उपलब्ध आहेत. यातील निवडक पत्रांवर आधारित '**ईश्वरभक्तीचे अनुभव**' नांवाचे एक पुस्तक मी प्रकाशितही केले आहे. महाराष्ट्रातील लाखों घरांमध्ये आज पोथ्या श्रद्धेने व नित्यनेमाने वाचल्या जात आहेत. लोकांना ज्ञान व्हावे, ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळावा, आध्यात्मात प्रगती व्हावी म्हणून श्रीस्वामीजींनी काही पुस्तके लिहिली. विशेष म्हणजे ही पुस्तके वाचल्यानंतरसुद्धा लोकांना दिव्य अनुभव आले. गद्य पुस्तके वाचल्याने लोकांना दिव्य अनुभव येतात. त्यांच्या समस्यांचे निवारण होते. हा चमत्कार आमच्यासाठीसुद्धा अतिशय नाविन्यपूर्ण असा होता. पण आम्ही फक्त निमित्त होतो. **कर्ता करविता ईश्वर** त्याचे कार्य करत होता व आजही तो कार्य करत आहे.

**र**त्नागिरी येथील ओंकार आचरेकरला त्याच्या एका मित्राने पावसकर नांवाच्या एका कुटुंबाविषयी माहिती सांगितली. ते खूप त्रासात व कष्टात आहेत असे तो म्हणाला. ओंकार याने कसलाही विचार न करता **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते** ७ आपल्या मित्राकडे दिले व पावसकरांना द्यायला सांगितले. त्याप्रमाणे ओंकारच्या मित्राने ती पुस्तके पावसकरांना दिली.

वस्तुतः अडचणीतून मार्ग मिळण्यासाठी, त्रास व कष्ट दूर होण्यासाठी लोक श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या वाचतात, पोथ्यांची अनेक पारायणे करतात. काही लोक तर दिवसातून पाच-पाच वेळा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचतात किंवा **श्रीदुर्गा त्रिशती** वाचतात. **श्रीस्वामी समर्थ सप्तशतीची** अनेक पारायणे करतात. **श्रीदत्त स्तोत्र व श्रीदुर्गा स्तोत्र** यांचे दररोज शंभर ते दोनशे पाठही करतात.

ओंकारला या उपासना मार्गाची काहीच कल्पना नसल्याने त्याने त्याच्या जवळची पुस्तके पावसकर यांना पाठवून दिली. पण

म्हणतात ना, ईश्वराची करणी अगाध असते! चार-पाच दिवसांनी पावसकरांचा फोन ओंकारला आला व ते म्हणाले,

''आचरेकर तुम्ही कोण? हे आम्हाला माहीत नाही! आम्ही तुम्हाला ओळखत नाही. पण तुम्ही आम्हाला अक्षरशः संकटातून सोडवले. तुमच्या मित्राने आम्हाला पुस्तके दिली. त्या दिवसापासून आम्हाला अतिशय दिव्य अनुभव येत आहेत. आम्ही ही पुस्तके वस्त्रात गुंडाळून पूजेत ठेवली आहेत व रोज संध्याकाळी एकत्र बसून आम्ही त्या पुस्तकांचे वाचन करतो. आमच्या जीवनात प्रकाश पडला आहे. आमची सर्व संकटे दूर झाली आहेत तुम्हाला भेटण्याची खूप इच्छा आहे.'' यावर ओंकारने उत्तर दिले, ''आपण जरूर भेटू!''

पावसकरांबरोबरचे बोलणे संपल्याबरोबर ओंकारने ताबडतोब मला फोन केला व पावसकरांची सर्व हकिकत मला सांगून पुढे मी त्यांना काय मार्गदर्शन करू असे विचारले. मी म्हणाले,

''आपल्या सर्व पोथ्या त्यांना दे व नित्यनेमाने पोथ्या वाचायला सांग. ईश्वराच्या कृपेने त्यांचे सर्व कष्ट दूर होतील.'' ओंकारने मला फोन केला. तो दिवस होता १० मे २०१४.

श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके मानवी जीवन उजळून टाकतात असे अद्‌भुत सामर्थ्य श्रीस्वामीजींनी पोथ्या व पुस्तकांमध्ये ठेवलेले आहे. हेतू एकच....

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**

**जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

अशा प्रकारे आम्हाला पोथ्या व पुस्तकांचे हजारोंनी अनुभव ऐकायला मिळत असतात. पुस्तकातून प्रकाश बाहेर पडत आहे असे पाहिल्याचेही एका व्यक्तीने सांगितले. अमेरिकेतील सुजाता माळवेला पुस्तकातील अक्षरे गोल्डन दिसली होती. शिरीष मसुरकर याने एका साधक स्त्रीला श्रीस्वामीजींनी लिहिलेली पुस्तके दिली तेव्हा ती म्हणाली, या पुस्तकांमध्ये दिव्य स्पंदने आहेत. ही पुस्तके वाचणाऱ्याला नक्कीच दिव्य अनुभव येत असतील. स्मिता कदम हिला श्रीस्वामीजी आता पुस्तके लिहिणार आहेत, ही पुस्तके क्रांती घडवतील, सर्वत्र भक्तीचे वातावरण निर्माण करतील असे १९९० सालीच सांगितले गेले होते. या सर्व गोष्टींची मला अचानक आठवण झाली.

श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तकांमुळे लक्षावधी लोकांचे जीवन सुखी झाले आहे. यातील हजारो लोक आम्हाला अनुभव कळवत असतात. शेकडो लोक अनुभव लिहून आमच्या ऑफिसला पाठवत असतात. अशा शेकडो पत्रांपैकी एखादाच अनुभव आम्ही लिहित असलेल्या पुस्तकांमध्ये समाविष्ट करत असतो.

**झाडू संतांचे मार्ग । आडरानी पडले जग ।।**

तुकाराम महाराजांच्या या उक्तीप्रमाणे समाजाला सन्मार्ग दाखविण्याचे श्रीस्वामीजींचे कार्य गेली ५० वर्षे अव्याहतपणे चालू आहे. कोणाकडून काहीही न घेता व कुठल्याही प्रकारची प्रसिद्धी न करता हे कार्य चालू आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा व मध्यप्रदेश या राज्यातील व परदेशातील मराठी बांधव श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचून ईश्वराची कृपा प्राप्त करत आहेत. ज्यांना मराठी येत नाही, अशा लोकांसाठी संस्कृत भाषेतील श्रीदत्त स्तोत्रे, देवी स्तोत्रे दिली जातात व याचे पाठ करा असे सांगितले जाते व त्यांनाही दिव्य

अनुभव येतात. स्वतः श्रीस्वामीजी कोणालाही भेटत नाहीत परंतु श्रीस्वामीजींचे भक्त हे कार्य करत असतात. असे एक-दोन अनुभव येथे सांगितल्यास वावगे ठरणार नाही.

ॐ

जैसे समुद्री लवण न पडे ।
तंव वेगळे अल्प आवडे ।
मग होय सिंधूचि एवढे ।
मिळे तेव्हां ।।

।। ज्ञानेश्वरी ।।

# काही दिव्य अनुभव

## निद्रानाशातून मुक्ती

**पे**ण येथील विलास चिटणवीस यांना सुमारे १४ वर्षे निद्रानाशाचा रोग होता. रात्री ते जेव्हा झोपण्यासाठी अंथरुणावर पडत, तेव्हा त्यांच्या कानाशी कुठल्यातरी शक्तीच्या टाळ्यांच्या आवाजाने त्यांची झोप उडत असे व त्यांना रात्रभर जागे रहावे लागत असे. त्यांच्या बायकोची बहीण पार्ल्याला रहात असे. त्यांच्या शेजारी मुकुंद कुलकर्णी नांवाचे एक गृहस्थ रहात असत. त्यांच्या पत्नीचे नांव वेदवती कुलकर्णी. आपल्या मेहुणीच्या घरी अधून-मधून गेल्याने श्री. मुकुंद कुलकर्णी बरोबर त्यांचा परिचय झाला होता. निद्रानाशाचा प्रकार जेव्हा वेदवती कुलकर्णीला कळला, तेव्हा तिने विलास चिटणवीसांना सांगितले की...

‘‘श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या वाचल्याने अशा अडचणीतून मार्ग सापडतो.’’ असे म्हणून तिने विलास चिटणवीसांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले. विलास चिटणवीसांनी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात करताच त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये त्यांना

भगवान् श्रीदत्तात्रेय दिसले. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांना उजवा हात वर करून आशीर्वाद दिला व "**ॐ द्राम दत्तगुरु**" या मंत्राचा सतत जप करत रहा असे सांगितले. भगवान् दत्तात्रेयांनी डाव्या हाताने त्या दुष्ट शक्तीला पकडले होते, जी गेली १४ वर्षे चिटणवीसांना सतावत होती.

भगवान् श्री दत्तात्रेयांनी त्या दुष्ट शक्तीचे अक्षरशः मुटकुळे बांधले व भूगर्भातील खाचेमध्ये त्या शक्तीला टाकून दिले. भूगर्भातून ती कधीही परत वर येणार नाही अशी व्यवस्था केली. त्या दिवसापासून चिटणवीसांना एकदम शांत झोप लागू लागली.

सप्टेंबर २००९ मध्ये अचानक चिटणवीसांचे बोलणे असंबद्ध होऊ लागले. बोलतांना जीभ का अडखळते म्हणून डॉक्टरांना दाखविले. डॉक्टरने एम्. आर. आय. काढायला सांगितले. त्यावरून असे निदान केले की गेली आठ-दहा दिवस मेंदूमध्ये रक्तस्राव होत असून मेंदूचे ऑपरेशन करणे अतिशय आवश्यक आहे. ऑपरेशनमध्ये प्राण जाण्याची किंवा एखादा अवयव निकामी होण्याची शक्यता डॉक्टरनी बोलून दाखविली. परंतु श्रीदत्त उपासनेमुळे चिटणवीसांना खूपच मनोबल प्राप्त झालेले होते. ऑपरेशन शंभर टक्के यशस्वी झाले. शुद्धीवर आल्यानंतर जेव्हा त्यांनी डोळे उघडले तेव्हा त्यांना हॉस्पिटलच्या भिंती अष्टगंधाच्या रंगाने रंगवलेल्या व प्रकाशमान दिसल्या, त्यामध्ये त्यांना अष्टविनायक व इतर अनेक देव-देवतांची दर्शने झाली.

ॐ

**ज्ञानाग्नीचेनि मुखे । जेणे जाळली कर्मे अशेखे ।**
**तो परब्रह्मचि मनुष्य वेखे । ओळख तू ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# बाधा पळाली

**उ**त्तम नावाचा एक ड्रायव्हर मुंबईत रहातो. **श्री स्वामी समर्थ सप्तशती** वाचनाचे त्याला अनेक अनुभव आहेत. एकदा तो वरवडे (ता. रत्नागिरी) या गावी गेला असता, तेथे रात्रीच्या वेळी त्याला जोरजोराने किंचाळण्याचे, ओरडण्याचे आवाज ऐकू आले. काय प्रकार आहे, हे पाहण्यासाठी तो शेजारच्या घरी गेला.

गीता सावंत नावाची मुलगी जोरजोराने हातवारे करत किंचाळत होती. तिला काय होत आहे हे कोणालाच कळत नव्हते. गीताच्या आई-वडिलांनी उत्तमला सांगितले, ''या मुलीचे लग्न झालेले आहे. परंतु तिला पिशाच्च बाधा झाल्याने सासरच्या लोकांनी आमच्याकडे आणून सोडले. दिवसातून तीन-चार वेळा हिला असे पिशाच्च बाधेचे झटके येतात, रात्री-अपरात्री पण येतात, तास-दोन तास किंचाळते-ओरडते हातपाय आपटते व नंतर आपोआप शांत होते.

अनेक उपाय केले, अनेक देवांना कौल लावले, ज्योतिषी पाहिले, साधू-संतांकडे घेऊन गेलो, पण काहीच उपयोग झाला नाही, हिच्या नशिबात काय आहे, हे कळायला मार्ग नाही.''

सुमारे तासाभराने गीता शांत झाली तेव्हा उत्तम तिला

म्हणाला, ‘‘श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेली **श्री स्वामी समर्थ सप्तशती** नांवाची पोथी वाचल्याने खूप दिव्य अनुभव येतात, माझे खूप चांगले झाले आहे, तू ती पोथी वाच! माझे अंतर्मन सांगते, तुझे नक्की चांगले होईल,’’ असे म्हणून आपल्याजवळील **श्री स्वामी समर्थ सप्तशती** ग्रंथ गीताला दिला.

गीताने श्रद्धेने **श्री स्वामी समर्थ सप्तशती** ग्रंथ हातात घेतला व देवाजवळ ठेवला. स्नान करून देवाजवळ दिवा लावला, अगरबत्ती लावली व श्रद्धेने तो ग्रंथ पूर्ण वाचून काढला, त्या रात्री तिला पिशाच्च बाधेचा काहीही त्रास झाला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ती उत्तमला म्हणाली, ‘‘तू देवासारखा माझ्यासाठी धावून आलास. देवानेच तुला पाठविले. मला काल रात्री मुळीच त्रास झाला नाही. हा ग्रंथ मी तुला परत करणार नाही.’’ यावर उत्तम म्हणाला, ‘‘या ग्रंथाची माझ्यापेक्षा तुलाच जास्त आवश्यकता आहे. मुंबईला गेल्यावर मला हा ग्रंथ मिळेल. तू रोज श्रद्धेने वाचत राहा!’’

गीताने रोज श्रद्धेने पूर्ण ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. पिशाच्चबाधेचा तिला पुन्हा कधीही त्रास झाला नाही. ग्रंथ वाचनास सुरुवात केल्यापासून पाचव्या दिवशी गीताच्या सासरची माणसे आली व गीताला सासरी घेऊन गेली.

ॐ

**तो मनुष्यासारिखा तरी आवडे ।**
**तरी मनुष्यत्व तया न घडे ।**
**जैसा जळी जळामाजी न बुडे । भानुबिंब ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# डोक्यातील जटा

**वें**गुर्ला येथील प्राजक्ता पेडणेकर हिला नागीण झाली होती. नागिणीने ती इतकी हैराण झाली होती की तिला झोप लागत नसे. तिच्या अंगाची आग होत असे. तिचे डॉक्टरी व गावठी उपाय चालू होते. पण गुण येत नव्हता. एक दिवस तिचा भाऊ समीर तिला म्हणाला, ''**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाच. तुला नक्की बरे वाटेल.'' त्यावर प्राजक्ता म्हणाली, माझ्या अंगाची इतकी आग होत आहे, मला देवाचे नांव घेणेसुद्धा सुचत नाही तेव्हा तूच मला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचून दाखव.

त्या दिवसापासून समीरने तिच्याजवळ बसून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली. पहिल्याच दिवशी तिला अंगाची आग कमी झाल्याचा अनुभव आला व झोपही लागली. समीरने काही दिवस **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** आपल्या बहिणीसाठी वाचले. थोडेसे बरे वाटल्यानंतर व चांगली झोप लागण्यास सुरुवात झाल्यानंतर प्राजक्ताने स्वतःच **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली. अशा प्रकारे नागिणीच्या व्याधीपासून तिची पूर्ण सुटका झाली.

प्राजक्ता पेडणेकर दररोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन करू लागली. नोकरीसाठी तिने अनेक ठिकाणी प्रयत्न केले होते. पण कुठेच यश येत नव्हते. तिचा चुलत भाऊ किरण पेडणेकर तिला म्हणाला, ''तू **श्रीदुर्गा त्रिशती** दररोज पूर्ण वाचत जा.'' किरणच्या सांगण्याप्रमाणे प्राजक्ताने **श्रीदुर्गा त्रिशती** वाचायला सुरुवात केली. तिचे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन चालूच होते. काही दिवसातच तिला फोंड्यामधील कृषि विद्यापीठात लेक्चरर् म्हणून नोकरी मिळाली. अशा प्रकारे आपल्याला नोकरी मिळावी ही तिची इच्छा ईश्वराच्या कृपेने पूर्ण झाली. फोंडा कृषि विद्यापीठामध्ये हिराबाई निकम नांवाची एक सफाई कामगार होती. एक दिवस हिराबाई प्राजक्ताला म्हणाली, ''माझ्या मुलीचे नांव वृषाली. ती तेरा वर्षाची आहे. एक-दीड महिन्यापूर्वी तिच्या पूर्ण अंगावर भाजल्याप्रमाणे फोड आले. डोक्यातसुद्धा फोड आले. एका रात्रीमध्ये डोक्यातील सर्व केसांच्या जटा झाल्या. त्या दिवसापासून ती शाळेत जात नाही. अभ्यास करत नाही. सारखी किंचाळत असते.'' अशा प्रकारे आपली कथा सांगून हिराबाई रडू लागली.

प्राजक्ता पेडणेकरने तिला धीर दिला व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले व म्हणाली, ''तुझ्या मुलीला हे वाचायला सांग. या **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** वाचनाने तिला नक्की बरे वाटेल.'' हिराबाई **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घेऊन घरी गेली. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** पहाताच तिची मुलगी वृषाली किंचाळू लागली.

दुसऱ्या दिवशी हिराबाईने प्राजक्ताला सांगितले की, वृषाली **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राकडे** बघायलाही तयार नाही. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दाखविले की, लगेच किंचाळायला सुरुवात करते. यावर प्राजक्ताने हिराबाईला सांगितले, ''तुझ्या मुलीला सांग की, तुझ्या गुरुने तुला हे

वाचण्याची आज्ञा केली आहे.'' घरी आल्यानंतर जेव्हा हिराबाईने वृषालीला गुरुंची आज्ञा सांगितली तेव्हा वृषालीने निमूटपणे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** हातात घेतले व वाचायला सुरुवात केली.

**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून वृषाली शांत झाली. तिसऱ्या दिवशी तिच्या सर्व जटा सुटून केस मोकळे झाले. पाच-सहा दिवसात ती नॉर्मल होऊन शाळेत जाऊ लागली. त्यावर्षी तिला परीक्षेत भरपूर मार्क्स मिळाले. शाळेच्या वार्षिकोत्सवामध्ये नृत्याच्या स्पर्धेत तिने भाग घेतला व बक्षीस मिळविले.

**ॐ**

**तेणे न पाहता विश्व देखिले ।**
**न करिता सर्व केले ।**
**न भोगिता भोगिले ।**
**भोग्यजात ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# प्रभाव श्रीदत्तस्तोत्राचा

**क**ळंबोली (नवी मुंबई) येथील अमोल महामूलकर यांची पत्नी वर्षा एकदा गावाला गेली होती. तेथून ती जेव्हा परत आली, तेव्हा तिला बघून अमोलला अतिशय धक्का बसला. कारण त्याची पत्नी वर्षा पुरुषी आवाजात बोलत होती. सौ. वर्षाच्या मुखाने पिशाच्च बोलू लागले, ''ही तुझी पत्नी नसून माझी पत्नी आहे. यापुढे ही घरातील काहीही कामे करणार नाही. सगळी कामे तुलाच करावी लागतील.'' यावर अमोल आपल्या पत्नीला ''तुला काय वेड लागले आहे का? तू अशी वेड्यासारखी काय बडबडतेस?'' असे म्हणाला. तेव्हा वर्षाने चक्क अमोलला मारायला सुरुवात केली व घरातील भांडी त्याच्यावर फेकून मारू लागली.

अमोलच्या घरात असे प्रकार नेहमीच घडू लागले. यावरून अमोलच्या लक्षात आले की, वर्षाला पुरुष पिशाच्चाची बाधा झाली असून यावर काहीतरी दैवी उपाय करणे आवश्यक आहे. अमोल तांत्रिक, मांत्रिक, साधू यांच्याकडे जाऊन आपल्या समस्या सांगू लागला व ते सांगतील ते उपाय करू लागला. यामध्ये त्याचे लाखो रुपये

खर्च झाले. परंतु वर्षाला मुळीच आराम पडला नाही.

जेव्हा वर्षाच्या अंगामध्ये पुरुष पिशाच्चाचा संचार व्हायचा तेव्हा ती सर्वांना मारझोड करायची, शिव्या घालायची व हाताला येईल ते फेकून मारायची व पिशाच्चाचा संचार निघून गेला की, सगळ्यांशी अतिशय प्रेमाने वागायची. घरात फेकलेल्या भांड्यांचा पसारा कुणी केला हेसुद्धा तिला आठवायचे नाही.

अमोलचे मांत्रिक, तांत्रिक, साधू यांच्याकडे जाणे चालूच होते. एका प्रसिद्ध साधूने ७५ हजार रुपये खर्च येईल असे सांगून ती बाधा दूर करण्याचे आश्वासन दिले. अमोलने पैसे दिले. त्या साधूने उपाय केले. परंतु काहीही फायदा झाला नाही. अशी काही वर्षे गेली. नाईक नांवाचा अमोलचा एक मित्र होता. एकदा तो वनिता बुक्समध्ये पुस्तके विकत घेण्यास गेला असताना अरुण दाभोळकर याने त्याला श्रीदत्तस्तोत्र दिले. या नाईकने अमोल महामुलकर याला सांगितले, श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचल्याने लाखो लोकांचे कल्याण झाले आहे. तू वनिता बुक्समध्ये जाऊन पोथ्या व पुस्तके घे. सध्या माझ्याकडे हे श्रीदत्तस्तोत्र आहे. या श्रीदत्तस्तोत्राची तुला झेरॉक्स काढून देतो. वर्षाला या स्तोत्राचे जास्तीत जास्त पाठ करायला सांग व तुला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा पुस्तके व पोथ्या घेऊन ये. अमोलने विचार केला, वर्षाला बरे करण्यासाठी आत्तापर्यंत लाखो रुपये खर्च झाले आहेत. या श्रीदत्तस्तोत्राचे पाठ केल्याने पिशाच्चबाधेतून तिची सुटका होईल की नाही हे सांगता येत नाही. पण पुण्य तर नक्की मिळेल. असा विचार करून श्रीदत्तस्तोत्र वर्षाला दिले व दिवसभर याचे पाठ करत राहा असे सांगितले.

पिशाच्चबाधेच्या त्रासाला वर्षा अगदी कंटाळून गेली होती.

पिशाच्च तिला विविध मार्गाने छळत होते. श्रीदत्तस्तोत्र हातात पडल्याबरोबर तिने त्या स्तोत्राचे सतत पाठ करायला सुरुवात केली. श्रीदत्तस्तोत्राचे दररोज शंभर-दीडशे पाठ ती करू लागली. दोन-तीन दिवसातच पिशाच्चाचा त्रास अनेक पटीने कमी झाला आहे हे तिच्या लक्षात आले. आपण श्रीदत्तस्तोत्राचे पाठ करतो म्हणून आपल्याला पिशाच्च त्रास देऊ शकत नाही, अशी तिची खात्री झाली व ती सतत श्रीदत्तस्तोत्र म्हणू लागली. असे पाच-सात दिवस गेल्यानंतर एक दिवस अमोल घरात असताना वर्षाच्या अंगामध्ये पिशाच्चाचा संचार झाला व त्या पिशाच्चाने अमोलचा हात धरून आपल्याजवळ बसविले व अमोलला म्हणाला, ''मी गेली अनेक वर्षे पिशाच्च योनीत यातना भोगत होतो. वर्षाने जे श्रीदत्तस्तोत्राचे पाठ केले त्या पाठाने मला सद्गती प्राप्त झाली आहे, माझा उद्धार झाला आहे. मी वर्षाचे शरीर सोडून जात आहे. तुम्ही या श्रीदत्तस्तोत्राचे पाठ करत राहा. हा मार्ग सोडू नका. स्वतःचा उद्धार करून घ्या.'' असे सांगून त्या पिशाच्चाने सौ. वर्षाचे शरीर सोडले व पिशाच्च बाधेतून वर्षाची सुटका झाली. सर्व प्रकारच्या बाधा, ग्रहपीडा निवारण करणारे प्रभावी श्रीदत्तस्तोत्र पुढे देत आहे. या श्रीदत्तस्तोत्राचे दररोज कमीत कमी एकशे आठ पाठ करावेत. जास्त पाठ केल्यास खूप लवकर दिव्य अनुभव येतात.

ॐ

**जेणे भ्रांतीपासूनि हिरतले । गुरुवाक्ये मन धुतले ।**
**मग आत्मस्वरूपी घातले । हारौनिया ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# ।। श्रीदत्तस्तोत्र ।।

अत्रिपुत्रो महातेजा दत्तात्रेयो महामुनिः ।
तस्य स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ।।१।।
मुंडनं कौपिनं भस्मं योगपट्टं च धारयन् ।
शैली श्रृँगी तथा मुद्रा दंड पात्र जिनासनम् ।।२।।
कंथादो पंच आधारी कंठमालां च पादुकाम् ।
कर्णकुंडलधारी च सिद्धोही भ्रमते महिम् ।।३।।
दत्तात्रेयो महादेवो विष्णुरूपो महेश्वरा ।
स्मरणात् सर्वपापानि नश्यंते नात्र संशयः ।।४।।

मातापूरनिवासी च देवो दत्तात्रेयो मुनिः ।
नित्य स्नानं प्रकुरुते भागीरथ्यां दिने दिने ।।५।।

दत्तात्रेयो हरिः साक्षात् वसंते सह्यपर्वते ।
भक्तानां वरदो नित्यं सः देवश्चिंतितं मया ।।६।।

नागहार धरो देवो मुकुटादि समन्विता ।
पुष्पमालाधरो देवो सः देवो वरदो मम ।।७।।

अत्रिजो देवदेवेषो मातुर्लिंगधर प्रभु ।
सर्वसौभाग्ययुक्तश्च भक्तानां वरदः सदा ।।८।।

।। श्रीदत्तस्तोत्रम् संपूर्णम् ।।

ॐ

# मृतात्म्याने केले मार्गदर्शन

**प्रा**ची पाटील या मुलीने आम्हाला पुढीलप्रमाणे तिचा अनुभव कळविला आहे.

प्राचीच्या घरामध्ये पिशाच्च शक्तींचे अस्तित्व होते. त्यामुळे घरात सतत भांडणे होत असत. कष्ट व मेहनत करून कितीही कमावले तरी पुरे पडत नसे, घरात अशांती होती. घरातील सर्वांची मने दिवस-रात्र चिंता, काळजी व भीति यांनी व्यापलेली असायची. यावर कहर म्हणजे घरामध्ये अदृश्य सृष्टीतील आवाज ऐकू यायचे. हे आवाज दिवसा व रात्री झोपल्यावर सतत ऐकू यायचे. यामुळे झोपही पुरेशी मिळत नसे. प्राचीच्या घरातील सर्वजण हैराण झाले होते.

प्राचीचे एक हॉटेल होते. या हॉटेलमध्ये घरातील सगळे खूप मेहनत करायचे. या हॉटेलला पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. अशा सर्व प्रकारांनी प्राचीचे कुटुंब गांजलेले होते.

एकदा त्यांच्या हॉटेलमध्ये सावंत नांवाचे एक सज्जन सद्भक्त आले. त्यांनी प्राचीच्या आईला श्रीस्वामी दत्तावधूत यांच्या पोथ्या व पुस्तकांविषयी माहिती दिली व म्हणाले, 'ही पुस्तके व पोथ्या

वाचल्याने लाखों लोकांचे कल्याण झालेले आहे. तुम्ही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज घरात वाचा व काय अनुभव येतो तो पहा!' असे म्हणून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** प्राचीच्या आईला दिले.

**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केल्यानंतर प्राची व प्राचीच्या घरातील लोकांना असा अनुभव आला की, पूर्वी जे आवाज अस्पष्टपणे ऐकू येत असत. तेच आवाज अदृश्य सृष्टीतून स्पष्टपणे ऐकू येऊ लागले. यातील काही आवाज म्हणू लागले की, ''आम्ही पिशाच्च आहोत. गेली सोळा वर्षे आम्ही तुमच्या घरात अशांती निर्माण करत आहोत, भांडणे लावून देत आहोत, तुम्हाला सर्व प्रकारचे त्रास देत आहोत, धंदा-उद्योगात तुम्हाला जे नुकसान होत आहे ते आम्हीच करत आहोत. पण तुम्ही आता जे वाचन सुरू केले आहे या वाचनामुळे आम्हाला तुमचे घर सोडून जावे लागणार असे वाटते.''

पिशाच्चांबरोबर असे संवाद होऊ लागले. एक दिवस एक वेगळाच आत्मा प्राची समोर साकार झाला. त्यांने सांगितले, ''मी तुझा काका! माझे नाव आनंद गंगाधर पाटील.'' कंपनीत काम करतांना स्फोट झाल्याने प्राचीच्या काकांचा मृत्यू झाला होता त्याची आठवणही त्या आत्म्याने करून दिली.

प्राचीच्या काकांचा आत्मा प्राचीला म्हणाला, ''तू जे **संक्षिप्त श्री गुरुचरित्राचे** वाचन करत आहेस त्याने तुझ्या घरातील पिशाच्च शक्ती घर सोडून जात आहेत हे वाचन कधीही थांबवू नका. श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या सर्व पोथ्यांचे वाचन घरात चालू ठेवा. याने घरात सुख-शांती नांदेल.''

तुझ्या घरामध्ये जी अशांती आहे ती पिशाच्च शक्तींमुळे

आहे. तुझी आत्या तुमच्यावर करण्या करत आहे व त्यामुळे तुमच्या घरात पिशाच्च शक्ती घुसत आहेत. तू तुझ्या आत्याच्या घरी जा, तिला सांग...

"आमच्यावर करण्या करणे बंद कर, नाहीतर दत्त महाराज तुला भयंकर शिक्षा करतील."

प्राचीने विचार केला, कोणाच्याही घरी जाऊन अशा प्रकारे आरोप करणे चांगले नाही. शिवाय आत्या म्हणेल की मी तुमच्यावर मुळीच करण्या करत नाही, अशा परिस्थितीत काय करावे हे प्राचीला व तिच्या घरातील लोकांना सुचत नव्हते. शेवटी प्राचीने धाडस करून आत्याच्या घरी जाऊन सांगितले की, 'आमच्यावर करण्या करणे बंद करा नाहीतर भगवान् दत्तात्रेय तुम्हाला शिक्षा करतील.'

प्राचीने असे सांगितल्यानंतर आत्या काहीच बोलली नाही. फक्त 'सॉरी' म्हणाली. दुसऱ्या दिवसापासून प्राचीच्या घरात सुख-शांती नांदू लागली. हॉटेल चांगले चालू लागले. घरात प्रेमाचे वातावरण निर्माण झाले. अशा प्रकारे श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने प्राचीच्या घरात सुख-शांती नांदू लागली.

ॐ

**जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।**
**हा भक्तीयोगु निश्चित । जाण माझा ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# व्यसन सुटले

**डॉ.** लीना भंगाळे यांच्या घरी छाया महाडिक नांवाची स्त्री दररोज घरकाम करण्यासाठी येत असे. लीनाताई रोज देवाच्या पोथ्या वाचतात, सतत देवाचे करत रहातात. यामुळे मनाला एक प्रकारचे समाधान मिळत असे. छायाला त्यांच्याविषयी खूप आदर वाटत असे. एकदा छाया महाडिक लीनाला म्हणाली,

''ताई! तुम्ही खूप देवाचे करता. तुमच्या घरातील वातावरण आनंदी आहे. मला काहीतरी मार्ग सांगा. माझा नवरा दररोज खूप दारू पितो, रात्रभर धिंगाणा घालतो. आमच्या घरात अजिबात सुख-शांती नाही. आम्हाला रात्रीची झोपही शांतपणे मिळत नाही. मला काहीतरी मार्ग सांगा!''

यावर लीना भंगाळे म्हणाली, ''तू **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचशील का? श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्यांमुळे लाखो लोक सुखी झाले आहेत. यातील ही पोथी छोटीशी आहे. तू श्रद्धेने वाच. तुला नक्कीच चांगला अनुभव येईल!''

यावर छाया म्हणाली, ''हो! मी जरूर वाचेन!''

दुसऱ्या दिवसापासून छाया महाडिकने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली. एक-दोन दिवसातच घरातील वातावरणात फरक जाणवू लागला. दररोज दारू पिऊन धिंगाणा घालणारा नवरा घरी आल्यावर जेवून चूपचाप झोपू लागला. एका आठवड्यात त्याची दारू सुटली. आपण दारू पित होतो याचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याने छायाची क्षमा मागितली. तो व्यवस्थित काम-धंदा करू लागला. विशेष म्हणजे छायाच्या नवऱ्याने आपल्या काही मित्रांना दारू सोडण्याचा सल्ला दिला. छाया महाडिकची एक मैत्रिण होती. या मैत्रिणीचे नांव संध्या ठाकूर. संध्याला घेऊन छाया लीनाकडे आली व तिला म्हणाली, ''ही माझी मैत्रीण संध्या ठाकूर. हिची परिस्थिती माझ्याहून भयंकर आहे. नवरा दारू पिऊन हिला व मुलांना मारतो. काहीही काम करत नाही. हिच्याकडेच पैसे मागतो व पैसे न दिल्यास तिला मारतो.''

लीनाने संध्याला विचारले, ''**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचशील का?''

यावर संध्या म्हणाली,

''मला वाचता येत नाही. परंतु मी माझ्या मुलाला वाचायला सांगेन. तो आठवीत शिकत आहे.''

यावर लीना म्हणाली,

''तुझा मुलगा जेव्हा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचेल तेव्हा तू ते श्रद्धेने ऐक!''

संध्या हो म्हणाली व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घेऊन आपल्या घरी गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान करून तिने आपल्या मुलाला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सांगितले. पोथी वाचनाची सवय

नसल्याकारणाने मुलाने अडखळत तीस ओव्यांचा एक अध्याय कसाबसा वाचला व शाळेला उशीर होत आहे असे संध्याला सांगून तो शाळेत निघून गेला.

अल्पवयीन मुलाद्वारे अतिशय श्रद्धेने केलेली प्रार्थना श्रीदत्तप्रभूंपर्यंत पोहोचली. संध्या ठाकूरच्या घरातील वातावरण बदलून गेले. घरात प्रसन्नता निर्माण झाली. दुसऱ्या दिवशी मुलगा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा** दुसरा अध्याय वाचायला बसला तेव्हा संध्याचा नवराही तेथे येऊन बसला. त्याने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा** दुसरा अध्याय ऐकला. त्या दिवशी तो सर्वांशी प्रेमाने वागला. आपण खूप चुकीचे वागत होतो हे त्याने कबूल केले. आपण कालपासूनच दारू पिणे सोडून दिले असे संध्याला सांगितले. तिसऱ्या दिवशी मुलाने तिसरा अध्याय वाचला. त्या दिवशी संध्याच्या नवऱ्याने घरात तीनशे रुपये आणून दिले व मरेपर्यंत दारूला स्पर्श करणार नाही अशी प्रतिज्ञा मी केली आहे असे सांगितले. तसेच आपण दोघांनी मुलांकडे नीट लक्ष देऊन मुलांना मोठे करू असे तो संध्याला म्हणाला.

चौथ्या दिवशी त्याने स्वतः **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली. अशा प्रकारे संध्या ठाकूर हिच्या घरात सुख-शांती नांदू लागली.

ॐ

**माझा मराठीचा बोलु कवतिके । अमृतातेही पैजा जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिके । मेळविन ॥**

**॥ ज्ञानेश्वरी ॥**

# इच्छापूर्ती

**श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्ध योग्याच्या सहवासात भाग** १ या पुस्तकामध्ये सुजाता माळवे हिने आपले अनुभव सविस्तरपणे दिलेले आहेत. वाचकांनी ते मुळातून वाचावेत. एका ज्योतिषाच्या मार्गदर्शनाप्रमाणे सुजाताने श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके वाचायला सुरुवात केली. तिला अनेक दिव्य अनुभव आले. तिनेच सर्व भक्तांना सांगितले की, श्रीस्वामीजींच्या पोथ्या वाचल्याने पूर्वजांचा उद्धार होतो, पिशाच्चांचा उद्धार होतो, वास्तू शुद्ध होते. अशाप्रकारचे अनेक अनुभव तिने पहिल्या भागात लिहिलेले आहेत. डिसेंबर २०१३ मध्ये तिला आणखी एक दिव्य अनुभव आला. तो पुढीलप्रमाणे...

सुजाता माळवेने सॅन फ्रान्सिस्को (अमेरिका) येथे एक घर विकत घेतले. नवीन घरामध्ये पहिल्या दिवशी कोणीतरी साधू किंवा सज्जन अशा व्यक्तीला भोजनाला बोलवावे अशी तिची खूप इच्छा होती. तिने श्रीस्वामीजींना प्रार्थना केली.

‘‘देवा! तुझा कोणीतरी खास भक्त माझ्या नवीन घरी पहिल्या दिवशी भोजन करेल अशी काहीतरी व्यवस्था कर!’’

प्रार्थना केल्यानंतर अचानक तिच्या मनात विचार आला, आपण मंदिरातील पुजाऱ्याला भोजनाचे आमंत्रण द्यावे. त्याप्रमाणे तिने पुजाऱ्याला तशी विनंती केली. त्यानेही आनंदाने येण्याचे कबूल केले.

गृहप्रवेशाच्या दिवशी पुजारी आला. भोजन झाल्यानंतर तो सुजाताला म्हणाला, ''प्रत्येक माणसाच्या पाठीमागे त्याच्या पूर्वजांचे आत्मे असतात व त्या आत्म्यांच्या काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षा पूर्ण केल्या तर सुख-शांती मिळते. तुझ्या पाठीमागेही काही आत्मे आहेत. ते आत्मे असे म्हणत आहेत की, तू ज्या पोथ्या वाचतेस त्या पोथ्यांच्या वाचनाने त्यांना शांती प्राप्त होत आहे व त्यांची प्रगतीही होत आहे. तरी तुझे पोथ्या वाचनाचे कार्य चालू राहू दे! त्यानेच तुला सुख-समृध्दी प्राप्त होईल.'' हे ऐकून सुजाताला अगदी धन्य झाल्यासारखे वाटले. आपण केलेल्या प्रार्थनेचा इतका दिव्य अनुभव येईल अशी तिने अपेक्षाही केली नव्हती.

ॐ

**मंत्रेचि वैरी मरे । मग वाया का बांधावी कट्यारे ।**
**रोग जाय दूर साखरे । तरी निंब का पियावा ॥**

**॥ ज्ञानेश्वरी ॥**

# माशाचा काटा

**दी**पा आंबेरकर हिने आपली बहीण मंगल कारेकर हिला **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** दिली होती व रोज एक-दोन अध्याय तरी वाच असे सांगितले होते. परंतु एक-दोन वर्षे गेली तरी पोथी वाचण्याचा योग आला नाही.

ऑक्टोबर २०१३ मध्ये एकदा तिचा मुलगा जेवत असताना माशाचा काटा मुलाच्या घशामध्ये अडकला व मुलगा वेदनेने रडू लागला. मुलाला डॉक्टरकडे नेले. त्याने स्कोपी केली व ऑपरेशन करावे लागेल, चार दिवसांनी या असे सांगितले. मुलगा दिवस-रात्र रडत होता. मंगल कारेकरला काय करावे हे सुचत नव्हते. आर्थिक परिस्थिती ठीक नव्हती. मुलाच्या घशात काटा अडकून चोवीस तास उलटून गेले तरीही मुलगा सारखा रडतच होता. त्याला एक क्षणभरही झोप येत नव्हती. आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याने ऑपरेशन कसे करावे हा प्रश्न मंगलला पडला होता. मंगल अशा व्याकूळ अवस्थेत असताना अचानक दीपाचा फोन आला. मंगलने आपल्यावर आलेल्या बिकट प्रसंगाची कल्पना दीपाला दिली.

दीपाने विचारले, ''तुला **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** देऊन दोन-अडीच वर्षे झाली, तू वाचलीस का?''

''नाही गं! वाचायला वेळच मिळाला नाही. तू माझ्यासाठी प्रार्थना कर!'' मंगलने उत्तर दिले.

यावर दीपा म्हणाली, ''काळजी करू नकोस. तुझ्या मुलाला नक्की बरे वाटेल.''

दीपा बरोबर असे बोलणे झाल्यानंतर मंगल व तिचा नवरा मुलाला घेऊन डॉक्टरकडे गेली, तेव्हा डॉक्टरने मुलगा ठणठणीत बरा असल्याचे सांगितले.

अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ, प्रभू दत्तात्रेय यांच्या कृपेने मंगलचा मुलगा पूर्ण बरा झाला. देव हाकेच्या अंतरावर असतो हेच खरं!

लाखो भक्तांना श्रीस्वामीजींचे अनुभव आहेत. परंतु यापैकी शंभर लोकांनीही श्रीस्वामीजींना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. पुस्तके व पोथ्या वाचून लोक श्रीस्वामीजींचे भक्त होतात. तात्काळ त्यांच्या पाठीमागे एक दिव्य शक्ती उभी रहाते व नंतर या भक्ताच्या हातूनही दिव्य चमत्कार घडू लागतात. असे आहेत श्रीस्वामी दत्तावधूत उर्फ श्रीदत्तगिरी!

**ॐ वनिता ॐ, मुंबई**

**ॐ**

**विचारशून्य होता मन । हृदयी प्रकटे अंतर्ज्ञान ।**
**आणि विश्व चैतन्य । प्रकटे अंतर्दृष्टी पुढे ।।**
**।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।**

# बिपिन व अश्विनी

**श्री**स्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेले **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ५** हे पुस्तक आमच्या वाचनात आले आणि आमच्या जीवनाची दिशाच बदलून गेली. श्रीस्वामीजींच्या कृपेने आमच्या जीवनाला मार्ग मिळाला.

माझे मित्र संजय भंडारे यांनी नवीन घर बांधल्याकारणाने मी व माझी पत्नी सौ. अश्विनी त्यांच्या घरी गेलो होतो. संजय भंडारे व त्यांचे सर्व कुटुंब अत्यंत सात्त्विक व प्रेमळ आहेत. संजयराव यांचे वडील श्री. विष्णुपंत (अण्णा) भंडारे गेल्या अनेक वर्षांपासून आध्यात्मिक पुस्तके, धार्मिक ग्रंथ, पोथ्या मुद्रित करीत आहेत. त्यांचा हाच वारसा त्यांचे पुत्र संजयराव पुढे चालवत आहेत.

अशा या प्रेमळ कुटुंबात २००७ साली जाण्याचा प्रथम योग आला. त्याच दिवशी संजयरावांनी मला 'हे घ्या नवीन पुस्तक जरा वेगळे आहे. बघा वाचून कसे वाटते?' असे म्हणून श्रीस्वामीजींनी लिहिलेले **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ५** हे पुस्तक दिले.

घरी आल्यावर मी ते पुस्तक सहज चाळले आणि वाचायला सुरुवात केली. हे पुस्तक अर्धवट वाचून खाली ठेवावे असे वाटलेच नाही. रात्रीपर्यंत बसून संपूर्ण पुस्तक वाचून काढले. नंतर अश्विनीने ते पुस्तक वाचायला घेतले. तिला ते फार आवडले. आम्हा दोघांनाही श्रीस्वामीजींनी लिहिलेली सर्वच पुस्तके वाचावीत असे मनापासून वाटू लागले. दुसऱ्या दिवशी बुधवार पेठेतील पुस्तकांच्या दुकानात गेलो, पण सर्व पुस्तके काही मिळाली नाहीत. खूपच उत्कंठा लागून राहिलेली होती. पुस्तकावरचा पत्ता वाचला आणि सरळ मुंबई येथील लालबागचे वनिता बुक्सचे ऑफिस गाठले. सौ. काकींनी सर्व पुस्तके दाखविली व माहिती सांगितली. श्रीस्वामीजींची सर्व पुस्तके व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी घेऊन घरी आलो.

श्रीस्वामीजींच्या कृपेने मी, माझी पत्नी व मुलगा सिद्धार्थ असे तिघेही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी वाचू लागलो. पोथ्या व पुस्तके घरात आल्यावर शांतता व प्रसन्नता वाढू लागली. पोथीच्या वाचनाने मनाला समाधान व आनंद वाटू लागला. व्यवसायातील आणि इतर अडचणींवर मार्ग मिळू लागला. या काळात श्रीस्वामीजींबद्दल व त्यांच्या पुस्तकांबद्दल संजयराव यांच्याबरोबर चर्चा वाढू लागली. श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचून लोकांना आलेले अनुभव संजयराव व सौ. वहिनी आम्हाला सांगायचे. हे अनुभव ऐकताना रात्रीचे एक-दोन कधी वाजायचे तेच कळायचे नाही. संजयराव, वहिनी, सौ. आई, अण्णा सर्वजण आम्हाला सौ. ताईंचीपण माहिती सांगायचे. सौ. ताईंची आध्यात्मात खूप प्रगती आहे. त्यांनी खूप वर्षे श्रीस्वामीजींची अतिशय सेवा केली आहे, असे सौ. ताईंविषयी सतत सांगत. श्रीस्वामीजी अरण्यात, हिमालयात असतात व कोणासही भेटत नाहीत असे

श्रीस्वामीजींविषयी सांगत.

सौ. ताईंचे आपल्याला दर्शन व्हावे अशी आम्हा तिघांनाही अतिशय ओढ लागली होती आणि एके दिवशी सकाळी संजयरावांचा फोन आला. बिपिन, सिद्धार्थ आणि अश्विनी दुपारी आमच्या घरी या. सौ. ताई आल्या आहेत व त्यांनी तुम्हाला भेटायला बोलावले आहे. आम्हाला अतिशय आनंद झाला. दुपारी आम्ही संजयरावांच्या घरी गेलो. तेथे आम्हाला सौ. ताईंचे प्रथम दर्शन झाले. आम्हाला अतिशय आनंद व समाधान वाटले.

२००९ चा ऑगस्ट महिना पुण्यामध्ये स्वाईन फ्ल्यूची साथ घेऊन आला. या तापाची सर्वात जास्त लागण, प्रभाव हा शाळांमधील लहान मुलांवर झाला. माझा मुलगा चि. सिद्धार्थ याला स्वाईन फ्ल्यूची सर्व लक्षणे दिसू लागली. त्यावेळी त्याचे वय १३ वर्षांचे होते.

सिद्धार्थचे ब्लड रिपोर्ट मुंबईच्या NIV संस्थेकडे पाठविले होते. पण रिपोर्ट येण्यास सहा ते सात दिवसांचा अवधी होता. सिद्धार्थचा ताप वाढत होता व स्वाईन फ्ल्यूची सर्व लक्षणे पण वाढत होती. डॉक्टरांनी सांगितले की ४८ तासाच्या आत त्याला औषध मिळणे अत्यंत आवश्यक आहे. पण सरकारने मात्र जोपर्यंत रिपोर्ट पॉझिटिव्ह येत नाही तोपर्यंत पेशन्ट्ला स्वाईन फ्ल्यूची गोळी (औषध) द्यायची नाही असे धोरण जाहीर केले होते. आम्ही फारच घाबरून गेलो होतो. डॉक्टरांनी सिद्धार्थला दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये (१३ ऑगस्ट २००९) ॲडमिट केले.

आम्ही सर्व भार श्रीस्वामीजींवर सोडला. मी सिद्धार्थजवळ बसून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची** पोथी सतत वाचत राहिलो. चि.

सिद्धार्थला वेळेत औषध मिळून त्याला बरे वाटावे म्हणून मी चि. सिद्धार्थसुद्धा त्याला जमेल तेवढे पलंगावर झोपून पोथीचे वाचन करीत रहा असे सांगितले.

थोड्यावेळात मी हॉस्पिटलच्या टी.व्ही. वरील बातम्यांमध्ये ऐकले की, स्वाईन फ्ल्यूच्या संशयित सर्व रुग्णांना तातडीने औषधे देण्यात येतील, सर्व सरकारी हॉस्पिटलमध्ये ही औषधे उपलब्ध होतील. रुग्णांच्या ब्लड-रिपोर्टची वाट बघितली जाणार नाही असे सरकारने जाहीर केले आहे. आम्हाला खूप आनंद झाला. मी तातडीने जाऊन सिद्धार्थसाठी औषध आणले.

श्रीस्वामीजींच्या कृपेने चि. सिद्धार्थ खूप मोठ्या संकटामधून सुखरूप वाचला. त्याला चोवीस तासाच्या आतच औषध मिळाले.

**- बिपिन**

## २५ जुलै २०१० गुरुपौर्णिमा

**हा** दिवस आमच्या तिघांच्याही आयुष्यातला सर्वश्रेष्ठ आणि अत्यंत आनंदाचा दिवस होता. याच दिवशी श्रीस्वामीजींच्या कृपेमुळेच श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन त्यांच्या नागार्जुन सागर येथील आश्रमात आम्हाला झाले.

श्रीस्वामीजींच्या दर्शनाने आम्हाला झालेला आनंद, मिळालेली प्रसन्नता, समाधान इतके आहे की, ते शब्दात वर्णनच करता येणार नाही. तेव्हापासून आम्हाला दिव्य अनुभव येत आहेत.

४ डिसेंबर २०१०. मी, बिपिन व माझी बहीण सौ. आसावरी काही कामासाठी बाहेर गेलो होतो. अचानक बिपिनला त्याच्या मित्राचा फोन आला, त्याला तातडीने साताऱ्याला जावे लागणार होते. तो मला म्हणाला, ''तुम्ही दोघी हे काम पूर्ण करा. मी घरी जाऊन गाडी घेतो व साताऱ्याला जाण्यासाठी निघतो.'' असे म्हणून तो घरी आला. घराच्या खाली दारातच त्याला अचानक चक्कर आली, डोळ्यासमोर अंधारी आली. त्याला वाटले आपण सकाळपासून जेवण केले नसल्यामुळे आपल्याला त्रास होत असेल. घरात येऊन हातपाय धुवून त्याने आईला जेवायला वाढायला सांगितले.

जेवतानासुद्धा त्याला चक्कर येत होती. साताऱ्याला जाण्याची घाई असल्याकारणाने तो खोलीत आवरण्यासाठी आला तर तेथे त्याला पुन्हा एकदा चक्कर आली व डोळ्यांपुढे अंधारी पण आली.

तेवढ्यात सिद्धार्थ खोलीत आला. तो नुकताच ग्राउन्ड् वरून खेळून आला होता. त्याने बिपिनला पलंगावर झोपवले व डॉक्टरांना फोन केला. त्याने बिपिनचे ब्लड प्रेशर तपासले. ते खूपच कमी झाले होते. त्याने डॉक्टरांना फोन करून बिपिनच्या तब्येतीची माहिती दिली. डॉक्टरांनी बिपिनला दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायला सांगितले. सिद्धार्थने मला फोन करून परस्पर हॉस्पिटलमध्ये येण्यास सांगितले.

एका तासापूर्वी अत्यंत व्यवस्थित असणाऱ्या बिपिनला अचानक एवढे काय झाले हेच मला समजेना. कारण या आधी कधीही त्याला असा त्रास झाला नव्हता व त्याला काही दुखणे, आजारही नव्हता.

डॉक्टरांनी बिपिनला लगेचच I C U मध्ये दाखल केले.

श्रीस्वामीजी व सौ. ताईंच्या कृपेमुळे याही परिस्थितीत मी आणि सिद्धार्थ अतिशय शांत होतो.

बिपिनचे पल्सरेट व ब्लड प्रेशर दोन्हीही कमी कमी होत होते. डॉक्टरांनी भराभर सर्व टेस्ट केल्या पण ब्लड प्रेशर कमी होण्याचे कारण त्यांना समजत नव्हते.

मी सिद्धार्थला सांगितले, ''तू घरी जा व श्रीस्वामीजींनी दिलेली विभूति व आपल्या पोथ्या घेऊन लगेचच परत ये.'' पोथ्या व विभूति घेऊन सिद्धार्थ परत आला. त्याने बाबांना डोक्याला, छातीला, पोटाला व हाताला विभूति लावली. मी व सिद्धार्थ बिपिनजवळ बसून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** पोथी वाचू लागलो.

रात्री साधारण १ ते २ ची वेळ होती. मी बिपिनजवळ बसून पोथी वाचतच होते. अचानक त्याला खूप त्रास व्हायला लागला. त्याला छातीवर कोणीतरी खूप मोठे ओझे ठेवल्यासारखे वाटू लागले आणि त्याच क्षणी त्याचे ब्लड प्रेशर २० झाले. सर्व मॉनिटर्स मधून जोरजोरात सायरन वाजायला लागल्यामुळे बाहेरच्या खोलीमध्ये बिपिनचे मेव्हणे होते ते धावत आत आले. त्यांनी धावत जाऊन डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी घाईने बिपिनला एक इंजेक्शन दिले.

नक्की काय घडत आहे हेच मला समजत नव्हते. बिपिनचे मेव्हणे खूपच घाबरले होते.

मी डॉक्टरांना विचारले, याला छातीवर एवढे प्रेशर का जाणवत आहे? तर डॉक्टर म्हणाल्या, ''माझ्याकडील ब्लड प्रेशर वाढविण्यासाठीचे असणारे शेवटचे इंजेक्शन मी दिले आहे. आता बघू!''

या परिस्थितीतही बिपिन माझ्याशी बोलत होता आणि अशाही

परिस्थितीत श्रीस्वामीजींनी मला खूपच शांत ठेवले होते. परिस्थितीचे गांभीर्य श्रीस्वामीजींनी मला जाणवूच दिले नाही. मी बिपिनला सांगितले, ''तू डोळे मिटून देवाचे नांव घेत झोप. मी पोथी वाचते, तुला बरे वाटेल.''

माझ्या नकळत मी ती पोथी जेथून सलाईन लावले होते तेथे त्याच्या हातावर अलगद टेकवली व मोठ्याने वाचायला सुरुवात केली. पोथी वाचायला सुरुवात करताक्षणीच त्याचे ब्लड प्रेशर जे २० होते ते ३० वर आले व दहा मिनिटातच ते ५० वर आले.

डॉक्टर व राजेश (बिपिनचे मेव्हणे) यांना थोडे बरे वाटले पण ब्लड प्रेशर परत घसरणार नाही व आता ते नॉर्मल होईल याची खात्री त्यांना वाटत नव्हती. मी मात्र एवढ्या गंभीर परिस्थितीमध्ये पण शांत होते. मला थोडीसुद्धा भीति वाटत नव्हती. माझे पोथीचे वाचन सुरूच होते.

थोड्यावेळाने अचानक एक नर्स आमच्या खोलीत आली व मला म्हणाली, ''तुम्ही पेशन्ट्जवळ बसू नका. आधी येथून उठा. ही पोथी घेऊन बाहेर जा. बाहेर जाऊन काय वाचायचे ते वाचा.''

तिचे हे बोलणे ऐकल्यावर मला खूप रडू आले. मी तिला म्हणाले, ''मी येथून उठून कोठेही जाणार नाही. या पोथीचा स्पर्श त्याला (बिपिनला) होत आहे म्हणूनच त्याचे ब्लड प्रेशर परत नॉर्मल व्हायला लागले आहे.''

त्या नर्सला हे काही पटत नव्हते. ती म्हणाली, ''तुम्ही मोठ्याने वाचू नका. पेशन्ट्ला त्रास होईल.'' मला ती बिपिनपासून बाजूला

करत होती. म्हणून मला खूप रडायला येत होते.

श्रीस्वामीजींच्या कृपेने पहाटेपर्यंत बिपिनचे पल्सरेट व ब्लड प्रेशर परत नॉर्मल झाले होते.

सकाळी जेव्हा डॉक्टर बिपिनला तपासण्यासाठी आले तेव्हा ते आम्हाला म्हणाले, "२० ब्लड प्रेशर झालेला माणूस एकतर जगतच नाही. जगलाच तर त्याच्या दोन्ही किडन्या एकदम फेल होतात. नाहीतर असा माणूस कोमात तरी जातो. २० ब्लड प्रेशर झालेला पेशन्ट् शांतपणे आपल्याला काय त्रास होत आहे हे सांगतो आहे, असे मी माझ्या डॉक्टरी कारकिर्दीत पहिल्यांदाच पहात आहे. हा खरच दैवी चमत्कार आहे."

डॉक्टरांनी हे सांगितल्यावर बिपिनवर केवढे मोठे संकट आले होते, याची मला जाणीव झाली व श्रीस्वामीजींनी बिपिनला या मोठ्या संकटातून किती अलगद बाजूला केले याची पण जाणीव झाली.

दत्तजयंतीनंतर अंदाजे २३/२४ डिसेंबरला परत एकदा श्रीस्वामीजींच्या दर्शनाला जाण्याचा योग आला.

श्रीस्वामीजींच्या दर्शनाने मनाला खूपच आनंद आणि प्रसन्नता मिळत होती.

श्रीस्वामीजी रोज आश्रमातील त्यांच्या आवडत्या औदुंबरापाशी बसून आम्हा सर्वांशी खूप गप्पा गोष्टी करत. मुलांना व आम्हालासुद्धा छान छान गोष्टी सांगत असत. खूप विनोद करत. यातूनच आम्ही कसे वागले पाहिजे ते आम्हाला शिकवीत असत.

श्रीस्वामीजींसमोर तासन्तास बसून रहावे, त्यांचे सर्व बोलणे

ऐकत रहावे, त्यांच्या समोरून क्षणभरही उठू नये असे आम्हाला वाटे.

माझ्या मनातील सर्वच विचार श्रीस्वामीजींना कळतात याची पण जाणीव श्रीस्वामीजींबरोबर असताना मला होत होती.

एकदा माझ्या मनात विचार आला, आज आपण श्रीस्वामीजींसाठी बटाटे वडे बनवावेत. मी किचनमध्ये गेले. तेव्हा उत्सव असल्यामुळे अजूनही तिघी-चौघीजणी किचनमध्ये सेवेसाठी होत्या.

मला वडे करायचे आहेत हे त्यांना माहीत नसल्यामुळे त्यांनी न्याहारीसाठी दुसरा पदार्थ करण्याचे ठरविले होते. ''कुठल्याच गोष्टीचा आग्रह धरू नकोस.'' असे सौ. ताईंनी शिकविल्यामुळे मी काहीच बोलले नाही.

थोड्याचवेळात नन्या (दिगंबर) किचनमध्ये आला व मला म्हणाला, ''तुला श्रीस्वामीजींनी औदुंबराजवळ बोलाविले आहे.''

मी श्रीस्वामीजींकडे गेले. श्रीस्वामीजींसमोर त्यांची भाची व तिचे यजमान दोघेही बसले होते.

माझी व त्यांची ओळख करून देऊन श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''हे माझे जावई आहेत. प्रथमच आश्रमात येत आहेत. त्यांच्याकडे नीट लक्ष दे. त्यांच्यासाठी छान छान पदार्थ कर. तुला काय ते बटाटे वडे वगैरे करायचे असतील तर कर.''

माझ्या मनात आलेला विचार श्रीस्वामीजींनी ओळखला होता. ते माझ्याकडे बघून हसत होते.

आश्रमात कोणतीही सेवा करताना क्षणोक्षणी हीच जाणीव होत असते की, हे काम आपण करत नसून श्रीस्वामीजीच आपल्याकडून

करवून घेत आहेत.

आपल्या क्षमतेपेक्षाही अधिक काम करण्याची ताकद श्रीस्वामीजी आपल्याला देत आहेत.

एकदा आश्रमाच्या सेवेसाठी आपणही काही रक्कम द्यावी असा विचार बिपिनच्या मनात आला व त्याने आश्रमातील मुख्य गाभाऱ्यात असलेल्या दानपेटीमध्ये काही रक्कम असलेले पाकीट ठेवले.

ते पाकीट ठेवताना त्याला कोणीही पाहिले नव्हते. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीस्वामीजींचे दर्शन घेऊन आम्ही पुण्याला परत जाण्यासाठी निघालो.

पुण्यात आल्यावर दुसऱ्या दिवशी श्रीस्वामीजींचे भक्त श्री. मनोज शेंडे यांचा बिपिनला फोन आला. ते म्हणाले,''मी कालच आश्रमातून आलो आहे. श्रीस्वामीजींनी तुमच्यासाठी एक पाकीट दिले आहे व श्रीस्वामीजींचा निरोप तुम्हाला सांगायचा आहे.''

बिपिन लगेचच शेंडे यांना भेटायला गेला. श्रीस्वामीजींनी दानपेटीत ठेवलेली रक्कम असलेले पाकीट व 'तुमची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे पालटणार आहे. माझे तुमच्याकडे पूर्ण लक्ष आहे. काळजी नको.' असा निरोप श्री. शेंडे यांच्याबरोबर पाठविला होता.

नंतर जेव्हा परत आम्हाला श्रीस्वामीजींच्या दर्शनाचा योग आला. तेव्हा त्यांनी बिपिनला सांगितले, ''तू ते पाकीट दान पेटीत ठेवलेस त्याच रात्री देवतांनी येऊन मला सांगितले व तू किती रक्कम ठेवलीस हे पण मला सांगितले.''

जेवढी रक्कम पाकीटामध्ये ठेवली होती, बरोबर तेवढीच रक्कम श्रीस्वामीजींनी परत पाठविली होती.

सिद्धार्थच्या कॉलेजला सुट्टी असल्यामुळे मी आणि सिद्धार्थ आश्रमात सेवेसाठी आलो होतो. श्रीस्वामीजींच्या कृपेने रोजच्या दिनक्रमानुसार सर्व चालू होते.

एके दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे सिद्धार्थ व चेतनने मिळून सर्व मंदिरातील पूजा केल्या. मी आणि चेन्नम्मा स्वयंपाक घरात नैवेद्य करीत होतो. दुपारच्या आरतीची वेळ झाली. मी भोग घेऊन मंदिरात गेले. मंदिरात लक्ष्मीनारायणजी व चेतन पूजा करीत होते.

पोळ्या बनवायच्या राहिल्यामुळे मी आरतीसाठी न थांबता किचनमध्ये परत जात होते. जाताना बघितले तर सिद्धार्थ किचनच्या वर असलेल्या पाण्याच्या मोठ्या टाकीवर उभा होता.

मी विचारले, ''वर काय करतो आहेस? पूजेला नाही का गेलास?'' त्याने सांगितले, ''मी, बाबूमामा व श्रिनू पाण्याची टाकी साफ करीत आहोत.'' बाबू व श्रिनू टाकीत आत असल्यामुळे मला दिसले नाहीत. मी किचनमध्ये गेले. आत जाऊन पिण्यासाठी पाणी घेतले एवढ्यात काहीतरी पडल्याचा खूप जोरात आवाज झाला.

काहीतरी पडले आहे हे जाणवल्यामुळे मी आवाजाच्या दिशेने बाहेर पळाले आणि बघितले तर टाकीवर बाबू उभा होता व जोरजोरात चेतनला हाका मारत होता. मी त्याला काय झाले हे विचारत होते पण तो खूपच घाबरला होता. माझ्या लक्षात आले की, सिद्धार्थ टाकीवरून खाली पडला आहे.

जोरजोरात श्रीस्वामीजींचे नांव घेत मी सिद्धार्थ पडला होता तेथे गेले. बघितले तर सिमेंटच्या पत्र्याच्या ढिगामध्ये सिद्धार्थ पडला

होता.

पाण्याच्या टाकीत पाणी सोडण्यासाठी पंप सुरू करायचा होता म्हणून लोखंडी शिडीवरून सिद्धार्थ खाली उतरत होता व शिडीच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवताच शिडी घसरली व सिद्धार्थ दोन मजले उंच असलेल्या टाकीवरून खूप जोरात खाली पडला होता. शिडी ज्या सिमेंटच्या पत्र्यावर उभी केली होती तो सर्व सिमेंटचा पत्रा पण तुटला होता. सिद्धार्थ उभ्या उभ्या खाली पडला होता. तो पडला तेथील खालची दगडी फरशीसुद्धा फुटली होती एवढ्या जोरात तो खाली पडला होता.

पण श्रीस्वामीजींच्या प्रचंड कृपेमुळे त्याला काहीही झालेले नव्हते.

मी सिद्धार्थजवळ पोहोचले होते, पण मी त्याच्याजवळ पोहोचण्याच्या आधीच बाबू टाकीवरून येऊन त्याच्याजवळ उभा होता.

एवढ्या उंचावरून सिद्धार्थ पडला असताना मला थोडीसुद्धा भीति वाटत नव्हती. उलट वरून खाली उतरण्याचे काहीच साधन नसताना बाबू इतक्या लवकर सिद्धार्थजवळ कसा आला? याचेच मला खूप आश्चर्य वाटत होते आणि बाबूलासुद्धा तो खाली कसा आला ते आठवत नव्हते.

मागून चेतन धावत आला व मला आणि बाबूला म्हणाला, 'तुम्ही आधी सिद्धार्थकडे बघा,' असे म्हणून तो सिद्धार्थजवळ गेला.

त्याने सिद्धार्थला पाणी दिले. सिद्धार्थ श्रीस्वामीजींच्या कृपेने व्यवस्थित होता. बाबू व चेतनने मिळून त्याला उठविले व तो हळूहळू चालत खोलीत गेला. बाबू व चेतन दोघेही खूप घाबरले होते आणि ते

स्वाभाविकच होते.

ते मला सारखे म्हणत होते, आपण त्याला डॉक्टरांकडे घेऊन जाऊ. मी सिद्धार्थला विचारले, तो म्हणाला, 'मी पडलो तेव्हा उभाच्या उभा खाली बसल्यामुळे एक खूप जोरात चमक माझ्या मणक्यातून डोक्यापर्यंत गेली. मला क्षणभरच खूप त्रास झाला. असे वाटले की, माझे सगळे मणके तुटले असणार पण क्षणात ती चमक थांबली व आता मी ठीक आहे.' मी बघितले तर त्याला पाठीला, पायाला व थोडे गालाला खरचटले होते. बाकी काहीही झाले नव्हते.

बाबू व चेतन सारखे म्हणत असतानासुद्धा त्याला दवाखान्यात न्यावेसे वाटत नव्हते. खरेतर त्याला आश्रमाच्या दैवी वातावरणातून बाहेर न्यावे असे मला वाटत नव्हते. श्रीस्वामीजी आहेत, त्यांनीच सिद्धार्थला सांभाळले आहे.

''सिद्धार्थला तू दवाखान्यात नाही नेलेस तरी चालेल. तो आता ठीक आहे'' असे मी बाबूला म्हणत होते, पण बाबूचेही बरोबर होते. तो म्हणाला, ''मी नुसते त्याला डॉक्टरांना दाखवून आणतो म्हणजे ते काहीतरी औषध देतील व त्याला दुखणार नाही.''

बाबू व चेतन सिद्धार्थला दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टरांनी त्याला तपासले व सिद्धार्थ ठीक असल्याचे सांगितले.

श्रीस्वामीजींचे दर्शन होण्याच्या आधी सिद्धार्थ घरात गमतीने ओरडला किंवा त्याने कशाचाही मोठा आवाज केला तरी मला खूप घाबरायला व्हायचे.

पण श्रीस्वामीजींच्या अपार कृपेमुळे व आश्रमात असल्या-कारणाने दोन मजले उंच असलेल्या पाण्याच्या टाकीवरून सिद्धार्थ

खाली पडला असताना मला थोडीसुद्धा भीति वाटली नाही की, घाबरल्यासारखे वाटले नाही. आमच्या सिद्धार्थवर आलेले खूप मोठे संकट श्रीस्वामीजींनी अलगद दूर केले होते.

**बिपिन व सौ. अश्विनी जोशी.**

**पुणे**

ॐ

**ते ज्ञान पै गा बरवे ।**
**जरी मनी आथि आणावे ।**
**तरी या संता भजावे ।**
**सर्वस्वेसी ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. प्रतिभा मुळ्ये

**श्री**स्वामीजी अरण्यात जेथे तपस्या करत होते, तेथे आमचा दोघांचा १९८२-८३ च्या सुमारास जाण्याचा योग आला. तेथे गेल्यावर श्रीस्वामीजींचे दर्शन झाल्यावर आम्हाला खूपच आनंद झाला. तेथे आम्ही दोन दिवस होतो. श्रीस्वामीजींनी त्या दोन दिवसात आमच्या योग्यतेप्रमाणे आध्यात्मिक विषयावर आणि आपले जीवन कसे घालवावे यावर मार्गदर्शन केले. अरण्यात असूनही या दोन दिवसात श्रीस्वामीजींनी आमची खाण्यापिण्याची व्यवस्था चांगली ठेवली होती. दोन दिवसांनी चांगले आनंदित होऊन आम्ही मुंबईला परत आलो. अरण्यात श्रीस्वामीजींबरोबर जो आनंद मिळाला तसा आनंद परत क्वचितच अनुभवला. मी ऑफिसमध्ये गेले तेव्हा माझा सहकारी ख्रिश्चन मुलगा मला म्हणाला, ''मॅडम, तुम्ही कोठे गेला होतात? तुम्ही खूप फ्रेश दिसताय.'' मी त्याला म्हटले, ''अरे! अशा ठिकाणी आम्ही गेलो होतो की, तिथे तुम्हाला स्वतःचा तसेच सर्व जगाचा विसर पडेल.'' नंतर अधून-मधून आम्ही श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी जाऊ लागलो.

एकदा आम्ही अरण्यात गेलो असतांना संध्याकाळी साडेपाच ते सहा वाजता एक तेजाचा झोत येऊन औदुंबर वृक्षात गुप्त झाला. श्रीस्वामीजी म्हणाले, ''श्रीदत्त महाराजांचे आगमन औदुंबर वृक्षात झाले. तुम्ही दोघांनी या वृक्षाची पूजा करा.'' आम्ही गंध, अक्षता, रानफुले, उदबत्ती, साखरेचा नैवेद्य दाखवून औदुंबर वृक्षाची पूजा केली.

असेच एकदा आम्ही श्रीस्वामीजींकडे अरण्यात गेलो. ''चला! आपण जरा फिरून येऊ या,'' असे श्रीस्वामीजी म्हणाले. फिरता फिरता एका पाणवठ्यावर गेलो. तिथे आम्ही पाण्यात पाय ठेवून थोडा जप केला. थोड्यावेळाने निघतांना श्रीस्वामीजींनी एक सपाट पाषाण माझ्या हातात दिला. श्रीस्वामीजी ज्या कुटीमध्ये रहात असत व ध्यान करत असत त्या कुटीमध्ये मी तो पाषाण ठेवला. तोपर्यंत संध्याकाळ झालेली होती.

दुसऱ्या दिवशी पहाटे श्रीस्वामीजी तेथे गेले तर त्या पाषाणावर साक्षात् दत्त महाराज उभे असलेले श्रीस्वामीजींनी पाहिले. मला त्यांनी विचारले, ''काल दिलेला पाषाण कोठे आहे?'' मी सांगितले, ''मी तो तुमच्या ध्यानाच्या कुटीत ठेवला आहे.'' ते काय समजायचे ते समजले आणि आम्हाला तो पाषाण देऊन त्याची रोज पूजा करायला सांगितले. तो पाषाण सध्या देव्हाऱ्यात असून त्याची आम्ही दररोज पूजा करतो.

नागार्जुनसागरला गुरुपौर्णिमा, श्रीदत्तजयंती, माघ पौर्णिमा हे तीन उत्सव होतात. एकदा श्रीदत्तजयंतीच्या वेळेला मी आश्रमात गेले होते. रात्री बाराची वेळ होती. श्रीस्वामीजी त्रिफला वृक्षाखाली (वड, पिंपळ व औदुंबर यांचा एकत्रित वृक्ष) ध्यान करीत बसले होते. तेथे तीन-चार पांढऱ्या गायी श्रीस्वामीजींच्या दर्शनाला आल्या म्हणून मी (प्रतिभा मुळ्ये) श्रीस्वामीजींचे तीन फोटो काढले. त्या तीनही फोटोमध्ये

आकाशातून दिव्य किरण निघून श्रीस्वामीजींच्या ह्रदयात शिरले, असे दृश्य चित्रित झाले आहे. फोटो डेव्हलप केल्यानंतर हे दिव्य किरण आम्हाला दिसले.

श्रीस्वामीजी केव्हातरी पार्ल्याला आमच्याकडे येत असत. एकदा श्रीस्वामीजी पार्ल्याला आले असताना दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. भक्तमंडळी श्रीस्वामीजींसमोर बसली होती. श्रीस्वामीजींना विचारले, ''जेवायला वाढू का?'' ते म्हणाले ''थांबा! मी सांगतो.'' आणि दहा मिनिटांनी ''जेवायला वाढा'' असे म्हणाले. मी जेवण वाढणार इतक्यात दारावरची बेल वाजली. मी दार उघडले. माझी आई श्रीस्वामीजींसाठी ढोकळा घेऊन आली होती. श्रीस्वामीजी म्हणाले, ''मी तुम्हाला थांबा म्हणून सांगितले का ते कळले का? तुमची आई येणार हे मला समजले होते.'' श्रीस्वामीजी चराचरात आहेत हे या वाक्यावरून सिद्ध होते.

एकदा श्रीस्वामीजी मुंबईला आले होते. मी नेहमी नवनाथ पोथी वाचत असे. तो दिवस श्रावण महिन्यातील शेवटचा शुक्रवार होता. श्रावण महिन्यात मी नवनाथ पोथीचे पारायण केले. नवनाथ पोथीचे चाळीस अध्याय आहेत. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी मी दोन अध्याय वाचत असे. श्रावणातील शेवटच्या शुक्रवारी माझ्या पोथीचे पारायण संपले. मी नवनाथांना प्रार्थना केली, ''मला जशी जमेल तशी मी पोथी वाचली, ती तुमच्यापर्यंत पोहोचली का? याची मला प्रचीती द्या.'' सकाळची प्रार्थना मी विसरून गेले. त्याच दिवशी श्रीस्वामीजींचा फोन आला. मी त्यांना म्हणाले, ''आमच्याकडे जेवायला येता का?'' ते म्हणाले, ''मी येतो व बरोबर काही मंडळींना घेऊन येतो.'' श्रीस्वामीजी येणार म्हणून आम्हाला खूप आनंद झाला.

त्या दिवशी पुरणपोळी, खिचडी, वरण-भात असा नैवेद्य तयार केला. श्रीस्वामीजी व भक्त मंडळी जेवायला बसली. श्रीस्वामीजी सोफ्यावर बसून, टीपॉयवर ताट ठेवून जेवायला बसले. समोर गोल आकारात भक्तमंडळी खाली जेवायला बसली होती. जेवत असताना श्रीस्वामीजी म्हणाले, ''तुमच्याकडे कोण जेवायला आले माहीत आहे का? ही जेवायला बसलेली मंडळी नवनाथ व दहावा दत्त तुमच्याकडे जेवायला आलो आहोत.'' हे ऐकून मला खूप आनंद झाला.

श्रीस्वामीजी सतत आपल्याबरोबर आहेत याचा अनुभव नेहमीच आम्हाला येत असतो. एकदा मी हवन करत होते. पेटलेला कापूर केव्हा सिंथेटीक साडीवर पडला हे माझ्या लक्षात आले नाही पण साडीला काहीही झाले नाही. ही गोष्ट मी श्रीस्वामीजींना कळवली. तेव्हा श्रीस्वामीजी आश्रमात होते. त्याचवेळी एका स्त्रीच्या साडीला लागलेली आग श्रीस्वामीजींनी विझवली होती.

एकदा मी रस्ता क्रॉस करत असताना सहा माणसे बसलेल्या एका फियाट कारचे चाक माझ्या पायावरून गेले. परंतु माझ्या पायाला यत्किंचितही दुखापत झाली नाही. एकदा रात्री नऊच्या सुमारास श्रीस्वामीजींनी फोन केला. मी त्यांना विचारले, ''जेवायला येता का?'' ते म्हणाले, ''मी सदैव तुमच्याजवळ आहे. जेवण झाल्यावर डोळे मिटून देवाजवळ बसा.'' त्याप्रमाणे डोळे मिटून मी देवाजवळ बसले. तेव्हा श्रीस्वामीजी भव्य रूपामध्ये जवळ येताना दिसले. जवळ येऊन ते म्हणाले, ''मातोश्री! काय करत आहात?'' असे म्हणून अदृश्य झाले.

एकदा श्रीस्वामीजींनी आपल्या भावास सांगितले, ''तू मुळ्ये काकांचे रत्नागिरीचे घर जरा उघडून बघ. मला काहीतरी गडबड दिसत आहे.'' भाऊ कामात व्यस्त असल्याने म्हणाला, ''ठीक आहे!

दोन दिवसात बघतो.''

नंतर त्याने जेव्हा घर उघडून बघितले, तेव्हा घरात एक उंदीर मरून पडलेला आढळला व त्याचा अत्यंत घाणेरडा वास घरात सर्वत्र पसरलेला होता. ते संपूर्ण घर फिनाईलने साफ करण्यास त्याला तीन ते चार तास लागले.

आमच्या रत्नागिरीच्या घरात अधून-मधून हिना अत्तराचा वास बऱ्याचवेळा येत असतो. श्रीस्वामीजींच्या अस्तित्वाची सतत जाणीव होत असते.

मी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर श्रीस्वामीजींचा फोन आला, ''तुम्ही सोमवार, गुरुवार, शनिवार तीन दिवस चोवीस तास दूध आणि फळे खाऊन उपवास कराल का?'' घरचे सर्वजण विचारात पडले कारण मला उपवासाचा त्रास होतो हे त्यांना माहीत होते. मी त्यांना म्हणाले, ''पाहूया, सुरुवात करूया. नाही झाले तर श्रीस्वामीजींना तसे सांगू.'' श्रीस्वामीजी म्हणाले, ''५४ उपवास केले म्हणजे साधारण, ७४ उपवास मध्यम व १०८ उपवास उत्तम!'' एक दिवस उपवास केला तर त्रास होणारी मी श्रीस्वामीजींच्या कृपाशीर्वादाने १०८ सोमवार, १०८ गुरुवार, १०८ शनिवार काहीही त्रास न होता, एकही उपवास न बुडता पूर्ण केले.

श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तकांचे लोकांना खूप चांगले अनुभव आले. कोणाला मनःशांती मिळाली, कोणाचे आजार बरे झाले, कोणाला मूल झाले, कोणाला मुलगा हवा होता त्यांना मुलगा झाला, कोणाचे लग्न जमत नव्हते ते लग्न जमले, कोणाचे कर्ज फिटले. घरात पैसा पुरत नव्हता तो पुरू लागला, कोणाचे दारूचे व्यसन सुटले, अगदी सुशिक्षित माणसांपासून मजूर, गवंड्यांपर्यंत लोकांना अनुभव आलेले

आहेत.

काकांची तब्येत शेवटपर्यंत चांगली होती. त्यांच्या वयाच्या ५४-५५ व्या वर्षी गंडांतर होते. ते श्रीस्वामीजींनी दूर केले. त्यामुळे श्रीस्वामीजींच्या कृपेने काकांचे आयुष्य १०-१२ वर्षांनी वाढले आणि ५ ऑक्टोबर २००७ ला काका या जगातून गेले. त्यांचा मृत्यू त्यांना कळलाच नाही. फूल जसे उमलते-मिटते तसे काकांचे जीवन संपले. माझ्यावर आभाळ कोसळले.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''गंडांतर टाळता येते पण मृत्यू टाळता येत नाही. मला वेळ द्या. मी तुम्हाला चांगली उभी करतो.''

जीवनात अडीअडचणी येत असताना श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''तुम्ही काळजी करू नका, ईश्वर तुमची काळजी करेल.'' मला नेहमीच तसा अनुभव येत असतो.

विशेष म्हणजे प्रारब्धाचे भोग भोगत असताना अडी-अडचणींना तोंड देत असताना श्रीस्वामीजींच्या कृपाशीर्वादाने सतत प्रेरणा मिळून जीवन सुरळीत चालले आहे. आता मी जी काही उभी आहे व शांततेने जीवन जगत आहे, ती श्रीस्वामीजींच्या कृपेमुळेच! आता एकच इच्छा आहे की, शेवटच्या श्वासापर्यंत ईश्वरचिंतन व सेवा व्हावी.

ॐ

# श्री. प्रभाकर मुळे

**श्री.** प्रभाकर मुळ्ये यांना श्रीस्वामीजी ‘काका’ म्हणत असत. त्यामुळे सगळे त्यांना ‘काका’ म्हणत असत. श्री. प्रभाकर मुळ्ये यांचा उल्लेख याच्यापुढे ‘काका’ म्हणून करत आहे.

काका सॉलिसिटर होते व एका सॉलिसिटर फर्ममध्ये भागीदार होते. काकांना ती फर्म सोडा असे श्रीस्वामीजी सतत सांगत होते. काकांच्या स्वभावानुसार आपण काय करायचे असा ते विचार करत होते. ती भागीदारी फर्म सोडायला काकांनी सहा महिने लावले. ज्या दिवशी काकांनी भागीदारी फर्म सोडली त्याच्या दुसऱ्या दिवशी काकांना M. S. E. B. ची ३६ Arbitrations मिळाली आणि श्रीस्वामीजींच्या कृपेने शेवटपर्यंत पैशाचा ओघ सतत येत होता.

डिसेंबर २००० मध्ये श्रीदत्तजयंतीच्या दिवशी भगवान् दत्तात्रेयांनी काकांना स्वप्नात दर्शन देऊन एक विशिष्ट मंत्र दिला व त्याचा जप करण्यास सांगितले. ‘‘आत्तापर्यंत तू जी काही सेवा केलीस त्याने तुझे गतजन्मीचे प्रारब्ध शुद्ध झाले असून यापुढे तू जी काही सेवा करशील, त्याचा उपयोग तुझ्या पुढील जन्मासाठी होईल,’’ असे सांगितले. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीस्वामी समर्थ सप्तशती, श्रीदुर्गा सप्तशती, श्रीदुर्गा त्रिशती, श्रीदत्तलीलामृत, श्रीसिद्धलीलामृत,** या श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या पोथ्यांचे सर्वांना चांगले अनुभव आले.

एकदा त्यांच्याकडे एक पती-पत्नी वकिली सल्ला घेण्यासाठी आले. सून बरोबर वागत नाही, भांडण करते व न सांगता माहेरी निघून जाते, अशी तक्रार केली. मुलाला घटस्फोट मिळवून द्या अशी

विनंती सासऱ्यांने काकांना केली. त्यासाठी ते आवश्यक तो खर्च करायला तयार होते.

काकांनी त्यांची समजूत घातली व आपल्या जवळील **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी त्यांना दिली. वकिलांचा हा विचित्र सल्ला ऐकून सासरेबुवा चक्रावले परंतु सासूने पोथी घेतली व मी जरूर वाचेन असे सांगितले. त्यानंतर आठ-दहा दिवसांनी पती-पत्नी परत आले व पुढीलप्रमाणे सासरेबुवा म्हणाले, ''माझी यावर मुळीच श्रद्धा नव्हती. परंतु माझ्या बायकोने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरू केल्यानंतर आमच्या घरातील वातावरणच पालटून गेले. घरात एक प्रकारची शांतता निर्माण झाली. एक प्रकारचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तिसऱ्या दिवशी सून घरी परत आली. तिच्या स्वभावातही बराच फरक पडला. आता आम्ही सुखी आहोत,'' असे म्हणून त्यांनी श्री. प्रभाकर मुळ्ये यांना शाल व श्रीफळ अर्पण केले व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** आणखी प्रती मागून घेतल्या.

एकदा काकांनी निवस्कर नावाच्या एका सद्‌गृहस्थांना भेटून सांगितले, ''मी तुम्हाला काही सद्‌ग्रंथ भेट देणार आहे. तुम्ही रविवारी जरूर माझ्याकडे या!'' या गोष्टीचा निवस्कर यांना विसर पडला. शनिवारी रात्री निवस्करांच्या पत्नीच्या स्वप्नामध्ये अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ आले व म्हणाले, ''तुझ्या नवऱ्याला उद्या मुळ्ये यांच्याकडे पुस्तके घेण्यास पाठव!'' असे म्हणून श्रीअक्कलकोट स्वामी अदृश्य झाले. हा अनुभव ऐकून निवस्करांना अतिशय धन्य वाटले. त्यांनी काकांकडे येऊन हा अनुभव सांगितला व श्रद्धेने पुस्तके घेतली.

काकांच्या परिचयाचे एक वयस्कर गृहस्थ होते. त्यांच्या मुलाचे व त्यांचे संबंध दुरावले होते. सूनही त्यांच्याशी व्यवस्थित वागत नसे.

या गृहस्थांचा मुलगा व सून मुंबईच्या बाहेर रहात. मुलगा आपल्या वडिलांना भेटायला येत नसे व फोनही करत नसे. त्यामुळे हे गृहस्थ बेचैन असायचे. काकांनी त्यांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले व ही पोथी रोज वाचायला सांगितली. त्या गृहस्थाने ही पोथी वाचायला सुरुवात केल्यानंतर त्यांच्या मुलाचा फोन आला. हळूहळू त्यांचे संबंध सुधारले. आता मुलगा व सून अधून-मधून त्यांच्याकडे येतात व रहातात. मुलगा नास्तिक होता तोसुद्धा आता देवपूजा करतो व उपवास करतो. आता ते वयस्कर गृहस्थ आनंदात जीवन जगत आहेत.

श्रीस्वामीजी अधून-मधून विलेपार्ले येथे आमच्याकडे रहायला येत असत. त्यावेळी श्रीस्वामीजींचे वय २९-३० वर्षांचे होते. अरण्यामध्ये त्यांची साधना व तपस्या चालू होती. कधीतरी वर्षातून एकदा पार्ल्याला आमच्याकडे येत असत. एकदा काकांचे व त्यांचे ज्योतिषशास्त्रावर काही बोलणे चालले होते. काकांनी त्यांना पार्ल्यात रहाणाऱ्या श्री. बापट ज्योतिषी यांची माहिती सांगितली. तेव्हा श्रीस्वामीजींनी काकांना आपली पत्रिका दिली व बापट ज्योतिषी काय म्हणतात ते बघायला सांगितले. ज्योतिषी बापट यांना काकांनी श्रीस्वामीजींची पत्रिका दाखवली. श्री. बापट म्हणाले, ''ही सिद्ध पुरुषाची पत्रिका आहे.'' काकांना हे ऐकून आश्चर्य वाटले. यांना परब्रह्माची व परब्रह्मातीत अवस्था कधी प्राप्त होईल? असा प्रश्न काकांनी बापटांना विचारला. बापट म्हणाले, ''यांना परब्रह्माची अवस्था प्राप्त झालेली आहे. यांचा जन्म फक्त लोकोद्धार कार्यासाठी झालेला आहे.''

वसुधा वाघ यांना काकांनी जेव्हा श्रीस्वामीजींची पत्रिका दाखवली, तेव्हा वसुधा वाघ म्हणाल्या, ''ही दत्तावतारी सिद्धपुरुषाची

पत्रिका आहे. या पत्रिकेचा अनेक बाजूंनी अभ्यास केल्यावर हे साक्षात् सिद्धपुरुष आहेत हे सिद्ध होते. कुंडलिनी व षट्चक्रे या गोष्टी यांच्याबद्दल बोलणे हा पोरखेळ आहे. या सर्व गोष्टींच्या पलीकडे ते गेलेले आहेत.''

''श्रीस्वामीजींची पत्रिका घेऊन तुम्ही ज्यावेळी माझ्या रूममध्ये एंट्री केली, तेव्हा तुमच्या पाठीमागे एक वलय होते. तेव्हाच मी ओळखले, तुम्हाला सिद्धपुरुषाचा आशीर्वाद आहे.''

**सौ. प्रतिभा मुळ्ये**
**ठाणे**

**जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंठा ।**
**तो स्वाधीन करी सुभटा । ओळगोनी ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. नलिनी उमेश राव

**मे** १९९५ मधली घटना. माझा मुलगा निलेश हा त्यावेळी इंजिनिअरींगच्या तिसऱ्या वर्षाला शिकत होता. त्या वर्षीची दुसऱ्या सेमिस्टरची परीक्षा होती. तो आधीचा पेपर देऊन आला होता. त्याच्या अंदाजानुसार त्याने कमीतकमी मार्कांचा पेपरसुद्धा सोडवला नव्हता. त्याचा परिणाम त्याच्या पुढच्या पेपरवर होऊन तो मला रात्री म्हणाला, ''आई! मी उद्याच्या पेपरला जात नाही!'' मनातून मी एकदम धास्तावले. काय करावे सुचेना! त्याचा आत्मविश्वास गेला तर काय करायचे या विचाराने मी अस्वस्थ झाले. त्यावेळी आम्ही व श्री. मुळ्येकाका, बहीण प्रतिभा मुळ्ये पार्ल्याला एकत्र रहात होतो. सकाळ होताच ही हकीकत मुळ्येकाकांच्या कानावर घालावी, असे मला वाटले.

मी ही गोष्ट मुळ्येकाकांच्या कानावर घातली, त्यावेळी श्रीस्वामीजी घाटकोपर येथे सौ. वनिता दीक्षितताईंकडे होते. त्यांनी श्रीस्वामीजींना सर्व परिस्थिती सांगितली. श्रीस्वामीजी म्हणाले, ''काळजी करू नका! तुम्ही निलेशला श्रीदत्तस्तोत्र म्हणायला सांगा

आणि पंधरा मिनिटांनी फोन करा.''

त्याप्रमाणे निलेशने श्रीदत्तस्तोत्र म्हणायला सुरुवात केली आणि पंधरा मिनिटांनी मुळ्येकाकांनी श्रीस्वामीजींना फोन केला. त्यावर श्रीस्वामीजी म्हणाले, ''निलेशला फोन द्या.'' निलेश फोनवर आला.

श्रीस्वामीजी निलेशला म्हणाले, ''अरे कालच्या पेपरमध्ये तू पास आहेस आणि आजही तुझा पेपर चांगला जाणार आहे! तू परीक्षेला जा!'' असे श्रीस्वामीजी म्हणताच त्याला जो आत्मविश्वास आला, त्याचे वर्णन मी शब्दात सांगूच शकत नाही. तो आणि मी रिक्षाने गेलो, त्याने मला बँकेत सोडले आणि तीच रिक्षा घेऊन कॉलेजला गेला, पेपर देऊन आला व म्हणाला, 'पेपर बरा गेला.' काही दिवसांनी रिझल्ट लागला.

पहिल्या पेपरमध्ये ४० टक्के मार्क मिळाले आणि दुसरा पेपरही चांगला सुटला. निलेश म्हणाला, ''आई! मी पहिल्या पेपरमध्ये ४० मार्कांचे प्रश्न सोडवलेच नव्हते. तरीपण श्रीस्वामीजींनी मला हे मार्क्स दिले. हा माझा अनुभव मी आयुष्यभर लक्षात ठेवीन.''

## मला पडलेले स्वप्न

**सा**धारण १९९६ च्या सुमारास मला स्वप्न पडले...

''मी आणि माझी मैत्रीण विद्या तिजोरीवाला. स्वप्नात आम्हाला सांगितले गेले की, एका मोठ्या पर्वतावर अनेक सत्पुरुष आहेत. आम्ही दोघी त्यांच्या दर्शनासाठी गेलो. साधू पुरुषांचे दर्शन घेत आम्ही वर पोहोचलो. सर्व सत्पुरुषांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केले होते व ते सर्व वृद्ध होते.

दर्शन घेता घेता आम्ही खूप दमलो, पण आता एकच सत्पुरुष वरती आहेत, असे आम्हाला कोणीतरी सांगितले. कसेबसे तो डोंगर चढून आम्ही तेथे जाऊन त्यांचे चरणावर आधी डोके ठेवले आणि वर पाहिले तो काय आश्चर्य, श्रीस्वामी दत्तावधूतांचेच दर्शन झाले. ते आम्हाला म्हणाले, ''माझ्याकडे येण्यासाठी एवढा त्रास पडतो का?''

माझे यजमान श्री. उमेश ग. राव हे आजारी होते. एकवीस दिवस हॉस्पिटलमध्ये राहून सर्व प्रकारच्या टेस्ट करून घेतल्यानंतर तो त्रास ॲसिडीटीचा आहे असे निदान झाले. आम्ही घरी आलो.

घरी आल्यावर ॲसिडीटी बाजूलाच राहिली. त्यांच्या डोक्यातून गरम गरम वाफा बाहेर पडू लागल्या. त्या त्यांना सहनच होईनात. हे परत हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यावर ट्रीटमेंट घेऊ म्हणून हट्ट धरू लागले कारण त्याचा त्यांना खूपच त्रास होऊ लागला.

त्याचवेळी प. पू. दत्तावधूत स्वामींचे आम्ही दर्शन घेतले. आम्हाला मोठा दिलासा मिळाला. ते म्हणाले, ''हॉस्पिटलमध्ये जाण्याची काही गरज नाही. १४ दिवस दत्ताला दररोज १०८ प्रदक्षिणा घाला.''

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवसापासून श्रीदत्ताला प्रदक्षिणा घालायला लागलो. दोनच दिवस झाले असतील. प्रदक्षिणा घालून आम्ही देवळातून घरी आलो. घरी आल्यावर माझे यजमान प. पू. दत्तावधूत स्वामींच्या फोटोसमोर बसले. त्यांच्यासमोर श्रीस्वामीजी प्रकट झाले. त्यांनी माझ्या यजमानांना गरगर फिरवले आणि म्हणाले, ''थांब! तुझे जे काही आहे ते काढून टाकतो!'' आणि काय आश्चर्य! त्या क्षणापासून काहीही औषध न घेता त्यांना बरे वाटू लागले ते

आजपर्यंत!

ही २००२-२००३ सालची गोष्ट असेल. मी, श्री. मुळ्येकाका व माझी बहीण सौ. मुळ्येताई नागार्जुनसागरला जात होतो. रेल्वेची साध्या सेकंड क्लासची तिकिटे काढली होती. आम्हाला सीटस् सुध्दा दरवाज्याजवळ मिळाल्या होत्या.

मुंबई-हैद्राबाद एक्सप्रेस ही गाडी कल्याणहून दुपारी २-३० वाजता सुटली. रात्री १ च्या सुमाराला ती गाडी गाणगापूर स्टेशनला सिग्नलसाठी म्हणून थांबली. तिथे तिचा थांबा नव्हता. बाहेर मिट्ट काळोख होता. इतक्यात माझ्या हातातील पर्सला जोरात धक्का बसला. मी जागी झाले आणि 'गुरुचरित्र गुरुचरित्र' असे म्हणत उठले. इतक्यात समोरच्या वरच्या सीटवर एक मुस्लिम मुलगा झोपला होता. तो पटकन उठला आणि त्या चोराच्या मागे धावत सुटला. एवढा धावला की चोराने ती पर्स खाली रूळावरती फेकून दिली. त्या मुलाने ती पर्स उचलून जशीच्या तशी माझ्या हाती आणून दिली. मी त्या मुलाला बक्षीस देऊ इच्छित होते पण त्याच्याबरोबरचा मुलगा म्हणाला, ''वो कुछ लेगा नहीं!'' सकाळी उठल्यावर ती मुले मला पुन्हा कोठे दिसली नाहीत.

दुसऱ्या दिवशी आम्ही आश्रमात पोहोचलो. श्रीस्वामीजींच्या कानावर ही गोष्ट घालण्याआधीच निरोप आला की, नलूताईंना म्हणावं, ''एक भक्त (बाई) आली आहे. तिचे ऑपरेशन आहे. तिला २५०० रुपये दे.''

या अनुभवावरून,

**“सकल निधीके तुम कारण हो ।**

**सकल विश्वतारण हारे हो ।**

**तुम सम और नही तुमही हो ।**

**हे सत् अवतारो ।।”**

या आरतीच्या ओळी आठवतात.

ॐ

## श्री. निलेश उमेश राव

**श्री.** निलेश उमेश राव, रहाणार ठाणे. माझे इंजिनिअरिंगचे शिक्षण सन २००० मध्ये पूर्ण झाले. परंतु नोकरी मिळण्यात अपयश येत होते. अनेक प्रयत्न करूनही सर्व ठिकाणाहून नकारच येत होता आणि दिवसागणिक अस्वस्थता वाढत होती. अशात प. पू. श्रीस्वामीजींचा निरोप आला, “आश्रमात जाऊन रहातोस का?” मी लगेच तयार झालो व लगेचच आश्रमात गेलो. आश्रमात जे काही काम माझ्या वाट्याला येत होते ते करत होतो. जवळजवळ दोन महिने आश्रमात सेवा केल्यावर परत जाण्याचा निरोप आला. परत आल्यावर मी एका सॉफ्टवेअर कंपनीमध्ये इंटरव्ह्यू दिला. तिथे जवळजवळ २०-२५ मुले ट्रेनी पोस्टसाठी आली होती. इंटरव्ह्यू दिला व श्रीस्वामीजींच्या कृपेने माझी निवड झाली. श्रीस्वामीजींच्या कृपेने ती नोकरी मिळाली आणि करिअरला चांगली सुरुवात झाली ती आजपर्यंत!

एकदा मी, श्री. मुळ्येकाका व मम्मी (मुळ्येकाकी) आम्ही तिघे नागार्जुन सागरला गेलो होतो. आमचे बरोबर श्री. दाभोळकरसुद्धा

होते. त्यावेळी तिकडचा पाण्याचा एक पंप मुंबईला आणायचा होता. श्रीस्वामीजी म्हणाले, ''हा पंप तुम्ही मुंबईला घेऊन जा.'' आम्ही तेथे चार-पाच दिवस राहून निघालो. मी तो पंप खांद्यावर उचलून घेतला होता. त्यावेळी आम्ही बसने हैद्राबाद येथे आलो. तेथून रेल्वे स्टेशनवर आलो. त्यानंतर ट्रेनने तो पंप दादरवरून नेरूळ येथे मम्मी-काकांच्या घरी नेला.

पंप घरी नेल्यावर मला एकदम आश्चर्य वाटले. त्या पंपाचे वजन २०-२५ किलो असले पाहिजे. मला वजन उचलायची अजिबात सवय नसतांना मी हा पंप कसा काय उचलून आणला आणि विशेष म्हणजे दुसऱ्या दिवशी अजिबात अंग वगैरे दुखले नाही. मनात आले, श्रीस्वामीजी किती काळजी घेतात. तो पंप त्यांनी हलकाच करून टाकला, म्हणून माझ्यासारख्या माणसाला तो उचलता आला.

ॐ

## सौ. स्वाती निलेश राव

**मी** सौ. स्वाती राव. मी ठाण्याला रहाते व ऐरोली (नवी मुंबई) येथे काम करते. मी ज्या रस्त्याने जाते त्या रस्त्यावर नेहेमीच खूप वर्दळ असते. वर्दळीचा त्रास वाचावा व लहान गाडी लवकर मार्ग काढू शकते म्हणून मी दुचाकीने कामावर जाते. एकदा कामावर जात असताना, नुकताच सिग्नल सुटला होता. सर्व गाड्या वेगात होत्या आणि रस्त्यावर सांडलेल्या तेलावरून माझी दुचाकी घसरली (स्किड झाली). साधारण चार फूट घसरून दुचाकी रोड डिव्हायडरवर

आपटली व पुन्हा रस्त्याच्या मधोमध आली. रस्त्याच्या मधोमध एक ट्रक बंद पडला होता. चालक चावी देऊन ट्रक चालू करण्याचा प्रयत्न करत होता पण तो ट्रक चालू होत नव्हता. गाडी घसरत असताना ट्रकचा तो आवाज मला स्पष्ट ऐकू येत होता. माझी गाडी त्या बंद ट्रकच्या टायरवर आपटली आणि गाडी घसरायची थांबली. एवढे सगळ होऊनही मी स्वतः कोणाचीही मदत न घेता उठले व गाडी उचलली. मला व गाडीला काहीही झाले नव्हते. साधे खरचटलेसुद्धा नव्हते. मी उठल्यानंतर बंद असलेला ट्रक चालू झाला व निघून गेला.

चालता ट्रक बंद पडल्याने इतर वाहनांना थांबावे लागले किंवा वेग कमी करावा लागला. त्यामुळे मी जेव्हा रस्त्यावर पडले तेव्हा इतर वाहने माझ्यापासून लांब होती. जर तो ट्रक थांबला नसता तर गाडीची घसरण थांबली नसती व मी अंदाजे ट्रकच्या मागच्या चाकाखाली आले असते.

देवांनी जणू माझा जीव वाचवण्यासाठीच तो ट्रक बंद पाडला होता अशी माझी खात्री आहे.

मला एक मुलगी आहे. तिचे नाव ज्योतिका. ती साधारण दोन-तीन महिन्याची होती तेव्हाची गोष्ट. ज्योतिका नुकतीच पायावर जोर देऊन मागे सरकायला शिकली होती. आम्ही कॉटवर झोपलो होतो. ज्योतिका उठली व तिने पायावर जोर देऊन मागे व्हायला सुरुवात केली. ती कॉटच्या काठावर आली व ढोपरांवर तोल सांभाळून लटकत होती. मी गाढ झोपले होते. तेवढ्यात मला असे वाटले की मला कोणीतरी उठवत आहे. मी उठले आणि हा सगळा प्रकार पाहून हादरले व ज्योतिकाला पटकन उचलले. नवल म्हणजे ती लटकली कशी? दोन-तीन महिन्यांच्या मुलांच्या अंगात ढोपरांनी तोल सांभाळण्याएवढी

ताकद असते का?

मला त्याक्षणी असे वाटले की कोणीतरी तिला अलगद धरून ठेवले होते व मला त्यांनीच उठवले.

**सौ. स्वाती निलेश राव**

**ठाणे**

ॐ

**तरी तनु मनु जिवे । चरणासी लागावे ।**
**आणि अगर्वता करावे । दास्य सकळ ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# श्री. विश्वास निमकर

**सि**प्ला कंपनीत मी काम करीत असताना कामानिमित्त निरनिराळ्या ठिकाणी जावे लागे. असेच एकदा हैद्राबादला जायचे होते. हैद्राबादला कामाच्या दिवसांमध्ये रविवार येत होता. रविवारी सर्वांना सुट्टी असल्यामुळे कंपनीचे कोणतेही काम करता येण्यासारखे नव्हते म्हणून त्या दिवशी नागार्जुनसागरला जाण्याचा बेत केला. नागार्जुनसागरला काही वस्तूपण न्यायच्या होत्या. अनायासे मी जाणार होतो म्हणून त्या वस्तूपण नेण्याचे निश्चित केले. नागार्जुनसागरला जाण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. ठरल्याप्रमाणे रविवारी सकाळी मी हैद्राबादच्या एस्. टी. स्टॅण्डवर पोहोचलो. पण बसवरील पाट्या वाचता येत नव्हत्या कारण त्या तेलगु भाषेत लिहिल्या होत्या. चौकशी खिडकीवर पायलॉनला जाणाऱ्या बसचा नंबर विचारून घेतला व ती बस शोधायला लागलो. त्या बसपाशी पोहोचलो तेव्हा ती बस निघतच होती. मी पटकन आत चढलो व बस पायलॉन कॉलनीवरूनच जाणार ना याची खात्री केली. बस पूर्ण भरली होती व ३-४ प्रवासी उभे होते. आता उभ्यानेच प्रवास करावा लागणार असे मनात आले.

इतक्यात ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर बसलेल्या पांढरी लुंगी नेसलेल्या प्रवाशाने मला हाक मारली व म्हणाला, ''आपको पायलॉन कॉलनी जाना है ना? आईये आप यहाँ बैठिये।'' असे म्हणून त्याने आपली सीट मला दिली व स्वतः बसच्या मागील भागाच्या सीटवर तीन प्रवासी बसलेले असतानासुद्धा चौथा प्रवासी म्हणून बसला. त्याने मला सीट का दिली? व स्वतः अडचणीत का बसला? याचे मला आश्चर्य वाटले.

एकेकाळी श्रीस्वामीजी व त्यांचे भक्त वारंवार एकत्र येत असत व आध्यात्मिक चर्चेतून श्रीस्वामीजी मार्गदर्शन करत असत. त्या काळी श्रीस्वामीजींचा मुक्काम विलेपार्ले येथे मुळ्येकाकांच्या घरी किंवा घाटकोपरला सौ. दीक्षितताईंच्या घरी असे. श्रीस्वामीजींबरोबर चर्चा बहुतेकदा रात्रीच होत असे व बऱ्याचवेळा रात्री दोन-दोन वाजेपर्यंत चाले. अशाच एका रात्री विलेपार्ल्याला मुळ्येकाकांच्या घरी आम्ही जमलो होतो. त्यामध्ये मी, मुळ्येकाका व उमेशरावांच्या घरातील मंडळी, श्री. व सौ. साडविलकर होते. श्रीस्वामीजी आध्यात्मातील एका विषयावर बोलत होते. अचानक मला खोलीतील ट्यूब लाईटचा प्रकाश आल्हाददायक वाटू लागला व आजूबाजूचे वातावरण प्रसन्न वाटू लागले. ही अनुभूती सुमारे १० ते १५ सेकंद मिळाली व नंतर मी पूर्वपदावर आलो. मला समजेना असे का झाले; पण मी गप्प राहिलो. सुमारे १०-१५ मिनिटांनी श्रीस्वामीजींनी मला विचारले, ''काय रे विश्वास, तुला काही निराळे जाणवले का?'' मी ''हो'' म्हटले. ''काय जाणवले?'' श्रीस्वामीजींनी विचारले. ''ट्यूबलाईटचा प्रकाश आल्हाददायक वाटला व आजूबाजूचे वातावरण एकदम प्रसन्न वाटले'' मी उत्तरलो. ''बरोबर आहे! कारण तुझ्या अंगावर आकाशातून आलेले वैश्विक किरण (cos-

mic rays) पडले होते,'' श्रीस्वामीजींनी खुलासा केला.

श्रीस्वामीजींना भेटून सुमारे पंधरा वर्षांचा काळ लोटला होता. त्यांची केव्हा एकदा परत भेट होईल असे झाले होते पण योग येत नव्हता. एप्रिल २०१४ मध्ये एका रात्री मला स्वप्न पडले. स्वप्नात आश्रमातील एका झाडाखाली कठड्यावर श्रीस्वामीजी बसले होते. मी त्यांच्यासमोर बसलो होतो. मला म्हणाले, ''अरे विश्वास! आहेस कोठे तू!'' मी म्हणालो, ''मी येथेच आहे.'' मी असे बोलताच श्रीस्वामीजींनी डोळे मिटले व प्रचंड वेगाने वारा वाहू लागला. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की मला वाटले, मी माझ्या जागेवरून उडून जातो की काय? वाऱ्याबरोबर माझ्या अंगातून काळ्या धुरासारखा पदार्थ बाहेर पडत होता. थोड्यावेळाने वारा थांबला. नंतर श्रीस्वामीजींनी मला पुढे विचारले, ''काय ठीक चालले आहे ना?'' मी म्हणालो, ''ठीक आहे! पण... '' इतक्यात आश्रमातून एक सेवक श्रीस्वामीजींना काही निरोप सांगण्यासाठी आला व माझे स्वप्न संपले.

(या स्वप्नातील दृश्य दि. ११-८-२०१४ रोजी नागार्जुन-सागरच्या आश्रमात विश्वासने प्रत्यक्ष अनुभवले.)

ॐ

**नवल अहंकाराची गोठी । विशेषे न लगे अज्ञाना पाठी ।**
**सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# निरुपमा शेवडे

## चोरांपासून रक्षण

**मी** निरुपमा शेवडे, व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टंट असून हा प्रसंग माझ्या ऑफिसमध्ये घडलेला आहे. एके दिवशी सकाळी आठ वाजायच्या सुमारास आमच्या शेजारच्या ऑफिसमधून घरी फोन आला की, तुमच्या ऑफिसचा दरवाजा कोणीतरी पूर्णपणे फोडलेला आहे.

ऑफिसमध्ये दोन कॉम्प्युटर्स, दोन प्रिंटर्स, फॅक्स मशीन, इंटरकॉम, कॅलक्युलेटर्स, क्लाएंटस्‌च्या फाईल्स, पुस्तके, स्टेशनरी असे बरेच सामान होते. तसेच माझे काका व मावशी, श्री. प्रभाकर मुळ्ये व सौ. प्रतिभा मुळ्ये यांचे श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या आत्मसिद्धी व मानवी जीवनातील गूढ रहस्ये या पुस्तकांचे गठ्ठेदेखील ठेवले होते. एक संपूर्ण कपाट या पुस्तकांनी भरलेले होते.

फोन येताच नक्की कुठल्या वस्तूंची चोरी झाली असेल व चोरांनी किती नासधूस केली असेल असा विचार करतच मी ऑफिसमध्ये जायला निघाले. ऑफिसमध्ये जाऊन बघते तर दरवाजा

संपूर्णपणे तोडलेला होता. मी घाबरतच ऑफिसमध्ये प्रवेश केला व नक्की काय चोरीला गेले याचा शोध घेऊ लागले.

तेथील सर्व परिस्थिती बघून माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. कारण एकही वस्तू जागची हलली नव्हती व काहीच चोरीला गेले नव्हते. सर्व सामान व्यवस्थित जागेवर होते.

श्रीस्वामीजींच्या पुस्तकात दैवीशक्ती आहे हे ऐकून माहीत होते. त्या पुस्तकातील दैवी शक्तीनेच चोरांपासून ऑफिस व त्यातील सर्व सामानाचे रक्षण केले.

## लग्न ठरले

**मा**झा भाऊ उन्मेष शेवडे. याचे अडीच - तीन वर्षे लग्न ठरत नव्हते. तीन वर्षांत कितीतरी मुली बघितल्या पण लग्नाचा योग काही जुळून येत नव्हता. याला कारण म्हणजे त्याला अतिशय जास्त नंबरचा जाड चष्मा होता व आपल्या या उणिवेबद्दल त्याला कुठल्याही मुलीपासून काहीही लपवून ठेवायचे नव्हते. मुली या उणिवेबद्दल समजताच नकार देत असत. मी माझ्या आईला (सौ. लक्ष्मी शेवडे) सुचविले की, तू उन्मेषसाठी श्रीस्वामीजींच्या फोटोला प्रार्थना करून संपूर्ण **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** रोज वाचत जा. माझ्या आईने मनोभावे श्रीस्वामीजींना प्रार्थना केली व रोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली. हे केल्यापासून तीन महिन्यात भावाचे लग्न ठरले व तो आज सुखाने संसार करत आहे.

## व्याधीपासून सुटका

**म**ला स्वतःला पोटदुखीचा त्रास होता. ॲसिडीटी झाली की उलट्या होत व पोटही दुखत असे. या त्रासामुळे माझे वजनदेखील

आवश्यक वजनापेक्षा कमी होते. श्रीस्वामीजींच्या आशीर्वादाने आज हा त्रास पूर्णपणे गेला आहे व तब्येतही सुधारली आहे.

## पुस्तकांची सेवा

**श्री**स्वामीजींची पुस्तके मी सेवा म्हणून विविध लायब्ररीज्ना पाठवते, तसेच कधी कधी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन भाविकांना देते. नाशिकजवळ वणीला सप्तश्रृंगी देवीच्या मंदिरात **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग-२ व ३** या पुस्तकांची सेवा केली. थोड्यावेळाने एक मनुष्य आला व म्हणाला, ''मी एक ड्रायव्हर आहे. तुम्ही दिलेले **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग-२** हे पुस्तक मला मिळाले. ते आत्ताच मी गाडीत जाऊन वाचले. खूप सुंदर आहे या पुस्तकाचे उर्वरित भाग जर तुमच्याकडे असतील तर तेही मला द्या.'' असे म्हणून तो उर्वरित भाग घेण्यासाठी माझ्या खोलीवर आला.

श्रीदत्त क्षेत्र नृसिंहवाडी येथे श्री. दत्तराज अन्वेकर हे गृहस्थ येऊन भेटले व म्हणाले, ''श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेली पुस्तके खूपच दिव्य आहेत व मला त्याची प्रचीती आली आहे. या पुस्तकांमुळे माझे पूर्ण जीवनच बदलून गेले आहे. तुम्ही मला या पुस्तकांचा एक संपूर्ण संच सांगतो त्या पत्त्यावर पाठवून द्याल का?'' असे म्हणून त्यांनी एक पत्ता मला दिला.

मुंबईला लोकल ट्रेनने प्रवास करताना जेव्हा मी श्रीस्वामीजींची पुस्तके वाचते तेव्हा माझ्या शेजारी बसलेली किंवा समोर बसलेली व्यक्ती, ''तुम्ही कशावरील पुस्तक वाचत आहात?'' असे विचारून ते पुस्तक बघायला घेते असे बऱ्याच वेळेला घडले आहे.

श्रीस्वामीजींच्या पुस्तकाच्या सेवेने मनाला खूपच आनंद

वाटतो, तसेच रस्त्याने एकटे चालत असताना मनातल्या मनात जप आपोआप सुरू होतो, असा माझा अनुभव आहे.

## देवीभक्ती

**डिसेंबर २००२** मध्ये दत्तजयंती उत्सवासाठी नागार्जुनसागरला आश्रमात गेले होते. श्रीस्वामीजी हिल कॉलनी येथील आश्रमात असल्यामुळे त्यांचे दर्शन झाले. आश्रमात आम्ही ४-५ दिवस होतो. या पाच दिवसात मी दुर्गास्तोत्राचे बरेच पाठ केले. पाठ करत असताना, ''माझी ही भक्ती देवीपर्यंत पोहोचते का?'' व आश्रमात पाठ केल्यामुळे काहीतरी प्रचीती यावी असे विचार व इच्छा मनात होती. शेवटच्या दिवशी डोळे मिटून पाठ करत होते. पाठ झाल्यानंतर डोळे उघडून बघते तर आश्रमातील मोर जवळ येऊन बसला होता. मला तो देवीचा आशीर्वादच वाटला व खूप आनंद झाला.

**निरुपमा शेवडे**

**ठाणे**

ॐ

**आइका रसाळपणाचिया लोभा ।**
**की श्रवणेचि होती जिभा ।**
**बोले इंद्रिया लागे कळंभा ।**
**एकमेकां ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. वैशाली मुजुमदार

**ही** २००२-३ ची घटना आहे. माझा नवरा सुनिल मुजुमदार याला काही महिन्यांपासून नोकरी नव्हती. यापूर्वी त्याने अनेक नोकऱ्या बदलल्या होत्या आणि प्रत्येक वेळेस नवीन नोकरीकरता त्याला तीन तरी ऑफर असत व त्यातील एक नोकरी तो निवडत असे. पण यावेळेस नशिबात काही वेगळेच होते. त्याचे खूप प्रयत्न सुरू होते, तो कुठलीही छोटीशी नोकरी करायला तयार होता पण आश्चर्य म्हणजे या वेळेस त्याला कुठलीही नोकरी मिळत नव्हती. त्याला नोकरी नसून जवळजवळ दहा महिने होत आले होते, आमची निराशा वाढत चालली होती. गाडीनंतर आता हळूहळू घरही जायची वेळ येणार असे दिसू लागले होते. या काळात माझी मैत्रीण सौ. नीता आंगणे हिने आम्हाला श्रीस्वामीजींबद्दल सांगितले आणि श्रीस्वामीजींची पुस्तके वाचायला दिली. हळूहळू आम्ही पुस्तके वाचायला लागलो आणि थोडेफार देवाचेही करायला लागलो. श्रीस्वामीजींचे आशीर्वाद पुस्तकाच्या रूपाने घरात आल्यावर लगेच सुनिलला चांगली नोकरी लागली. आमच्या अडचणी हळूहळू दूर होत गेल्या.

श्रीस्वामीजी आम्हाला नेहमी सांगत, जसे तुम्ही सरकारचा टॅक्स भरता, तसेच किमान २० टक्के तरी ईश्वराचा टॅक्स तुम्ही भरला नाही तर देव कुठल्या ना कुठल्या मार्गाने तेवढा टॅक्स काढून घेतो. मग तुम्हाला वाटते आपल्यावर अशी वेळ का येते? कारण असे की तुम्ही अनेक वर्षांपासून देवाचा टॅक्स चुकविलेला असतो म्हणून दान करीत रहा. देवस्थानाला अथवा गोरगरिबांना मदत करून किंवा त्यांच्या मुलांची शिक्षणे किंवा लग्न करून, तुम्हाला आवडेल त्या पद्धतिने दान करा. श्रीस्वामीजी सांगत ईश्वराच्या हिशोबात कुठलीही चूक नसते.

२००३ मध्ये आम्हाला आश्रमात श्रीस्वामीजींचे दर्शन झाले व जीवनाची दिशा पूर्णपणे बदलून गेली.

श्रीस्वामीजी सांगत, ''ताई! या पृथ्वीतलावरील सगळ्यात सात्त्विक स्त्री आहेत.'' मग सौ. ताईंच्या दर्शनाची पण खूप ओढ लागली होती. २००३ साली त्यांचे पण दर्शन आम्हाला झाले. त्यानंतर श्रीस्वामीजी व सौ. ताईंचे आमच्या जीवनातील जे स्थान आहे ते आम्ही शब्दात सांगू शकणार नाही.

२००८ साली मे महिन्यात आम्ही माहूरला गेलो होतो. रेणुका देवीच्या दर्शनाला जाताना पायऱ्यांवर माझा पाय घसरला आणि गुडघा जोरात आपटला. मला तेव्हा काहीच जाणवले नाही आणि मी वर जाऊन दर्शन घेतले. त्याच दिवशी आम्ही मुंबईला परतलो. दुसऱ्या दिवसापासून माझी दिनचर्या सुरू झाली. रोजचा व्यायाम, पोहायला जाणे, घरचे काम इत्यादि सुरळीत चालू होते. पंधरा दिवसानंतर माझी मुलगी ऋतुजा हिचा पाय रात्री झोपेत माझ्या गुडघ्याला लागला आणि मला डोक्यापर्यंत कळ गेली. पुढच्या प्रवासाला जाण्यापूर्वी एकदा

दाखवलेले बरे म्हणून मी ऑर्थोपेडिककडे गेले. त्यांनी तपासले पण मला कोठेच दुखत नव्हते. ते म्हणाले, 'तुम्ही एक्स-रे काढा मगच मी तुमच्याशी बोलेन!' एक्स-रे बघून ते थक्क झाले. माझ्या गुडघ्याच्या वाटीचा एक छोटा तुकडा निघाला होता. श्रीस्वामीजींच्या कृपेने फक्त तो वाटीपासून वेगळा झाला नव्हता, नाहीतर सर्जरी करावी लागली असती. एवढे मेजर फ्रॅक्चर असूनपण मला पंधरा दिवस दुखले नाही की, कळलेही नाही याचे उत्तर कुठलाही डॉक्टर देऊ शकत नव्हता. ते फक्त श्रीस्वामीजींना ठाऊक होते.

श्रीस्वामीजींचे आशीर्वाद माझ्या पूर्ण कुटुंबावर आहेत याची आम्हाला पदोपदी जाणीव होते. माझी बहीण सौ. रश्मी ओक, ही २०११ साली खूप आजारी पडली. तिच्या सर्जरीच्या वेळेस पोटात खूप एडिशन्स असल्याने डॉक्टरांच्या हातून चुकून तिच्या आतडीला कट गेला. तिची परिस्थिती खूपच गंभीर झाली. तिला अन्न-पाण्याशिवाय २१ दिवस आय. सी. यू. मध्ये ठेवण्यात आले होते. पोटातील जखम भरत नव्हती व ती भरेल याची डॉक्टरांना पण खात्री नव्हती. शेवटी आम्ही श्रीस्वामीजींना कळविले. सौ. ताईंनी श्रीस्वामीजींचा निरोप दिला, ''काळजी करू नकोस. रश्मीला काहीही होणार नाही, तिचा जीव वाचेल.'' त्या दिवसानंतर तिच्या तब्येतीत सुधारणा दिसू लागली आणि आज तिची तब्येत अगदी नॉर्मल आहे.

माझ्या आईने वयाच्या ७० व्या वर्षापासून श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके वाचायला सुरुवात केली. माझे वडील गेल्यावर आईचे वय ७४ वर्षे असतांना तिला रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या आणि तिला आय. सी. यू. मध्ये ऑक्सिजनवर ठेवण्यात आले. लिव्हर सिरोसीस झाल्याने तिला सात बाटल्या रक्त देण्यात आले

होते. पण तिच्या पोटातील रक्तस्त्राव बंद होत नव्हता. तिला तीन आठवड्याने घरी पाठवले. तिची तब्येत पुन्हा कोठल्याही क्षणी बिघडेल, तिचे वय जास्त असल्याकारणाने सुधारण्याची फार कमी शक्यता आहे. फार फार तर दोन-तीन महिने काढेल असे डॉक्टरांनी सांगितले. ती जरा नॉर्मल होत नाही, तोच महिन्याभरात तिला पुन्हा उलट्या सुरू झाल्या. या खेपेस तिला सिरोसीस बरोबर पायाला थ्रोंबोसिस पण झाले. आता पंचाईत झाली होती कारण सिरोसीस करता रक्त गोठण्याचे औषध, तर थ्रोंबोसिसकरता रक्त पातळ होण्यासाठी औषध आणि वय ७४ वर्षे. शेवटी श्रीस्वामीजींनी आपला चमत्कार दाखवला आणि ती दोन्ही आजारातून नुसती बरी झाली नाही, तर अगदी ठणठणीत झाली. इतकी बरी झाली की, आता ती एकटी रहाते आणि स्वतःची सगळी कामे स्वतः करते. रोज नियमाने पोथ्यांचे वाचन करते. ती नेहमी म्हणते की मला श्रीस्वामीजींच्या पोथ्यांचा हा मार्ग आयुष्यात खूप उशिरा मिळाला. (वयाच्या ७० व्या वर्षी) तरी माझ्यावर त्यांनी लगेच कृपा केली. तुम्ही मुली हा मार्ग कधीही सोडू नका.

मी लहान असताना पत्रिका बघून तुझे आई-वडील तुझ्या वयाच्या ४२ व्या वर्षी, अगदी एका पाठोपाठ जातील असे कोणीतरी सांगितल्याचे मला आठवले. माझ्या आईचा जीव वाचवल्यानंतर, श्रीस्वामीजींनी माझ्या बहिणीलाच नव्हे तर माझ्या आईलाही दोन वेळा मृत्यूच्या दाढेतून खेचून आणले आहे आणि आज त्या दोघीही अगदी ठणठणीत आणि आनंदात आहेत.

श्रीस्वामीजी आम्हा भक्तांना नेहमी सांगत, हिमालयात खूप दैवी स्पंदने आहेत. तेथे गेले की परत यावेसे वाटत नाही, तेथे लगेच

ध्यान लागते. श्रीस्वामीजींना हिमालयाची खूप ओढ आहे पण २०१३ च्या नैसर्गिक प्रकोपानंतर उत्तराखंड, हिमालय किंवा गंगा नदीच्या पुराचे फोटो जरी कोठे बघितले तर अजूनही आम्हाला अंगावर काटा येतो. त्या वर्षी (२०१३) उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही तिघांनी उत्तरेकडे हिमालयात जायचा विचार केला. श्रीस्वामीजींची परवानगी घ्यायला निरोप पाठवला, श्रीस्वामीजींचे उत्तर आले की, ''अजिबात जायचे नाही!'' त्यावेळेस मला जरा वाईट वाटले. श्रीस्वामीजींना हिमालय इतका आवडतो तर आपल्याला जायला का बरे नाही म्हणाले? नंतर जितकेवेळा टी.व्ही. वर निसर्गाचा तो प्रकोप बघायचो तेव्हा श्रीस्वामीजींच्या आठवणीने डोळे भरून येत असत. लोकांचे किती भयंकर हाल झाले आणि फक्त श्रीस्वामीजींमुळे आपण वाचलो याची सतत आठवण होते.

श्रीस्वामीजी सगळ्यांना खूप प्रेम देतात. लहान मुलांवर तर त्यांचा खूपच जीव आहे. आश्रमात श्रीस्वामीजी असायचे तेव्हा मुलांना भूक लागली की श्रीस्वामीजींना मुलांच्या आयांच्या आधीच समजायचे, मग ते लगेच निरोप पाठवत, मुलांना खायला द्या, त्यांना भूक लागली आहे. श्रीस्वामीजी मला नेहमी सांगत, ''तुम्ही आयाच मुलांना सारख्या सारख्या सूचना करून गोंधळात टाकता. तुम्ही मुलांना सुधारायला जाऊ नका, तुम्ही स्वतःला सुधारा. ईश्वर आहे तुमच्या मुलांची काळजी घ्यायला.'' अगदी अभ्यासासाठीसुद्धा मुलांवर सक्ती केलेली श्रीस्वामीजींना आवडत नसे आणि श्रीस्वामीजी नेहमी म्हणत, ''मुलांना चांगले मार्क्स कसे मिळवायचे हे शिकवण्यापेक्षा चांगला माणूस कसे बनायचे हे शिकवणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हे तुमचे खरे काम, हे जास्त गरजेचे असते, यातून तुम्ही काहीतरी

मिळवत असता. क्लासेस्‌ना घालून त्यांना पहिला नंबर मिळवण्याची जबरदस्ती तुम्ही करू नका. ते चुकीचे आहे. त्यांना लहानपणापासून देवाचे करायची सवय लावा. लहानपणापासून देवाचे केले की, ते त्यांना त्यांच्या भविष्यकाळात उपयोगी येते.''

माझी मुलगी ऋतुजा ११ वर्षांची असतानाची ही घटना. मला फोनवर सौ. ताईंनी श्रीस्वामीजींचा निरोप दिला की, ''वैशाली! तुला श्रीस्वामीजींनी निरोप दिला आहे की, ऋतुजाला घेऊन लगेच बाजारात जा, भरपूर मोठे मोठे चॉकलेटस्‌ घेऊन दे!'' मी ताईंना हो म्हणाले, पण मला काही केल्या संदर्भ लागत नव्हता. मी ऋतुजाला विचारले, तिचे उत्तर ऐकल्यावर आम्हा दोघींच्या डोळ्यात पाणी आले. ती म्हणाली, ''आई! मी फक्त दहा मिनिटांपूर्वी फ्रीजमध्ये चॉकलेट शोधत होते आणि चॉकलेट संपलेले बघून मला श्रीस्वामीजींची खूप आठवण आली. वाटले की, जर आत्ता मी आश्रमात असते तर श्रीस्वामीजींनी मला खूप चॉकलेटस्‌ दिली असती.''

श्रीस्वामीजी आम्हा सर्वांना नेहमी सांगत की, देव सतत लहान मुलांबरोबर असतो, असे समजा. कारण मुले निरागस असतात. तुमचे मन, विचार जेवढे स्वच्छ तेवढा ईश्वर तुमच्याजवळ आहे हे लक्षात ठेवा! ईश्वर तुमचे मन आणि भाव बघतो इतर काही नाही आणि तुमच्या मनात आनंद असला, समाधान, प्रेम असले तर ईश्वर तुमच्याजवळच आहे असे समजा. ते नेहमी सांगत, ''ईश्वराला, भगवंताला आवडेल असे जगायचे.''

तुकारामांचा एक अभंग सांगतो तो लिहून ठेवा...

**न मिळो खावया । न वाढो संतान ।**

**परि हा नारायण । कृपा करो ।।**

अशी वृत्ती ठेवा म्हणजे जीवन आनंदमय होईल, ईश्वर कृपा करेल. ईश्वराची कृपा व्हावी म्हणूनच जगायचे, परिस्थिती कशीही येवो त्यात आनंदात, समाधानात राहता आले पाहिजे. आपण कशाचेही दुःख न करता आनंदातच रहायचे.

श्रीस्वामीजी आणि सौ. ताईंच्या कृपाछत्राखाली आमच्या जीवनाची गाडी अगदी सुरळीत चालत आहे, ते आम्हा भक्तांना पदोपदी सांभाळून, चुकांबद्दल सावध करून आमचे जीवन आनंदी करत आहेत.

**सौ. वैशाली मुजुमदार**

**ठाणे**

ॐ

**विपाये चित्ती आठविता । दे आपुली योग्यता ।**
**मग तयाते प्रशंसिता । काय लाभु आथी ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# नंदिनी-शेखर

**श्री**स्वामीजींनी आखून दिलेल्या मार्गावरून जेव्हा आमचा प्रवास सुरू झाला, तेव्हापासून आमचे जीवनच बदलून गेले. पूर्वीचा ताण-तणाव, बेचैनी, stress व tension कुठच्या कुठे पळून गेले. जीवनात सगळीकडे आनंदी आनंद आणि समाधान भरून राहिले आहे. श्रीस्वामीजी म्हणत, ''आपल्या जीवनात खरा सद्गुरु मिळणे खूप कठीण गोष्ट आहे व तो मिळाल्यास त्याच्यावर विश्वास ठेवून तो टिकवणे ही गोष्ट त्याहूनही कठीण आहे.''

श्रीस्वामीजींनी सांगितलेल्या मार्गावरून चालताना खूप अद्भुत अनुभव आले....

काही वर्षांपूर्वी शेखरला प्रथमच नोकरी निमित्त अमेरिकेला जाण्याचा योग आला. त्याचा आठ महिन्याचा IT Project बोस्टन येथे सुरू होणार होता. प्रथमच आम्हाला सोडून तो आठ महिने लांब रहाणार, म्हणून आम्हाला त्याची खूप काळजी वाटत होती. पण ही संधी त्याला घालवायची नव्हती म्हणून तो निघाला. बोस्टनला पोहोचल्यावर काही कारणास्तव त्याला स्थिरस्थावर व्हायला वेळ

लागला. पण येथे आम्हाला खूप काळजी वाटू लागली. मुंबईहून प्रयाण केल्यानंतर तीन दिवस झाले तरी त्याचा फोन आला नव्हता किंवा ई-मेलही आला नव्हता. चौथ्या दिवशी आमच्या शेजारी रहाणारी माझी मैत्रीण वैशाली मुजुमदार अनपेक्षितरित्या रात्री ९.३० च्या सुमारास घरी आली व तिने, ''तुला मराठी वाचता येते का?'' असे विचारले. मी म्हणाले, ''मला मराठी चांगले वाचता येते.'' तिने मला '**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र**' व '**श्री दुर्गा त्रिशती**' या पोथ्या देऊन नियमित वाचनात ठेवण्यास सांगितले व निघून गेली. पोथ्या घरी आल्याच्या काही मिनिटांतच शेखरचा अमेरिकेहून फोन आला व त्याने आपली खुशाली कळवली. पोथ्यांच्या नुसत्या आगमनाने काळजी मिटली तर वाचनाने किती कल्याण होईल असा विचार मनात आला व येथून माझा आध्यात्मिक प्रवास सुरू झाला.

श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके यांचे नियमित वाचन सुरू झाले. माझा कल पाहून वैशालीने मला हवन व ध्यान करण्यास प्रवृत्त केले. हवन करणे व त्यानंतर अग्नी शांत होईपर्यंत त्याच्या समोर बसून ध्यान करणे अशी पद्धत मी अवलंबिली होती. असेच एकदा ध्यानात मला पांढरा पोशाख केलेली, दाढी-मिशा असलेली तेजस्वी व्यक्ती दिसली. मला याचे नवल वाटले. कारण अशा व्यक्तीला कुठेही पाहिल्याचे मला आठवत नव्हते. अशा तेजस्वी व्यक्तिमत्त्वाला एकदा पाहिल्यानंतर विसरणे तर अशक्यच होते. काही दिवसांनी वैशालीच्या घरी जाण्याचा योग आला. तेथे मी श्रीस्वामीजींचा फोटो पाहिला व मला आश्चर्याचा धक्काच बसला. ध्यानात मला श्रीस्वामीजींचे दर्शन झाले होते या विचाराने मी भारावून गेले. पोथी वाचन, हवन व ध्यानाचे फळ असे मिळत आहे या अनुभवाने मला खूप हुरूप आला.

येथपर्यंत पोथीवाचन, हवन, इ. फक्त मी एकटीच करत होते. घरातील इतर मंडळींनी मला कधी मज्जाव केला नाही पण स्वतः कधी पोथी/पुस्तके वाचनात रस दाखवला नाही. २००८ साली शेखर ठाण्यातील एका software कंपनीमध्ये नोकरी करत होता. या नोकरीत त्याला अजिबात समाधान नव्हते. कंपनीची परिस्थिती बिघडत चालली होती. पगारात कपात झाली होती. तो खूप काळजीत होता. हवी तशी दुसरी नोकरी मिळतही नव्हती. आपली मनःशांती तो हरवून बसला होता. त्याची मनःस्थिती व अस्वस्थ प्रकृती पाहून मी त्याला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्याचा सल्ला दिला. शेखरनेही लगेच वाचण्यास सुरुवात केली. रोज सकाळी आंघोळ करून देवपूजा झाल्यावर **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचून मग कामावर जाण्याचा नेम त्याने सुरू केला. पहिल्या दिवसापासूनच त्याची मनःस्थिती सुधारली. त्याला उत्साह वाटू लागला. आश्चर्य म्हणजे फक्त दोन दिवस त्याने वाचन केले आणि तिसऱ्या दिवशी त्याला एका नामांकित Investment Bank मधून interview call आला. Vice President चा हुद्दा होता. फक्त दोन interview झाले व त्याला ही मोठ्या हुद्याची नोकरी मिळाली. फक्त एका महिन्यात हे सर्व घडले.

असा अद्‌भुत अनुभव आल्यावर शेखरही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** नियमितपणे पाठ करू लागला. तसेच **श्रीदुर्गा त्रिशती** मधील देवी कवच, देवी सूक्त व नारायणी स्तुतीचे ही पाठ करण्यास त्याने सुरुवात केली. या उपासनेचेही त्याला खूप दिव्य अनुभव आले.

नवरात्रोत्सव सुरू होणार होता. या नवरात्रात मी देवी कवच, देवी सूक्त व नारायणी स्तुती यांचे पाठ करण्याचे ठरवले. काही अडचणींमुळे मला हे नऊ दिवसांचे अनुष्ठान पूर्ण करता आले नाही.

या गोष्टीचे मला जरा वाईट वाटले खरे पण मन मात्र शांत होते. रात्री मी प्रार्थना करून झोपी गेले. त्या रात्री मला एक स्वप्न पडले. स्वप्नात मला श्रीस्वामीजींचे दर्शन झाले व एका देवीचा तेजस्वी चेहरा दिसला. अतिशय तेजस्वी पण शांत असे देवीचे डोळे होते. अशी मूर्ती माझ्या कुठेही पहाण्यात आल्याचे लक्षात नव्हते. श्रीस्वामीजींचे व देवीचे दर्शन नवरात्रात झाल्याचा आनंद जाणवत होता. पुढे दोन महिन्यांनी आम्हाला पहिल्यांदा आश्रमात जाण्याचा योग आला. तेथे देवळातील राजराजेश्वरी देवीचे दर्शन झाल्याबरोबर लक्षात आले की, स्वप्नात दिसलेली देवी ती हीच व हेच ते तेजस्वी, शांत डोळे व मंद स्मित हास्य. देवी जणू माझ्याकडे पहात माझ्या चेहऱ्यावरचा आश्चर्याचा भाव टिपत होती.

आश्रमात येण्याचे आमंत्रण आम्हाला अशाच एका घटनेनंतर मिळाले. ठाण्यातील एका अपंगांसाठी असलेल्या संस्थेची आम्हाला माहिती मिळाली. आम्ही त्या संस्थेला भेट दिली, देणगी दिली व समाधानाने बाहेर पडलो. त्या संस्थेच्या अगदी दारातच असताना आम्हाला फोन आला की आश्रमाला भेट देण्याची आम्हाला परवानगी मिळाली आहे. दिवाळीचे दिवस होते व त्यात आश्रमात जाण्याचा योग म्हणजे दूधात साखर!

आश्रमातील वातावरण म्हणजे अगदी शांत, दिव्य व संसारिक गोष्टी विसरायला लावणारे. आश्रमातील बाबू व चेतन यांनी आमचे असे काही स्वागत केले जणूकाही आमची खूप वर्षांपासूनची ओळख आहे. आपुलकी, सेवा या शब्दांचा अर्थ आश्रमाच्या या पहिल्या भेटीतच आम्हाला समजला. या नवीन मित्रांकडून आम्हाला खूप काही शिकायला मिळाले. निःस्वार्थ सेवा आणि त्याबरोबर आनंदात राहून दुसऱ्यांना आनंद देणे हे त्यांच्याकडून शिकलो.

ही आमची नागार्जुनसागरची पहिलीच भेट असल्याने आजूबाजूची स्थळे म्हणजे यतितपोस्थला, अनुपु व हिल कॉलनीचा आश्रम येथेही आम्हाला बाबू घेऊन गेला. येथून श्रीशैलला जाण्याची कल्पना सुचली. श्रीशैलला जाण्याआधी उमा-महेश्वरम्ला जाण्याची प्रथा आहे. अभयारण्यातील हा रम्य प्रवास अगदी मनमोहक होता. उमा-महेश्वरम्चे दर्शन घेऊन आम्ही श्रीशैलला पोहोचलो. तेथे पोहोचल्यावर आमच्यासोबत आलेला पांडू लगेच रांगेत जागा पकडण्यासाठी पुढे धावला. थोड्यावेळाने आम्ही त्याला परत येताना पाहिले. तो म्हणाला, ‘‘हे तर अगदी आश्चर्यकारक आहे. मंदिरात जाण्यासाठी अजिबात रांग नाही, अजिबात गर्दी नाही व आपल्याला हवा तितका वेळ मंदिरात घालवता येणार आहे.’’ साधारणपणे श्रीशैल मल्लीकार्जुनच्या देवळात लाखोंनी गर्दी असते असे ऐकले होते. पण ही अद्भुत घटना एक दिव्य अनुभव देऊन गेली. देवळात फक्त आम्ही चौघे आणि पुजारी इतकेच होतो. श्रीस्वामीजींच्या कृपेने आम्हाला मनसोक्त दर्शन मिळाले. प्रत्येक ठिकाणी श्रीस्वामीजी आपले लाड कसे पुरवतात हे मात्र आम्हाला प्रकर्षाने जाणवले.

श्रीस्वामीजींनी दर्शवलेल्या मार्गावर आता आमचा प्रवास चांगला चालला होता. श्रीस्वामीजींच्या दर्शनाची ओढ आता मी, शेखर व आमची मुलगी श्रृती अशा तिघांनाही लागली होती. या मार्गावर असलेल्या प्रत्येक भक्ताचा असा अनुभव आहे की, स्वच्छ मनाने केलेली प्रत्येक इच्छा कुठल्या ना कुठल्या तरी रूपात पूर्ण होते. आमचेही तसेच झाले. डिसेंबर २०१० मध्ये आम्हाला वैशालीचा निरोप आला की, श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ आम्हाला आश्रमात पुनश्च बोलवण्यात आले आहे. आमच्या आनंदाला सीमाच

राहिली नाही. आम्ही लगेच तयारीला लागलो. पण नियतीला कदाचित ती वेळ मंजूर नव्हती. आम्ही नागार्जुनसागरला निघण्याच्या दोनच दिवस आधी शेखरच्या वडिलांचा हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. आमच्यावर जणू आभाळच कोसळले, त्यात श्रीस्वामीजींच्या दर्शनाची संधी हुकणार याचेही दुःख होते पण आमचे हे दुःखही श्रीस्वामीजींनी जाणले. त्यांनी वैशालीकडून पुन्हा निरोप पाठवला की, वडिलांच्या तेराव्यानंतर आम्हाला लगेच आश्रमात पोहोचायचे आहे. श्रीस्वामीजींच्या या निरोपाने आम्ही भारावून गेलो. या  निरोपाने दुःख दूर झाले. श्रीदत्त जयंतीनंतर आम्ही आश्रमात पोहोचलो तेव्हा श्रीस्वामीजी औदुंबराखाली बसले होते. त्यांनी आम्हाला लगेच बोलावले व समोर बसवून घेतले. आस्थेने चौकशी केली. त्यांना बघून आमच्या आनंदाला सीमा उरली नाही. आम्ही फक्त त्यांच्या प्रसन्न चेहऱ्याकडे बघतच राहिलो. त्या दोन-तीन दिवसात श्रीस्वामीजींनी आम्हाला खूप वेळ दिला, आम्हाला समोर बसवून घेतले व खूप काही सांगितले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाने आमच्या साऱ्या चिंता दूर झाल्या. तीन दिवसांनी आम्ही जेव्हा मुंबईसाठी निघालो होतो तेव्हा आमच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान झळकत होते.

त्यानंतर असा अनुभव आम्हाला प्रत्येक खेपेस आला. श्रीस्वामीजी आम्हाला त्यांच्यासमोर बसवून ध्यान करवून घेत. थोड्यावेळाने आम्हा सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा उत्साह व तेज दिसू लागे. श्रीस्वामीजींची ही किमया आम्ही प्रत्येक वेळी अनुभवली आहे. श्रीस्वामीजींकडून मिळणाऱ्या दैवी लहरी व स्पंदनांचा हा प्रभाव होता. अशा या स्पंदनांचेसुद्धा एक शास्त्र असून त्यावर संशोधन करण्याची गरज असल्याचे श्रीस्वामीजींनी सांगितले. त्याशिवाय त्यांनी असे सांगितले की, ''सारे संशोधक हे पूर्व जन्मीचे विविध शाखेचे

ऋषी असतात. उदा. अणू -परमाणू यावर संशोधन करणाऱ्या ऋषींना कणाद शाखेचे ऋषी म्हटले जाते. भारवाहक म्हणजे बोटी, विमाने या विषयावर संशोधन करणाऱ्या ऋषींना भारद्वाज ऋषी असे म्हटले जाते.''

त्याच काळात माझी मुलगी श्रृती दहावीच्या परीक्षेला बसणार होती. श्रृती अभ्यासात हुशार आहे व त्यामुळे तशी काळजी नव्हती. पण काही कारणास्तव तिचे मन अभ्यासात अजिबात रमेना. तिची परीक्षा मार्च महिन्यात होती. पण जानेवारीच्या अखेरपर्यंत तिचा अभ्यास सुरू झाला नव्हता. अशा परिस्थितीत आम्हाला खूप काळजी वाटू लागली. आम्ही श्रीस्वामीजींच्या फोटोसमोर बसून या संकटातून सोडवण्यासाठी प्रार्थना करू लागलो. एक-दोन दिवसात तिच्या इंग्रजीच्या शिक्षिकेने तिला घरी बोलावले व आम्हालाही तिच्या सोबत येण्यास सांगितले. श्रृती त्या शिक्षिकेची आवडती विद्यार्थिनी होती पण त्या दिवशी तिने श्रृतीला असे काही फैलावर घेतले की, श्रृतीसकट आम्हालाही जोरदार धक्का बसला. श्रृतीच्या विद्यार्थी जीवनात केलेला हा ईश्वरी हस्तक्षेप होता. कारण त्यानंतर श्रृतीला जो अभ्यासाचा सूर गवसला तो तिची परीक्षा संपेपर्यंत, श्रृतीने आम्हाला कसलीही काळजी करण्यास जागा ठेवली नाही. याचा परिणाम म्हणजे शाळेतील पहिल्या पाच विद्यार्थ्यांमध्ये तिची गणना झाली. ९५ टक्के मार्कांनी ती उत्तीर्ण झाली. श्रीस्वामीजींनी आमच्या प्रार्थनेला हा असा अद्भुत प्रतिसाद दिला होता.

सुट्टी मिळाली की, कुठे जायचे या प्रश्नाला एकच उत्तर 'आश्रम!' पुढे जूनमध्ये आश्रमात जाण्याचा योग आला. आम्ही जेव्हा सिंकदराबाद स्टेशनवर उतरलो तेव्हा दाभोळकर काकांना आम्ही सुखरूप पोहोचल्याचे कळवले. त्यांनी आम्हाला इतकेच सांगितले

की, ''तुम्ही खूप भाग्यवान आहात.'' प्रथम ते जरा कोड्यात असल्यासारखे वाटले पण आमची समजूत अशी झाली की, आश्रमात असे वारंवार येण्यास मिळत आहे म्हणून काका आम्हाला भाग्यवान म्हणत होते व ते अगदी खरेही आहे. आश्रमात बसून पोथी-पुस्तके वाचणे व ध्यान धारणा करणे असा आमचा दिनक्रम होता. श्रृती, बाबू-चेतनला पूजेसाठी मदत करण्यात मग्न होती. येथपर्यंत आम्ही सौ. ताईंबद्दल ऐकून होतो. त्यांच्या दर्शनाचा योग काही आला नव्हता. एके दिवशी बाबूने आम्हाला सांगितले की, सौ. ताई आश्रमात येणार आहेत. आम्हाला खूप आनंद झाला. या खेपेस सौ. ताईंचे दर्शन होणार म्हणून आम्ही त्यांची आतुरतेने वाट पाहू लागलो. त्यावेळी खूप उन्हाळा होता. अंगाची अगदी लाही लाही होत होती. रात्री आम्हाला कधीतरी झोप लागली. पण पहाटे अडीच-तीनच्या सुमारास सोसाट्याचे वारे वाहू लागल्याचा आवाज आला. खोलीतून बाहेर येऊन पहातो तर असे दिसले की, औदुंबराच्या आवारातच खूप वारे वहात होते व इतर ठिकाणी मात्र एक पानही हलत नव्हते. सकाळी मी ही गोष्ट बाबूला सांगितली तेव्हा तो म्हणाला की, त्याच वेळी आश्रमात सौ. ताईंचे आगमन झाले होते. निसर्गही सौ. ताईंचे स्वागत करण्यास तत्पर होता.

सौ. ताईंनी आम्हाला बोलावल्याचा निरोप बाबू घेऊन आला. आम्हाला सौ. ताईंचे प्रथम दर्शन घडले. अतिशय हसतमुख, शांत स्वभावाच्या सौ. ताईंनी आमच्याशी खूप गप्पा मारल्या. उत्कृष्ट मार्क्स मिळाल्याबद्दल श्रृतीचे अभिनंदन केले व बक्षिसही दिले. खूप वर्षांची ओळख असल्यासारखी आई-स्वरूप सौ. ताईंनी आम्हाला मार्गदर्शन केले व आस्थेने चौकशीही केली.

श्रीस्वामीजींसमोर बसले असताना त्यांनी आम्हाला खूप

काही गोष्टी सांगितल्या ज्यातून आम्हाला भरपूर शिकायला मिळाले.

एकदा श्रीस्वामीजींसमोर आम्ही आश्रमात ध्यान करत बसलो होतो. बराच वेळ ध्यान झाल्यानंतर श्रीस्वामीजी म्हणाले, ''छान ध्यान झाले! एक देवता येऊन तुला कुंकू लावून गेली!'' मला या अद्‌भुत गोष्टीचे खूप आश्चर्य वाटले. कारण हेच दृश्य मी ध्यानात पाहिले होते. श्रीस्वामीजींच्या कृपाशीर्वादाशिवाय हे घडलेच नसते.

असेच एकदा श्रीस्वामीजी औदुंबराखाली बसले होते व आम्हा सर्वांना श्रीस्वामीजींनी ध्यान करण्यास सांगितले. ध्यानात मला अचानक श्रीस्वामीजींच्या स्थानी एक शिवलिंग दिसू लागले. मी मनोमन त्या शिवलिंगाला दंडवत घातला व हा अनुभव श्रीस्वामीजींना सांगितला. त्याच वेळी मला श्रीगुरुचरित्रामधील नंदीनामक कवीच्या कथेची आठवण झाली. आणखी एका खेपेस असेच ध्यानात असताना मला असे दिसले की, श्रीपाद श्रीवल्लभ काही सांगत आहेत व ते श्रीस्वामीजी आपल्या सुंदर अक्षरात लिहून घेत आहेत.

त्राटक कसे करायचे हे श्रीस्वामीजींनी शिकवले होते. त्याप्रमाणे मी घरात श्रीस्वामीजींचा फोटो समोर ठेवून त्यावर त्राटक करत असे. अशा प्रकारे त्राटक साधना करत असताना मला खालील प्रमाणे अनुभव आले.

१) एकदा ध्यानात मला स्वतःची आकृती/प्रतिबिंब दिसले.

२) दुसऱ्या दिवशी मला श्रीपाद श्रीवल्लभांचे दर्शन झाले.

३) नंतर मला श्री महाअवतार बाबांचे दर्शन झाले.

अशाप्रकारे श्रीस्वामीजींच्या फोटोवर त्राटक करत असताना

मला श्रीस्वामीजींच्या फोटोतच या दोन महान संतांचे दर्शन झाले. लहान मुलांनी हट्ट करावा तसा मी विचार केला की, श्रीस्वामीजींच्या फोटोवर त्राटक करत असता श्रीस्वामीजींच्या ऐवजी या महान संतांची कशी काय दर्शने झाली. श्रीस्वामीजी का दिसत नाहीत? असा प्रश्न मनात येताच दुसऱ्याच क्षणी ध्यानात श्री महाअवतार बाबांची भव्य आकृती दिसली व त्या आकृतीतच श्रीस्वामीजींचे दर्शन झाले. अशा प्रकारे सगळे सत्पुरुष एकच असतात हे ईश्वराने दाखवून दिले.

आम्ही एकदा गोंदवल्याला निघालो होतो. श्रीस्वामीजींना हे ठाऊक असल्याने त्यांनी मला त्यांचा नमस्कार महाराजांपर्यंत पोहोचवण्यास सांगितले. आम्ही सगळे समाधीस्थानापर्यंत पोहोचलो. गाभाऱ्यात माझ्यासोबत आणखी आठ-दहा लोकही होते. मी नमस्कार केला व प्रार्थना करताना श्रीस्वामीजींचा नमस्कारही महाराजांप्रत व्यक्त केला. तेव्हा अचानक कुठूनतरी एक पुजारी आला व फक्त मला खडीसाखरेचा प्रसाद दिला आणि निघून गेला. मला या गोष्टीचे खूप आश्चर्य वाटले. अशा प्रकारे श्रीस्वामीजींचा नमस्कार गोंदवलेकर महाराजांपर्यंत पोहोचल्याची ही खूण समजून मी महाराजांना पुन्हा नमस्कार केला.

**शे**खरची एक मावशी मुळची धारवाडची पण मुलाच्या नोकरीमुळे ते पुण्यात स्थायिक झाले. मुलाला नोकरीनिमित्त लंडनला जावे लागले. त्याचे तिकडचे काम वाढल्याने लंडनचे वास्तव्य वाढले. त्यामुळे मावशीने सूनबाईलासुद्धा लंडनला पाठवून दिले. नवरा खूप वर्षांपूर्वी दिवंगत झाल्याने मावशी एकटीच रहात होती. ती श्री चिदंबर स्वामींची भक्त आहे. आम्ही तिला श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके दिली. पोथ्या पाहून तिला खूप आनंद झाला व तिने लगेच त्यांचे

वाचन सुरू केले. कानडी भाषिक असल्याने वाचन थोडे सावकाश असले तरी तिने चिकाटी मात्र सोडली नाही. या साधनेपासून येणारे अद्‌भुत अनुभव तिलाही येत आहेत. त्यातील एक येथे नमूद करत आहे.

मावशीला लहान मुले खूप आवडत. ती त्यांचे खूप लाड करत असे. अशीच एक कुट्टी नांवाची १२ वर्षांची मुलगी तिची आवडती होती. कुट्टी व तिचे आई-वडील धारवाडला रहायचे. एकदा मावशीला फोन आला की, कुट्टी खूप आजारी आहे व सारखी मावशीची आठवण काढत आहे. मावशी फोनवर कुट्टीशी बोलली व तिला "**श्री दत्त जय दत्त**" हा जप करण्यास सांगितले. एक-दोन दिवसांनी मावशीने परत कुट्टीला फोन केला तेव्हा ती म्हणाली की, तिला आता बरे वाटत आहे. तिने सांगितले की रात्री तिला स्वप्नात एक पांढरा पोशाख केलेले स्वामीजी आले व त्यांनी तिला 'सर्व काही ठीक होईल' असे सांगितले. मावशीला खूप आनंद झाला व कुट्टीला श्रीस्वामीजींचे दर्शन झाल्याने तिला खूप बरे वाटले.

श्रीस्वामीजींना लहान मुले खूप आवडतात, हे वर दिलेल्या कुट्टीच्या अनुभवावरून सिद्ध होतेच. पण आणखी एक गोष्ट येथे नमूद करावीशी वाटते. आश्रमात असताना श्रीस्वामीजी लहान मुलांना रोज काहीतरी खाऊ देत असत. एकदा संकष्टी चतुर्थीला आश्रमाच्या स्वयंपाकघरात मोदक केले होते. श्रीस्वामीजींना कळले की मुलांना खूप भूक लागली आहे. त्यांनी लगेच स्वयंपाकघरात निरोप पाठवला की, "मुलांना अगोदर जेवायला वाढावे व भरपूर मोदक खाऊ घालावे. नैवेद्य नंतर दाखविला तरी चालेल!" अशा प्रकारे श्रीस्वामीजी मुलांची खूप काळजी घेत आणि भरपूर लाड करत.

**ए**के दिवशी आमच्या घरात काम करणारी मोलकरीण खूप उशीरा आली व खूप त्रस्त वाटत होती. मी चौकशी केली असता, एरव्ही काही न सांगणारी तिने आपली व्यथा माझ्याकडे व्यक्त केली. तिचा चार वर्षांचा मुलगा तीन-चार दिवसांपासून खूप आजारी होता. त्याच्या अंगात खूप ताप भरला होता व काही केल्या उतरत नव्हता. डॉक्टरांच्या औषधोपचाराचाही म्हणावा तसा परिणाम दिसत नव्हता. चार दिवसापासून मुलगा रात्रभर तडफडत होता. त्यामुळे घरात सगळ्यांना काळजी वाटत होती. माझ्याकडे आश्रमातून आलेले एक विभूतिचे पाकिट मी तिला दिले व एक चिमूटभर विभूति पाण्यातून मुलाला देण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी ती अतिशय आनंदात कामावर आली व म्हणाली की, तिच्या मुलाला आता खूप बरे वाटत आहे व खूप दिवसानंतर काल रात्री त्याला शांत झोप लागली होती. त्याचा ताप बऱ्यापैकी उतरला होता असे म्हणून तिने माझे खूप आभार मानले. अशा प्रकारे श्रीस्वामीजींचे आशीर्वाद सर्वांना आहेत. त्यांचे लहान मुलांवर असलेले कृपाशीर्वाद या अनुभवांवरून दिसून येतात.

ॐ

## पक्ष्यांचा कलकलाट

**ऑ**गस्ट महिन्यामध्ये मी (नंदिनी) नागार्जुनसागर येथील आश्रमात गेले होते. आंध्रप्रदेशमध्ये वातावरण दुष्काळाचे होते. प्रचंड गरमी होती. पाऊस न पडल्याकारणाने माणसं हैराण झाली होती.

श्रीस्वामीजी आश्रमात आले होते. सहा-सात दिवस राहून ते पुनश्च एकान्तवासात जाणार होते.

श्रीस्वामीजी औदुंबराच्या झाडाखाली ध्यान करत बसले होते. मी त्यांच्यासमोर बसले होते.

अचानक अनेक पक्ष्यांनी जोरजोराने कलकलाट करण्यास सुरुवात केली. तो कलकलाट ऐकून मी व स्वामीजी दोघांनीही एकाच वेळी वृक्षावरील त्या पक्ष्यांकडे पाहिले. अनेक रंगांचे, विविध प्रकारचे पक्षी जोरजोराने कलकलाट करत होते.

श्रीस्वामीजी म्हणाले, ''नंदिनी बघ! त्या पक्ष्यांना किती आनंद होत आहे. आजपासून सात दिवसांनी खूप पाऊस पडणार आहे. तसेच या नदीलाही खूप पाणी येणार आहे. त्यामुळे त्या पक्ष्यांना खूप आनंद होत आहे.''

मी मनात म्हणाले, ''श्रीस्वामीजींना माणसाचे पुर्नजन्म व पुढील जन्म कळतात असे मला सौ. ताईंनी सांगितले होते. परंतु श्रीस्वामीजींना पक्ष्यांचीही भाषा समजते, हे आज प्रथमच कळले.''

**नंदिनी-शेखर**

**ठाणे**

ॐ

**तै शरीर भाव नासती । इंद्रिये विषय विसरती ।**
**जै सोऽहम् भाव प्रतिती । प्रकट होय ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. लीना भंगाळे

**मा**झा मुलगा पारितोष गेल्या वर्षी म्हणजे २०१३ ला दहावीला होता. तरी तो फक्त फावल्या वेळात अभ्यास करी. गेल्या नऊ वर्षात खेळला नसेल इतक्या Inter School Football Matches खेळला. Match म्हटल्यावर आधीचा काळ practice करण्यात आणि Match हून आल्यावर झोपा काढण्यात जात असे. मी आणि माझे पती, नित्यानंद खूपच काळजीत असायचो, त्याला सारखे बोलायचो, वादावादी व्हायची. शेवटचा एक महिना मात्र आम्ही एकमेकांना सांगून खूप संयम राखून त्याला काहीही बोलायचे नाही असे ठरविले. बस! आपली साधना करायची आणि देवाकडे प्रार्थना करायची, देवा आता तुम्हीच याला सद्बुद्धी द्या. फक्त शेवटच्या महिन्यात अभ्यास केला. परीक्षेनंतर result चांगला लागावा म्हणून त्याने श्रीदत्तस्तोत्र, श्री गणपती स्तोत्र व प्रज्ञाविवर्धन स्तोत्राचे पाठ करायला सुरुवात केली. त्याचा result आला, तर चक्क ८४ टक्के मार्क्स मिळाले. आम्ही तर एकदम चकीत झालो. पण सद्गुरुंच्या कृपेनेच हे झाले आणि मनोमन पारितोषने आणि आम्ही देवाचे आभार मानले.

एकदा मी आश्रमात गेले होते. काही कारणामुळे आम्हाला लवकर परत यावे लागणार होते. मन जरा नाराजच होते, म्हणून जेवढा वेळ मिळेल त्यावेळात जास्तीत जास्त साधना करण्याचा प्रयत्न करत होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही निघणार होतो. संध्याकाळची आरती होऊन सगळे बाहेर खुर्च्यांवर बसलो होतो. कुणीतरी आले म्हणून त्यांना खुर्ची दिली आणि मी औदुंबराच्या पारावर बसले. नेहमीप्रमाणे मनात जप **'ॐ दत्त दुर्गा ॐ'** सुरूच होता, आणि मग एकदम असे जाणवले की आता डोळे उघडे ठेवणे अशक्य आहे. शरीर जवळजवळ जाणवतच नव्हते. डोळे वर वर ओढले जात होते. पाठीच्या मणक्याशी फक्त काही जाणवले. एका खूप उच्च आनंदात असल्यासारखे वाटत होते. कधीपासून जो शोध घेत होते तेच गवसल्यासारखे जाणवले. आनंद होऊ लागला. भाईकाकांनी डोळे उघडायला सांगितले पण डोळे उघडायची इच्छाच होत नव्हती. दोन भुवयांच्यामध्ये एक ज्योत दिसत होती. शब्दात लिहूनही सांगता येणार नाही असा अवर्णनीय अनुभव होता.

**सौ. लीना भंगाळे**
**पवई, मुंबई**

ॐ

**भाव धरील तया । तारील पाषाण ।**
**दुर्जना सज्जन । काय करी ।।**
**।। संत तुकाराम ।।**

# पाडळे कुटुंब

## मनाली पाडळे

**१०** फेब्रुवारी २०१४. स्वप्नात दिसले, की श्रीस्वामीजी हिरानंदानी मिडोजच्या फूटपाथवरून हाइड पार्कच्या दिशेने चालत येत आहेत. त्यांनी पांढऱ्या रंगाचा कुर्ता व लुंगी घातली आहे. त्यांच्या खांद्यावर एक झोळी आहे. मी कानात हेडफोन घालून गाणी ऐकत संध्याकाळी ६-६.३० च्या सुमारास मित्रांना भेटायला मिडोजच्या दिशेने जात होते. अचानक मी वर बघितले तर मला श्रीस्वामीजी दिसले. मी लगेच त्यांच्या पाया पडले. ते म्हणाले, ''अगं वर बघ! कोण आहेस तू?'' मी म्हणाले ''मी मनाली.'' त्यांनी विचारले, ''कोण मनाली?'' तर मी म्हणाले, ''रुचिकाची मुलगी मनाली'' मग ते म्हणाले ''अच्छा रुचिकाची मुलगी मनाली.''

२५ मार्च २०१४ मी, शिल्पा मावशी व आई (रुचिका) आश्रमात होतो. २-३ दिवस आधीपासूनच मला सतत डोक्यात पालखी गीते येत होती. खूप दिवसापासून ती पालखी गीते म्हटली पण नव्हती व ऐकली पण नव्हती. २५ तारखेला अचानक असे

जाणवले की, एक दिवस अगोदर मी, आई, शिल्पामावशी व दाभोळकरकाका तेथे बसून पालखी गीते म्हणत आहोत.

२६ मार्च २०१४ ला दुपारी २.३०-३.०० वाजता बाबूदादा, चेतनदादा व मी श्रीस्वामीजींचे किचन साफ करत होतो. ते दोघे भांडी धुवून देत होते तर मी ती जागेवर लावत होते. मी बादली घेऊन जात असताना उजवीकडे जो किचनच्या सिंकवर आरसा आहे त्यात बघून मी पुढे गेले. परत मागे येऊन केस नीट करून पुढे जात असताना असे वाटले की, हॉलच्या खुर्चीत श्रीस्वामीजी बसले आहेत व मला काम करताना बघत आहेत. मी परत बघितले तर तेथे श्री स्वामीजींचे कपडे होते, श्री स्वामीजी नव्हते. तसाच भास मला आमच्या रूममधून बाहेर आल्यावर श्रीस्वामीजींची बाल्कनी दिसते तेथे ते बसले आहेत असे वाटले.

९ मार्चला माझी अकरावीची फायनल परीक्षा संपणार होती म्हणून आम्ही २० मार्च २०१४ चे सकाळी १० वाजताच्या फ्लाईटचे बुकींग केले. १४ मार्चला कॉलेजमध्ये सांगितले की पी. इ. ची आमची परीक्षा २० मार्चला सकाळी ११ वाजता आहे व ती जर दिली नाही तर ११ वी ला नापास करणार. मग मी व आई १५ मार्चला पी. इ. च्या सरांना (physical education) भेटायला गेलो. त्यांना सांगितले की, २० मार्चला आमचे फ्लाइट बुक झाले आहे. तर आता काही होऊ शकते का? तर सर म्हणाले, ''तसे तर शक्य नाही पण तुम्ही प्रवासाला जा व आल्यावर परीक्षा द्या.'' आम्ही ३१ मार्चला आश्रमातून आलो. १ एप्रिलला फक्त माझ्या एकटीची परीक्षा झाली.

एक दिवस स्वप्नात गडद भगव्या रंगाचा सूर्य दिसत होता.

समोर डोंगर होता. डोंगरावर श्रीहनुमानजी एका गुडघ्यावर बसून शंख वाजवत होते.

ॐ

## नेहा पाडळे

**म**ला स्वप्नात शंकराची पिंडी दिसली. तिथे खूप गारवा होता. त्या पिंडीच्या बाजूला कोनाडा होता तेथे एक बारीक शरीरयष्टीचे साधू लंगोटी लावून ध्यान करत बसले होते. त्यांच्या डोक्यावर एक वस्त्र होते. मी त्यांना बघत असताना तेथे बाबू आला व त्याने मला विचारले की हे कोण आहेत, तुला माहीत आहे का? मी नाही म्हटल्यावर, त्याने सांगितले की, ''हे परमानंद सरस्वती आहेत.''

कोल्हापूरला रहायला आल्यापासून श्रीदत्तस्तोत्राचे पाठ कमी होत होते. हवनसुद्धा कमी होत होते. त्याचे मनाला वाईट वाटत होते. एक दिवस मी मुद्दाम ठरवूनच श्रीस्वामीजींच्या फोटोसमोर श्रीदत्तस्तोत्राचे पाठ करत बसले होते. त्यांच्याकडे बघत बघत मी स्तोत्र म्हणत होते. तेव्हा त्यांचा फोटो अगदी हसरा आणि जिवंत वाटत होता. डोळे अगदी बोलके दिसत होते. ते माझ्याकडे बघून हसत आहेत असे मला वाटत होते. मी त्यांच्याकडे बघतच श्रीदत्तस्तोत्र म्हणत राहिले. मी ठरविले होते की सहाशे स्तोत्र झाल्याशिवाय उठायचे नाही. तेवढ्यात माझा मुलगा शुभम जेवायला वाढ असे सांगू लागला. माझे श्रीदत्तस्तोत्राचे पाचशे सत्तर पाठ झाले आहेत, मी त्याला सांगितले, की 'सहाशे वेळा श्रीदत्तस्तोत्र म्हणून झाल्यावर वाढते.' स्तोत्र म्हणताना वाटले की, सहाशे पूर्ण झाली पण काऊंटरवर एक हजार हा आकडा होता. तीस स्तोत्र व्हायला जेवढा वेळ लागतो

तेवढ्यात चारशे तीस स्तोत्र झाली होती.

४ सप्टेंबर २०१३ला रात्री ११ च्या सुमारास मी रुचिका-ताईंशी बोलत होते. अचानक डोळ्यापुढे सूर्यकिरणांचा मोठा डोळे दिपवणारा प्रकाश दिसला. मी दोन सेकंदांसाठी एकदम स्तब्ध बसले.

७ सप्टेंवर २०१३ ला दुपारी बारा वाजता नुसती पडून श्वासावर लक्ष ठेवणे चालू होते. अचानक पांढऱ्याशुभ्र प्रकाशाचा एक मोठा झोत मला बंद डोळ्यांनी दिसला. त्यात मला असा विचार आला की, जे काही घडते ते परमेश्वराच्या कृपेने घडते तर त्याची काळजी कशाला? मग मी लगेच डोळे उघडले.

९ सप्टेंबर २०१३ ला घरात गणपती बसले होते, मी मूर्तीसमोर उभी राहून गणपती स्तोत्र म्हणत होते. तेव्हा मला बंद डोळ्यासमोर उलटे प्रश्नचिन्ह (question mark) दिसले व प्रश्नचिन्हाच्या गोलात प्रकाशमान टिंब दिसत होता.

२२ नोव्हेंबर २०१३ ला स्वप्नात मी रुचिकाताईंच्या घरी यायला निघाले पण मला घर सापडत नव्हते व पुढे जाता येत नव्हते. तेवढ्यात एका बाईने लिफ्टकडे हात दाखवून 'लिफ्टने वर जा' असे सांगितले. लिफ्ट लाकडाच्या ओंडक्यांची होती. लिफ्टमध्ये लक्ष्मी नावाची कामवाली मुलगी आहे तिच्याबरोबर जा. मग मी, माझा नवरा व दीर उत्तम पाडळे त्या लक्ष्मी बरोबर वर गेलो. त्या खोलीत सर्व आध्यात्मिक लोक बसलेले होते. तेथे निताताईंनी एक पुस्तक दाखविले व म्हणाल्या की, "हे पुस्तक खूप चांगले आहे. याच्या बद्दल बाहेर कोठेही काहीही बोलायचे नाही. या पुढे खूप काळजी घ्यायची." तेथे अजून एक बाई असते. तिला मी सांगते की, पुढचा दरवाजा बंद असल्याने मी मागच्या दरवाजाने आले. तर ती बाई

मला म्हणते, ''चांगलेच झाले तू पाठीमागून आलीस. त्यामुळे तुला लक्ष्मी व सरस्वती भेटल्या. लिफ्टमध्ये होती ती लक्ष्मी व निता म्हणजे सरस्वती.''

ॐ

## राजीव पाडळे (नेहाचा नवरा)

**मी** रोज एक तास **'श्रीदत्त जय दत्त'** असा जप करत देवाची पूजा व फोटोंची पूजा करतो. आता मला श्रीस्वामीजींच्या फोटोतून अतिशय छान सुगंध येतो.

आजकाल स्वप्नात मी नेहमी हवेत पक्ष्यांसारखे उडत असतो व अतिशय आनंदात असतो. हे स्वप्न मला दर चार दिवसांनी पडते.

एकदा स्वप्नात खूप पाणी दिसत होते. नेहा पण माझ्याबरोबर होती. मी पाण्याला घाबरत होतो म्हणून पुढे जात नव्हतो. तरी पण नेहा मला हात धरून पुढे घेऊन गेली. पाण्याखालच्या जमिनीवरून आम्ही चालत होतो व पाणी आमच्या डोक्यावरून जात होते. चालत चालत आम्ही पुढे गेलो.

ॐ

## शुभम पाडळे (नेहाचा मुलगा)

**मी** डोळे बंद करून चिंतन करत होतो; असे वाटत होते की, समोर एक पर्वत आहे. पर्वतशिखरावर श्रीहनुमानजी बसलेले आहेत. पण मला ते माझ्या स्वतःच्या रूपात दिसत होते. ते खूप

तेजस्वी व प्रेमळ दिसत होते. त्यांच्या कपाळावर व हातावर शंकरासारखे तीन बोटांनी आडवे भस्म लावलेले होते. गळ्यात रुद्राक्षाची माळ होती. त्यांची दाढी पांढरी व लांब होती. अंगावर डोक्यावर लांब केस होते. ते लांब लाकडी पळीने हवन करत होते.

हनुमान चालिसा म्हणत असताना मला असे जाणवते की, मी स्वतः ऑरेंज कलरच्या poster मध्ये बसलो आहे. जसे जसे मी पाठ वाढवत जातो तसा तसा तो कलर जास्त गडद होत जातो व मी एकदम energetic होतो.

मी जेव्हा पेईंग गेस्ट म्हणून रहात होतो, तेव्हा तिथे मला खूप मित्र नव्हते म्हणून मला फार एकटे वाटायचे. त्यामुळे नंतर मी देवाचे वाचन करू लागलो. मला असे जाणवायचे की, श्रीस्वामीजी माझ्याबरोबर आहेत. एक दिवस सकाळी आठ-नऊच्या दरम्यान बाईकवरून जात असताना माझ्या बाजूला उभ्या poster मध्ये श्रीस्वामीजी उडत येत होते. त्यांचे पाय जमिनीपासून १-२ फूट वर होते.

ॐ

## रुचिका पाडळे

**ने**हा व तिच्या फॅमिलीला ठाणे स्टेशनवर सोडायला मी कारने चालले होते. मी बरीच स्पीडमध्ये होते व ट्रकला ओव्हरटेक करायला जात होते. ओव्हरटेक करताना अंदाज चुकला व ट्रकने गाडीला धडक दिली. कार डिव्हायडरवर चढली. गाडीचे थोडे नुकसान झाले पण आतल्या कोणाला काहीच झाले नाही.

मी व मनाली स्कुटरवरून जाताना रिक्षाला आपटून आमचा अपघात झाला. मनालीला काहीच झाले नाही पण माझे खांद्याचे हाड निसटले. नेहा व फॅमिली काही दिवस ठाण्याला येऊन राहिले कारण मला काहीच करता येणे शक्य नव्हते. जास्त दिवस रहाणे शक्य नसल्याने नेहा मला तिच्या घरी बेळगावला घेऊन गेली.

बेळगावच्या डॉक्टरना जेव्हा दाखवले तेव्हा ते म्हणाले की, ''म्हणावी तशी सुधारणा होत नसल्याने ऑपरेशन करून स्क्रू टाकावा लागेल. फक्त एक टक्का चान्स आहे की सर्व नीट होईल. तेव्हा तुम्ही तीन दिवसांनी मला येऊन भेटा.'' त्या तीन दिवसात मी झोपून जेवढी स्तोत्र, जप करता येईल तेवढे करत होते. तीन दिवसांनी आम्ही एक्स-रे काढून डॉक्टरना भेटायला गेलो. तेव्हा डॉक्टर खूपच आश्चर्यचकीत झाले. ते म्हणाले, ''तुम्ही देवाचे खूप करता का? हा चमत्कार आहे की तुमचे हाड बरे होत आहे व आता ऑपरेशनची गरज नाही.''

ॐ

## उत्तम पाडळे (रुचिकाचा नवरा)

**मी,** मनाली, रुचिका व माझ्या भावाची दोन मुले (शुभम व प्रज्वल) असे सर्वजण आम्ही कोल्हापूरहून मुंबईला येत होतो. आम्ही मुंबई-पुणे एक्सप्रेस हाय-वे ला लोणावळ्याजवळ होतो. रुचिका व शुभम झोपले होते. दुपारची वेळ होती. थोड्यावेळातच आम्ही जेवणासाठी थांबणार होतो. गाडी ११०-१२० च्या स्पीडमध्ये होती. तेवढ्यात मला डुलकी लागली व गाडी एकदम राईटला गेली.

मनाली व प्रज्वल एकदम जोरात ओरडले. त्यांच्या ओरडण्याने मला जाग आली तर गाडी उजव्या हाताला रेतीत गेली होती. मनाली व प्रज्वल ओरडले नसते तर गाडी जोरदार आपटलीच असती. श्रीस्वामीजींच्या कृपेने मागच्या गाड्या पण स्लो झाल्या होत्या. गाडीला व आम्हा कोणाला काहीच झाले नाही.

ॐ

## संकेत पाडळे

**एक** दिवस रात्री मला स्वप्न पडले की, श्रीस्वामीजी आमच्या घरी येत आहेत. दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी दाभोळकरकाकांचा फोन आला की, तुमच्या सर्व कुटुंबाला आश्रमात बोलावले आहे.

**पाडळे कुटुंब**

**ठाणे व कोल्हापूर**

ॐ

**भक्ती एक मी जाणे पार्था ।**

**सान थोर हे नाही ।**

**भाव-भक्तीचे पाहुणे आम्ही ।**

**पावो कोणातेही ॥**

**॥ स्वामी स्वरुपानंद ॥**

# अर्पणा मंडावडे

**मी** अर्पणा मंडावडे. मी गेली दोन वर्षे शाळेत शिक्षिकेची नोकरी करत आहे. माझा मुलगा अद्वैत या वर्षी १० वीत आहे. त्याचा नीट अभ्यास व्हावा म्हणून शेवटचा एक महिना सुट्टी मिळाली तर बरे असे वाटल्याने १ महिना रजेसाठी अर्ज दिला. तेव्हा मला असे सांगण्यात आले की, अशी रजा देणे शक्य नाही. शाळेच्या नियमात ते बसत नाही. काही अनुभवी टीचरकडून पण कळले की, पूर्ण एक वर्षाची गॅप घ्यावी लागेल. अशी रजा कधीच देत नाहीत. सगळीकडून असे कळल्यावर मी एक वर्षाचा ब्रेक घ्यायचा निर्णय घेतला. जे होते ते ईश्वराच्या इच्छेने होते हाच विचार मनात ठाम होता. मला माझ्या मुख्याध्यापिकेने बोलावून सांगितले की, तुझी रजा मंजूर करणे माझ्या हातात नाही. मी बोर्डच्या चेअरमनशी बोलून घेते. सर्व पर्याय विचारात घेऊन इतर कोणताच पर्याय सूट होत नसल्याने मी सरळ राजीनामा दिला. राजीनामा दिल्यावर दोन दिवसांनी मला सांगण्यात आले की तुला नोकरी सोडायची गरज नाही. तुझी एक महिन्याची रजा मंजूर झाली आहे. शाळेच्या

आजपर्यंतच्या इतिहासात अशी रजा कोणालाच मंजूर झाली नाही. सुरुवातीला ठामपणे नकार दिलेल्या ट्रस्टींनी अचानक आपला निर्णय का बदलला हे कोणालाच समजले नाही. पण माझ्या मनात मला नक्की माहीत होते की हा चमत्कार कसा झाला व कोणी केला.

मे २०१४ ला आम्ही सर्वजण बसने आश्रमात निघालो होतो. तो बस ड्रायव्हर अतिशय भयंकर ड्रायव्हींग करत होता. आम्ही सर्वजण अक्षरशः जीव मुठीत धरून बसलो होतो. त्याच भीतीमुळे माझे सतत श्रीदत्तस्तोत्र चालू होते. मध्यरात्री कधीतरी मला झोप लागली. पण झोपेतसुद्धा हीच काळजी होती की आपण सुखरूप पोहोचू की नाही? असा विचार येता क्षणीच पिवळ्या प्रकाशात श्रीदत्त महाराज दिसले. त्यांच्या हातातून त्रिकोणी आकाराचा प्रकाश अशा प्रकारे येत होता की, त्या प्रकाशाने पूर्ण बस कव्हर केली होती. त्याच प्रकाशात ती बस चाललेली होती. त्यानंतर सकाळपर्यंत मला अतिशय गाढ व शांत झोप लागली.

आश्रमात मी त्रिफला वृक्षाखाली बसून श्रीदत्तस्तोत्राचे अनुष्ठान (४० वेळा) केले. त्यानंतर श्रीदत्तस्तोत्र म्हणत त्रिफला वृक्षाला प्रदक्षिणा घालू लागले. काही प्रदक्षिणा झाल्यानंतर नमस्कार करताना अचानक मला गुडघ्यापर्यंतचे पाय दिसल्यासारखे वाटले. आपल्याला भास झाला असेल असे वाटून मी प्रदक्षिणा घालत होते. परत काही प्रदक्षिणानंतर नमस्कार करताना त्रिफला वृक्षामध्ये मागे गाय व गायीच्या पुढे छातीपर्यंतचा भाग दिसला तरी मी प्रदक्षिणा करतच होते. परत थोड्यावेळाने नमस्कार करताना मागे गाय असलेल्या संपूर्ण श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाले.

ॐ

## अमर मंडावडे (अर्पणाचा नवरा)

**मे** २०१३ ला आश्रमातून मी तसाच हैद्राबाद टूरला गेलो होतो. माझ्या डोक्यात सतत माझ्या नोकरीची काळजी होती. त्या दिवशी रात्री मी साडेसात-आठलाच झोपायला गेलो. गाढ झोपेत असताना अचानक एक साधू महाराज आल्याचे जाणवले. मला वाटले की ते श्रीस्वामीजीच आहेत व कानात स्पष्टपणे आवाज ऐकू आला, ''काळजी करू नकोस, मी तुझ्या बरोबर आहे!''

**अर्पणा अमर मंडावडे**

**ठाणे**

ॐ

**तो मनुष्यासारिखा तरी आवडे ।**
**परी मनुष्यत्व तया न घडे ।**
**जैसे जळी जळामजी न बुडे ।**
**भानुबिंब ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# दीपा शेंबेकर

**मी** दीपा शेंबेकर. माझे यापूर्वीचे अनुभव मी **श्री स्वामी दत्तावधूत या सिद्धयोग्याच्या सहवासात भाग - १** या पुस्तकात दिले आहेत. तद्नंतर जे काही अनुभव आले ते पुढे देत आहे.

माझ्या पाठीच्या मणक्यांमध्ये एल-५ जागेवरून सरकल्यामुळे गॅप निर्माण झाली होती. त्यामुळे मला खूपच वेदना होत असत. पाठीच्या मणक्यावर सहा ठिकाणी सेन्सेटिव्ह स्पॉट होते. तेथे खूप वेदना होत असत. ऑपरेशन करूनही काहीच उपयोग होणार नाही असे डॉक्टरने सांगितले.

मी भरतनाट्यम्‌चे क्लासेस् चालवत असे. पाठीच्या या दुखण्यामुळे ते क्लासेस् बंद पडले. शेवटी तर अशी परिस्थिती झाली की, पाच मिनिटांपेक्षा जास्त मला बसता येईना. डॉक्टरने, ''पूर्ण बेडरेस्ट घ्या,'' असे सांगितले.

सप्टेंबर २०११ नंतर मी चोवीस तास झोपून राहू लागले. पाच मिनिटेही बसणे मला अशक्य झाले. २०१२ व २०१३ दोन वर्षे झोपून काढली. त्यावेळी श्रीस्वामीजी नर्मदा परिक्रमेत होते.

जानेवारी २०१४ मध्ये माझी मैत्रिण नंदिनी हिला श्रीस्वामीजींचा फोन आला. तेव्हा तिने माझी सर्व हकिकत श्रीस्वामीजींच्या कानावर घातली. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''दीपा शेंबेकरला सांग. काहीही काळजी करू नकोस. तू ठणठणीत बरी होशील. इतकेच नव्हेतर तू पद्मासनात बसू शकशील व भरतनाट्यम्चे तुझे क्लासेस् परत सुरू होतील. काळजी करू नकोस!''

श्रीस्वामीजींचा निरोप नंदिनीने मला दिला.

चोवीस तास मी झोपून रहात होते. श्रीस्वामीजींच्या आशीर्वादाचे शब्द जरी अमृतासारखे होते, तरी.... ईश्वराच्या कृपेने मी चोवीस तासातील काही तास उठून उभी राहू शकेन, स्वयंपाक करू शकेन एवढाच अर्थ मी घेतला. कारण यापेक्षा जास्त माझी अपेक्षा नव्हती. भरतनाट्यम् करणे, क्लासेस् चालवणे या गोष्टी दोन वर्षांपूर्वी डॉक्टरांच्या सांगण्यामुळे बंद झाल्या होत्या. आयुष्यात कधीही भरतनाट्यम् करू शकणार नाही असे ऑर्थोपेडिक सर्जनने सांगितले होते. त्यामुळे श्रीस्वामीजींच्या आशीर्वादाचा अर्थ शब्दशः न घेता ईश्वराच्या कृपेने थोडेफार घरकाम करू शकेन एवढाच मी घेतला. कारण सोफ्यावरसुद्धा मी पाच मिनिटांहून जास्त वेळ बसू शकत नव्हते व पाठीला सपोर्ट घेतल्याशिवाय दोन मिनिटे बसणेही मला अशक्य होते. अशा परिस्थितीत नंदिनीने जे काही सांगितले त्यात मला अतिशयोक्ती वाटली होती, परंतु नंदिनीने निरोप दिल्यानंतर पुढे एकापेक्षा एक अशा चमत्कारिक घटना घडत गेल्या. गोव्यातील एका हाडवैद्याच्या उपचाराने मला पूर्ण बरे वाटले. पाठीला सपोर्ट घेतल्याशिवाय मी बसू लागले, हिंडूफिरू लागले, सर्व कामे करू लागले व भरतनाट्यम्ही करू लागले. ही सर्व आनंदवार्ता श्रीस्वामीजींना कळविल्यानंतर

श्रीस्वामीजी म्हणाले, ‘‘आता भरतनाट्यम्चे क्लासेस् सुरू कर!’’

श्रीस्वामीजींचा हा निरोप ऐकून आता काय करावे असा प्रश्न पडला. कारण क्लासेस्साठी जागा मिळणे कठीण होते. २४ सप्टेंबर २०१४ रोजी भरतनाट्यम् क्षेत्रातील एक व्यक्ती माझ्याकडे आली व त्यांनी मला भरतनाट्यम्चा क्लास घेण्याची विनंती केली. ते मला म्हणाले, ‘‘मी परदेशात जाणार आहे. तेव्हा माझे भरतनाट्यम्चे क्लासेस् तू चालव.’’ अशारितीने श्रीस्वामीजींचे आशीर्वादाचे शब्द अक्षरशः खरे ठरले.

नवरात्रात मी एक लाख जप पूर्ण केल्यावर सासूबाईंना स्वप्नात घरात एक सालंकृत देवी आल्याचे दिसले.

माझा मुलगा तनय पाचव्या वर्षापासून गणपती स्तोत्र, नवग्रह स्तोत्र, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र, दत्तस्तोत्र व दुर्गा स्तोत्र म्हणत आहे. आठव्या वर्षापासून दत्तात्रेयस्तोत्र म्हणत आहे. त्याच्या बाराव्या वर्षी सासूबाईंना स्वप्न पडले की तनयच्या पायाशी खूप नाग होते. ते सर्व निघून जाऊन त्या जागी फुले तयार झाली आहेत.

नववीपर्यंत तनयला अभ्यास व्यवस्थित झाला तरी, भीती वाटायची की केलेला अभ्यास परीक्षेच्या वेळी नीट आठवेल की नाही, तो १० वीत गेल्यावर दिवाळीत श्रीस्वामीजींनी तनयला साधना सांगितली. तो ती न चुकता रोज करतो. त्यानंतरच्या सर्व परीक्षेत पेपरच्या आधी एक तास त्याला अचानक एखादा प्रश्न आठवून पाहिला पाहिजे असे जाणवायचे. तो प्रश्न अगदी वेगळाच किंवा कधीतरी out of portion वाटायचा. तरी त्या प्रश्नाची तयारी करून गेल्यावर तोच प्रश्न परीक्षेला यायचा. एकदा असे झाले की, जे त्याने १५ दिवसांपूर्वीच आठवून पाहिले होते त्यावर प्रश्न आला, त्याला वाटले, आता हे

आपल्याला आठवेल की, नाही? मग तो डोळे मिटून शांत बसला तेव्हा त्याला डोळ्यासमोर ते पूर्ण छापलेले उत्तर आले. ते त्याला नीट वाचता आले नाही कारण ते काही क्षण डोळ्यासमोर आले होते. पण लिहायला घेतल्यावर त्याला ते अगदी व्यवस्थित लिहिता आले.

**दीपा शेंबेकर**

**ठाणे**

ॐ

**तेणे न पाहता विश्व देखिले ।**
**न करिता सर्व केले ।**
**न भोगिता भोगिले ।**
**भोग्यजात ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# नंदन चौगुले

**मी** नंदन चौगुले. १६ सप्टेंबर २०१३ ला मला अचानक कंपनीतून तीन महिन्यात नोकरी सोडण्याची नोटीस आली. माझा परफॉर्मन्स् नीट असतानासुद्धा आलेल्या नोटीसचे मला आश्चर्य वाटले, मला टेन्शन येण्याआधीच २४ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरला आश्रमात जाण्याचा योग आला. मी व शिल्पा (माझी पत्नी) नागार्जुनसागरला गेलो. त्यानंतर दिवाळीसाठी व श्रीदत्तजयंतीसाठी असे तीन महिन्यात तीन वेळा आश्रमात आमचे जाणे झाले. या तीन महिन्यांच्या काळात मी, शिल्पा, माझी आई व प्रतीक (माझा मुलगा) आम्हा सर्वांना श्री स्वामीजींनी थोडेही टेन्शन येऊ दिले नाही. प्रत्येक दिवस त्यांच्या आशीर्वादाने अगदी आनंदाचा व मजेचा जात होता. कधीही त्यांनी काळजी व चिंतेला आमच्या आसपासही फिरकू दिले नाही जे आमच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे.

२४ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरच्या आश्रमाच्या वास्तव्यात नंदिनीने मला **संश्रिप्त श्रीगुरुचरित्र** संपूर्ण वाचण्यास (जे मी आधी ४ अध्याय व नंतर ३ अध्याय वाचत असे) सांगितले व १०८

वेळा **श्रीदत्तस्तोत्र** व **श्री स्वामी समर्थ सप्तशतीचा** एक अध्याय रोज वाचण्यास सांगितले. मी लगेचच **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व १०८ वेळा श्रीदत्तस्तोत्र सुरू केले पण **श्री स्वामी समर्थ सप्तशतीचे** वाचन काही होईना. शिल्पा मला अधून-मधून आठवण करून देत होती पण काही केल्या ते होईना. मग एक दिवस शिल्पाने आठवण करून दिल्यावर मी **श्री स्वामी समर्थ सप्तशतीचा** तिसरा अध्याय वाचला व ऑफिसला निघालो. दीड महिन्यात जो एकही इंटरव्ह्यू कॉल आला नव्हता तो त्या दिवशी दोन तासात दोन कंपनीतून इंटरव्ह्यू कॉल आले. मला त्याच दोन कंपनीतून कॉल हवा असे वाटत होते. रिलायन्स जिओचा कॉल दुपारी ४ वाजता झाला, तो अतिशय चांगला झाला.

मधल्या काळात रिलायन्स जिओ मधून सतत या आठवड्यात ऑफर लेटर पाठवतो, मग पाठवतो परत मग पाठवतो असे प्रकार चालू होते. आधी ठरल्याप्रमाणे planned holiday साठी लोणावळ्याला जाऊन आलो. तेथे गेल्यावर फोनवरून सतत कळत होते की, तुझे काम बहुतेक होणार नाही. मी त्यांना शांतपणे as you wish असे सांगितले. परत घरी आल्यावर श्रीदत्तस्तोत्र वाचायला बसल्यावर पंधरा मिनिटांत फोन आला तुझे काम होत आहे. माझे सर्व डिटेल्स मागवले. पण श्रीदत्त जयंतीच्या आधी २०-२२ दिवस परत तिथून फोन आला की आणखी एक इंटरव्ह्यू व्ही. पी. बरोबर होईल मी त्यांना सतत सांगत होतो की १३ डिसेंबर ते १९ डिसेंबर आम्ही बाहेरगावी जाणार आहोत. त्यामुळे लवकर इंटरव्ह्यू घ्या. पण अचानक आश्रमात निघायच्या आदल्या दिवशी तिथून फोन आला की, इंटरव्ह्यू १३ डिसेंबर ते १९ डिसेंबरच्या दरम्यानच होईल. तर

तुमची ट्रिप पुढे ढकला. मी त्यांना स्पष्ट सांगितले की ते शक्य नाही. त्यावर ते म्हणाले की, मग आम्ही दुसरा candidate शोधतो नंतर आम्हाला दोष देऊ नका. पण मी ठामपणे सांगितले की, नोकरी नाही मिळाली तरी चालेल पण मी जाणारच. मी बाहेर आल्यावर म्हणालो की, श्रीस्वामीजी माझ्या पाठीशी आहेत. जर या कंपनीत माझे चांगले होणार असेल तर ही नोकरी मला मिळेल. नाहीतर याच्यापेक्षा चांगली नोकरी माझ्या नशिबात असेल. नंतर आमची या संदर्भात काहीच चर्चा झाली नाही. आम्ही आनंदात आश्रमात गेलो व तेवढ्याच उत्साहात श्रीदत्तजयंतीचा उत्सव साजरा केला.

२० डिसेंबरला पहाटे आम्ही आश्रमातून परत आलो. मी विचार केला की, आपण कंपनीत फोन करू जर नोकरी मिळत नसेल तर तसे ते सांगतील. फोन लावल्यावर कळले की, इंटरव्ह्यू कॅन्सल झाला आहे व आता दोन दिवसात ते ऑफर लेटर पाठवतील. त्याप्रमाणे दोन दिवसात चांगली पोस्ट व पगाराचे ऑफर लेटर आले.

**मा**झ्या भाच्याला (सुमित) मेकॅनिकल इंजिनियर झाल्यावरही सहा महिने नोकरी मिळत नव्हती. त्याच्या वडिलांचा स्वतःचा बिझनेस आहे. त्यात त्याने सहा वर्षे मदत केली. पण फारसे उत्पन्न नसल्याने त्याने व्यवसाय सोडला. वडिलांकडून पैसे घेऊन तो पुण्यात पेईंग गेस्ट म्हणून रहात होता. मधल्या काळात त्याने कॉम्प्युटर कोर्स केला. असे सहा महिने गेले पण नोकरी मिळत नव्हती. कारण कोणाचाच वशिला त्याच्याकडे नव्हता. वडिलांकडून पैसे घेऊन तो कसेबसे भागवत होता. २००६ किंवा २००७ला मी कोल्हापूरला गेलो तेव्हा त्याच्याशी बोलणे झाले. तेव्हा त्याला **श्रीदुर्गा त्रिशती** मधील देवी कवच वाचायला सांगितले. त्याला म्हटले निदान सहा महिने तरी

वाचून फरक पडला तर बघ. त्याने लगेच श्रद्धेने वाचन चालू केले. अडीच महिन्यात त्याला बेंटलीमध्ये नोकरी लागली. पगारसुद्धा फारच चांगला मिळाला. आता तो देवी कवच वाचल्याशिवाय कधीही घराबाहेर पडत नाही.

**नंदन चौगुले**

**ठाणे**

ॐ

**तैसे संकल्पोनि काढिले ।**
**जयाचे मनचि चैतन्य जाहले ।**
**तेणें एकदेशिये परि व्यापिले ।**
**लोकत्रय ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. सुजाता माळवे

**ए**कदा नवरात्रात देवी मंत्राचे अनुष्ठान केले. तेव्हा समाप्तीच्या दिवशी घर गावठी गुलाबाच्या वासाने पूर्ण भरून गेलेले होते. नंतर मला कळले की, सौ. आईंना (सौ. वनिता दीक्षित) पिवळा गुलाब खूप आवडतो.

एकदा स्वप्नात मी आणि प्रवीण एका जहाजात होतो. समुद्रात खूप वादळ सुरू झाले होते. खूप मोठ्या प्रचंड काळ्या रंगाच्या पाण्याच्या लाटा उसळत होत्या, त्या जहाजाचे कॅप्टन श्रीस्वामीजी होते. त्यांनी ते जहाज समुद्रातून काढून रस्त्यावर गाडी पार्क करावी तसे सुंदर बाग असलेल्या एका टुमदार बंगलेवजा घरासमोर आणून उभे केले. बागेत खूप पिवळी फुले, पिवळे गुलाब दिसत होते.

एकदा माझी चाळीस वर्षांपूर्वी दिवंगत झालेली आई स्वप्नात आली. तिच्या हातात गुलाबाच्या फुलांचा गुच्छ व दवणा, अबोली, मोगरा या फुलांचा गजरा होता. मला म्हणाली, 'चल सौ. ताईंच्या दर्शनाला जाऊ! मला सौ. ताईंचे आभार मानायचे आहेत.'

सौ. आई (सौ. वनिता दीक्षित) जेव्हा अमेरिकेत आमच्याकडे आल्या तेव्हा मला त्यांच्या भोवती अनेक तारे चमकताना दिसत होते. पुष्कळवेळा सौ. आई माझ्या स्वप्नात येतात व मार्गदर्शन करतात. अनेकदा सप्तशृंगी गडावरील देवीच्या जागी तसेच कोल्हापूर महालक्ष्मीच्या मूर्तीच्या जागी सौ. आईच (सौ. वनिता दीक्षित) दिसतात.

आम्हाला सदैव सद्बुद्धी होत राहो. अशी परमेश्वर चरणी प्रार्थना!

**सौ. सुजाता माळवे**
**सॅन फ्रान्सिसको, अमेरिका**

ॐ

**तू मन हे मीचि करी ।**
**माझीया भजनी प्रेम धरी ।**
**सर्वत्र नमस्कारी ।**
**मज एकाते ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. प्रतिभा मुकुंद लागू

**मी** प्रतिभा लागू. मी व माझे यजमान कॅप्टन मुकुंद लागू हैद्राबादला रहातो. माझी मुले पुण्यामध्ये असतात. १९९७ पासून मी मानसिक आजाराची शिकार बनले होते. माझ्या मनात उदासीनता, चलबिचल, भीति, आपण आता फार काळ जगणार नाही असे विविध नकारात्मक विचार येत रहायचे. माझ्या यजमानांची बोटीवर नोकरी असल्यामुळे ते चार ते आठ महिने बोटीवर असायचे. नोकरी निमित्ताने मुलगाही बोटीवर असायचा. माझी मुलगी फक्त माझ्याबरोबर रहात होती. तेव्हा ती आठवीत होती. तिच्या हातात मी नेहमी टेलिफोनची डायरी देऊन सांगत असे की, माझे काही बरे वाईट झाले तर सर्वांना फोन करून सांग. मला बाथरूममध्ये जाऊन आंघोळ करायला, तसेच बाहेर जायलासुद्धा भीति वाटत असे. अशा परिस्थितीत मी आठ वर्षे काढली. सगळ्या टेस्ट केल्या. त्या नॉर्मल असायच्या पण माझे मन व प्रकृतीत काही बदल होत नव्हता.

माझ्या यजमानांच्या एका मित्राने आम्हाला नागार्जुनसागरला एक पॉवरफूल शक्तिपीठ आहे तिकडे जाऊन तुम्ही दर्शन घेऊन या

असे सांगितले. त्याने सांगितल्याप्रमाणे २४-८-२००५ रोजी आम्ही प्रथम नागार्जुनसागरला आलो. इथे आल्यानंतर अर्ध्या तासाने आम्ही आश्रमात गेलो. दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी आरतीला गेलो. सगळ्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तेव्हा कुठे मन शांत झाले. त्यानंतर यांच्या मित्राने मुंबईहून **'श्री दुर्गा त्रिशती'** व **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'** या पोथ्या १ सप्टेंबर २००५ रोजी पाठवल्या.

पोथ्या मिळाल्यानंतर आम्ही उभयता रोज एक-एक अध्याय वाचायला लागलो. दुसऱ्या खेपेस नागार्जुनसागरला १८ ऑक्टोबर २००५ रोजी गेलो. त्या दिवशी आम्ही ध्यानमंदिर बघितले. तेथे पावसाचे एक ते दीड फूट पाणी भरले होते. तेव्हा तिकडची व्यवस्था राजेश पहात होता. त्याने अतिशय छान भाषेत खूप गोष्टी सांगितल्या. खूप अनुभव सांगितले. भारावलेल्या मनाने आम्ही परत आलो.

त्या दिवसानंतर **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** संपूर्ण वाचू लागले. माझ्या मनाला जी भीति वाटत होती ती नाहीशी झाली. श्रीस्वामीजींचा फोटो बघायलासुद्धा भीति वाटत होती. ती हळूहळू कमी झाली. अंतर्मनात जी ढवळाढवळ होत होती ती जवळजवळ नाहीशी झाली. दोन्ही पोथ्या वाचनात आल्यामुळे श्रीदुर्गा माता व श्रीस्वामीजी माझ्याबरोबर सतत आहेत व मला ते साथ देत आहेत तसेच माझे संरक्षण करत आहेत असे वाटायला लागले. मी दिवसाला तीस गोळ्या घेत होते. त्या हळूहळू कमी केल्या. २००५ च्या नोव्हेंबर महिन्यात आम्हाला आज्ञा झाली, ''तुम्ही श्रीदत्त जयंती उत्सवाला या.'' पण मला स्वतःला आत्मविश्वास वाटत नव्हता व आम्हाला हॉटेलमध्ये रहावे लागत असे. माझे यजमान बोटीवर असल्याकारणाने आम्हाला येता आले नाही. तेव्हा श्रीस्वामीजी व सौ. ताई तेथे आले होते पण आमच्या नशिबात

त्यांना भेटण्याचा योग नव्हता.

२००६ ते २००८ या काळात मी खूप सावरले गेले होते. जगण्याची इच्छा निर्माण झाली. ईश्वराच्या कृपेने मी परत माणसांत आले. आपण आपल्या जीवनात ईश्वराचे काहीतरी करावे असे मनाला वाटू लागले. पोथ्या वाचन, स्तोत्र पठण चालूच होते. आश्रमात जाऊन सेवा करावी असेही वाटू लागले पण आम्हाला तेथे रहायची परवानगी नसल्यामुळे आम्हाला हॉटेलमध्ये रहावे लागत असे. श्रीदत्त जयंती व गुरुपौर्णिमेला आम्ही सकाळी जाऊन संध्याकाळी पालखी संपल्यानंतर परत जात असू. इतर वेळी नुसते दर्शनाला जात असू.

याकाळातील ''**माशाचा काटा**'' हा माझा अनुभव **ईश्वरभक्तीचे अनुभव** या पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे.

जुलै २००८ मध्ये मला स्वप्नामध्ये औदुंबराचे झाड दिसले. संपूर्ण हिरवेगार व पानांनी बहरलेले होते व त्याच्या भोवतालचा चबुतरा कोणीतरी साफ करत आहे असे दिसले. (श्रीस्वामीजी त्याच चबुतऱ्यावर बसून दर्शन देतात). हे स्वप्न मी श्री भाईमामांना सांगितले, तेव्हा ते फक्त हसले.

पण त्याचा अर्थ मला नंतर लक्षात आला. १३ जुलै २००८ रोजी आम्हाला श्रीस्वामीजींचे प्रथमच दर्शन झाले. आमच्या जीवनात तो दिवस सोन्याच्या अक्षराने लिहिण्यासारखा होता. त्या दिवशीचा आनंद अवर्णनीय होता. आम्ही दोघे चार दिवस त्यांच्या सहवासात होतो. त्या दिवसापासून आत्तापर्यंत कोणत्याही गोष्टींची अडचण, त्रास, मनस्ताप झाला नाही. आमच्या प्रारब्धात ज्या काही घटना घडतील किंवा घडल्या असतील त्या श्रीस्वामीजी व सौ. ताईंच्या कृपा व आशीर्वादाने नगण्य वाटतात. त्यांच्या दर्शनानंतर आश्रमात रहायला

मिळाले ही संधी म्हणजे आमच्यासाठी अलभ्य लाभ होता.

त्याच महिन्यात मला दुसरे स्वप्न पडले, एक मोठे कासव आहे व त्याच्या उजव्या बाजूला मोठे शंख व चक्र आहे व डाव्या बाजूला उंट आहे. मी त्यांच्या मनोभावे पाया पडले व सहज तोंडातून श्रीस्वामी दत्तावधूत असे नांव बाहेर पडले. ऑगस्ट २००८ मध्ये सौ. ताईंचे दर्शन झाले. मी त्यांना फक्त दहा मिनिटांसाठी भेटले कारण मला परत हैद्राबादला कामासाठी यायचे होते. मी त्यांना नमस्कार केला तेव्हा त्यांच्या शरीरातून प्रकाश किरणांचे झोत माझ्या शरीरात जात आहेत असे श्रीस्वामीजी म्हणाले. तेव्हा मन अगदी उचंबळून आले व आपल्या जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

दोन्ही देवांचे एकत्रितरित्या दर्शन अगदी अलभ्य लाभ. कितीही लिहिले तरी अपुरे वाटते. २००८ मध्ये आमच्या उभयतांच्या जीवनात खूप चांगल्या चांगल्या गोष्टी घडल्या. त्याच वेळी 'त्रिफला वृक्षाने' मला स्वप्नात दर्शन दिले व म्हणाला, ''श्रीस्वामीजी तुला बोलावित आहेत तू लवकर ये.'' मग मी आश्रमात जाऊन राहिले. २००८ ते २०१४ पर्यंत मी अनेकवेळा आश्रमात जाऊन राहिले. घरच्या थोड्या अडचणीमुळे खूप दिवस रहाता येत नसे. पण जेवढे मिळते तेवढी ईश्वराची कृपा. तेही नसे थोडके. जेव्हा मला श्रीस्वामीजी व सौ. ताईंचे दर्शन होणार असेल तेव्हा मला सूचक स्वप्ने पडत.

माझे यजमान व मी नोकरीच्या निमित्ताने २०१० मध्ये स्कॉटलंडला गेलो होतो. तेथे आम्ही ॲबर्डीन शहरात रहात होतो. तेथे खूप महाराष्ट्रीयन मंडळी रहात होती. त्यांना पुस्तके व पोथ्या भेट म्हणून दिल्या. एकदा सोलापूर जवळ उमरगा येथे रहाणाऱ्या मिसेस

माने ॲबर्डीनच्या मार्केटमध्ये भेटल्या. त्यांची व माझी ओळख झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांचे प्रॉब्लेम्स त्यांनी माझ्याबरोबर शेअर केले. तेव्हा त्यांना मी सांगितले की, तुम्ही माझ्या घरी या. मी तुम्हाला पोथ्या देईन. काही ना काही कारणाने त्यांना येता आले नाही. एकदा त्यांच्या स्वप्नात श्रीस्वामी समर्थ आले व म्हणाले, ''तुला त्या पोथ्या देत आहेत तर तू आणायला का जात नाहीस?'' त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी फोन केला व म्हणाल्या, ''मी संध्याकाळी येऊन पोथ्या घेऊन जाते.'' सांगितल्याप्रमाणे त्या पोथ्या घेऊन गेल्या पण त्यानंतर मी भारतात परत आल्याने माझे त्यांच्याशी कॉन्टॅक्ट राहिले नाही.

माझे सासू-सासरे यांच्या मृत्यूच्या वेळी माझे यजमान बोटीवर होते तेव्हा दोन्ही वेळेला श्रीस्वामीजी आश्रमात होते. वेळोवेळी दाभोळकरदादा व चि. चेतन यांच्यामार्फत ते मला मार्गदर्शन करत असत. त्यामुळे गंभीर प्रसंगी माझे नातेवाईक जवळ नसताना प्रत्येक गोष्ट धैर्याने केली. निर्णय घेताना भीती वाटली नाही. भक्तांसाठी देव कसे धावून येतात व मदतीचा हात पुढे करतात याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. संकटे आल्यानंतर ते आपल्या मागे उभे असतात. आपणसुद्धा ईश्वरासाठी आपल्या मनाचा मोठेपणा, समर्पकता, काबाडकष्ट केले पाहिजेत. त्यात आपल्या चुका होतात पण देव सांभाळून घेतात.

२०१२ मध्ये मला स्वप्न पडले की, एक लहान मुलगा देवीच्या मूर्तीजवळ उभा आहे व तिच्या कपाळावरच्या सोन्याच्या कुंकुवाला हात लावत आहे व श्रीस्वामीजी एका ओट्यावर बसून त्याच्याकडे पहात गालातल्या गालात हसत आहेत. लगेच तिसऱ्या दिवशी माझी सून सौ. श्रीयाला दिवस गेल्याची बातमी आली.

२०१३ मध्ये जेव्हा सौ. ताई आश्रमात आल्या होत्या तेव्हा त्यांनी स्वतःच्या हाताने पोथ्या व पुस्तके दिली. त्याच रात्री आश्रमात असताना मला स्वप्न पडले. सौ. ताईंनी चार देवतांचा फोटो दाखविला. त्यातील एक देवता स्पष्ट दिसत होती. ती अत्यंत तेजस्वी होती तिने मुकुट, कमरपट्टा असे अनेक दागिने परिधान केले होते. मला त्या म्हणाल्या, ''या सर्व अनादी देवता आहेत. आजपासून यांची शक्ती तुम्हाला देत आहे.''

एप्रिल २०१४ मध्ये मला असे स्वप्न पडले की मी सौ. ताईंबरोबर जात आहे. सौ. ताईंनी मुकुट, कमरपट्टा धारण केलेले आहे. त्या अत्यंत तेजस्वी दिसत होत्या. आम्ही कोठे जात आहोत हे काही कळत नव्हते. आश्रमात गेल्यावर हे स्वप्न मी बाबूला सांगितले. बाबू म्हणाला, ''सौ. ताई सतत तुमच्या बरोबर आहेत.'' लगेच दहा दिवसानंतर त्या आमच्याबरोबर आश्रमात आल्या.

एकदा श्रीस्वामीजी आश्रमात आले होते. तेव्हा त्यांना कळले की, माझी आई माझ्याबरोबर रहाते तेव्हा मला त्यांचा फोन आला की, ''तुमच्या आईंना तुम्ही तुमच्याबरोबर आश्रमात घेऊन या.'' माझ्या घरी श्रीस्वामीजींचा फोटो ठेवला आहे. माझी आई रोज सकाळी तुपाचा दिवा लावून अगरबत्ती पेटवून फोटोला फुले वहायची, तिला ते कोण आहेत माहीत नव्हते. तिला इतकेच माहीत होते की, ते देव आहेत. गेल्या वर्षभर ती रोज श्रद्धेने न विसरता फुले वहात होती. त्यामुळे तिला दर्शनाचा योग आला असेल. त्यांच्या दर्शनाने तिला खूप आनंद झाला.

प्रत्येक गुरुपौर्णिमा व श्रीदत्त जयंतीला प्रत्यक्षात देवांचे दर्शन झाले नाही तरी स्वप्नात असे काही सूचक अनुभव येतात की, दोन्ही

उत्सव चांगल्यारितीने पार पडतात. अर्थात हे देवांच्या कृपाकिरणांशिवाय शक्य नाही. कितीतरी अनुभव प्रत्यक्षात येतात. कित्येक गोष्टींची कल्पना व मार्गदर्शन स्वप्नात मिळते. आमचे उभयतांचे परमभाग्य की आम्हाला आश्रमात श्रीस्वामीजी व सौ. ताईंच्या सान्निध्यात रहायला मिळते. असे कित्येक अनुभव आहेत ते सर्व लिहिले तर पुस्तकच निर्माण होईल.

ईश्वराजवळ एकच प्रार्थना आहे की, आमचे मन विचलीत न होता अहंकाररहित निरपेक्ष मनाने सेवा घडो. जास्तीत जास्त ईश्वरभक्ती, परोपकार व दान करण्याची प्रेरणा मिळावी.

श्रीस्वामीजींचे व सौ. ताईंचे कृपाकिरण आमच्यावर सदैव राहो.

श्रीस्वामीजी व सौ. ताईंना आमचे शतशः प्रणाम.

**सौ. प्रतिभा मुकुंद लागू**

**हैद्राबाद**

ॐ

**ते ज्ञान हृदयी प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे ।**
**मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. रश्मी ओक

**मी** सौ. रश्मी ओक. माझे पती मिलिंद ओक. आम्ही मूळचे जबलपूरचे रहाणारे.

आम्ही दोघांनी ईश्वरभक्ती करायला सुरुवात केल्यापासून श्रीस्वामीजींच्या कृपेने, आशीर्वादाने चमत्कार वाटावे असे अनुभव आम्हाला आयुष्यात आले. त्यातील काही अनुभव येथे नमूद करत आहे.

श्रीस्वामीजी लिखित पोथ्यांचे वाचन व स्तोत्र पठण सुरू करून काही काळ लोटला होता. एका कार्यक्रमानिमित्त आम्ही ठाण्याला माझ्या बहिणीकडे गेलो होतो. एका रात्री मला स्वप्नात पांढरे कपडे घातलेले तरुण व अतिशय तेजःपुंज असे सत्पुरुष दिसले. त्यांनी माझ्याकडे एक पांढरा सदरा देऊन तो धुवून आणायला सांगितला. सकाळी मी ही गोष्ट वैशालीला सांगितली, तेव्हा तिने तिच्या जवळील श्रीस्वामीजींचे फोटो मला दाखविले. फोटो पाहून लक्षात आले की स्वप्नात श्रीस्वामीजींनीच दर्शन देऊन आशीर्वाद दिले होते. त्यानंतर आम्ही जास्त उत्साहाने ईश्वरभक्ती करायला लागलो.

श्री. मिलिंद यांची कामानिमित्त जबलपूरहून बिलासपूर (छत्तीसगड) येथे बदली झाली. तेव्हा तेथून अमरकंटक हे नर्मदा मैय्याचे उगम स्थान जवळ असल्याने आम्ही दोघेच सुट्टीच्या दिवशी आमच्या गाडीने दर्शनाला गेलो. बिलासपूरहून अमरकंटक १००-१२५ किलोमीटर आहे व मध्ये ४० किलोमीटरचा घाट आहे. तेथे घनदाट जंगल आहे आणि अजिबात वस्ती नाही. देवळात दर्शन झाल्यावर आसपास काही ठिकाणे असतील तर पहावी व परत जावे असा विचार करत होतो कारण वाटेत गाडीच्या दृष्टीने पण मदत लागली तर सोय नाही अशी परिस्थिती होती. आम्ही परतीचा विचार करत असतानाच एक स्थानिक गाईड आला आणि मी जवळपासची ठिकाणे दाखवतो म्हणाला. आश्चर्य म्हणजे अजिबात ओळख नसतानाही मिलिंदला त्याला गाडीत घ्यायची बुद्धी झाली आणि त्याने सांगितल्याप्रमाणे गाडी वळवली. थोड्या अंतरानंतरच गाडी वळवताना ड्रायव्हर सीटच्या बाजूच्या चाकातून विशिष्ट असा आवाज येऊ लागला. त्यावेळेस अमरकंटकला मारुतीचे सर्व्हिसस्टेशन पण नव्हते आणि रविवार असल्यामुळे सगळी दुकानेपण बंद होती. आमच्या बरोबरच्या व्यक्तीने वाट दाखवत हळूहळू आम्हाला गावाबाहेर असलेल्या एका वेल्डिंगच्या दुकानापर्यंत नेले. पण तो दुकानदार मेकॅनिक नसल्यामुळे त्याला गाडीच्या फॉल्ट बद्दल काहीच लक्षात येईना. मग आमच्याबरोबर आलेल्या गाईडनेच खाली वाकून ती जागा दाखवली आणि दोन लोखंडाच्या पट्ट्या जोडून वेल्डिंग कसे करायचे ते सांगितले व ती व्यक्ती आली तशी निघूनपण गेली. यावरून सिद्ध होते की, श्रीस्वामीजींच्या भक्तांना अडीअडचणीच्या वेळेला कुठल्या ना कुठल्या रूपाने ईश्वरी मदत मिळते. फक्त प्रत्येक वेळेला ते आपल्या लक्षात येत नाही. आम्ही जर त्या दिवशी त्या व्यक्तीला

बरोबर न घेता तसेच परतीच्या वाटेला लागलो असतो तर आमची परिस्थिती खूप बिकट झाली असती, परंतु ईश्वर सतत पाठीशी आहे हे त्याने दाखवून दिले.

माझा हा अनुभव म्हणण्यापेक्षा श्रीस्वामीजींनी आपल्या भक्ताकरता केलेला चमत्कार आहे. जेथे सामान्य माणसाची बुद्धी तोकडी पडते अशी ही अकल्पनीय घटना आहे. या घटनेबद्दल लिहिताना शब्द, भावना सगळ्याच कमी पडतात असे वाटते. प्रयत्न करत आहे, हे देवा! सांभाळून घ्या.

**ए**प्रिल २०११ मध्ये आम्ही बिलासपूरला होतो. काही कामानिमित्त आम्ही जबलपूरला आलो होतो. तेव्हा माझ्या थोड्या शारीरिक कुरबुरी सुरू होत्या म्हणून जबलपूरच्या आमच्या डॉक्टरला दाखवल्यावर एक छोटेसे ऑपरेशन करावे लागेल असे तिने सांगितले. नेहमीची डॉक्टर असल्यामुळे आणि अनायसे सुट्टीवर आम्ही जबलपूरला आलेलो असल्याने लगेच शस्त्रक्रिया करायची असे ठरले. त्यावेळी शस्त्रक्रिया चालू असताना अचानक वेगळेच कॉम्प्लिकेशन्स झाल्यामुळे मला फिकल फिस्टूलाचा त्रास झाला. तिसऱ्या दिवशी अचानक खोकला येऊन माझ्या इंटेस्टाईनला पीळ पडून पोट फुगून वर आले. अतिशय वेदना होऊ लागल्या. नंतर दुसऱ्या दवाखान्यात माझा दीर सी. सी. यु. चा इन्चार्ज आहे तेथे मला शिफ्ट करावे लागले. त्याचे आणि इतर जेवढे कोणी स्पेशालीस्ट डॉक्टर बोलावले त्या सगळ्यांचे मत पडले की, इंटेस्टाईनच्या कमीत कमी दोन तरी शस्त्रक्रिया कराव्या लागतील. आधी एक मग दुसरी आणि या प्रक्रियेला दोन-सहा महिने असा अवधी लागेल. ते ऑपरेशन इतके नाजूक होते की त्याकरता दिल्ली किंवा मुंबईलाच चांगल्या सोयी

आहेत. पण त्या वेळची परिस्थिती मला हलवण्यासारखी नव्हती. माझी बहीण सौ. वैशाली ठाण्याला रहाते. तिला हे सगळे कळल्याबरोबर श्रीस्वामीजींकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे ती ताबडतोब जबलपूरला आली आणि मला भेटली. दुसऱ्या दिवशी दुपारी ऑपरेशनची वेळ ठरली होती. माझी तब्येत खूप सिरियस असल्यामुळे मला सी. सी. यु. मध्ये इन्फेक्शन होऊन कॉम्प्लीकेशन्स वाढू नये म्हणून वेगळे ठेवले होते. माझ्या हार्टजवळ सेंट्रल लाईन टाकून डॉक्टर स्थिती सांभाळण्याचा प्रयत्न करत होते. वैशालीने रात्री आल्या आल्या माझ्या कपाळाला आणि पोटाला विभूति लावली. सकाळी मी बेडवर उठून बसले होते. माझ्या इंटेस्टाईनचा पीळ सुटून आपोआप हालचाल सुरू झाली होती. सगळयांनाच खूप आश्चर्य वाटले की, ज्या पेशन्टची सर्जरी झाल्याशिवाय तब्येत सुधारणार नाही असे वाटले होते, तिची रिकव्हरी काही न करता कशी होऊ शकली. डॉक्टर चैतन्यने (माझा दीर) वैशालीला विचारले, ''तू काय आणलेस?'' यावर तिचे उत्तर होते ''**श्रीस्वामीजींचा आशीर्वाद**'' नंतर कुठलीही शस्त्रक्रिया न करता माझी तब्येत बरी झाली आणि आज मी सामान्य आयुष्य जगते आहे. माझे हे जीवन श्रीस्वामीजींनीच दिलेले आहे.

असे कितीतरी अनुभव रोजच्या छोट्या छोट्या घटनांमध्ये पण येत असतात. आज श्रीस्वामीजींच्या कृपेने, आशीर्वादाने आमची दोन्ही मुले व सूनही ईश्वरभक्ती करू लागले आहेत व आपापल्या आयुष्यात स्थिरस्थावर झालेले आहेत.

देवा तुमची अशीच कृपा व आशीर्वाद आम्हा सर्वांच्या पाठीशी असू द्यावे ही नम्र विनंती.

ॐ

# श्री. मिलींद ओक

**२००८** मध्ये गुरुपौर्णिमेच्या उत्सवाकरता म्हणून आम्हाला पहिल्यांदाच आश्रमात यायची परवानगी मिळाली. तेथे जायच्या आधी मला स्वप्नात दृष्टान्त झाला.

आम्ही दोघे, आमची दोन्ही मुले तुषार व समीर, श्री. सुनील, ऋतुजा व वैशाली मुजुमदार असे आम्ही सगळे गाडीने जात आहोत. वाटेत दोन्ही बाजूने मोठ-मोठ्या शिळा आहेत. त्या मधून एक पायवाट डोंगराकडे जात आहे. मी त्यावर चढतो आहे व वर एक मंदिर आहे. तेथे श्रीनृसिंह सरस्वती व एक दहा-बारा वर्षांचे बटु रूप दिसले. श्रीनृसिंह सरस्वतींनी त्या बटुला मिठीत घेतले. तो हुंदके देऊन रडत होता. देवाचे हे रूप बघून मी अचंबित झालो. नंतर खरच जेव्हा आश्रमात जायची वेळ आली तेव्हा जायच्या वाटेवरचा परिसर आपण स्वप्नात पाहिल्याचे जाणवले.

मी जमेल तसे पोथ्या, पुस्तकांचे वाचन आणि ईश्वरभक्ती करत असे. मला स्वप्नात अनुभव येऊ लागले. अधून-मधून स्वप्नात श्रीनवनाथ व मारुती यांचे दर्शन होऊ लागले. एकदा श्रीस्वामीजींचे दर्शन झाले आणि मी त्यांच्या पायावर डोके ठेऊन ''**दत्त महाप्रभू**'' ''**दत्त महाप्रभू**'' असे म्हणून रडत आहे असे दिसले.

एकदा स्वप्नात एक गुहा दिसली. त्यात दिव्याचा हलका शेंदरी प्रकाश पडत होता. मध्ये एक मोठी शिळा होती. त्यावर श्रीस्वामीजी, त्यांच्या उजव्या बाजूला एक ऋषी व डाव्या बाजूला श्री महाअवतार बाबांसारखे दिसणाऱ्या दिव्य पुरुषांचे दर्शन झाले.

एकदा स्वप्नात पांढरे कपडे घातलेले सूफी संत दिसले त्यांनी माझा हात धरून दार नसलेल्या भिंतीतून मला एका घरात नेले. खाली पायऱ्या उतरून गेल्यावर खूप मोठ्या हॉलमध्ये दोन मोठे पलंगवजा दिवाण होते. त्यावर तिबेटी दिसणारे दिगंबर अवस्थेतील काही दिव्य पुरुष झोपलेले दिसले. त्यांची उंची सुमारे १२-१५ फूट असावी. मला त्या सूफी संतांनी सुगंधित द्रव्य (तेल) दिले व झोपलेल्यांच्या पावलांना लावायला सांगितले. मी तसे करत असताना ते सगळे अर्धोन्मिलित नेत्रांनी बघून मंद-मंद हसत होते. त्यांना नमस्कार करून आम्ही परत तसेच भिंतीतून बाहेर आलो. पण मी भिंतीतून आत कसा शिरलो हे मात्र मला अजूनही कळले नाही.

एकदा स्वप्नात, एका परिसरात बरीच देवळे आहेत आणि तेथे पुष्कळ भगवी वस्त्रे परिधान केलेल्या व्यक्ती दिसल्या. त्यांनी स्फटिकांच्या व रुद्राक्षाच्या माळा घातल्या होत्या त्यांचे वय पण खूप असावे असे वाटत होते. मी त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि जवळ जाऊ लागलो तर ते अदृश्य झाले. तेथील एका मंदिरात जाऊन मी "**श्रीगुरुदेव दत्त**" असे उच्चारल्यावर आतून एक तेजस्वी साधू बाहेर आले. ते श्री शंकर महाराजांसारखे दिसत होते. त्यांनी मला जवळ बोलावून चार पाय असलेले चांदीचे छत्र दिले आणि मी त्यांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार करायचा खूप प्रयत्न करत होतो, हुंदके देऊन रडत होतो. परंतु मी जवळ जाऊ शकत नव्हतो आणि ते मात्र माझ्याकडे अतिशय करुणेने बघत होते.

एकदा मी व रश्मी आम्ही दोघेही रस्त्याने जात आहोत असे दिसले, तेव्हा रस्त्याच्याकडेला एक अतिशय तेजस्वी वृद्ध व्यक्ती

कुशीवर झोपलेली दिसली. आमच्याजवळ त्यांना द्यायला दुसरे काही नव्हते म्हणून मी अंगातला शर्ट काढून त्यांना दिला. त्यांनी त्याचा गोळा करून डोक्याखाली उशी सारखा ठेवला आणि पुन्हा कुशीवर झोपले.

आम्हाला वरील स्वप्नांचा अर्थ लागला नाही पण ईश्वरभक्ती केल्याने तो सतत पाठीशी असतो हे मात्र पदोपदी जाणवायला लागले.

२०१२ मध्ये माझे वडिलोपार्जित घर विकून ठाण्याला घर घ्यायचा विचार चालला होता. पण या सगळ्या व्यवहारात बऱ्याच टेक्निकल आणि भावनिक अडचणी होत्या. हा व्यवहार होणे अशक्य आहे असे वाटत असतानाच श्रीस्वामीजींनी त्यांच्या एका भक्तामार्फत अशी कृपादृष्टी टाकली की, योग नसतानाही आणि कितीतरी अडचणी आलेल्या असतानाही त्यांच्या कृपेने थोड्याच काळात बघता बघता सगळे व्यवहार सुरळीत पार पडले आणि थोड्याच अवधीत आमचे ठाण्याला घर झाले. सामान्य माणसाला अशक्य वाटणारी घटनाही श्रीस्वामीजींच्या भक्तांकरता गुरुकृपेने सहज शक्य होते हेच खरे.

२०१४ मध्ये गुरुपौर्णिमेच्या सुमारास उत्सवाकरीता आश्रमात जायचा योग आला. रोज मी मुख्य मंदिराला श्रीदत्तस्तोत्र म्हणत प्रदक्षिणा घालून नमस्कार करत असे. नंतर देवी मंदिराला तीन प्रदक्षिणा करून तेथे नमस्कार करत असे व शंकराच्या देवळात दर्शन करून नमस्कार करत असे. तीनही ठिकाणी नमस्कार करताना खाली डोके टेकून नमस्कार करत असे. त्या वेळेस आश्रमात आलेल्या एका लहान मुलाने मला सांगितले की,

काका तुमच्या कपाळाला केवढे कुंकू लागले आहे. असे मी आश्रमात असेपर्यंत प्रदक्षिणा आणि नमस्कारानंतर माझ्या कपाळाला कुंकू दिसायचे.

**श्री. मिलिंद व सौ. रश्मी ओक**

**जबलपूर**

**ॐ**

**सुवर्णमणी सोनिया । ये कल्लोळ पाणीया ।**
**तैसा मज धनंजया । शरण ये तू ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. वैशाली सांडीम

**स**द्‌गुरु श्रीस्वामीजी, सौ. वनिता आई (ॐ वनिता ॐ) यांना कोटी कोटी वंदन करून मी मला आलेले श्रीस्वामीजींच्या कृपेचे अनुभव लिहित आहे.

मी २००१ पासून श्रीस्वामीजींनी दाखविलेल्या परमपावन मार्गाचे अनुसरण करत आहे. माझ्याकडून श्रीस्वामीजींनी पाच वेळा **देवीसूक्त** व एक वेळा **देवीकवच**, **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र**, **श्रीदत्तलीलामृत**, **श्रीसिद्धलीलामृत** यांचे पाठ करून घेतले. नंतर **श्रीदेवीसूक्त** तसेच **श्रीदत्तस्तोत्राचे** १०,००० पाठ आणि इतर श्रीस्वामीजींच्या पोथ्यांचे वाचन सांगितले. तसेच २०१३ सालापासून **परमानंद लहरी**मधील एका मंत्राचे रोज १०८ असे अनुष्ठान सुरू करण्यास सांगितले व **परमानंद लहरी** पोथीही वाचण्यास सांगितले व माझ्याकडून **श्रीदुर्गास्तोत्राचे** १०,००० पाठ २०१४ पर्यंत करून घेतले. या उपासनेने श्रीस्वामीजींच्या व सौ. **ॐ वनिता ॐ** यांच्या कृपेने मला काही आध्यात्मिक अनुभव आले, त्याचेच वर्णन मी आता करत आहे. हे सर्व अनुभव म्हणजे माझ्यासाठी त्यांच्या कृपेच्या अमृत वर्षावात

आलेले प्रत्यक्षीकरणच आहेत.

**मी** एकदा स्वप्नात गोंदवल्याला गेले व तेथे झाडू मारण्याची सेवा करत होते. तेव्हा अचानक एका कोपऱ्यात माझे लक्ष गेले तर तेथे श्रीगोंदवलेकर महाराज बसलेले होते. मात्र कोणीच त्यांच्याकडे बघत नव्हते. मी धावतच जवळ गेले व त्यांना नमस्कार केला. 'थोडे पाणी व काहीतरी खाण्यास आणून देऊ का?' म्हणून विचारले. त्यांनी फक्त पाणी मागून घेतले. मग मी त्यांना विचारले, 'पाय दाबून देऊ का?' तेव्हा ते म्हणाले, ''माझी पाठ दुखत आहे, तू माझी पाठ दाबून दे.'' त्यांची पाठ दाबत असताना मी म्हणाले, 'सर्वजण समाधी मंदिरात आपल्या पादुकांचे दर्शन घेत आहेत. तुम्ही तर इथे साक्षात् आहात. तुमच्याकडे कोणाचेच कसे लक्ष नाही?' मी असे विचारताच, ते म्हणाले, ''ते मला पाहू शकत नाहीत.''

मी आश्चर्यचकीत झाले व म्हणाले,'मग महाराज मी आपल्याला कशी काय पाहू शकते?' तेव्हा ते हसून शांतपणे म्हणाले,''त्याचे असे आहे की, तुझे गुरु हे परमसिद्ध आहेत. त्यांच्या कृपाशीर्वादामुळेच तू मला पाहू शकत आहेस. त्यांच्या मार्गदर्शनानुसार जर तू नित्य उपासना करशील तर तुझे ते कल्याण करतील.'' त्यांनी मला ''पौर्णिमेचा उपवास निराहार व फक्त पाण्यावर कर.'' असे सांगितले. इतक्यात मला जाग आली. सकाळचे पाच वाजले होते. विशेष म्हणजे गेल्या आठवडाभर मी पाठ व कंबरेच्या दुखण्याने हैराण झाले होते आणि आता मात्र माझी कंबर व पाठ पूर्णपणे बरी झाली होती.

**ए**कदा रात्री ३ वाजता जाग आली. मी देवघरात झोपले होते. उठून श्रीस्वामीजींच्या फोटोकडे पाहिले, नंतर अनुलोम-विलोम प्राणायाम

केला. माझे पोथ्यांचे पारायण नुकतेच संपले होते. त्यामुळे श्रीस्वामीजींच्याच विचारात फोटोकडे पहात झोप लागली व स्वप्नात दिसले की मी कोठेतरी हिमालय पर्वताच्या पायथ्याशी आले आहे. तेथे आपली काही भक्त मंडळी होती. त्यामध्ये यशवंत होता, इतरही भक्तमंडळी होती, त्यात अरुणसरही होते.

मी सरांना विचारले, ''सर तुम्ही आम्हाला कोठे आणलेत? आम्हाला श्रीस्वामीजींचे दर्शन होईल का?'' माझे डोळे श्रीस्वामीजींना शोधत होते. सर मला म्हणाले, ''वैशाली शांतपणे इथे उभी राहा.'' इतक्यात तेथे अतिशय सुंदर गौतम बुद्धाप्रमाणे दिसणारे एक तरुण तेजस्वी योगी आमच्याकडे मंद पावले टाकत येत होते. आम्ही सर्वांनी हात जोडले इतक्यात मी मनात म्हणाले की, 'हे योगी कोण आहेत?' तर माझ्याच हृदयातून आवाज आला, 'हे श्रीमहाअवतार बाबाजी आहेत.'

हे कळताच क्षणभर मी स्तब्धच झाले व मनातच विचार केला, 'आपण त्यांच्या चरणांना स्पर्श करून नमस्कार करू शकतो का?' पण नंतर भीति वाटली की, आपली एवढी योग्यता नाही म्हणून दुरूनच गुडघ्यावर टेकून नमस्कार केला व जेव्हा वर पाहिले तेव्हा डोक्यावर श्रीमहाअवतार बाबाजींनी हात ठेवला होता. किती सुंदर क्षण होता तो. त्यांच्या दिव्य स्पर्शाने जणू दैवी लहरी आपल्या शरीरात प्रवेश करत आहेत असे वाटले. सर्वांनी त्यांचे दर्शन घेतले. नंतर ते सर्वांकडे बघून अतिशय प्रेमाने म्हणाले, ''तुम्ही सर्व भक्त श्रीस्वामीजींनी दाखवलेल्या मार्गाचे तंतोतंत अनुसरण करत आहात म्हणूनच मी तुम्हाला येथे दर्शन देण्यासाठी आलो.'' इतक्यात जाग आली. ते स्वप्न न वाटता साक्षात्, अनुभव घेतल्यासारखे वाटत होते.

**परमानंद लहरी** ही दिव्य पोथी मिळाली होती. श्रीस्वामीजींनी सांगितले होते की, तू हवी तितकी श्रीदत्त भक्ती कर, देवी भक्ती जरा जपूनच कर. त्यानंतर मी माझी नित्योपासना करत होते. श्रीस्वामीजींच्या पोथ्यांच्या पारायणामुळे मला माझ्यात अनेक बदल जाणवत होते. व्हायब्रेशन्स समजू लागले होते व एक दिवस अचानक मी अरुणसरांना विचारले की, 'मी **परमानंद लहरी** वाचू का?'

त्यावर अरुणसर म्हणाले, ''कोणत्याही एका मंत्राचे १०८ पाठ अनेक भक्त करतात. तू करून बघ. काही त्रास वाटला तर बंद कर.'' मी एक मंत्र निवडला व १०८ वेळा म्हणू लागले. काही दिवसातच माझी पाठ दुखू लागली व माझी इतर साधनाही बंद पडली. त्यानंतर मी घाबरले व नंतर त्या मंत्राचे पाठ बंद केले. श्रीस्वामीजींच्या पोथ्यांची पारायणे सुरूच होती आणि एक दिवस अचानक श्रीअरुणसरांनी सांगितले की, ''**ॐ वनिता ॐ** यांनी तुला व संध्याला **परमानंद लहरी** मधील कोणत्याही एका मंत्राचे १०८ वेळा पाठ करून बघण्यास सांगितले आहे.''

मला तर त्या पोथीला हात लावायलासुद्धा भीती वाटत होती. मी दुसऱ्या दिवशी महालक्ष्मीचा एक मंत्र निवडून म्हटला तर माझ्या कंबरेच्या मध्यभागी काही स्पंदने जाणवली मी घाबरले व सरांना म्हणाले की, 'कदाचित पाठदुखी पुन्हा सुरू झाली असे वाटते,' व मी पाठ करणे बंद केले. नंतर मात्र पुढील तीन दिवस माझी काहीच नीट साधना होईना. मन अस्वस्थ होते व ही अस्वस्थता का आहे हे कळत नव्हते. तीन दिवसानंतर माझ्या हृदयातूनच मला आवाज आला की, ''पूर्वी तू तुझ्या मनाने पाठ केले होतेस आणि आता मात्र तुला साक्षात् जगन्मातेने सांगितले आहे तर ते तू करत नाहीस म्हणून हा सर्व गोंधळ होत

आहे.''

मी ताबडतोब परमानंद लहरी पोथी काढली व दोनदा वाचली. कोणता मंत्र घ्यावा याचा विचार करत असता सत्ताविसाव्या मंत्रावर जेव्हा माझी नजर गेली तेव्हा डोळ्यातून घळघळा अश्रूधारा वाहू लागल्या, पण तो मंत्र खूप मोठा असल्याने मला तो घ्यायचा नव्हता. परंतु दुसऱ्यांदा पोथी वाचतांनाही त्या मंत्रावरून माझी नजरच हटेना. शेवटी मी त्या मंत्राचे रोज १०८ पाठ करण्यास सुरुवात केली. पाठीच्या शेवटच्या मणक्याच्या ठिकाणी मंत्र म्हणताना नेहमी स्पंदने जाणवू लागली. मी त्याला पाठदुखीच समजत होते. मात्र सरांनी मला सांगितले, ''तू काळजी करू नकोस. वाचन सुरूच ठेव.'' साधारण वर्षभर पाठ केल्यानंतर मला एक स्वप्न पडले की मी श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी गेले आहे. अचानक श्रीस्वामीजी उभे राहिले आणि त्यांच्या हातात आपोआप एक तलवार आली. ते माझ्याजवळ आले मला काही समजण्याच्या आतच त्यांनी त्या तलवारीने माझ्या शरीराचे दोन तुकडे केले. त्या तलवारीने जरी माझ्या शरीराचे दोन तुकडे झाले असले तरी माझी अंतर्चेतना पूर्णपणे जागृत होती. मी पाहिले की शरीराच्या अर्ध्या भागातून एक देवी बाहेर आली तसेच दुसऱ्या भागातूनही दुसरी देवी बाहेर आली व त्या दोन्ही देवी एकरूप झाल्या. माझे शरीर पूर्ववत एकसंध झाले व देवी माझ्या शरीरात सामावून गेली. त्यानंतर मी असे अनुभवले की सिडनीमधील सत्संगास हे अनुभव सांगत असताना बऱ्याच गोष्टींची तयारी केली नसली तरी मी एकदम व्यवस्थित बोलते, जणूकाही कोणीतरी दुसरेच माझ्या मुखाने बोलत आहे.

एकदा मला ध्यानात सौ. वनिता दीक्षित (ॐ वनिता ॐ)

या ऑरेंज कलरची बॉर्डर असलेल्या पांढऱ्या साडीत दिसल्या. मी त्यांच्यापुढे लहान मुलीप्रमाणे दिसत होती. माझा आकारही छोटा झाला होता, जणूकाही त्या माझ्या आई आहेत व मी त्यांचे दोन वर्षांचे बाळ आहे, जे नुकतेच बोलू लागले आहे. त्या मला **देवीसूक्त, नारायणीस्तुती, देवीकवच, दुर्गास्तोत्र** शिकवत आहेत असे दिसले. मला पूर्वी देवीची काही उपासना करताना जपूनच करावी लागत असे, परंतु या अनुभवानंतर देवीची उपासना करताना कोणताही त्रास झाला नाही. तसेच देवीची उपासना करतांना अतिशय आनंद वाटू लागला.

श्रीस्वामीजींची व सौ. आईंची माझ्यावर जी कृपा आहे ती माझ्या पुढील आयुष्यात तशीच राहो व प्रत्येक क्षण श्रीस्वामीजींच्याच स्मरणात जावो, ही प्रार्थना.

**सौ. वैशाली सांडीम**
**सिडनी, ऑस्ट्रेलिया**

ॐ

**ज्ञानाग्नीचेनि मुखे । जेणे जाळिली कर्मे अशेखे ।**
**तो ब्रह्मचि मनुष्यवेखे । वोळख तूं ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# सौ. मनिषा देसाई

***परिचय*** *: सौ. मनिषा देसाई, सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथे रहाते. हिने श्रीस्वामीजींना पाहिलेले नाही. केवळ पोथ्या व पुस्तके वाचून आलेले अनुभव तिच्याच शब्दात पुढे देत आहे.*

**सौ. वैशाली सांडीम**
**सिडनी, ऑस्ट्रेलिया**

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।।**

**श्री**स्वामीजींना कोटी कोटी वंदन करून त्यांच्या कृपेने आलेले अनुभव पुढे लिहित आहे. लिहिताना काही चूक झाल्यास क्षमा असावी. २०१२ मध्ये माझी मैत्रीण सौ. वैशाली सांडीमकडून मला श्रीस्वामीजींच्या पोथ्या व पुस्तके मिळाली.

माझ्याकडे मी एक तुळशीचे रोप लावले होते आणि माझ्या एका मैत्रिणीने अजून एक तुळशीचे रोप दिले व सांगितले की ही

तुळस ऑस्ट्रेलियन आहे. मी ते रोपटे तुळस समजून माझ्या तुळशीच्या कुंडीत लावले. ते तुळशीसारखेच दिसत होते. मी रोज त्याला पाणी घालू लागले. काही दिवसात ते रोपटे वाढले पण भारतीय तुळस सुकायला लागली. मला समजत नव्हते, की हे असे का होत आहे? त्यानंतर एक स्वप्न पडले व स्वप्नात असे दिसले की मी ते ऑस्ट्रेलियन तुळशीचे रोप उपटून काढत आहे आणि स्वतःशीच बोलत आहे की, या रोपट्यात चांगला आत्मा नाही आहे. त्यामुळे माझ्या तुळशीला त्रास होतोय. सकाळी उठल्यावर आपल्याला असे स्वप्न का पडले? तरीही मी ते रोपटे उपटून टाकले. रोपटे उपटून टाकल्यानंतर माझी तुळस छान वाढू लागली. काही दिवसात माझ्या वाचनात श्रीस्वामीजींचे पुस्तक आले आणि कळले की प्रत्येक झाडात आत्मा असतो, काही आत्मे चांगले असतात, काही वाईट असतात. थोड्याच दिवसात माझी मैत्रीण माझ्या घरी आली. तिने सांगितले की, ते रोपटे तुळशीचे नव्हते. त्याला विचित्र वास येतो तसेच त्या रोपट्यामुळे डास व इतर किडे येतात.

मी माझ्या फोनमध्ये श्रीस्वामीजींचा फोटो स्क्रिन सेव्हरवर ठेवते आणि बाहेर जाताना काऊंटरवर "**श्रीदत्त जय दत्त**" हा जप करते. श्रीस्वामीजींची आठवण आल्यावर मी माझा फोन बघते. असेच एकदा घराच्या बाहेर पडले. जप करत होते आणि श्रीस्वामीजींचा फोटो पहात होते. अचानक माझे लक्ष समोरच्या रस्त्यावरून येणाऱ्या छोट्या ट्रककडे गेले. तो तीन थरांमध्ये सिलेंडर्स भरलेला ट्रक अतिशय वेगाने येत होता. अचानक पार्किंगमधील एका कारने मागे न बघता रिव्हर्स घेतला.

आता तो ट्रक कारवर येऊन आदळणार असेच वाटत होते

पण अचानक जोरात ट्रकचा ब्रेक दाबला गेला आणि होणारा प्रसंग वाचला. मी हे सर्व बघत होते. त्या ट्रकचा वेग बघून मी खूप घाबरले व श्रीस्वामीजींचा फोटो हातात घेऊन म्हणाले की, 'कदाचित आता मी तुम्हाला शेवटचे बघत आहे.' असा विचार करून मी जोरातच ओरडले ''स्वामीजी वाचवा!'' आणि असा चमत्कार झाला की, प्रचंड वेगाने येणारा ट्रक ऐनवेळी ब्रेक दाबून एका फूटापेक्षाही कमी अंतरावर मोठा आवाज करत थांबला. ही घटना घडली तेथेच पार्किंग होते, जर तेथे मोठा स्फोट झाला असता तर इतर गाड्या, शॉपिंग मॉल, रस्त्यावरील इतर लोक व आम्ही सगळे या स्फोटात गेलो असतो. माझी पूर्ण श्रद्धा आहे की, श्रीस्वामीजींनीच त्या ट्रकवाल्याला वेळीच ट्रक थांबवण्याची प्रेरणा दिली. माझा आणि इतर सर्वांचा जीव त्यांनीच वाचवला.

**ए**कदा आमच्या मैत्रिणीने माझ्या कुटुंबाला घरी जेवायला बोलावले होते. त्यांना दोन मुले व एक आठ महिन्यांची मुलगी आहे. आम्ही खरंतर तिलाच पहायला गेलो होतो. ती मला प्रथमच भेटणार होती. आम्ही गेलो तेव्हा बाळ नुकतेच झोपेतून उठले होते. माझ्याबरोबर माझ्या दुसऱ्या मैत्रिणीसुद्धा होत्या. आम्ही सगळ्यांनी तिला घेण्यासाठी हात पुढे केले परंतु ती माझ्याशिवाय कोणाकडेही गेली नाही कारण माझ्या गळ्यात श्रीस्वामीजींचे लॉकेट होते. ते लॉकेट ती तिच्या इवल्याशा हातामध्ये धरून त्यावर डोके टेकवत होती. त्यानंतर ती तिच्या आई-वडिलांकडेसुद्धा जायला तयार होईना. तिच्या आईला आश्चर्याचा धक्काच बसला कारण ती तिच्याशिवाय कोणाकडेही जात नसे. दुसरे कोणीजरी घेतले तर रडत असे व माझ्याकडे ती जवळजवळ अडीच तास होती. बऱ्याच वेळानंतर खाण्याचे

आमिष दाखवून तिच्या आईने बाळाला घेतले. काही वेळाने ती माझ्या हातानेच जेवली आणि माझ्याजवळच होती. हे सर्व माझ्या बुद्धीपलीकडील होते. माझा नवरा व इतर लोकही आश्चर्यचकीत झाले होते. आपल्या घरच्यांना सोडून पहिल्यांदाच एवढी लहान मुलगी कशी काय माझ्याकडे आली आणि इतका वेळ डोके टेकून शांत राहिली.

माझी पूर्ण श्रद्धा आहे की, ती श्रीस्वामीजींच्या लॉकेटसाठीच माझ्याकडे येत होती आणि प्रत्येकवेळी लॉकेट हातात पकडून त्यावर तिचे डोके ठेवत होती. जणूकाही ती जन्मोजन्मींची श्रीस्वामीजींच्या दर्शनाची वाट पहाणारी भक्त असावी व आज तिची इच्छा पूर्ण झाली.

माझ्या भावाचे बरेच वर्ष लग्न ठरत नव्हते. बरेचसे प्रॉब्लेम्स होते. मी माझ्या आईला पोथ्या पाठविल्या. ज्या दिवशी पोथ्या पोहोचल्या त्याच दिवशी त्यांना कळले की, एका मुलीची पत्रिका जुळते हे ऐकून आईची श्रद्धा अजून दृढ झाली. तिने चाळीस दिवसाचे **श्रीसंक्षिप्त गुरुचरित्राचे** पारायण करायचे ठरविले आणि चाळीस दिवसात भावाचे लग्न ठरून त्याचा साखरपुडाही झाला. हे सगळं सांगताना आई मला म्हणाली, ''या पोथ्या इतक्या दिव्य आहेत की, त्या घरात येताच संकटे एकापाठोपाठ पळून जायला लागली.''

**मी** सिडनीमध्ये रहाते. मी बरीच वर्षे नोकरीसाठी प्रयत्न करीत होते परंतु यश येत नव्हते. पोथ्या वाचू लागल्यानंतर श्रीस्वामीजींच्या कृपेने मला ब्लड कलेक्टरची नोकरी मिळाली. माझे काम पेशन्टचे रक्त ट्यूबमध्ये घेऊन त्यावर पेशन्टचे नांव जन्म तारीख व त्याचा बारकोड लावून लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवायचे. असेच

एकदा Homebush या नगरात मला एका डॉक्टरच्या क्लिनिकमध्ये पाठविले. तिथे डॉक्टर स्वतः रक्त जमा करून फक्त लेबलींगसाठी माझ्याकडे पाठवायचे. त्यादिवशी मी माझे काम संपवून घरी आले. संध्याकाळी मी श्रीस्वामीजींच्या पोथ्या वाचत होते, एवढ्यात माझ्या मॅनेजरचा फोन आला. ती अतिशय रागात होती. ती म्हणाली मी एका अर्जन्ट रक्ताच्या सॅम्पलला लेबल लावले नाही त्यामुळे त्या पेशन्टच्या जीवावर बेतले होते, त्याला हार्ट अॅटॅक येण्याची शक्यता होती. हे खूपच सिरियस आहे म्हणून डॉक्टर खूप रागावले व म्हणाले, ''आम्ही तुला कामावरून काढून टाकणार आहोत. उद्या येऊन तू तुझा गुन्हा कबूल करून साईन कर.'' हे ऐकून मला खूपच रडू आले. तिने फोन ठेवला. मी पोथ्या वाचून श्रीस्वामीजींना प्रार्थना केली व मॅनेजरला फोन करून सांगितले, ''तुम्ही म्हणता तसे आज अर्जन्ट रक्ताचे सॅम्पल माझ्याकडे आलेच नाहीत. शिवाय आज दुपारी मी तिकडे गेले होते. डॉक्टरांनी मला पाहिलेसुद्धा नाही. मी बाहेर बसून लेबलींगचे काम सुरू केले. तुम्ही जी टेस्ट सांगितली त्याप्रकारची टेस्ट केल्याचे मला मुळीच आठवत नाही, त्यामुळे मी कोणत्याही पेपरवर सही करणार नाही.'' मी त्यांना नम्रपणे विनंती केली की, ''तुम्ही या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी करा.'' तिने रागावून फोन ठेवला.

दुसऱ्या दिवशी मला कामावर बोलावले नाही, त्यामुळे मी खूपच दुःखी झाले होते पण मला आतून आशा वाटत होती तसेच श्रीस्वामीजींवर श्रद्धाही होती. सकाळी सात वाजता फोन वाजला. फोन माझ्या सर्वात मोठ्या मॅनेजरने केला होता. तिने प्रथम माझी माफी मागितली व खुलासा केला की, ''सकाळी ड्युटीवर आलेल्या मुलीकडून चूक झाली होती. तुझ्या कामाचे तर ते कौतुकच करत

होते. तू उद्यापासून कामाला येऊ शकतेस.'' मला खूप आनंद झाला मी हात जोडून श्रीस्वामीजींचे आभार मानले. तेथे दहा वर्षे काम करणाऱ्या माझ्या मैत्रिणीला जेव्हा ही हकीकत सांगितली. तेव्हा ती मैत्रिण म्हणाली, ''तू खूप नशिबवान आहेस. एका रात्रीत त्यांना कसे काय हे सगळे कळले? हा प्रॉब्लेम सुटण्यासाठी कमीत कमी दोन-तीन दिवस लागतात आणि इतकी चौकशी ते जुन्या परमनन्ट लोकांसाठीच करतात. तुझ्यासारख्या लोकांना ते मुळीच विचारात घेत नाहीत आणि मोठी मॅनेजर स्वतः तुला फोन करून माफी मागते, बोलते हे सगळेच माझ्यासाठी अजब आहे.'' मी मनातच म्हणाले, हे सर्व माझ्यासाठी श्रीस्वामीजींनीच घडवले आहे यात शंकाच नाही.

मी गरोदर असल्याचे जेव्हा मला कळले तेव्हा मला खूप काळजी वाटू लागली. कारण नोकरीला लागून फक्त सहा महिने झाले होते म्हणून मी या बातमीने आनंदित झाले नव्हते. परंतु त्याच रात्री मला प्रथमच स्वप्नात श्रीस्वामीजींचे दर्शन झाले. मी सर्व सौभाग्य अलंकार घालून नऊवारी साडी नेसून श्रीस्वामीजींच्या दर्शनाला गेले आहे. त्यांना नमस्कार केल्यानंतर त्यांनी माझ्या ओटीत प्रसाद म्हणून नारळ दिला व माझे स्वप्न संपले. उठल्यानंतर मला वाटले नक्कीच होणारे बाळ खूप भाग्यवान असेल. मला श्रीस्वामीजींचे प्रथमच स्वप्नात दर्शन झाले म्हणून मी फार आनंदित झाले. त्यानंतर मला उलट्यांचा खूप त्रास होऊ लागला. मला पोथी वाचणे अशक्य होते म्हणून मी माझ्या नवऱ्याला विचारले की, ''तू माझ्यासाठी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचशील का?'' तो 'हो' म्हणाला, त्यानंतर असा अनुभव आला की ज्या दिवशी तो पोथी वाचीत नसे, त्यादिवशी मला खूप त्रास होत असे. ते बघून माझ्या नवऱ्याने दररोज पोथी

वाचून श्रीस्वामीजींची विभूति मला लावण्यास सुरुवात केली. तेव्हा मला बरे वाटले. नऊ महिने मी सतत "**श्रीदत्त जय दत्त**" जप केला. जमेल तसे पोथ्या व पुस्तकांचे वाचन केले. डॉक्टरने सिझेरीयन करण्यास सांगितले. तारीख निश्चित झाली. डिलीव्हरीमध्ये खूप प्रॉब्लेम आले. मी नवऱ्याला माझे लॉकेट दिले व सतत श्रीस्वामीजींची प्रार्थना करत होते. बाळ झाल्यानंतर ते नीट रडत नव्हते तेव्हा माझ्या नवऱ्याने त्याला श्रीस्वामीजींचे लॉकेट दाखवले व कानात "**श्रीदत्त जय दत्त**" म्हटले. त्याबरोबर तो मोठ्याने रडला. मात्र त्यानंतर दूध पाजताना, झोपवताना मला नेहमीच जप करावा लागतो. नाहीतर तो खूपच त्रास देतो व त्याच्या वडिलांना रोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचावे लागते. माझ्या मुलाचे नांव मी आशय ठेवले आहे. आशय १२ दिवसांचा असताना आमच्याकडे गुरुपौर्णिमेनिमित्त सत्संग होणार होता व सर्वजण दत्तगीते म्हणून नैवेद्य तयार करून आनंदाने गुरुपौर्णिमा साजरी करणार होते. मला सत्संगला जाण्याची फार इच्छा होती. मी संध्याला फोन करून सांगितले. तेव्हा ती म्हणाली अरुणसरांनी सांगितले आहे की ४० दिवसानंतर तू पुन्हा सत्संगला ये. मला वाईट वाटले. कारण मला सत्संग चुकवायला मुळीच आवडत नाही. दुसऱ्या दिवशी वैशाली व विशाल माझ्याकडे श्रीस्वामीजींचा प्रसाद घेऊन आले. वैशाली मला म्हणाली, "काल आम्ही तुझी खूप आठवण काढली." श्रीगुरुपौर्णिमा सर्व भक्तांनी खूप आनंदाने साजरी केली. तेव्हा मी तिला गुरुपौर्णिमेच्या दिवशी पहाटे पडलेले स्वप्न सांगितले. मी पाहिले की, श्रीस्वामीजी माझ्या घरी आले आहेत व मला म्हणाले की, "मनिषा! तुझी इच्छा आहे ना माझी पूजा करण्याची. हा बघ मी चौरंगावर बसतो. तू पूजा कर." मी म्हणाले, "मला पूजा कशी करता येईल कारण बाळ होऊन अजून ४० दिवस झालेले नाहीत." त्यांनी सांगितले, "त्याची काळजी

तू करू नकोस.''

मग मी अत्यंत आनंदाने मला हवी तशी श्रीस्वामीजींच्या पादुकांची पूजा केली. ते स्वप्न नसून प्रत्यक्ष अनुभव होता कारण पूर्ण दिवसभर मी त्याच आनंदात होते.

वैशाली हे ऐकून खूपच आनंदित झाली व म्हणाली, ''मनिषा आपले श्रीस्वामीजी सगळ्या बंधनाच्या पलीकडचे आहेत. जर तुमची श्रद्धा व भाव खरा असेल तर तुमच्यासाठी सदैव चराचरात व्यापून आहेत. परंतु त्यासाठी तुझ्यासारखा भक्तिभाव हवा. मला तुझे फारच कौतुक वाटत आहे.''

हे ऐकून मी खूप आनंदित झाले व माझ्यासाठी श्रीस्वामीजी सिडनीमध्ये प्रकट झाले हे बघून माझ्या डोळ्यातील पाणी थांबत नव्हते.

**सौ. मनिषा देसाई**

**सिडनी (ऑस्ट्रेलिया)**

ॐ

**अमरी भाट होईजे । मग मृत्यू लोकाते वानिजे ।**
**ऐसे जन्म पार्थागा जे । ते तो पावे ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# डॉक्टर मिलिंद पाटील

**मा**झे नांव मिलिंद पाटील. आमच्या घरातील वातावरण दत्तभक्तीमय होते. लहानपणापासून श्रीदत्तभक्तीची ओढ होती. **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ३** वाचनात आले आणि अनेक माहीत नसलेल्या गोष्टींचा उलगडा झाला. पुस्तके वाचल्यानंतर श्रीस्वामीजींना भेटण्याची इच्छा मनात निर्माण झाली आणि शोध घेत वनिता बुक्समध्ये पोहोचलो. तेथे श्री. दाभोळकरकाकांची भेट झाली. त्यांच्याकडे श्रीस्वामीजींच्या दर्शनाची इच्छा प्रकट केली. तसेच सौ. दीक्षितताईंनाही भेटण्याची इच्छा प्रकट केली. त्यांनी श्रीस्वामीजी अरण्यात असतात व सौ. ताईसुद्धा भेटत नाहीत असे सांगितले. श्री. दाभोळकरकाकांच्या सांगण्यानुसार साधना करू लागलो. तेव्हापासून स्वतःमध्ये खूप बदल झाला. दानाची व परोपकाराची भावना निर्माण झाली. **श्रीसिद्धलीलामृत** व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** या पोथ्यांचे वाचन चालू होते. एकदा घरी झोपलो असताना स्वप्नामध्ये रात्री सहा फूट उंचीचा पांढरा शुभ्र प्रकाश दिसला. त्यावेळी त्याचा अर्थ कळला नाही. नंतर मला Orthopedic Post Graduation मध्ये

admission मिळाली. कामाच्या व्यापामुळे दोन वर्षे साधना जरा कमी झाली पण दाभोळकरकाकांच्या सदैव संपर्कात होतो. नंतर Post Graduation Exam च्या वेळी दररोज एक तासच साधना होत होती. एके दिवशी पूजा करताना ऋषींचे दर्शन झाले व लगेच दुसऱ्या दिवशी दाभोळकरकाकांचा फोन आला की, ''श्रीस्वामीजींचा फोटो घेऊन जा!'' फोटो बघितल्यावर जाणवले की, मला दर्शन झालेले ऋषी हेच होते. तेव्हापासून देवघरामध्ये श्रीस्वामीजींचा फोटो फ्रेम करून त्याची स्थापना केली. रिझल्टच्या दिवशी शुक्रवारी पहाटेच सप्तशृंगी देवीचे स्वप्नात दर्शन झाले व तिने सांगितले की, ''तू पास झाला आहेस.'' रिझल्ट बघितल्यावर मनातील भीती दूर झाली. श्रीस्वामीजींच्या कृपेनेच मी पास झालो. मी मनोमन देवीचे आभार मानले. २००७ मध्ये श्रीदत्तजयंतीला आश्रमात येण्याची परवानगी मिळाली. नंतर २००८ला गुरुपौर्णिमेलाही जाण्याची संधी मिळाली. परंतु श्रीदत्तजयंतीला जाता आले नाही म्हणून मन नाराज होते. श्रीदत्तजयंतीच्या दिवशी स्वप्नात श्रीस्वामीजींचे दर्शन झाले. २००९ मध्ये Kalyan-Dombivali Municipal Corporation च्या हॉस्पिटलमध्ये Medical Officer चा जॉब मिळाला. त्याच सोबत दुसऱ्या डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये Consultant Orthopedic Surgeon म्हणून काम करू लागलो.

**ए**कदा गुरुपौर्णिमेला आश्रमात श्रीस्वामीजींचे प्रथमच दर्शन झाले. त्याच रात्री परत श्रीस्वामीजींचे स्वप्नात दर्शन झाले व मन कृतार्थ झाले. मी सत्संग चालू झाल्यापासून दादरला दर महिन्याच्या पहिल्या रविवारी जात असे व प्रारब्धशुद्धीसाठी दानधर्म करत असे. त्याच दरम्यान श्रीस्वामीजींचे स्वप्नात दर्शन झाले व त्यांनी सांगितले

की, ''सध्या आश्रमात येऊ नकोस.'' मला खूप वाईट वाटले परंतु रात्री स्वप्नात परत दर्शन झाले. श्रीस्वामीजी म्हणाले, ''मी सदैव तुझ्याजवळ आहे.'' त्यानंतर आश्रमात येण्याची परवानगी मिळाली. श्रीस्वामीजींच्या कृपेने थोडी हिम्मत करून व थोडे पैसे जमवून कल्याण पूर्व येथे भाडे तत्त्वावर हॉस्पिटल चालू केले. हळूहळू प्रॅक्टीस वाढली व आता हॉस्पिटलची स्वतःची जागा आणि कल्याण पूर्वमध्ये घर बुक केले. हे सर्व श्रीस्वामीजींच्या कृपेमुळेच प्राप्त होऊ शकले.

**मी** साधना सुरू केल्यावर पाठीमध्ये ऊर्जा वर सरकल्या प्रमाणे जाणीव होते व शरीराला कंप जाणवतात. सध्या रोज ध्यान करतो. कूटस्थाच्या जागी निळा गोल दिसतो. कधी कधी पिवळा सोनेरी प्रकाश तर कधी कधी दोन सेंटीमीटर उंचीची ज्योतही दिसते. दररोज ध्यानामध्ये श्रीस्वामीजींची तसेच सौ. ताईंची मानस पूजा, चरण पूजा करून मग **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन करतो. बऱ्याचवेळा श्रीस्वामीजींचे तसेच सौ. ताईंचे स्वप्नात दर्शन होते. तसेच पाच-सहा वेळेला सप्तशृंगी देवीचे दर्शन झाले.

**ए**कदा स्वप्नात श्रीस्वामीजी आश्रमात आले असून आठ-दहा लोक त्यांच्याबरोबर बसलेले दिसले. श्री. दाभोळकरकाकांना स्वप्नाबद्दल सांगितले व श्रीस्वामीजी आश्रमात आले आहेत का? म्हणून विचारले, ''मी चौकशी करून सांगतो.'' असे श्री. दाभोळकर काका म्हणाले. थोड्या वेळाने दाभोळकर काकांचा फोन आला. ''श्रीस्वामीजी आताच आश्रमात आले आहेत. तू येऊन जा म्हणून सांगितले आहे.''

आश्रमात श्रीस्वामीजींचा सहवास प्रथमच मिळाला, तसेच त्यांना ट्रिटमेंट करण्याचे भाग्यही मला लाभले. त्यावेळी श्रीस्वामीजी

म्हणाले की, ''मी आश्रमात आल्यावर तुला दर्शनासाठी नक्की बोलावणार. तू हवन, स्तोत्रपठण चालूच ठेव व तुला आलेले अनुभव लिहून पाठव.'' श्रीस्वामीजींना माझी एकच प्रार्थना आहे की, ''मला सदैव तुमच्या चरणी राहू द्या व माझ्याकडून चांगले कार्य करून घ्या.''

**डॉ. मिलिंद पाटील.**

**कल्याण**

ॐ

**तेथ सोऽहम् मंत्रे दीक्षिती ।**
**इंद्रिय कर्माचिया आहुति ।**
**इये ज्ञाननळी प्रदीप्ती ।**
**दिधलिया ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

# प्रकाशकाचे निवेदन

**श्री**स्वामीजी कोणालाही भेटत नाहीत ते सदैव एकान्त-वासात राहून जगद्कल्याणार्थ साधना, तपस्या करत रहातात. ईश्वराला व देव-देवतांना आळवतात. सर्वांना आरोग्याचा लाभ व्हावा, गोर-गरीबांना अन्न, वस्त्र, निवारा यांची प्राप्ती व्हावी, गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना सद्बुद्धी मिळावी, पूर्वजांचा उद्धार व्हावा अशा सदिच्छेने ते गेली चाळीस वर्षे एकान्तवासात राहून तपस्या करत आहेत. त्यांच्या तपस्येचे फळ म्हणून जे काही त्यांना प्राप्त झाले ते त्यांनी पोथ्या व पुस्तकांच्या आधारे जगाला दिले. याचा लोकांना खूप लाभ झाला. लाखो लोकांचे कल्याण झाले त्यांच्या मनोकामना पूर्ण झाल्या.

पोथ्या व पुस्तके वाचून आलेले अनुभव सांगणारी लाखो पत्रे जगभरातून आमच्या ऑफिसमध्ये आली. त्यातील निवडक पत्रातील अनुभव **श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्धयोग्याच्या सहवासात भाग १ व भाग २** मध्ये तसेच **ईश्वरभक्तीचे अनुभव** या पुस्तकांमध्ये प्रकाशित केले आहेत. अशी १०० पुस्तके प्रकाशित करता येतील

इतके अनुभव आमच्याकडे आहेत परंतु तेवढा वेळ आमच्याकडे नाही व जेवढे अनुभव आम्ही प्रकाशित केले आहेत, तेवढ्यावरून माणसाला बरेच काही शिकता येईल म्हणून लोकांचे अनुभव प्रकाशित करण्याचे आम्ही आता बंद करत आहोत. तरी कृपया आमच्याकडे पत्रे पाठवू नयेत अशी विनंती आहे. सर्वांनी ईश्वरभक्ती करत रहावी. परोपकार व दान-धर्म करावा व स्वतःचे कल्याण करून घ्यावे.

**प्रकाशक**

**ॐ वनिता ॐ**

**प्रभु आपण शंकर ।**
**मी पूजितो पामर ।**
**मम बोल अरण्यपत्र ।**
**बेल म्हणोनि स्विकारावे ।।**
**।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।**

ॐ

# समाप्त

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।

**परोपकारार्थं इदं शरीरम्।**

**ईश चिंतनार्थं इदं मनः ।**

**विवेकार्थं इदं बुद्धिः ।**

ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।

शरीर परोपकार करण्यासाठी आहे.

मन ईश्वर चिंतनासाठी आहे.

बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)

यांचा विचार करण्यासाठी आहे.

**जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.**

।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।